# लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे



डॉ. कृष्णा इंगोले

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे

डॉ. कृष्णा इंगोले

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती**
जानेवारी २००४

**प्रकाशक**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई – ४०० ०१४.

© **प्रकाशकाधीन**

• डॉ. कृष्णा इंगोले.
१०३२/५ 'माणदेश' लोहार गल्ली, सांगोला.
जि. सोलापूर ४१३३०७, दुरध्वनी ०२१८७ – २२०५९३.

**मुद्रक**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे.

**मुखपृष्ठ :**
श्री. राजा बडसल

**किंमत : रूपये** – १००/-

## अनुक्रमणिका

# निवेदन

"लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे" ही डॉ. कृष्णा इंगोले यांनी लोकगीतावर लिहिलेल्या लेखांची मालिका. या मालिकेत त्यांनी लेकीच्या जन्मापासून ते तिच्या आहेव मरणापर्यंतचा सारा जीवनपट उलगडून दाखविला आहे. या मालिकेतील प्रत्येक लेख स्वतंत्र व स्वयंपूर्ण असूनही मालिकेचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक लेखाने स्त्रीचं वेगळं रूप साकारलेलं आहे. त्यामुळे या लेखांतून स्त्रीची वेगळी रूपे आपल्यासमोर साकारतात. या सर्वच लेखातून पारंपरिक ग्रामीण स्त्रीचं भावविश्व उलगडत जातं.

या लेखातील गीतं माणदेशी व माणदेशाच्या आसपासच्या परिसरातून संकलित केल्याचं लेखकाचं म्हणणं आहे. मात्र महाराष्ट्राच्या इतर भागात ही लोकगीते सापडणारच नाही असा लेखकाचा मुळीच दावा नाही. आज प्रसार माध्यमाचा एवढा सुळसुळाट होऊनही एका परिसरातील गीत दुसऱ्या परिसरात जाणं अवघड झालेलं आहे. ज्या काळात ही लोकगीतं निर्माण झाली त्या काळात प्रसाराचं केवळ मौखिक माध्यम उपलब्ध असतानाही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भूभागात सारखीच गीतं का आढळतात हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र लोकसाहित्यशास्त्र निर्माण होण्याची आवश्यकता डॉ. कृष्णा इंगोले यांनी या पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रास्ताविकात नमूद केली आहे. अशा स्वरूपाचं लोकसाहित्यशास्त्र निर्माण होण्याचे दिवस आता फारसे दूर राहिलेले नाहीत.

लोकसाहित्याचा व लोकजीवनाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे.

मुंबई
दिनांक १८ जून, २००३.

रा. रं. बोराडे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

भागीरथी आई!
तू आणि तुझ्यासारख्या
असंख्य माता माऊलींनी जपून
ठेवलेले परंपरेतले हे लोकधन.
ज्यातून तुझीच जीवन कहाणी आली आहे. म्हणून
तुलाच अर्पण.

कृष्णा

# अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ४
प्रस्तावना — ........ ९
लेकीचा जलम ........ ३१
मोठं या मोठं डोळं ........ ३३
तिचा चंदन मव्हरला ........ ३५
साळूला मागईन ........ ३७
मांडवाच्या दारी ........ ४०
अशी सुरत अनिवार ........ ४२
आधी हळद लावा ........ ४५
घुम घुम रे मांडवळा ........ ४८
साळू निघाली सासऱ्याला ........ ५१
ऋतुवंते सखे ग तू न्हाणुले ........ ५५
मला गुदगुली झाली ........ ५८
गोरीया लेणं लेती ........ ६०
लेणं कंथाच्या राजाचं ........ ६२
बारीक बांगयडी ........ ६५
काळीया चंद्रकळा ........ ६७
बंधुजी घेतो चोळी ........ ७०
असं सासर द्वाड बाई ........ ७३
साळूला सासुरवास ........ ७५
भरताराचं सुख ........ ७८
चुडा माझा राजस ........ ८१
मैनाबाईला डोहाळे ........ ८४
जो बाळा रे जो ........ ८८
नेणंता बाळ माझा ........ ९१
छंदखोर बाळा ........ ९५
शाळेतल्या हरियीला ........ ९९
उगवला नारायण ........ १०१

सकाळच्या पाऱ्यामंदी ........ १०४
दिवस मावळला ........ १०७
पंचमीच्या सणाला नाग मी पुजीला ........ १११
ये गं ये गं गवराबाई ........ ११५
कृष्णाचा झाला जन्म ........ ११७
सण आला पोळा ........ ११९
बळीचे राज्य येऊ दे ........ १२२
ओवाळीते भाऊराया ........ १२५
तुळशीबाईचं लगीन ........ १२८
इंद्रायणीकाठी सोन्याचा पिंपळ ........ १३१
एवढी कारंडी मायबाई ........ १३४
नांद्रुकीच्या झाडाखाली तुकारामांची झोपडी ........ १३८
जिजामातेच्या पोटी जन्मला हिरा ........ १४१
शिखरीचा शंभू ........ १४४
पंढरीची वाट ........ १४७
रूसली रूक्मिण ........ १५१
पंढरीला जाती विठूच्या दर्शनाला ........ १५४
मेघराजाचं लगीन ........ १५८
चाड्यावरीया मूठ ........ १६२
शिवच्या शेतामंदी ........ १६६
भरल्या बाजारात ........ १७०
मुंबई शहरामंदी ........ १७३
वाणीचा बंधू माझा ........ १७६
ओवी माता माऊलीला ........ १८१
गवळी माझा नाना ........ १८५
शेजारीन सया ........ १८९
तुला माझा भाऊपणा ........ १९३
पान खाण्याचा छंद मोठा ........ १९७
गावाला गेलं म्हणू ........ २००
कंथ माझा दारूच्या धुंदीत ........ २०३

नखऱ्याची नार ........................................ २०६
पराया नारीसाठी ........................................ २०९
दुबळ्या संसाराची ........................................ २१२
जीवाला जडभारी ........................................ २१५
लक्ष्मी आली घरा ........................................ २१९
बंधुला झाला लेक ........................................ २२२
बंधू इवाई करू गेले ........................................ २२५
अहेव मेली नार ........................................ २२९
कामामंदी काम ........................................ २३४
बारीक माझा गळा ........................................ २३७
सरलं दळण ........................................ २४०

## लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे

### प्रस्तावना –

आस्वादक पध्दतीने स्त्रीगीतांतून स्त्रीजीवन मांडण्याचा हा प्रयत्न आहे. लेकीच्या जन्मापासून तिच्या अहेव मरणापर्यंतचा सारा जीवनपट उलगडून दाखविला आहे. ही लेखमाला असल्याने यातील प्रत्येक लेख स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहे. त्या त्या प्रसंगाचे भावविश्व त्या लेखातून व गीतातून साकार झाले आहे. प्रत्येक लेख स्त्री जीवन साखळीतील महत्त्वपूर्ण भावानुभव आहे. रत्नजडीत मण्याच्या माळेतील प्रत्येक मणी जसा सुटा स्वयंपूर्ण असतो तसाच माळेतील महत्त्वपूर्ण घटकही असतो किंवा खंडकाव्यातील प्रत्येक कविता स्वयंपूर्ण असूनही कथाकाव्यांचा ती भाग असते तसे या ग्रंथातील लेखाचे स्वरूप आहे. स्त्रीगीताची संकलने विपुल झाली असली तरी मांडणी नवीन आहे. पारंपरिक ग्रामीण स्त्रीजीवनाचे समग्र भावविश्व सूत्ररूपाने येथे मांडले आहे.

दुसरे असे की, मैनाबाई नावाचे एक प्रातिनिधिक पात्र कल्पीले असून तिच्या जीवनातून विकसीत होत गेलेली गाथा मांडली आहे. हे लेखन सुटे सुटे केले असल्याने क्वचित कुठे तुटकपणा जाणवत असला तरी स्थूलमानाने व समग्रपणे पाहिले तर ती मैनाबाईच्या जीवनाची कथा आहे. लोकगीते सामुहिक जीवनाचे दर्शन घडवितात. अर्धशतकापूर्वीच्या ग्रामीण स्त्रीजीवनाची ही प्रातिनिधिक कथा ठरते. स्त्रीगीतातून साकार होणारी ही एक कादंबरीच आहे.

ललित साहित्यात व्यक्तिनिष्ठ भावनांचा आविष्कार असतो तर लोकसाहित्यात सामुहिक भावनांचा आविष्कार होतो असे म्हटले जाते. ललित साहित्यातील व्यक्तिनिष्ठ पातळीवरील चित्रण सार्वत्रिक पातळीवर पोहोचलेले असते, म्हणूनच ते सर्वांना आस्वाद्य वाटते. लोकसाहित्यात समूहमनाचा आविष्कार होतो, पण म्हणणाऱ्या वा ऐकणाऱ्या व्यक्तीच्या अनुभवाचाच तो भाग असतो. त्यांची मूळ निर्मिती व्यक्तिनिष्ठच असते. त्याला समूहमान्यता मिळाल्यामुळे लोकसाहित्याचा दर्जा प्राप्त होतो. या दृष्टीने पाहिले तर हा ग्रंथ लोकगीतातील ललित साहित्य आहे. वर मी कादंबरी आहे म्हटले ते याच अर्थाने.

या ग्रंथातील गीते स्वतंत्रपणे माणदेश व परिसरातून संकलीत केली आहेत. भावानुभव सांधण्यासाठी क्वचित एखादी दुसरी ओवी पूर्वसंकलनातून वापरली आहे. नाही तर हे स्वतंत्र संकलन आहे. माडगूळकर बंधू व शंकरराव खरातांनी साहित्यातून साकार केलेल्या माणदेशाच्या अधिक माहितीसाठी प्रस्तुत लेखकाचे 'माणदेश : स्वरूप आणि समस्या' हे पुस्तक पाहवे. माणदेशावरचे एक लोकगीत असे –

असं माणदेशाचं उन । तिथं नदी वाहते माण ॥
माळासोबत काळरान । मटकी बाजरीची खाण ॥
असं माणदेशाचं उन । तिथं बोरीबाभळीचं बन ॥
लिंब हिरवा बेगडीपान । आणली बंधुजीनं चोळी छानं ॥
असं माणदेशाचं उन । तिथं चरती मेंढर खिल्लार ॥
जशी तळपती तलवार ।
असं माणदेशाचं उन । बांधावर नेपतडी छान ॥

अनुक्रमणिका

निरगुडीचं पांढरं पान । काळा इथला विठूचा पाषाण ॥
असं माणदेशाचं उन । माझ्या मव्हन्या राघुबानं ॥
आणलं डाळिंबाचं बन ।
असं माणदेशाचं उन । लालचुटूक डाळिंबं छान ॥
माझ्या मव्हण्या राघुबानं । दिलं धरतीला लाल कुंकवाचं दान ॥

या स्त्रीगीतात माणदेशाची सारी वैशिष्ट्ये आली आहेत. एखादा ग्रंथ लिहून जे सांगता येणार नाही ते हे लोकगीत माणदेशाविषयी बरेच काही सांगून जाते. या संकलनाला माणदेशाची प्रादेशिक स्थलविशिष्टता असली तरी लोकगीताच्या स्थलांतर क्षमतेमुळे थोड्या फार फरकाने ही गीते सर्वत्र आढळतील. त्यामुळे संपूर्ण मराठी स्त्री जीवनाचेच हे चित्र ठरते.

**लोकसांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास** –

लोकसाहित्य हे अभ्यासाचे स्वतंत्र क्षेत्र आहे. त्यात लोकजीवनाच्या समग्र भौतिक आणि आधिभौतिक लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. अभ्यासाच्या सोयीसाठी प्रत्येकजण वेगवेगळ्या पध्दतीने लोकसाहित्याचा अभ्यास करतात. आजच्या विशेषीकरणाच्या काळात ते योग्यही ठरते. पण मुळात लोकजीवन व लोकसंस्कृती एकसंधच असते. लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र लोकसाहित्यशास्त्र निर्माण होण्याची आवश्यकता आहे. लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीचा साकल्याने अभ्यास करणेच योग्य ठरेल. पाश्चात्य देशात लोकसांस्कृतिक दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास होऊ लागला आहे. वेल्समधील लार्वथ पीट, अमेरिकेतील डॉन योडेर, पाश्चात्य देशातील हॅन्री ग्लॅसी, मायकेल ओ जोन्स, डॉरसन इ. अभ्यासकांचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत. मराठीतील लोकसाहित्याचा असा अभ्यास होण्याची गरज आहे.

अलिकडे महाराष्ट्रातील विद्यापीठातून मराठीचा एक विषय म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास होत आहे. जसे अभिजनांचे ललित साहित्य असते तसे ग्रामीण लोकांचे लोकसाहित्य असते. संत साहित्यापासून ग्रामीण, दलित या नव्या साहित्य प्रवाहापर्यंत, कथा, कादंबरी, नाटक, कविता यासारख्या विविध वाङ्मय प्रकारातून अभिव्यक्त होत असलेले साहित्य हे अभिजनांचे ललित साहित्य होय. ते व्यक्तिनिष्ठ, भावनाप्रधान, कल्पनारम्य, अनुभवनिष्ठ, नवनिर्मितीक्षम, जीवन रहस्यांचा व मानवी मनाचा वेध घेणारे, भाषेचा कलात्मक वापर करणारे साहित्य असते तर लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालत आलेले, समूहनिर्मित, युगानुयुगाच्या मानवी अनुभवाचे साररूप ज्ञान सांगणारे, समूहमनाचा, लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आविष्कार घडविणारे, ग्रामीण बोलीचा सहजतेने वापर करणारे असते. त्यात पूर्वकालीन जीवनाचे अर्थपूर्ण अवशेष आढळतात. लोकसाहित्य लोकमानसावर संस्कार करीत त्यांचे मानसिक भरणपोषण करीत असते. लोककलांचा आश्रय घेऊन लोकरंजन करीत लोकशिक्षण व लोकप्रबोधन करीत असते. लोकसंस्कृतीचे सातत्य टिकविते. अभिजनांच्या साहित्य व कलांचा तो मूळ स्त्रोत असून संभ्रमावस्थेत ते नवे पाथेय पुरविते. लोकजीवनात जे जे येते त्या सर्वांचा समावेश लोकसंस्कृतीत पर्यायाने लोकसाहित्यात होतो. आजच्या लोकशाहीच्या काळात जसा राजेरजवाड्यांच्या इतिहासापेक्षा लोकांचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास महत्त्वाचा मानला जातो तसेच अभिजनांच्या साहित्यकलापेक्षा लोकांच्या कला व साहित्याला महत्त्व प्राप्त होत आहे.

**लोकसाहित्याचे प्रकार –**

लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, लोकनाट्य, लोकश्रध्दा, लोकसमजुती, लोकरूढी, लोककला इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश होतो. त्यात लोकगीतांचे दालन सर्वाधिक समृद्ध आणि संपन्न आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकगीते असे वाटण्याइतपत लोकगीतांची संख्या विपुल आहे. पारंपरिक लोकजीवनाचे एकही अंग असे नाही की ज्यावर लोकगीत निर्माण झालेले नाही. म्हणजे लोकगीते समग्र लोकजीवनाला व्यापून राहिलेले दिसतात. त्यातही लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या सर्वाधिक आहे. या ग्रंथात स्त्रीगीतांचाच परामर्श घेतला आहे.

**स्त्रीगीताची प्राचीनता –**

कोणत्याही भाषेत ललित साहित्याच्या अगोदर लोकसाहित्य निर्माण होत असते. वेदांना श्रुती म्हणतात. वेद हे आद्य भारतीय लोकसाहित्य आहे. वेदातील सूक्ते म्हणजे लोकगीतांची आद्य संकलनेच आहेत. ऋग्वेदात अग्नी, सूर्य, उषा, वायू, पर्जन्य, जलदेवता, कृषि, गायी, बेडूक, रात्र यांची सूक्ते म्हणजे गाणीच आहेत. यज्ञाची विधीगीते आहेत. अथर्ववेदात जारणमरणाची सूक्ते येतात. गाथा हा शब्द गीत या अर्थानेही वापरला जात होता. सिंधु डांगे यांच्या मते 'रामायण, महाभारत ही मुळात युध्दगीतेच होती. सूत-भाटांच्या परंपरेतून ती महाकाव्यात परावर्तीत झाली.' पुराणातल्या गाथा लोकगीतासारख्याच होत्या. लग्नगीते तर फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहेत. लोकविधीत जिथे मंत्र नसतात तिथे आजही लोकगीतेच म्हटली जातात. रामायण महाभारत, जातककथा, जैनकथा ह्या लोककथातूनच निर्माण झाल्या आहेत. प्राकृत, अपभ्रंश भाषेच्या काळात लोकगीते मोठ्या प्रमाणावर म्हंटली जात होती. हाल राजाची गाथासप्तशती हा त्याचा महत्त्वाचा पुरावा आहे. सहाव्या शतकातील जैनाच्या 'बृहक्तल्पसूत्रभाष्या' त 'जिथे पीडित होऊन कुंटिनी मुसळे घेवून कारूण्यपूर्ण गीते म्हणतात'. असा उल्लेख आढळतो. यादवकाळातील इ. स. ११२९ मधील सोमेश्वराच्या 'मानसोल्लास' या ग्रंथात 'महाराष्ट्रातील स्त्रिया दळणकांडण करताना ओव्या म्हणतात' असा उल्लेख आढळतो. ज्ञानेश्वरपूर्व शारंगदेवाच्या 'संगीत रत्नाकर' या ग्रंथात देशी भाषेतील प्रासयुक्त तीन चरणी ओवी जगन्मनोहर असल्याचे म्हटले आहे. महदाईसेचे धवळे वरविषयक स्त्रीगीतेच आहेत. विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, रूक्मिणीस्वयंवर हे मराठीतील आद्य ग्रंथ ओवीबध्द आहेत. आजपर्यंत ही स्त्रीगीतांची परंपरा चालू आहे. प्राचीन काळातील लोककथांची संकलने झाली तशी लोकगीतांची झालेली नाहीत. त्यामुळे सलग इतिहास लक्षात येत नाही. पण स्थूलमानाने लोकगीतांना वेदाइतकी प्राचीन परंपरा आहे. या काळात इतक्या सांस्कृतिक उलथापालथी होऊनही लोकसाहित्याची निर्मिती थांबली नाही. आजच्या लोकजीवनाला विज्ञान तंत्रज्ञानामुळे गतिमानता प्राप्त झाली आहे. त्यामुळे लोकसाहित्य मागे पडत असल्याचे जाणवते. पण जोपर्यंत लोकमानसाला आविष्काराची गरज वाटेल तोपर्यंत वेगवेगळ्या रूपात लोकसाहित्य निर्माण होत राहील. एखाद्या समाजाची सांस्कृतिक समृध्दी ही त्या समाजाच्या भाषेतील साहित्य व ललित कलांच्या निर्मितीवर मोजली जाते. तसेच ज्या समाजात विपुल लोकसाहित्य निर्माण झालेले आहे तो समाज सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न आहे असे मानायला काहीच हरकत नाही. मराठी समाजही लोकसाहित्याच्या दृष्टीने समृध्द आहे. मराठी लोकगीताला प्रदीर्घ प्राचीन परंपरा आहे. मराठी ललित साहित्याची निर्मिती ही ओवीसारख्या लोकछंदातूनच झालेली आहे.

अनुक्रमणिका

लोकसाहित्यात लोकगीतांचे दालन सर्वाधिक समृध्द आहे. लोकगीताचे धर्म विषयक व लौकिक जीवन विषयक अशा दोन भागात वर्गीकरण करता येईल. विधीविधान, अनुष्ठान, पूजाअर्चा, लोकदैवतांची उपासना गीते, जन्ममृत्यू विषयक गीते यांचा समावेष धर्मविषयक गीतांत करता येईल. तर श्रमगीते, खेळगाणी, बडबडगीते, आदिवासी नृत्यगीते, स्त्रीगीते यांचा समावेश लौकिक गीतात करता येईल. स्त्रीगीतात धार्मिकगीते परंपरेने चालत आलेली आढळतात. लोकदैवतविषयक स्त्रीगीतात धार्मिकता वरवरचीच असून त्यांचा आशय लौकिक स्वरूपाचा, मानवीय असतो. लोकगीतांच्या निर्मितीत व सातत्यात स्त्रियांचा वाटा सिंहाचा आहे.

**स्त्रीगीताचे प्रकार** –

स्त्रीगीतात लोकमहाकाव्ये, कथागीते, गाणी, पदे, ओव्या, पाळणागीते, सणसमारंभाची गाणी, फेराची गाणी, देवदेवतांची गाणी, अंगाईगीते, बडबडगीते, नृत्यखेळगीते असे अनेक प्रकार आढळतात. त्यांच्या रचनेतही विविधता असते. प्रस्तुत ग्रंथात एका स्त्रीजीवनाची चौकट स्वीकारली असल्यामुळे त्या सर्वांचा समावेश करता आला नाही. त्यांचा परामर्श घेता आलेला नाही. लौकिक जीवनाआशय मांडणाऱ्या स्फुटगीतांवरच भर दिला आहे.

**स्त्रीगीतांच्या निर्मिती प्रेरणा** –

स्त्रीगीतांच्या निर्मिती प्रेरणा शोधल्या तर त्या विविध प्रकारच्या दिसतात. स्त्रीगीते ही गरजेतून निर्माण झाली आहेत. अंगाई गीत म्हंटल्यावर बाळ झोपते असे आईला जोपर्यंत वाटते तोपर्यंत ती अंगाईगीत म्हणत राहणार. लोकमानसाच्या व्यक्तिगत, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा लोकसाहित्यातून व लोकगीतातून पूर्ण केल्या जातात. जात्या तू ईश्वरा । कुण्या डोंगराचा ऋषी । बया मालनीसारखं । हुरद उकललं तुझ्यापासी ॥ अशी आत्माविष्काराच्या गरजेतून स्त्रीगीते म्हटली जातात. जात्यावरील दळणाचे प्रचंड कष्ट ओव्या गाईल्याने कमी होते. कामामंदी काम । दळानं अवघड । गीताच्या तालामंदी । सईनं वडला दगड ॥ अशी श्रमपरिहारासाठी स्त्रीगीते निर्माण झाली आहेत. लोकमानसाने जपलेल्या संस्कृतीचे सातत्य त्यातून टिकविले जाते. उदा. विधीगीते, पाळणागीते. स्त्रीगीतातून स्त्रियांचे मनोरंजन होत असते. उदा. फेराची गाणी, खेळगाणी. स्त्रीगीतातून अनौपचारिक शिक्षण मिळत असते. बाईच्या जातीचे युगानुयुगाचे संचीत गाण्यातून व्यक्त होते. भरताराचा राग त्याच्या डोळ्यात पारखावा व तो कसा घालवावा.

रूसला भरतार । रूसला तर रूसू द्यावा ॥
सांगते सये तुला । शेजेवरी समजावावा ॥

असे अनौपचारिक शिक्षण यातून दिले जाते.

हासु नको नारी । हसणं कोण्या परकाराचं ॥
उतरेल पाणी । तुझ्या चातुर भरतारचं ॥
हासु नको नारी । हास्याचा भ्रम मोठा ॥
अस्तुरीचा जलम खोटा । नावा लागेल बट्टा ॥

अनुक्रमणिका

अशी वागण्याबोलण्याची पद्धत व नीतीमत्तेची शिकवणही त्यातून दिली जाते. भरल्या बाजारात दंडभुजा झाकून, खाली बघून चालावे, जोडवी वाजू देऊ नयेत. पदर काकणाच्या खाली नखात असावा. लेकीच्या जातीनं नांदून आईबापाचं नाव करावं. अशी शिकवण दिली जाते. फेरासारख्या गाण्यातून समूहभावना निर्माण होते. स्नेह वाढतो. एकटेपणा नाहीसा होतो. सुखदुःख समूहाने अनुभवण्याची मानसिकता तयार होते. लोकगीतांतून विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या समाजमान्य संस्थांना समर्थन मिळते. सामाजिक निषेध नोंदविले जातात.

काय भाळलीस गोरे । शेजारच्या फाकड्याला ॥
चटणी मिळना तुकड्याला ॥
साळुला सासुरवास । नको करू तू सासूबाई ॥
साळु अन्याया जोगी न्हाई ॥

अशी सासुरवासाविरूध्द प्रतिक्रिया नोंदविले जाते. प्रचाराचे माध्यम म्हणूनही स्त्रीगीताचा वापर केला जातो. आजही साक्षरता प्रसारार्थ ओव्या लिहिल्या व गाईल्या जातात. वास्तवातले स्त्रीजीवन दुःखाचे, कष्टाचे, सासुरवासाचे, गुलामगिरीचे होते पण गीतातून मात्र सासरमाहेरची भव्यदिव्य स्वप्ने रंगवून स्वप्नरंजन केले जाते. त्यामुळे जीवनातील दुःखाचा क्षणभर विसर पडतो. खेळगाणी, नृत्यगीते, समुहगीते यातून व्यक्तिगत दुःखे विसरली जातात. स्त्रीगीते ही अक्षय आनंदाचा ठेवा आहेत. त्यातून स्त्रियांना अलौकिक आनंद मिळत असतो. गेयतेने, संगीताने व काव्यात्मकतेमुळे हा आनंद वाढतो. सारांश, श्रमपरिहार, आत्मविष्कार, मनोरंजन, आनंद, लोकशिक्षण यासारख्या प्रेरणेतून स्त्रीगीते निर्माण झाली आहेत.

गणागोताची ओवी । नार भूषणासाठी गाते ॥
पांडुरंगाला माझी ओवी । इंद्रसभेला जागवते ॥

असा ही स्त्रीगीतांचा उद्‌देश असतो.

स्त्रीगीते पहाटेच्या रम्यवेळी किंवा संध्याकाळी गाईली जातात. भल्या पहाटे कोंबड्याने बांग दिल्यावर तिला दळायला बसावे लागे. पहाटेची प्रसन्न वेळ, शुक्राची चांदणी उगवलेली, कधी फिकट चांदणे तर कधी गडद अंधार, पहाटवारा, प्रसन्न वातावरण, हा सारस्वत काळ देवता हृदयासी ये, असा, मन आणि शरीर प्रसन्न असलेल्या पहाटेच्या वेळी जात्यावरची गाणी म्हंटली जात होती. अंगाईगीते, बडबडगीते, खेळगाणी, फेराची गाणी ही संध्याकाळच्या वेळी म्हंटली जातात. या दोन्ही वेळा निर्मितीक्षम असतात.

**लोककलावंतांची गीते आणि स्त्रीगीतांतील फरक –**

लोकगीतात लोकसंस्कृतीच्या उपासकांची म्हणजे लोककलावंताची गाणीही मोठ्या प्रमाणावर आढळतात. उदा. वासुदेवाची गाणी, गोंधळगीते, पोतराजाची गाणी, भोप्याची गाणी, बहुरुप्याची गाणी, डहाकाची गाणी, शाहिरी इत्यादी या लोककलावंताच्या गीताशी स्त्रीगीतांची तुलना केली तर स्त्रीगीतांचे

अनुक्रमणिका

वेगळेपणा लक्षात येते. स्त्रीगीते गाणाऱ्या स्त्रियांना आपण कलावंत असल्याची जाणीव नसते. त्या स्वान्तःसुखाय, श्रमपरिहारार्थ, आत्माविष्कारासाठी व मनोरंजनासाठी गीतनिर्मिती व गायन करीत असतात. त्या अजाण कलावंत (unconscious artists) असतात. लोककलावंताच्या गीतांत सादरीकरण असते. स्त्रीगीतांत ते नसते. त्यामुळे स्त्रीगीते सहज उपलब्ध होतात. उलट लोककलावंताला आपण कलावंत असल्याची जाणीव असते. त्यामुळे कलावंताचा अहंकार, आत्मनिष्ठा, प्रसिध्दीची हौस, प्रेक्षकांचे भान, सादरीकरण रजंक करण्याकडे कल इ. गोष्टी आढळतात. आपले महत्त्व कमी होऊ नये म्हणून ते गीते इतरांना देत नाहीत. लोककलावंताचे जगणे त्या कलेवर अवलंबून असते. स्त्रियांचे जगणे स्त्रीगीतांवर अवलंबून असत नाही. लोककलावंताची गीते विधीशी संबधीत, पौराणिक स्वरुपाची धार्मिक असतात. त्यात विविधताही कमी आढळते. म्हणणाऱ्या लोककलावंतांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यात आढळत नाही. लोककलावंतांनी आपल्या जीवनाशी चित्तरकथा गाईली तर त्यानां भिक्षा कोण घालणार? त्यामुळे परंपरेने ठरवून दिलेली, लोकमाणसांची ज्यावर श्रध्दा आहे अशा देवदेवतांची गाणीच त्यांना म्हणावी लागतात. पण स्त्रीगीतात विधीसंबंधता ही औपचारिकच असते. ती उपसकाच्या स्वरुपाची नसते. स्त्रीगीतात पौराणिकता व देवदेवतांची गाणी असली तरी त्याचे स्वरुप लौकिक जीवन आशयाचेच असते. मुरळी, जोगतीणी, भाविणी या स्त्रिया जी गाणी गातात त्याला स्त्रीगीते म्हणत नाहीत. स्त्रीगीतांत स्त्रियांच्या जीवनाचे, सुखदुःखाचे, भावभावनांचे, नात्यागोत्याचे, वृत्तीप्रवृत्तीचे, रागलोभाचे, स्वच्छ प्रतिबिंब पडलेले आढळते. स्त्रीजीवनाचा समग्र आविष्कार त्यातून होत असतो. स्त्रीगीतां आशयाची विविधता विपुल प्रमाणात आढळते. लोककलावंत जातीबध्द असतात. त्याच जातीत ती लोककला परंपरेने चालत येते. स्त्रीगीताला जातीचे बंधन नसते. समाजातील सर्व स्तरांतील व सर्व जातीतील स्त्रिया गीते निर्माण करताना व गाताना दिसतात. लौकिक जीवनाशयामुळे आजच्या वास्तववादी कालखंडात लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारी स्त्रीगीते फारच महत्त्वाची ठरली आहेत.

**स्त्रियांच्या भूमिकेने मांडलेले स्त्रीजीवन –**

स्त्रीगीताचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे स्त्रियांनी आपल्या जीवनाकडे आपल्या डोळ्यांनी, मनाने, अनुभवाने व भूमिकेने पाहिले आहे. त्यातून जे जीवन त्यांनी अनुभवले, पाहिले, तेच गाईले आहे.

राम या म्हणू राम । राम न्हाई सीतेच्या तोलाचा ॥
हिरकणी माझी सीतामाय । राम हलक्या दिलाचा ॥

सीतेच्या रूपात ती आपले प्रातिनिधिक रूप पाहते. सीता भूमिकन्या, स्वयंवर लावून रामाशी लग्न करणारी, पतिप्रेमासाठी वनवास स्वीकारणारी, रावणाच्या वाईट दृष्टीला बळी पडलेली, संशयामुळे परित्यक्ता ठरलेली, वनात बाळंतीण होणारी, मुलांना वाढवणारी, अग्निदिव्य करुन स्वतःचे शुध्दत्व सिध्द करणारी आणि शेवटी भूमीरूप होणारी सीता स्त्रियांना आपलेच रूप वाटते.

सीतामाईला सासुरवास । केलाय परोपरी ॥
सीतामाई माऊलीनं । वाणं वाटलं घरोघरी ॥

असे सीतामाईचे दुःख स्त्रियांना प्रातिनिधिक वाटते.

अनुक्रमणिका

लेकीच्या आईला । नका म्हणू हालकी ॥ लेकाच्या आईला । कुणी दिलीया पालखी ॥ अशी भूमिका ती घेते. पुरुषदेवांची गाणी त्या देवाच्या संबधीत स्त्रियांच्या अनुषंगानेच गाते. त्यामुळे विठ्ठलाच्या गीतात जनाबाई व रुक्मिणी, शंकराच्या गीतात गिरजा, बिरोबाच्या गीतात कामाबाई व मायीबाई, ज्ञानोबाच्या गीतात मुक्ताई आणि तुकारामांच्या गीतात जीजाबाई येतेच. ही सगळी भूमिका पारंपरिक पण स्त्रीवादीच होती. संपूर्ण लोकगीतात स्वतःच्या भूमिकेने सर्व जीवनाकडे व धार्मिक, पौराणिक कथाभागाकडे पाहण्याची दृष्टी फक्त स्त्री गीतांतूनच दिसून येते. यावेळी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की स्त्रियांचे विश्व मर्यादित होते आणि त्या पुरुषी गुलामगिरीत जगत होत्या. हजारो वर्षाच्या पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेने त्यांची मानसिकता तयार केली होती. त्यामुळे काही ठिकाणी त्या या मानसिकतेला बळी पडलेल्या दिसतात. पण एकूण स्त्रीजीवनाचे बारकाईने निरीक्षण केल्यास त्या आपल्या जीवनाकडे आपल्या भूमिकेने पाहत होत्या हे लक्षात येते.

**स्त्रीगीतांतून स्त्रीजीवनाचे दर्शन –**

स्त्रीगीतांतून पारंपरिक स्त्रियांच्या जगण्याचे संपूर्ण प्रतिबिंब पडलेले दिसते. 'पहिली माझी ओवी' ने सुरु होणारी ही गीते लेकीचा जन्म, तिचे लाड व हट्ट, तिची खेळगाणी, तारुण्यसुलभ अल्लडप्रेम, लग्नाची चिंता, लग्नाची मागणी, बैठक, वधुवराचे कौतुक, लग्नातील गाणी, साळू निघाली सासरला, न्हाणुली, सुहागरात, भरताराचं सुख, लेण्यानेसण्याची हौस, डोहाळे, मुलांचा जन्म, वात्सल्य, दिनचर्या, शेतीवाडी, सणसमारंभ, माहेरची ओढ, तिथली माणसं आणि त्यांचे कौतुक, शेजारधर्म, भाऊपण्याच्या मैत्रीणी, नवऱ्याची व्यसने आणि बाहेरख्यालीपणा, मुलांच्या राज्यातील परावलंबन, अहेव मरण, सरलदळण, यासारख्या स्त्रीजीवनातील साऱ्या प्रसंगांचे दर्शन स्त्रीगीतांतून घडते. ते इतके नितळ आणि पारदर्शी आहे की एखाद्या नव्या खोदलेल्या विहिरीच्या पाण्यातील तळ दिसावा तसे तिचे जीवन स्त्रीगीतांतून दिसते. पारंपरिक स्त्री जीवनातील एकही महत्त्वाचा प्रसंग, अनुभव आणि भावना अशी नाही की, जी स्त्रीगीतांतून व्यक्त झालेली नाही. या ग्रंथातील लेख त्याची साक्षच आहेत.

स्त्रियांचे जीवनविश्व मर्यादित असले तरी त्यांच्या अनुभवाचे सार त्यात येते. नागपंचमीपासून आषाढी एकादशीपर्यंतचे सणसमारंभ, पेरणी पासून बाजारापर्यंतचे शेतकरी जीवन, उगवला नारायणपासून तिन्हीसांजपर्यंत दिनक्रम, पावसाळ्यापासून उन्हाळ्यांपर्यंतचे ऋतुचक्र, सासर माहेरच्या माणसांचे भावविश्व, वैराळदादापासून कल्लाळीणबाईपर्यंत तिच्या संपर्कात आलेल्या जातीजमातीच्या व्यक्ती, पंढरीच्या विठोबापासून, धनगरांच्या बिरोबापर्यंतची लोकदैवते, तुळजाभवानीपासून लक्ष्मीआई पर्यंतच्या लोकदेवता, ज्ञानोबापासून तुकोबा पासून बोधले महाराजापर्यंतचे संतमहंत या सर्वाचे चित्रण स्त्रीगीतांतून येते. गाण्यातून उलगडत जाणारी ही स्त्री जीवनगाथा आहे. स्त्री जीवनाचे सारे प्रतिबिंब त्यात पडलेले आहे.

**स्त्रीगीतातून लोकसंस्कृतीचे दर्शन –**

स्त्रीगीतातील जीवन आशय स्त्रीजीवनाच्या अनुषंगाने येत असला तरी त्यातून संपूर्ण लोकसंसंकृतीचे दर्शन घडते. धार्मिक व पौराणिक स्वरुपाच्या स्त्रीगीतातून रामायण महाभारतातील प्रसंग, परिसरातील लोकदैवते, त्यांच्या उपसाना पध्दती व श्रध्दा, पंढरीचा विठ्ठल, वारकरी संप्रदाय, संतमहंत

अनुक्रमणिका

यांची गाणी येतात. स्त्रीजीवनाच्या मर्यादित जीवन आशयामुळे त्यावर या ग्रंथात भर दिलेला नाही. साधारणपणे मानवी भावभावनांचा दैवतांच्या जीवनकथावर आरोप करुन गीते गाईले जातात.

रूक्मिणी धुणं धुती । विठ्ठल खडकावर बसं ॥
दोघांच्या पिरतीचं । चंद्रभागेला आलं हासं ॥

अशी मानवीयता त्यात येते. धर्माचा तत्वज्ञानात्मक आशय स्त्रीगीतातून फारसा येत नाही. धर्माचा तत्वज्ञानात्मक आशय जोपर्यंत लोकांच्या आचरणाचा भाग बनत नाही तोपर्यंत त्याला मूर्त स्वरुप प्राप्त होत नाही. पवित्र गोष्टींची श्रध्दा आणि आचार यातून धर्मव्यवस्था निर्माण होते असे एमिल दुरखाईम म्हणतो. स्त्रीगीतातून लोकधर्माचा आशय आचाराच्या पातळीवरच प्रकट होतो. स्त्रियांनी आपल्या आचरणातून धर्म व्यवस्था आणि लोकसंस्कृती टिकवून धरली आहे. यात अनेकविध देवदेवता, श्रध्दा, निष्ठा, वस्तु, पावित्र्याच्या कल्पना, पूजाविधी, रुढी, परंपरा, समजुती, सणसमारंभ या सर्वातून लोकसंस्कृतीचा विविधरंगी गोफ विनला जातो. लोकधर्माचा सारा बाज स्त्रीगीतातून येतो. लोकसंस्कृतीचे दर्शनही त्यातून घडते. यादृष्टीने स्त्रीगीते महत्त्वाची ठरली आहेत.

**स्त्रीगीतातील सामाजिकता** –

पारंपरिक स्त्रियांचे जीवन मर्यादीत असल्यामुळे त्यातून प्रकट होणारी सामाजिकताही मर्यादीत स्वरुपाची असते. व्यक्ती, कुंटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, नातीगोती, जातीजमाती, त्यांचे परस्पर संबंध, गावगाडा, राजकीय, सामाजिक जीवन यांचा समावेश सामाजिकतेत होतो. जातीयता ही तत्कालीन जीवनातील सामाजिक वास्तव होते. ती वाईट आहे अशी भावना तत्कालीन स्त्रियांत निर्माण झालेली नव्हती.

वैराळ दादा । तुझी माझी कोन जात ॥
चुड्याकारन दिला हात ॥
पराया जातीची मैत्रीण असेल तर
तुझा माझा भाऊपणा । हाय पराया जातीचा ।
तुझ्या माझ्या भोजनाला । हाय अंतर ईतीचा ॥

मुसलमान मैनाच्या संगतीत बोली मराठी येईना असा अनुभवही इथे मांडलेला आहे. सुतार, शिंपी, कुंभार, सोनार, चाटी, न्हावी, धनगर, मराठा, कल्हाळ इ. जातींच्या माणसांशी स्त्रियांचा व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचा व्यवहाराच्या निमित्ताने संबंध येत होता. चाट्याच्या दुकानात तिला साडीचोळी खरेदी करावी लागे. शिप्यांकडे चोळी शिवावी लागे, सोनाराकडून दागदागिने घडवून घ्यावे लागत. सुताराच्या मेटावर तिचा घरधनी तिफण भरायला जाई. माळ्याच्या मळ्यातील फुले-फळे तिला सणावाराला घ्यावी लागत. कल्लाळीनीच्या गुत्त्यावर तिचा भाऊ व पती जाई. या सर्वजातीजमातीचा उल्लेख स्त्रीगीतातून येतो. जातीय संघर्षाचे चित्रण येत नाही. उलट परस्पर सामंजस्यच येते.

मुलगी परक्याची धन. तिचा सांभाळ करावा लागतो. शिक्षण द्यावे लागते आणि हुंडा देवून लग्न करावे लागते.

अनुक्रमणिका

नवरीचा बाप। हिंडतो घरोघरी ॥
बिन हुंड्याचा नाही वर।
बोलतू आपुल्या राणी। कर्ज काढू शेतावर ॥

असा हुंड्याच्या चालीचा, शेतावर कर्ज काढून लग्न करुन देण्याचा अनुभव येतो. यात सामाजिकता नाही असे कोण म्हणेल? साळुला सासुरवास झाल्याची गाणी तर खूपचं आढळतात.

दारु मन दारु। बरांडी कैफाची।
पराया नारीच्या संगतीनं। घरं बुडाली कैकाची ॥

असा व्यसनाधीनतेचा, बाहेरख्यालीपणाचा समाचार घेतला आहे. भावाभावांची भांडणं, भाऊबंदकी, वाटण्या याचे उल्लेखही गाण्यातून येतात. अहेव मरण यावं असं स्त्रियांना वाटत होते. त्यापाठीमागे वैधव्यातील हलाकीचं जिणं आणि पुनर्विवाहास बंदी हा सामाजिक वास्तवाचा भागच होता. अशी सामाजिकता स्त्रीगीतातून प्रगट झाली आहे. राजकीय जीवन स्त्रियांच्या अनुभवाचा विषय नव्हता त्यामुळे तो स्त्रियांना गाण्याचा विषय झालेला दिसत नाही.

**स्त्रीगीतातून इतिहासावर प्रकाश** –

स्त्रीगीतातील एखादी ओवी इतिहासावरही प्रकाश टाकू शकते. लोकसाहित्याचा अभ्यास इतिहासाच्या दृष्टिनेही महत्त्वाचा ठरतो. लोकजीवनाचा इतिहास लिहिण्यासाठी लोकसाहित्य अत्यंत उपयोगी ठरु शकते. सिंध प्रांतातील एका दंतकथेवरुन राखालदास बानर्जी यांनी १९२२ साली केलेल्या उत्खलनातून प्राचीनतम महोंजोदडो संस्कृतीचा शोध लागल्याचे आपणास ज्ञात आहेत. शिखर शिंगणापूरच्या परिसरातील एक ओवी अशी.

महादेवाच्या पिंडीवरी। बेल वाहिला शिळाताजा।
पुत्र मागूनी गेला राजा ॥

या ओवीतील पुत्र मागणारा राजा कोण असावा? छ. शहाजी महाराज तर नसतील. शहाजी महाराजांची जहागिरी इंदापूर पुणे परिसरात होती. ते शिवभक्त होते. शिखर शिंगणापूरच्या महादेवाच्या दर्शनास येत असत. त्यांनी तिथे पाण्याचा तलावही बांधला आहे. भोसले घराण्यातील व्यक्तींच्या काही समाध्याही शिंगणापूरला आहेत. आजही देवस्थानाची मालकी भोसले घराण्याकडे आहे. एखाद्या देवाच्या वा साधूपुरुषाच्या कृपाशीर्वादाने मुलगा झाल्यास त्यांची नावे ठेवण्याची परंपरा भोसले घराण्यात होती. शहाशरफोजी या सत्पुरुषांच्या कृपाशीर्वादाने मुले झाल्यामुळे मालोजी राजांनी आपल्या मुलांची नांवे शहाजी व शरफोजी अशी ठेवली होती. शिवशंकराच्या कृपेने जिजामातेला पुत्र झाल्यावर त्यांचे नांव शिव-शिवा असे ठेवले असावे. पुढे जी हे आदरार्थी पद लावून शिवाजी असे झाले असावे. शिवाजी महाराज शिवपिंडीवरल्या गंधासारखे अर्धचंद्राकार गंध लावत असतं. तेही शिवभक्त होते. 'हर हर महादेव' ही मराठी सैन्याची रणगर्जना काय सांगते. दक्षिणेकडील शैव संप्रदायाशी शिवाजी महाराजांचे संबंध जोडणारे संशोधन अलिकडे रा.चिं. ढेरे यांनी 'शिखर शिंगणापूरचा शंभुमहादेव' या ग्रंथात केले आहे. अशा ओव्यांना

अनुक्रमणिका

सर्वमान्यतेचा आधार असतो. पण ही सर्वमान्यता चुकीचीही असू शकते. तेव्हा सुट्या ओव्याकडून पूर्ण इतिहास लक्षात येत नाही. इतिहासाच्या इतर साधनांच्या आधाराला लोकसाहित्याचा पुरावा बळकटी देवू शकतो इतकेच.

**स्त्रीगीतील एकसंघ मानसिकता** –

जीवनभाष्याच्या दृष्टीने आजच्या काळातही स्त्रीगीते त्यांच्या वास्तव अनुभवामुळे, पारदर्शी सरळ अभिव्यक्तीमुळे व प्रातिनिधिकतेमुळे महत्त्वाची ठरली आहेत. एक महत्त्वाची गोष्ट अशी की तत्कालीन स्त्रियांची मानसिकता एकसंघ होती. त्यात कुठलेही दुभंगलेपण नव्हते. प्रत्यक्ष जीवनात दुःख, कष्ट, गुलामगिरी, सासुरवास, कोंडमारा असला तरी ते सारे सहन करीत त्या जीवनाला सामोरी जात होत्या. देवाधर्मावरील श्रध्दानिष्ठा, नैतिकतेच्या कल्पना आणि चिवट जीवननिष्ठा या जोरावर जीवनातील लहानमोठ्या सुखदुःखाचे प्रसंग समरसून अनुभवण्याचे व आनंद शोधण्याचे एक शहाणपण त्यांचे ठिकाणी होते. सगळे जीवन सारखेच असल्याचे लोकगीतातून समूहमनाचा आणि जीवनाचा आविष्कार होत होता.

**स्त्रीगीताचे वाङ्मयीन विशेष** –

स्त्रीगीतांचा ललित साहित्याच्या दृष्टिनेही विचार करता येतो. स्त्रीगीते विधी, श्रम, खेळ, नृत्य या अनुषंगाने निर्माण होत असली तरी त्यांचा आविष्कार, प्रामुख्याने शाब्द स्वरुपाचा व गेय असतो. काव्यात्मकतेचे अनेक विशेष स्त्रीगीतात आढळतात. प्रतिभेची निर्मिती, जीवनाशयाचे चित्रण, भावभावनांचा आविष्कार व त्यांचे उदात्तीकरण, कल्पनारम्यता, वर्णनातील सूक्ष्मता व विविधता, व्यक्तिदर्शने, भाषेची सहजता, लय, अलंकारिकता, प्रतिमांचा वापर, सूचकता इत्यादींचा विचार काव्यात्मकतेच्या दृष्टीने केला जातो.

**स्त्रीगीतातील लोकजीवनाचा आशय** –

लोकगीतातून लोकजीवनाचा आशय मांडलेला असतो. स्त्रीगीतातून स्त्रीच्या भूमिकेतून समग्र स्त्री जीवनानुभवाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. पारंपरिक स्त्रीजीवनातील एकही असा विषय नाही की जो स्त्रीगीतातून आलेला नाही. स्त्रीच्या जीवनातील विविध रूपे, घरसंसार, नातेवाईक, शेतीवाडी, सणसमारंभ, विधिविधाने, देवदेवता, श्रध्दानिष्ठा, संतमहंत, ऋतुचक्र, जातीजमाती, त्यांचे परस्पर संबंध या सर्वांचे चित्रण यातून येते. ते सर्व व्यक्ती आणि समूहाच्या अनुभवाचे असते. त्यातून समाजाच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. पूर्वीच्या विवेचनातून ही गोष्ट स्पष्ट केली आहेच. जीवन आशयाच्या दृष्टीने स्त्रीगीते ही पारंपरिक स्त्रीजीवनाचा आरसाच आहेत. समाज इतिहासाच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहेत.

**स्त्रीगीतातील रसात्मकता** –

साहित्यातून मानवी भावभावनांचा आविष्कार होत असतो. जीवनात भावभावनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. त्यात स्त्रिया जात्याच भावनाप्रधान असतात. पुरूषांपेक्षा त्या अधिक भावनाशील असतात. खडतर जीवन भावरम्य व सौंदर्यसंपन्न करून जगण्याची व सांगण्याची कला त्यांना प्राप्त झालेली असते.

अनुक्रमणिका

भावनांच्या कलात्मक आविष्कारातून साहित्यातील रसांची निर्मिती होते. त्यातून वाङ्मयीन आनंद मिळतो. उत्कट भावनांचा आविष्कार करून त्याचे उदात्तीकरण केल्यामुळे स्त्रीगीतात रसिकाचे मन प्रसन्न करणारी काव्यात्मकता प्रगट होते. सुखसंवेदांचा मळा फुलविला जातो. रसाच्या दृष्टीने स्त्रीगीतांचा विचार करता येईल. शृंगाराची वर्णने पाहा.

मोठं या मोठं डोळं । डोळं लिबांच्या फोडी ॥
गोऱ्या माझ्या मालनीचं । रूप सावळं ताल तोडी ॥

गोऱ्या स्त्रीचे वर्णन कसे.

गोरीचं गोरपण । हळदीला मागं सारी ॥
गोऱ्यापणाला त्याज भारी ॥
पाण्याला गेली गोरी । अंधार करूयानी ॥
दिली घागर भरूयानी ॥

यातला शृंगारभाव किती हृदय आहे. तो कुणाला सुखावणार नाही? विरहाची भावनाही अशीच उत्कटपणे स्त्रीगीतात येते. नुकतीच लग्न झालेली साळू नांदायला जाते आहे.

साळू निघाली सासरला । तिच्या आईची वेडी माया ॥
सीता माझी मालयन । मागं हांबरती गाया ॥
साळू निघाली सासरला । तिच्या पापणीखाली झरा ॥
तिचा बंधु बोलं । तिला पंचमीची बोली करा ॥

आता पतीदेव गावाला गेल्यानंतरचा विरह पाहा.

गावाला गेलं म्हणू । येतू म्हणून गेलं काल ।
चुड्या माझ्या राजसाची । वाट पाहून डोळं लाल ।

रान उठलं खायाला । रात देते ग चटका ॥ कारण ‘आंब्याची डाल पिकून झाली लाल’ ‘राजसाच्या पाटी । गांव भयाण लागेपाठी ।’ अशी तिची अवस्था होते. बरेच दिवस झाले पतीदेव घरी परत आले नाहीत.

गावाला गेलं म्हणू । असं कसं गावाला जाणं ॥
नवं धोतर झालं जुनं ॥

यातला विरह किती सूचक तरीही स्पष्ट आणि उत्कट आहे.

दुःख हे स्त्रीजीवनाला व्यापून राहणारी गोष्ट आहे. ते वेगवेगळ्या प्रकारचे व विविध पातळ्यावरचे असते. स्त्री म्हणून गौण आणि हीन लेखण्याचा प्रकार, सासुरवासाचा जीवघेणा छळ, दारिद्र्याचे दशावतार,

दुबळा संसार, मृत्यूसारख्या घटना यातून दुःखांची विविध रूपे साकार होतात. लेकीचा जलम जसा गाजराचा वापा । पाणी देऊन काय नफा, कारण ती परक्या घरी जाणारी. लेकीचा जलम जसा गाजराचा पाला । धनी कुणाचा कोण झाला । ती गव्हा तांदळांची कणी । बाप विकून झाला वाणी । जन्मभर कष्टात आणि दुःखात पिचत जगणे.

लेकीचा ग जलम । भाड्याचा बईलं ॥
कधी ईसावा हुईलं ।
लेकीचा ग जलम । देव देवूनी चुकला ।
बैल घाण्याला जुंपला । जलमभरी ।

असं बाईच्या जन्माचं ठसठसत दुःख. सासुरवाशीणीचा छळ तर जीवघेणा.

साळुला सासुरवास । दिरा नंदानी तिला केला ॥
बया माझ्या मालनीचा । काट्यावरी जलम गेला ॥

भिरूड लागलेल्या आंब्यासारखी स्त्रीची अवस्था. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या पोखरणारी. त्यात हे दुःख दुसऱ्याला सांगायची पंचाईत. नवरा दुबळा, व्यसनी, कर्तृत्वहीन असला तर ‘पंरूष नाही धड झाला नारीचा पवाडा’ अशी अवस्था होते. दुबळ्या संसाराची जनलोकाला घाण येते. भोग सरल दिस येत्याल या आशेवर नाचार संसार करावा लागतो. अशा स्त्रीचे दुःख तिच्या मरणा बरोबरच संपते. त्यात अहेवपणे मरण आले तर बरे नाहीतर वैधव्यातला उन्हाळा. असे स्त्री जीवनाला वेढून राहणारे दुःख स्त्रीगीतातून येते. करूण रसाचा आविष्कार होतो.

हास्य रसाची विनोदी चित्रेही लोकगीतांतून येतात. एखादी तरूण मुलगी शेजाऱ्याच्या प्रेमात पडली तर

काय भाळलीस गोरे । शेजारच्या फाकड्याला ॥
चटणी मिळना तुकड्याला ।

अशी दारिद्र्याची भीती तिला घातली जाते. लग्नानंतर बायकोच्या गोरेपणावर भाळून घरी बसलेला बाईलवेडा पाहा.

डोंगरी कशाला पेरल्या तुरी । बायको गोरी । म्हणून बसलास घरी ॥ आता ‘बायको काळी असली तर हिंडतोय आळी’ अशी त्याची अवस्था होते अशा नवऱ्याची पोच बायका लगेच ओळखतात.

दुबळा भरतार । भाजी आणतो धोतरात ॥
नाही नारीच्या खातरत ॥

कशा वेळेला बायका शिरजोर होतात.

अनुक्रमणिका

अंबारीचा हत्ती । अंबारी घालू दिना ॥
नार पुरूषाचं चालू दिना ।

दोन बायकाच्या पुरूषाचा उपहास स्त्रीगीतातून केला जातो.

दोन बायकांची हौस । मोठी गं गड्याला ।
दिवाळीच्या दिवशी । अंघोळ करतो वड्याला ॥

लंपट माणसाचं एक चित्र

माळ्याच्या मळ्यात । मेथीबाईला आलं गोंडं ।
सासू जावाया मागं हिंडं ॥

असा हास्यरस लोकगीतातून येतो. बाळराजाचे कौतुक करताना वात्सल्यभाव येतो. तर देवादिकांच्या गाण्यातून भक्तीभाव प्रकट होतो. सर्वच रसाचा धांडोळा घेता येणार नाही पण या ग्रंथातील अनेक लेख त्या त्या रसांचा व भावनांचा आविष्कार घडवितात.

**स्त्रीगीतातील कल्पनाविलास** –

साहित्याची निर्मिती ही केवळ अनुभवाची निर्मिती नसते तर त्यात कल्पनेचाही भाग असतो. पुन्हा ही कल्पना वास्तवाच्या आधारानेच प्रगट होते. पावसासाठी आसुसलेली धरणी, फळी धरून उठलेलं आभाळ, घोंघावत आलेला वादळवारा, वीजांचा चमचमाट आणि ढगांचा गडगडाट नंतर कोसळणारा पाऊस पाहून सुचलेली कल्पना पाहा.

पडपड पावसा । इजबाईचा तेलतवा ॥
धरणीमाता बोलं । कवा येचिल माझ्या गावा ॥
पाऊस एवढं पाणी । वीजबाईनं काढलं ॥
हरिचंदर एवढा वारा । म्होर जासूद धाडलं ॥
मेघराजाचं लगीन । इजबाई करवली ॥
माझ्या सख्याच्या शेतामंधी । राती वरात मिरवली ॥

पंचमहाभूताचे एक भव्य नाट्य या ओव्यात आहे. पावसावर लग्नाची केलेली कल्पना किती मनोहर आहे. त्यात वीजबाई करवली आणि शेतात वरात मिरवली. आकाश पुरूष आणि धरणी स्त्री यांच्या मिलनाचा क्षण म्हणजे लग्न सोहळाच असा मनोहर कल्पना विलास आहे.

**स्त्रीगीतातील प्रसंगांची चित्रणे** –

स्त्रीगीतातून स्त्री जीवनातील व समाज जीवनातील विविध प्रसंगांची चित्रणे त्या त्या भावभावनांसह येतात. उदा. लेकीचा जन्म, मागणं, लग्न समारंभ, सासरला पाठवणी, न्हाणुलीचा कार्यक्रम, सुहागरात,

अनुक्रमणिका

सासुरवास, डोहाळं जेवण, दिनचर्या, सणसमारंभ, देवदेवतांच्या यात्रा, पाऊसपाणी, बाजारहाट, नवऱ्याची व्यसने आणि बाहेरख्यालीपणा, आजारपण, हळदीकुंकू, भाच्याचं बारसं, मरण यासारख्या कितीतरी प्रसंगाची आणि त्यावेळच्या भावास्थितीची चित्रणे स्त्रीगीतातून येतात. प्रस्तुत ग्रंथातील लेख याची साक्ष देतील. स्त्रीगीतात प्रसंगातील संवादात्मकता येते. नंणद भावजईचे संबंध मोठे मजेशीर असतात. सोडता तर येत नाहीत धरले तर चट्‌टा घेतात. भाऊ बहिणीला आणयला निघाला आहे त्यावेळचा संवाद-इळाचा ईळ गेला । गाडी तट्‌याची विणायला ॥ जातो बहिणीला आणायला ॥ भावजय गुजरी बोलयती । तुमच्या बहिणीचं गाव दुर । आडवा नदिला आला पूर ॥ बंधुजी बोलईतो । मी अगंत पवनार । बहिणीला आणीन वरच्यावर ॥ भावजय गुजरी बोलयती । लुगड चोळीला आला कार । बंधुजी बोलईतो । चाटी माझा मैतर । घीन बहिणीला पितांबंर ॥ अशी संवादात्मकता स्त्रीगीतात येते.

**स्त्रीगीतातील व्यक्तिचित्रणे** –

साहित्यातून विविध व्यक्तिचित्रणे येत असतात. लोकगीतातील व्यक्तिचित्रणे ही स्थूल स्वरूपाची असतात व सर्व साधारणपणे समाज जीवनात सर्वत्र आढळणारी असतात. त्यात चुडा माझा राजस, नेणंता छंदखोर बाळ, वाणीचा बंधु, गवळी नाना, सीता मालन, शेजारीण सया, भावजयी वाणीन, भाऊपण्यानं जोडलेली मैत्रीण अशी नात्यातील माणसे जशी चित्रीत केली जातात तशी चाटी, वैराळ, सोनार, शिंपी, सुतार, कुंभार, कल्हाळीन यासारखी समाज जीवनातील माणसेही येतात. त्यांचा संबंधही चित्रीत केला जातो. देवदेवतांनाही मानवी रूप देवून त्यांची चित्रणे केली जातात. ही सगळी व्यक्तिचित्रणे समाज जीवनात आढळणारी व स्त्रियांच्या अनुभवाची असतात. कथागीतातूनही ती ती पात्रे साकार होतात. व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने ललित साहित्या इतकी समृध्दता त्यात नसली तरी त्यात विविधता आणि वैशिष्ट्यपुर्णता असते.

**स्त्रीगीतातील अलंकार** –

काव्यातील अलंकार, प्रतिमा, रचनाचातुर्य ह्या विद्‌वतेच्या निदर्शक असतात. स्त्रीगीते तर ग्रामीण भागातील अशिक्षित, रूढ अर्थाने निरक्षर स्त्रियांनी रचलेली आणि गाईलेली असतात. त्यामुळे त्यात या गोष्टी कुठल्या असणार? असे वाटणे स्वाभाविक आहे, पण तसे नाही. कवन म्हंटले की त्यात काही गोष्टी अभावितपणे आणि सहजतेने येतात. अंतःकरणातील उत्कट भाव उंचबळून आला की शब्द कल्पनेचा परिवेश धारण करून विशिष्ट लयीतच येतात. सांगण्याच्या भिन्न भिन्न परीतून उक्तिवैचित्र्याचा आणि अलंकाराचा जन्म होतो. स्त्रीगीतात रसाला अनुकूल अशा वर्णाची चमत्कृती जन्य आवृत्ती साधून अनुप्रास साधला जातो.

- माळ्याचा मळा । जाईचा आळा ।
  तोडती नार । गुंफती हार ।
  अशी सुरत अनिवार । मारती लहार ।
- सासरच्या वाटे कुचकुच काटे ।
- घुम घुम रे मांडवळा घुमत रमत ।
- आंबा पिकितो । रस गळीतो । कोकणचा राजा बाई । झिम्मा खेळीतो ।

अनुक्रमणिका

या रचनात अनुप्रास नाही असे कोण म्हणेल?

स्त्रियांच्या ओव्यात यमक सर्वत्र आढळते. तीन चरणाच्या ओवीत दुसऱ्या व तिसऱ्या, चार चरणाच्या ओवीत दुसऱ्या व चौथ्या चरणात यमक असतेच. ती एक आवश्यक बाब आहे. त्याला गाणाऱ्याच्या भाषेत 'मोडीवर सुटणे' असे म्हणतात. कुठलीही ओवी घ्या त्यात यमक सर्वत्र आढळते.

लावणीचा आंबा। पाणी घालती कौलाने
नेणंता बाळ माझा। आंबा वाढतो डौलाने।
लावणीचा आंबा। पाणी घालती वंजळीनं।
साळूनं चालं घेतली जांभळीनं।

असे यमक प्रत्येक ओवीत असतेच. क्वचित एक शब्द दोन अर्थाने वापरून श्लेष साधला जातो.

गुज बोलताना। चंद्र माळीच्या आड गेला।
नाही गुजाचा झाडा झाला। चंद्र दमून पार गेला॥

यातल्या शेवटच्या चरणातील चंद्राचा अर्थ चंद्र आणि भाऊ असा दोन्ही अर्थाने केला तर चालतो.

दुबळा भरतार। रोज आणतो ताजा शेर।
त्याला म्हणावा सावकार॥

अशी वक्रोक्तीही येथे दिसते. उपमा तर अलंकाराचा प्राण. अलंकार म्हणजे त्याचाच विस्तार. स्त्रीगीतात उपमा सर्वत्र आढळतात.

बंधुजी परास। भाच्या बाळाची आगत॥
मुदला परास। मला व्याजाची लज्जत॥

स्त्रीगीते म्हणजे उपमांचे भांडारच. आता लेकीला गाजराचा वापा, ऊसाचे वाडे, बन्सी मका, जांभळ, केळी, शुक्रांची चांदणी, वीज, भाड्याचा बैल, कोथंबीर, पराया घरचे ताक अशा उपमा दिलेल्या दिसतात. बाळाला, लावणीचा आंबा, इंग्रजी बेंडबाजा, गल्लीतला चंद्र, सडीव तांदुळ, पेरूचं झाड, सुरूची झाडं, राघू वगैरे उपमा दिलेल्या दिसतात. नवऱ्याला बेगडाचं पान, अंगठीवरला खडा, कुंकवाचा करंड, भुजंग, बच्या नाग, हिरवं सीताफळ, आईला – हंबरती गाय, उंबराची सावली, समय, साखर, तुपाची किटली, वडिलांना – वड, पिकला उंबर, पारखी सोनार, पानमळा, चंदन, मोर, भाऊरायाला – लसून, किल्ल्याचा बुरूज, वाघ, शहामृग, चंद्र, शिलेदार अशा शेकड्याने उपमा स्त्रीगीतात काढून दाखविता येतात.

'लेकीचा जलम जसा गाजराचा वापा' किंवा 'बारीक माझा गळा। जसा पेटीचा बेंडबाजा।' 'साळूच्या माझ्या गळा जशी किंकरी किंकती' अशा उत्प्रेक्षा इथे भेटतात.

अनुक्रमणिका

कवळी तुझी जानी । आंब्याचा फुलवरा । किंवा चंदन माझा नाना । खरा चंदन जातीचा यातील रूपके वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

आई बापाच्या माघारी । कोण माहेरी गेली येडी ॥
कवटाळल्या खांब मेढी ॥

किंवा

सीता सीता म्हणूनी । राम कवटाळीतो झाडं ॥
सीता डोंगराच्या आड ॥

अशी स्वभावोक्तीने रामाच्या शोकाची अवस्था चित्रित केली आहे.

मारीला इंद्रजित । ढासळल्या माड्या ।
खाईना दानाचारा ॥ याच्या कोतवाल घोड्या ॥

हायका कशाचा कशाला संबंध. अशी असंगती इथे दिसते. अतिशयोक्ती तर फार आढळते.

नाजूक मैनेची कंबर । निऱ्या पडल्या शंभर ॥

किंवा

गर्भीन नारीला । तिला दिव्याचं लाग उन ॥
नेणंत्या मैनेचं । तिचं आचाट गोरपण ॥

किंवा

जोडव्याचं पाय । कुण्या नारीची वाजल्याती ॥
बैलं दावणीची भुजत्याती ॥

माहेरच्या वर्णनात, तिथल्या मानसाच्या कौतुकात अतिशयोक्ती आढळतेच.

कुंकवाचा करंडा । मेणाचा दुसरा ॥
माझ्या चुड्याला आसरा ॥

असे दिराचे अन्योक्तीने केलेले वर्णन दिसते.

राघू मैनेचं रूप गोजीरवाणी । माझ्या चांदाला शोभती ॥

अनुक्रमणिका

चंद्रामागली चांदणी ॥

असा अर्थातंरन्यास अलंकारही क्वचित साधला जातो. हे सारे अलंकार स्त्रीगीतात इतक्या सहजतेने येतात की ते अलंकार आहेत याची जाणीवही त्यांना नसते. त्यात कुठेही पंडिती कृत्रीमता नाही. 'स्त्रीगीताची वर्णन शैली अगदी सरळ नि सूचक आहे. अल्पाक्षरी आणि ठसठसीत आहे. साधी दिसत असली तरी सालंकृत आहे.' हे नारायणराव नांदापूरकरांचे मत उल्लेखनीय आहे. स्त्रीगीतातील जीवनचित्रण साधे असले तरी सांगणे बहारदार, औचित्यपूर्ण व सूचक असते.

पाण्याला गेली गोरी । हिर सोडून बारवला ।
तिचा चंदन मव्हरला ॥

यापेक्षा वयात आलेल्या मुलीचे वर्णन ते काय करणार? किंवा

तांबोळीन बाई । पान देताना चुकली ॥
नखल्या माझ्या बंधुजीला । माझ्या चांदाला दिपली ॥

यापेक्षा पुरूषी सौंदर्याचे वर्णन ते काय करणार?

मुलगा लावणीच्या आंब्यासारखा वाढतो. सासुरवास भिरूड लागलेल्या आंबेच्या फोकेसारखा असतो. मुलगी मोठी झाल्याचे माझ्या अंगाची चोळी । तुझ्या अंगाला दाटली । शीण राघानं गाठली ॥ यापेक्षा सूचकतेने काय सांगणार? संयम आणि औचित्य तर सुटले नाही पाहिजे आणि काव्यसौंदर्य तर पाहिले असे ओवीतले रचनाचातुर्य असते.

**स्त्रीगीताचा रूपबंध** –

रचनेच्या दृष्टीने स्त्रीगीताचा विचार केला तर त्यात लोकमहाकाव्यापासून ओवीपर्यंत अनेक प्रकार, रूपबंध आढळतात. हे सर्व प्रकार गेय असतात. अंगाईगीते, बडबडगीते, खेळगाणी अर्थाच्या दृष्टीने फारशी महत्त्वाची नसतात. त्यातली लय, ताल, ठेका आणि विनोद महत्त्वाचा असतो. गाण्यात कडवी, चरण व धृवपदाची पुनरावृत्ती आढळते. कथागीतात भारजा बाळाई, भुलाबाई यांची गीते आढळतात. विषयमर्यादेमुळे ती या ग्रंथात आली नाहीत. ही गीते ओव्याच्या मानाने कमी आहेत, ती स्मरणात ठेवण्यास व गाण्यास अवघड असतात. ओव्या विपुल तर आहेतच पण सर्व दृष्टीने सोप्याही आहेत. ओवी हा स्त्रियांनी निर्माण केलेला प्राचीन असा शुध्द मराठी काव्यप्रकार आहे. ओवी म्हणजे ओवणे, गुंफणे, ग्रंथीत करणे. त्यात अर्थ आणि शब्द ओवले – गुंफले जातात. संस्कृतात अनुष्टूभ वृत्त आहे पण ओवी नाही. ओवी ही केवळ मराठीची निर्मिती आहे. ती अत्यंत लवचिक असते. सर्व तऱ्हेने वापरता येते. रचना करायाला, आठवायाला, गायला सुलभ असते. आज लोकप्रिय होत असलेल्या चारोळीपेक्षाही ती सोपी आहे.

ओवीतला पहिला चरण हा विषयदर्शक मुखड्याचा असतो. त्याची रचना काव्यमय व बांधीव असते. दुसऱ्या व तिसऱ्या चरणात त्याच विषयाचा विस्तार केलेला असतो. ओवीचा मुखडा सोडला तर विषय दुसऱ्या व तिसऱ्या चरणातील सहा शब्दात आशयदृष्ट्या पूर्णरीत्या मांडला जातो. आभिजन वर्गातील

अनुक्रमणिका

स्त्रियामधून जी संकलने केली आहेत. त्यात साडेतीन चरणी ओवी आढळते. शेवटचा अर्धाचरण ज्याला ओवी म्हटले जाते त्याला उद्देशून असतो. उदाहरण मालनबाई, साजनबाई किंवा एखादा गेय शब्द येतो. चार चरणाच्या ओवीत दोन प्रकार आढळतात.

पाहुण्याला पाहुणचार । मी का घालीती पुरायण ॥
खाली साखरेचं आळं । वर तुपाचं दुरायनं ॥

या ओवीत चार स्वतंत्र चरण आहेत. तर काही वेळा तीन चरणाच्या ओवीतच ज्याला ओवी गाईली आहे त्याविषयी तिसरा चरण घालून ती चार चरणी केली जाते. नेणंता बाळ माझा, गवळण माझी बाई, गवळी माझा नाना, वाणीचा बंधु माझा, यासारखे ते चरण असतात. पाच किंवा सहा चरणाच्या ओव्याही थोड्या आढळतात.

पराया नारीची । जरा जपून कर चोरी ।
तिच्या शेजेवरी । नको झोपूस बिनघोरी ॥
तिचा नवरा शिरावरी ॥

यातल्या प्रत्येक चरणात शेवटी यमक येते. पण अशा ओव्या अपवादात्मक आहेत.

**स्त्रीगीतातील शब्दकळा** –

स्त्रीगीतातील शब्दकळा ही तितकीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रत्येक शब्दाला रूप, रस, गंध, आणि आकार असतो. त्याचे म्हणून एक व्यक्तिमत्व असते. सामर्थ्य आणि सौंदर्य असते. ओवीत अर्थानुरूप शब्द गोवले जातात. स्त्रीगीतातली सर्व शब्दकळा ग्रामीण बोलीतली आहे. तिचे सौंदर्य 'फेअर ॲण्ड लव्हली' चे नसले तरी त्यात अस्सल गावरान गोडवा, सतेजपणा, सहजतेतलं अनघड सौंदर्य असते. दिटी, संदुक, वैराळ, दिंडी, खनाळ, व्हंजी, इटी. नांद्रकीचे झाड, नंदी, गोपा, बिदीला, गुज, पातरा, निघळू यासारखे आज वापरात नसलेली पण जुने शब्द इथे भेटतात. प्रमाण शब्दाची बोलीतली रूपे इथे दिसतात. जशी इटली (विटली), अंदुक (अंधुक), आवुक (आयुष्य), औंदा (यंदा), कुरंदान (क्रोधान), हाळी (हाक), ग्वात (गोत), वटी (ओटी), दुचित (दुचिंत), गुता (गुंता), खुती (खोती), बरांडी (ब्रांडी), वरजलं (वर्ज्य करणे), यात सुलभीकरणाची प्रक्रिया दिसते.

काव्यमय शब्दकळा हे स्त्रीगीताचे एक वैशिष्ट्य आहे. ओवीच्या मुखड्याचा चरण काव्यमयच असतो. देखुनपण, नकल्या बंधू, बाजूबंद, शिवघडणी, गजीभार, राजवर्खी, राजेंदर, सांजाई, कालाकित्ता, विसबंदाची रोप, फुटाणी रंगदाट, साखर शेरणी, बोळवण केली, मखर गुंफलं व या सारखी प्राचीनतेसी नातं सांगणारी काव्यमय, सौंदर्य संपन्न शब्दकळाही इथे दिसते. काव्यमय शब्दकळा अशी संकल्पना, भाषाविज्ञानातही मांडली जात आहे. भाषावैज्ञानिक दृष्टीने स्त्रीगीताचा अभ्यास होण्याची गरज आहे. स्त्रीगीतात पुत्र फलप्राप्तीसाठी हिरव्या चोळीवर राघूची कशिदा काढणे. विरहातील मिलनोत्सुकता रसलिंबु गळे या शब्दानी सूचित करणे असे काही संकेतही येतात.

अनुक्रमणिका

**स्त्रीगीतातील गेयता –**

स्त्रीगीते गेय असल्यामुळे स्वरान्त यमके सर्वत्र आढळतात. शेवटच्या शब्दात ई, बी, ही अशी अक्षरे घालून शब्द गेय केला जातो. उदाहरणार्थ बांगडी बांगयडी, वाकुनी – वाकुईनी, बोलत्याती बोलबीत्याती. ओवीत गेयतेसाठी अग, बाई गं, एवढी, असा बाई असे शब्दही लयीसाठी घातले जातात. मराठमोळ्या भाषेचा अस्सल देशीपणा स्त्रीगीतातून दिसून येतो.

स्त्रीगीतात सगळीच गीते चांगली आहेत असे नाही. त्यात एखाच मुखड्याची गाणी आढळतात. पुनरावृत्ती, पाल्हाळ, स्थुलता, निरसता हे दोषही फार मोठ्या प्रमाणात आढळतात. अशिक्षित लोकमानसाची रचना असल्याने हे दोष येणारचं. संत साहित्यातही हे दोष दिसतात. पण एकंदरीने पाहिले तर स्त्रीगीताच्या अभिव्यक्तीत सूचकता, औचित्यपूर्णता, अलंकारिकता, बांधीव रचनाचातुर्य, गेयता, बोलीतील समृध्द काव्यात्म शब्दकळा, अल्पअक्षरत्व, ठसठशीतपणा इत्यादी अनेक वैशिष्ट्ये दिसतात.

स्त्रीगीताची रचना उक्ति – वैचित्र्याने भरलेली, प्रसंगानुरुप कोमल आणि कठोर, लाघवी तसेच सडेतोड आहे. त्याच शब्दांचा संक्षेप तसा अर्थाचा विस्तार आहे. भावना कल्पनेच्या कोंदणात बसविण्याची कला आहे. एकच भावना विविध पध्दतीने मांडण्याचे सामर्थ्य आहे. आविष्काराचा घाटही वेगवेगळा आहे. यासंबंधी डॉ. नारायण नांदापूरकरांचे विचार नोंदविण्यासारखे आहेत. मराठवडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात.– “यातील भावना जशा जिवंत आहेत तशी सजावटही संजीवक आहे. ही खऱ्या अर्थाने मराठी कविता आहे. हीत नऊही रसांची नांदणूक आहे. भावना कल्पनाचे मनोहर मिश्रण आहे. कवयित्रीचा व्यक्तिविकास आहे. वास्तवता आहे. वास्तवाचे उदात्तीकरण आहे. नादमाधुर्य आहे. शब्दचित्रण आहे. कलेचे सहजसुदंर स्वरूप आहे. हीत जीवनाची गाथा आहे. आणि संस्कृतीचे संरक्षण आहे. हे सर्व साधे पण पोटच्या उमाळ्याने आहे. त्यात अंतरीच्या नानाकळा आहेत. अशा उल्लासाचे वातावरण निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. जात्याच्या खुंट्याला पालवी फुटेल अशी भावसुधा आहे. पोटातून निघाले ते ओठातून बाहेर पडले. जसे तिला सुचले तसे तिने रचले. असा हा काव्यप्रकार आहे.”

**कविता आणि स्त्रीगीतातील फरक –**

स्त्रीगीतातून स्त्रीजीवनाचा पर्यायाने लोकजीवनाचा आशय, मानवी भावभावनांचे चित्रण, कल्पनारम्यता, प्रसंग वर्णने, व्यक्तिचित्रणे, रचनेची विविधता, अलंकारिकता, सुंदर शब्दकळा हे काव्याचे विशेष आढळत असले तरी काव्य आणि स्त्रीगीते यातील फरकही स्पष्ट करता येईल. स्त्रीगीतेही परंपरेने चालत आलेली असल्यामुळे त्यात सार्वकालिकता असते. वर्तमानातही ती तितकीच वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. श्रेष्ठ कविता ही सार्वकालिक असली तरी सर्वच कविता तशी असते असे नाही. स्त्रीगीताची निर्मिती ही मुळात व्यक्तीची असली तरी पुढे ती सामुहिक होते. निर्मिती, सादरीकरण, आस्वाद यात सामुहिकता येते. त्यामुळे आशयात मुरलेला गोडवा आणि रचनेत सफाईदारपणा येतो. त्यात स्थळ काळानुरुप बदलण्याची लवचिकता आढळते.

कविता ही व्यक्तिनिष्ठ निर्मिती असल्यामुळे त्यावर कवीच्या व्यक्तिमत्वाचा ठसा म्हणजे नाममुद्रा कायम असते. त्यात बदलशीलता, लवचिकता आढळत नाही. स्त्रीगीते मौखिक परंपरेने चालत येतात तर कविता लिखित परंपरेने येते. स्त्रीगीते कोणत्याना कोणत्या क्रियेशी (दळणकांडण, खेळ, नृत्य) संबंधीत

अनुक्रमणिका

असतात. कविता क्रियेशी संबंधीत नसते. स्त्रीगीते गाईली जात असल्यामुळे त्यात गेयता, स्वरप्रधानता, संगीतमयता आढळते. कवितेत या गोष्टी असतीलच असे नाही. मुक्तछंदातही कविता असू शकते. स्त्रीगीतात मंत्राक्षरता असते तर कवितेत अवतरण क्षमता असते. स्त्रीगीते बोलीत आविष्कृत होत असल्यामुळे त्यात जिवंतपणा, रसिकाच्या हृदयाला भिडण्याचे सामर्थ्य असते. कविता ही बहुधा प्रमाण भाषेत अभिव्यक्त होते. स्त्रीगीतात लोकमानसातील तर कवितेत अभिजन वर्गातील संकेत व्यक्त होतात. सामूहिकतेमुळे स्त्रीगीतात विचार, भावना, अभिव्यक्ती यात स्थूलता आढळते. कवितेत त्यातील सूक्ष्मता, तरलता आढळते. लोकगीतात पुनरावृत्ती, निरर्थक शब्द योजना, पाल्हाळ या गोष्टी दिसतात. कवितेत या गोष्टी असत नाहीत. सामूहिकतेच्या पातळीमुळे पुरोगामी विचार, परिवर्तनशीलता, विद्रोह, प्रयोगशीलता या गोष्टी स्त्रीगीतात क्वचितच येतात. मानदंड ठरणाऱ्या कवितेत या गोष्टी असतात. लोकगीताच्या सादरीकरणाच्या लोकसंघटना असतात. स्त्रीगीतात असे कायमस्वरुपी लोकसंघटन दिसत नाही. काव्यवाचन होत असले तरी कवितांच्या सादरीकरणाच्या लोकसंघटना नाहीत.

**ऋणनिदेश** –

कोणते ही काम अनेकांच्या सहकार्याने साकार होते असते. परंपरेतले हे स्त्रीधन निर्माण करण्यात जतन करण्यात. अनेक अज्ञात माऊलींचे हातभार लागले असतील. त्याचे ऋण किती मोलाचे आहेत. ही गीते मला मुलाप्रमाणे वात्सल्याने देणाऱ्या श्रीमती रूक्मिणी कांबळे, द्रोपदाबाई सावंत, यशोदाबाई निंबाळकर, कै. शहाबाई जरग, मसाबाई गेजगे, भीवराबाई सरगर, सौ. फुलाबाई व सिंधु वलेकर, भागीरथी इंगोले व सौ. कमल इंगोले, तुळसाबाई सातपुते, मुक्ताबाई गेजगे, नानुबाई पवार, भागीरथी काटे, चंद्राबाई वलेकर, फुलाबाई बाबर, इंदिराबाई हागीर, देवई ठोकळे, तानुबाई कांबळे, सरूबाई वाघमारे, सिंधुताई देशमुख, सोनाबाई पवार, भागीरथी शिंदे, कोंडाबाई माने, हिराबाई कट्टे अशा किती माता भगीनींची नावे सांगावीत. शिवदास भोसले, कोंडीबा पवार, सदाशिव सरगर, भगवान करांडे अशा वडिलधाऱ्यांनीही गीते दिली आहेत.

एक एक ओवी । लाखा लाखाला द्यावी ।
जीवभावानं गावी ॥

अशी गाणी त्यांनी गायली, म्हंटली, सांगितली. इथे एका प्रातिनिधिक स्त्रीजीवनाची मांडणीसाठी चौकट स्वीकारल्यामुळे मला ती सर्व वापरता आली नाहीत ही गोष्ट खरी. माझे काम 'मी तव हमाल भारवाही' असेच आहे. या ग्रथांचे सर्व श्रेय या गाणाऱ्या माऊलीनांच आहे.

संचारच्या 'प्रियवंदा' या पुरवणीतून या ग्रंथातील बरेचशे लेख प्रथम प्रसिध्द झाले. राहिलेले दहा एक लेख संचारच्या इंद्रधनु पुरवणीतून प्रसिध्द झाले. या पुरवणीचे संपादक वंसतराव एकबोटे, प्रा. सुहास पुजारी व त्यांचे सर्व सहकारी यांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांच्यामुळेच हे लेखन विनाखंड झाले. गुरूवर्य डॉ. द. ता. भोसले यांनी हस्तलिखीत वाचून मौलिक सूचना केल्या. मित्रवर्ग डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. राजन गवस, प्रा. अरूण शिंदे, मुकुंद वलेकर, प्राचार्य डॉ. मानसिंगराव जगताप, प्राचार्य डॉ. आ. गो. पुजारी, डॉ. विजय जाधव, प्रा. वामन जाधव, मारूती भोसले, दत्ता सरगर या स्नेहयांनी मदत केली. सौ. मंगल, कन्या स्मिता व स्वाती यांनी स्त्रीगीते लिहून घेण्यासाठी मदत केली. रसिकांनी प्रतिसाद देऊन हा ग्रंथ प्रसिध्द करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

## अनुक्रमणिका

प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष गुरूवर्य प्राचार्य रा. रं. बोराडे यांना एखादा या ग्रंथाच्या प्रकाशनार्थ सहज बोललो. त्यांनी हस्तलिखित मंडळाकडे पाठवून देण्यास सांगितले. मंडळाच्या तज्ज्ञ परीक्षकांच्या निर्णयामुळे मंडळाने हा ग्रंथ प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतला. अध्यक्ष मा. प्राचार्य रा. रं. बोराडे सर, मंडळाचे प्रभारी सचिव उ. बा. सुर्यवंशीसाहेब यांनी हा ग्रंथ प्रसिध्द करण्यासाठी बहुमोल मदत केली. शासकीय मुद्रणालयात हा ग्रंथ उत्कृष्टपणे छापून दिला. या सर्वांच्या सहकार्याशिवाय हा ग्रंथ आपल्या हाती पडलाच नसता. या सर्वांचे मी अंतःकरणपूर्वक ऋण व्यक्त करतो.

**डॉ. कृष्णा इंगोले.**

१०३२/५ ‘माणदेश’ लोहार गल्ली,

सांगोला. जि. सोलापूर. पिन. ४१३ ३०७.

दुरध्वनी (०२१८७) २२०५९३.

# अनुक्रमणिका

# लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे

डॉ. कृष्णा इंगोले.

अनुक्रमणिका

# लेकीचा जलम

लेकीचा जन्म एक आपत्ती. गावा-गावात, घरा-घरात, नात्यागोत्यात येणारा हा अनुभव. मुलगा झाला की त्याचे कुटुंबात आणि नातेवाईकांत जसे स्वागत होते तसे मुलीचे होत नाही. पहिलीच मुलगी असेल तर फारसे नाही पण तिच्या पाठीवर दुसरी किंवा तिसरी मुलगी झाली तर.. 'काय पुन्हा मुलगीच! अरे अरे!' अशी हळहळ. त्यामुळे आईलाही वाईट वाटते. नकोशी असतांना झालेली मुलगी म्हणून खेड्यात तिचे नावच 'नकुसा' असे ठेवतात. आता हे काय नाव झाले? हाच भाव ज्योती म्हापसेकरांच्या 'मुलगी झाली हो!' या नाटकात आला आहे. मग गर्भजल परीक्षा, गर्भपात, मुलीचा जन्मच नाकारण्याची प्रवृत्ती. त्यामुळे एकूण स्त्री-पुरूष संख्येचा समतोलच ढासळत आहे. आपल्या एकूण सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीचा हा परिणाम असतो. मुलीला लहानाचे मोठे करावे लागते. तिच्या शिक्षणासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. ती तरुण झाली की घरात तिचीच चिंता. घरातील तरुण मुलगी म्हणजे पदरातील इस्तू. ती जर वेडीवाकडी वागली तर आईबापाची बेअब्रू, तिच्या लग्नाचा प्रश्न. मुलीच्या बापाला लाचार होऊन वरपित्याचे उंबरठे झिजवावे लागतात. हुंड्यासाठी, प्रसंगी लग्नासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. जे लोकजीवनात असते तेच गाण्यात येते.

**नवरीचा बाप हिंडतो घरोघर ।**
**बिनहुंड्याचा नाही वर ॥**
**बोलतो आपल्या राणी ॥**
**कर्ज काढतो शेतावर ॥**

असं कर्जपाणी करुन लग्न केलं तर पुन्हा तिचे नांदणे सुराला लागेल की नाही याची काळजी. पुन्हा करणीधरणी, दिवाळसण, बाळंतपणाचा खर्च, या सर्व वास्तवामुळे मुलगी हे परक्याचे धन अशी समजूत खोलवर रुजली आहे. त्यामुळे मुलीचा जन्म एक आपत्ती वाटते.

लोकगीतात बाळराजाच्या बालपणावर आणि त्याच्या कोडकौतुकावर जेवढ्या ओव्या मिळतात तेवढ्या मैनाबाईच्या बालपणावर मिळत नाहीत. थोड्याफार मिळाल्या तर त्यात 'परक्याचे धन' असाच भाव असतो.

**लेकीचा जलम । जसा गाजराचा वापा ॥**
**वेड्या तू रं मायबापा । पाणी देऊन काय नफा ॥**
**थोर लोकाची नवईरी । तिला उपवर म्हणू नका ॥**
**पाणी दिल्याली बन्सी मका ॥**
**मैनेचं देखुणपण । जशी सोन्याबीयाची वीट ।**
**कुण्या राजराचं दैव नीट ।**
**मैनेचं देखुणपण । काय करावं आसूईनी ।**
**पराया नारीच्या पुतरानं । नेली दारात बसुईनी ।**

वरील ओव्यातील भाव असाच. लेकीचा जन्म तोट्याचा. गाजराच्या वाप्यासारखा. पाणी देऊन काही उपयोग नाही. गाजरे पूर्वी विकण्याची वस्तू नव्हती. ती बैलांला घालत. गरीबांना मोफत वाटत.

अनुक्रमणिका

मुलगी बघता बघता मोठी होते. उकीरंड्यासारखी वाढते. पाणी दिलेल्या बन्सी मकेप्रमाणे. उपमा तर कशा? ती देखणी, सौंदर्यवती असूनही उपयोग नाही कारण ती परक्या घरी जाणारी असते. लोकमानस आजही मुलीकडे असेच पाहते.

आता काळ बदलला आहे. स्त्री-पुरुष समतेचे युग आहे. मुला इतकीच मुलगी महत्त्वाची आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात ती मुलापेक्षाही सरस ठरत आहे. आज ना उद्या लोकसभेत ३३% जागा महिलांसाठी राखीव होतील. कदाचित तुमची मुलगीही खासदार होईल. मुलगा तर काय दिवे लावणार आहे. म्हणून एक माऊली म्हणते—

**लेकीच्या आईला । नका म्हणू हालकी ॥**
**लेकाच्या आईला । कुणी दिलीया पालखी ॥**

आज मंत्र्याला लालदिव्याची गाडी असते तशी पूर्वीच्या राजघराण्यातल्या स्त्रियांना मेणे किंवा पालख्या असत. आता तरी मुलीला आणि तिच्या आईला गौण लेखू नका. एका पाश्चात्य विचारवंताने म्हटले आहे. *Woman is noblest creation of God.*नव्हे ती प्रत्यक्ष देवीची मूर्तीच आहे. म. जोतीराव फुले पुरुषापेक्षा स्त्री श्रेष्ठ मानतात.

❒❒❒

अनुक्रमणिका

## मोठं या मोठं डोळं

मैनाबाईचा जन्म नाखुषीने स्वीकारला जात असला तरी दिसामासा ती मोठी होते. अंगड्या टोपड्यातून परकर झंपरात येते. झिम्मा फुगडी खेळत, खेळगाणी गात ती मोठी होते. साडीचोळीत येते. तरुणपणातील तिच्या रूपागुणांचा, सौंदर्याचा परिमळ पसरू लागतो. खेळ गाण्यासाठी, देवधर्माला, समारंभासाठी, सणासुदीला ती घराबाहेर पडते. नाजुक बांध्याची, नाकीडोळी नीटस, गव्हाळ वर्णाची, तरुणपणात पदार्पण केलेली मैनाबाई अनेकांचं लक्ष वेधून घेते.

परमेश्वर एखादीला सौंदर्याचे एखादं असं लेणं बहाल करतो की तिच्या व्यक्तिमत्त्वाला त्यामुळे उठावदारपणा येतो. कुणाला गोरापान रंग, कुणाला लांबसडक काळेभोर केस, कुणाला चाफेकळी तजेलदार नाक, कुणाला कमनीय बांधा असे सौंदर्याचे वरदान लाभते. आमची मैनाबाई रुपानं देखणी होतीच पण तिचे डोळे मोठे आणि वैशिष्ट्यपूर्ण होते.

डोळे महत्त्वाचे इंद्रिय. सृष्टीतील नानाविध रंग, रूप, आकार, प्रकाश, वस्तूचे ज्ञान डोळ्यांनी होते. निरीक्षण, अवलोकन, ज्ञानार्जनही डोळ्याकडूनच होते. माणसाच्या मनोभावनांचे प्रतिबिंब डोळ्यात पडते. डोळे म्हणजे मनाचा आरसाच. जेव्हा शब्द संपतात तेव्हा डोळे बोलू लागतात. डोळे लाजतात. डोळे हसतात, डोळे प्रेम करतात, डोळे रागवतात, डोळे रडतातही, कविवर्य वि. म. कुलकर्णी ‘डोळे’ या कवितेत म्हणतात –

शब्द संपतात – तेव्हा डोळ्यात लाज येते.<br>
शब्द संपतात – तेव्हा डोळ्यात आग पेटते.<br>
शब्द संपतात – खळकन् पाणी ओघळते.<br>
डोळे नसते तर आमचे कसे निभावले असते.

असे डोळे मानवी मनाचे भावदर्शन घडवितात. भा. रा. तांब्यांची नायिका म्हणते –

डोळे हे जुलमी गडे, रोखुनी मज पाहु नका.<br>
जादुगिरी त्यात पुरी, येथ उभे राहू नका.

‘डोळे हे फिल्मी गडे’ असे मर्ढेकरांनी म्हटले आहे. चेहऱ्याचे सौंदर्य पुष्कळ अंशी डोळ्यावर अवलंबून असते. डोळ्यांचा आकार व सौंदर्यावरुन मृगनयनी, हरिणाक्षी, मीनाक्षी अशा उपमा दिल्या जातात. आमच्या मैनाबाईचं डोळे ‘मोठंच्या मोठं’ होते. तिच्या डोळ्याचं वर्णन करणाऱ्या ह्या काही ओव्या.

**मोठं या मोठं डोळं । डोळं आभाळाचं ढग ॥**<br>
**गोरी माझी मालयन । दिस्ट झालीया खाली बघ ॥**<br>
**मोठं या मोठं डोळं । डोळं हातानं केल्यावानी ।**<br>
**सदा सुरमा लेल्यावाणी ॥**<br>
**मोठं या मोठं डोळं । डोळं भीवया नीटास ॥**<br>
**पडला देवाला आटास ॥**

**अनुक्रमणिका**

**मोठं या मोठं डोळं ॥ डोळं भीवया उडवती ॥**
**सुरमा गंधाला भीडवती**
**मोठं या मोठं डोळं । डोळं भीवयामंदी काळं ॥**
**तुझ्या दृष्टीचा आला जाळं ॥**
**मोठं या मोठं डोळं । तुझ्या डोळ्याची वाटे भीती ॥**
**खाली बघून चालू किती ॥**
**मोठं या मोठं डोळं । डोळं रसाळ लिंबाच्या फोडी ॥**
**गोऱ्या माझ्या मालणीचं । रुप सावळं ताल तोडी ॥**

या ओव्यातून मैनाबाईच्या डोळ्याचे वर्णन केले आहे. मैनाबाईचे डोळे हाताने केल्यावाणी, सदा सुरमा लेल्यावाणी, धनुष्यकृती नीटस भुवया. असे डोळे तयार करण्यासाठी परमेश्वराला आपले कसब पणाला लावावे लागले आहे. तिच्या डोळ्याच्या मोहक हालचाली, रागाला आले तर आग ओकणारे, डोळ्यांला डोळा भिडविण्याची हिंमत पुरुषाला सुध्दा होणार नाही. दृष्ट लागावे असे मैनाबाईचे डोळे आणि रुपसौंदर्य होते. खेड्या-पाड्यातल्या रुढार्थाने अशिक्षित, अडाणी खेडवळ बायाबापड्यांनी केलेलं हे वर्णन आहे. त्यातल्या उपमा – डोळे 'आभाळाचे ढग,' 'रसाळ लिंबाच्या फोडी.' 'मोठं या मोठं डोळं' या शब्दप्रयोगात 'मोठं' शब्दाची पुनरावृत्ती करुन साधलेली परिणामकारकता. भुवयाची मोहक हालचाल 'दृष्टीचा आला जाळ,' मधील रागावलेला आग ओकणारा भाव, डोळ्यांची वाटणारी भीती हे भावसौंदर्य पाहिले की भल्या-भल्या साहित्यिकाला सुचणार नाहीत अशा या गोष्टी आहेत. सामान्य लोकांनी किती साध्या, सहजतेने पण प्रभावीपणे डोळ्याचे हे वर्णन केले आहे.

अशा सुंदर डोळ्याच्या मैनाबाईवर कुणीही जीव ओवाळून टाकावा.

❒❒❒

## तिचा चंदन मव्हरला

मैनाबाई आमची नायिका. ती कुणी एक व्यक्ती नाही. खेड्यापाड्यातील साळू, मालन, गौरा यासारख्या असंख्य मुलींचे ते प्रातिनिधिक चित्र. वेगवेगळ्या रुपातील तिची लोकगीतातील चित्रणे मोठी मनोहर आहेत.

केळीच्या बुंध्यासारखी नितळं गव्हाळ वर्णाची, सुडौल बांध्याची, अंगापिंडानं भरलेली, नाकी-डोळे नीटस, मोठमोठ्या डोळ्यांची, नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली ही राजसबाळी. अशा तरुण सुंदर मुलीकडं कुणी राजकुमार आकर्षित झाला तर त्यात नवल नाही. पण जुनं सगळं जीवन संस्काराने मढलेलं आणि नीतीनियमाने बांधलेले. वाटेच्या वाटसरुने वेड्यावाकड्या नजरेने अशा तरुण मुलीकडे पाहिले तर

**वाटच्या वाटसरा । वाटंनं जाय उगा ॥**
**पाडाला आला आंबा । नाही तुझ्या हाताजोगा ॥**
**वाटच्या वाटसरा । केतकीला भुलू नको ।**
**बुडीचा भूजंग । त्याच्या दिठी पडू नको ॥**

अनोळखी माणसाने केवळ तोंडओळखीने लगट केली तर त्याला समज दिली जाते. गावातील पाटील, देशमुख, जमीनदार किंवा त्यांची तरुण मुलं अशा वेळी थोडा जास्तच अगाऊपणा करतात. विवाहित लेकीबाळीची छेड काढतात. एखादी विवाहिता त्याला म्हणते –

**देशीच्या देशमुखा! का रे उभा तुझा घोडा ॥**
**कंथ माझा जंगलात । वाघीणीच्या मोजी दाढा ॥**

आपण विवाहित आहोत. आपला पती धाडशी, पराक्रमी, वीर आहे. आपल्या वाटेला जाऊ नकोस हे या ओवीत किती खुबीनं व सूचकतेने सुचविले आहे, खडसावले आहे.

कोणत्याही काळात शृंगाराला जीवनात महत्त्वाचे स्थान असतेच. पण लोकसंस्कृतीने त्याला कधीही प्रतिष्ठा दिली नाही. आजच्या चित्रपट व टी. व्ही. मधल्या उघड्यावाघड्या शृंगाराला लोकगीतात अजिबात स्थान नाही. स्त्री-पुरुषांचे विवाहबाह्य संबंध लोकमानस आणि लोकसंस्कृती स्वीकारीत नाही. त्यामुळे अशा प्रेमसंबंधावरील लोकगीते फारच कमी प्रमाणात मिळतात.

खेड्यापाड्यात प्रेमसंबंध निर्माण होत नाहीत असे नाही. ते जमण्याचे प्रमुख ठिकाण म्हणजे पाणवठा. उगीच नाही मराठी चित्रपटातील नायक नदीवर पाणी आणायला गेलेल्या नायिकेला घागर उचलून देता देता प्रेमात पडत. पाणवठ्यावर घागर भरून घेऊन आलेल्या एक तरुणीलारस्त्यावर एकाने विचारले “जातानां एवढ्या लगबगीने गेलीस आणि आता एवढी दमानं.” “दिसत नाही का? जाताना घागर रिकामी होती, आता भरलेली आहे.” तिचे उत्तर. अशी रिकामी घागर पाणवठ्यावरचं भरणार. मग तो पाणवठा नदी असो, ओढा असो, बारव असो, आड असो, नाहीतर अलीकडील विंधनविहीर असो. अशा ठिकाणी तरुण मुलं – मुली पाण्याच्या निमित्ताने एकत्र येतात. प्रेमासाठी सहवास आवश्यक असतो.

**पाण्याला गेली गोरी । हिर सोडून बारवला ॥**
**तिचा चंदन मव्हरला ॥**

(विहिरीपेक्षा बारवेवर माणसाची वर्दळ जास्त म्हणून)

**पाण्याला गेली गोरी । तिची घागर डाव्या कुशी ॥**
**माझा नखल्या हौदापशी ॥**

एखादी थोडी आगाऊ असेल तर

**अंघोळीला गेला । त्याच्या घागरीवरी पेला ॥**
**कुण्या नारीनं उभा केला ।**

कधी कधी असंही घडतं. बारवेच्या विहिरीवर धुणं धुवायला गेलेली नार विहिरीवर मोट हाकणाऱ्या मोटकऱ्यावरच लुब्ध होते. पण तो विवाहित असल्याने तिला प्रतिसाद देत नाही.

**बारंव्या हिरीवरी । गोरी धुणं धुती ॥ मोटकऱ्याला इचारती ॥**
**मोटकरी बोलूइतू । माझ्या राणीला वर्स नऊ । खाली बघून धुणं धू ॥**

बहुसंख्या मुली सरळ चालीच्या असतात. पण एखादी अशा प्रसंगामुळे प्रेमात पडली. तर त्याची बातमी बघता बघता गावभर होते. हागनदारीपासून पाणवठ्यापर्यंत आणि शेतमळ्यापासून चावडीपर्यंत सर्वत्र त्याची चर्चा होते. एखादी अनुभवी पोक्त बाई तिला हिणवते.

**काय भाळलीस गोरे । त्याच्या नाजूक ओठाला ॥**
**न्हाय भाकर पोटाला ॥**
**काय भाळलीस गोरे । ओठावरल्या मिशाला ॥**
**न्हाय लुगडं नेसायला ॥**
**काय भाळलीस गोरे । शेजारच्या फाकड्याला ॥**
**चटणी मिळना तुकड्याला ।**
**काय भाळलीस गोरे । छपराचं त्याचं घर**
**रोज करील हाणमार ॥**
**काय भाळलीस गोरे । ओठावरल्या त्याच्या मिशा ॥**
**म्हातारपणामंदी । काय होईल तुझी दशा ॥**

अशी नाना तऱ्हेची भीती घालून, सामाजिक दडपण आणून अशा संबंधापासून परावृत्त केले जाते. तिचे आईबाप ही खडबडून जागे होतात आणि लग्न ठरवायचा घाट घालतात.

लोकगीतातून कवितेसारख्या प्रेमासंबंधातील सूक्ष्म छटा व्यक्त होत नाहीत. प्रेमसंबंधातील स्थूलपणा, सामाजिक दडपण, नीतीमत्तेच्या चौकटी आणि वैयक्तिक भावभावनेपेक्षा सामूहिक स्थूल भावनावर लोकगीताचा असलेला भर यामुळे असे होत असावे.

अनुक्रमणिका

## साळूला मागईन

लग्न हा मुलीच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग. तिच्या जीवनाला नवी दिशा देणारा. रोपवाटिकेत फळांची, फुलांची, झाडांची रोपे तयार करतात. शेतकरी वाफ्यात वांगी, कांदे, मिरची यांचे तराव तयार करतो. नंतर त्यांची शेतात लावणी करतात. शेतात रोपे जोमदार वाढतात. फुलां-फळांनी बहरुन येतात. तशीच मुलगी बापाच्या घरी वाढविली जाते. योग्य वेळी ती दुसऱ्या घरात रुजविली जाते. तिथे तिच्या जीवनाला बहर येतो.

आदिम संस्कृतीत स्त्री स्वतंत्र होती. निसर्ग निर्भय होती. कुटुंबात, समाजात तिला मानाचे स्थान होते. पण कृषिसंस्कृतीच्या प्रदीर्घ कालखंडात आजची विवाह संस्था निर्माण झाली. लोकगीतेही त्याच कालखंडापासून निर्माण झाली. या काळात स्त्री हळुहळू परतंत्र बनली. स्त्रीला माणूस म्हणून येणारे अधिकार नाकारण्यात आले. पुरुषसत्ताक कुटुंबपध्दती, मालकी हक्काच्या कल्पना, वंशशुध्दीसाठी नीतीमत्ता यामुळे स्त्री केवळ 'भोगदासी' ठरली. पुरुषाची गुलाम झाली. तिच्यावरची बंधने वाढली. मुंजीचा आणि शिक्षणाचा अधिकार नाकारल्यावर ती शूद्राच्या बरोबरची झाली. पावित्र्यांच्या कल्पनेमुळे व प्रजोत्पादनाच्या घाईसाठी तिच्या लग्नाचे वय कमी झाले. 'अष्टोवर्षाभवेत कन्या' आठ वर्षाची झाली की मुलगी लग्नाला आली असे समजण्यात येऊ लागले. मुलीच्या संमतीचे वय दहा असावे की बारा या संबंधात शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्रात मोठे वैचारिक रण माजले होते.

आज परिस्थिती बदलली आहे. मुली शिकत आहेत. नोकरी करत आहेत. डॉक्टर, इंजिनिअर होत आहेत. पण त्यांनाही 'दाखवून' घेण्याच्या प्रसंगातून जावेच लागते. मुलगी लग्नाला आली की, तिच्या आईबापाला एकच चिंता लागून राहते.

**लगीन सराईत । जीव माझा घोराईत ॥**
**सांगते सई तुला । नवरी उपवर घराईत ॥**
**लगीन सराईत । झोप लागना नेतराला ॥**
**सावळ्या मैनेला । कुठं द्यावी पातराला ॥**

मग वधू पिताचे वरं संशोधन. मुलगा, नातेसंबंध, मुलाचे व्यक्तिमत्त्व, शिक्षण, नोकरी, घरजागा, जमीन-जुमला, घरातील माणसं, त्याच्यावरच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टी पाहिल्या जातात. सर्वच गोष्टी मनासारख्या मिळतील असं नाही. मुलगा चांगला असला तर नोकरी नसते. नोकरी असली तर घरजागा, जमीन-जुमला नसतो. मुलगाच चांगला असला तर आपली बाजू अशी ठसविली जाते.

**असा नवरीचा बाप । काय बघतो जागाजुगा ।**
**नवरा हाळबिदीची गाभा ॥**
**असा नवरीबीचा बाप । काय बघतो काळी रानं ॥**
**माझ्या राघूला बोलयती । नवरा बेगडाबीच पान ॥**
**असा नवरीबीचा बाप ।त्यानं उंबऱ्या दिलं उसं ॥**
**नवरा बघूनी झाला खुष ।**

अनुक्रमणिका

अशा सर्व गोष्टी जुळून आल्या तर मुलगी दाखवायची ठरते. मुलीला बघायला यायचे निमंत्रण दिले जाते.

**नवरी पाहू आले । वसरी भरुनी अंगणी ॥**
**सीता माझी मालयन । माझी शुक्राची चांदणी ॥**
**साळूला मागईन । आधी सोप्याला पडदा लावा ॥**
**मग साळूचं रुप दावा ॥**
**साळूला मागईन । काळ्या रानात पडल्या वाटा ॥**
**गोऱ्या माझ्या मालयनीच्या । गोऱ्यापणाचा लई बोभाटा ॥**

असा मुलीला दाखविण्याचा प्रसंग. मुलीच्या दृष्टीने तर आयुष्याला कलाटणीवर देणारा. तिचं अल्लड वय. पहायला येणारा स्वप्नातला राजकुमार. त्याचं घर, घरातील माणसं, त्यांचे स्वभाव, दावविण्याची भीती, पसंती-नापंसतीची चिंता व नव्या संसाराचे आकर्षण असे कितीतरी भावतरंग तिच्या मनात निर्माण होत असतील. पाहुणे येणार म्हणून मुलीच्या आईची उडालेली धांदल. मुलीचे लग्न ठरणार म्हणून झालेला आनंद, लग्नाच्या खर्चाने चिंताग्रस्त झालेला बाप, अशी कुटुंबातील माणसांची मनस्थिती.

खेड्यातले ते चंद्रमौळी घर. घरात जागा कमी म्हणून अंगणात ओसरीवर बसलेली बैठक. मामा, चुलता यासारखे जमलेले नातेवाईक आणि शुक्राच्या चांदणीला दाखविण्याचा प्रसंग. शेवटच्या ओवीत मुलीच्या गोऱ्यापणाचा, सौंदर्याचा इतका बोभाटा झाला आहे की, मागणं घालणाऱ्या मंडळीनी येऊन जाऊन काळ्या रानात वाटा पाडल्या आहेत. कशी आहे अतिशयोक्ती पहा.

मग संगळं जमून येते.

**राघू–मैनाचं रूप गोजिरवाणी माझ्या चांदाला शोभा देती ॥**
**चंद्रामागली चांदणी ॥**

असा जोडा जमल्यावर एक दिवशी बैठक बसते.

**साळूला मागईन । गंगाथडीचं गवईळी ॥**
**नेणंती साळू माझी । सोन्या परास पिवयळी ॥**
**साळूला मागईन । चुलता बघतो वाडाहुडा ॥**
**नवरा अंगठीवरला खडा ॥**
**साळूला मागईन । बोली हुतीया सडकला ॥**
**पायी पैंजण लाडकीला ॥**
**असा नवरीबीचा बाप । बैठकीमंदी हासयीला ॥**
**चढ हुंड्याला बसयीला ॥**
**साळूला मागईन । बोली हुतीयां बागमंदी ।**
**चुलतं साळूचं रागामंदी ॥**
**साळूला मागईन । नाही चुलता, गेला घरी ॥**

अनुक्रमणिका

**तिच्या मामानं बोली केली । पाच तोळ्या वर सरी ॥**
**साळूला मागईन । नव्हतं द्यायचं मनाईत ॥**
**दैव मांडलं उनाईत ॥**
**साळूला मागईन । आलं गंगाथडीच कारकून ॥**
**हीरा काढला पारखून । न्हेली पुतळा पारखून ॥**

खेड्यातली बैठक ती. दोन्ही बाजूनं इरसाल कारभारी जमलेले. एकमेकाला पारखून, कसाला लावून बोलाचाली होते. सडकवर, बागेत विचारविनिमय होतो. रागलोभ होतात. मग परस्परांचा अंत पाहून एकदाशी लग्न ठरते.

❒❒❒

अनुक्रमणिका

# मांडवाच्या दारी

खेड्यात एक म्हण आहे. 'तोरणवेळ अन् मरणवेळ चुकवू नये.' लग्न आणि मरण माणसाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे प्रसंग. सुख आणि दुःख या दोन ध्रुवावर उभे असलेले. प्रत्येकाच्या अनुभवातले. या दोन्ही प्रसंगावर विपुल लोकगीते उपलब्ध आहेत.

मैनाबाईचं लग्न ठरलं. कामाची एकच धांदल उडाली. पैशाची जमवाजमव. साखरपुडा, टिळा, बस्ता, लग्नपत्रिका, न्याहरी एक ना अनेक कामं, म्हणूनच म्हणतात ना 'लग्न पाहावं करून.' तरी बरं लग्न वरपक्षाकडे होतं.

लग्नघरी तरी भारीच गडबड. अन्नधान्याची खरेदी, निवडणं, पाखडणं, दळणकांडण, सारवण-सुरवण, रंगरंगोटी, लग्नपत्रिका छापणे, त्या वाटणे, वाजंत्री सांगणे, आचारी ठरवणे, सुपारी हळकुंडापासून हंडेतपेल्यापर्यंत साहित्य जमा करणे, मंडप सांगणे, वऱ्हाडासाठी वाहनासकट मुराळी पाठविणे अशी नाना प्रकारची कामं. त्यात लग्नघरातल्या माणसांचा कामानं पिट्टा पडतो. जुन्या काळात एक बरं होतं हे श्रम हलके करण्यासाठी नाना प्रकारची गाणी, हास्यविनोद व्हायचे. लगीनघर कसे गात होते. गाणाऱ्या गळ्याच्या सुरांना बहार यायचा. लोककलावंताच्या निर्मिती क्षमतेला वाव होता. निवडणं-पाखडणं करताना नवरा-नवरीला, वरबाप-वरमाईला उद्देशून म्हटलेलं गाणी, हळद लावताना परटीनीनं म्हटलेले गीत, कणिक कांडताना, पुरण दळताना पुरुषांनी म्हटलेल्या कडव्यासह ओव्या, नवरा वरातीने आल्यावर बहिणीनं दार धरल्यावर म्हटलेलं गीत, ते नाव घेणं, रुखवत, हळद खेळणं असा गीत गायनाचा मोठा बहार असे. नाहीतर आता स्पिकरवरची ती कर्णकर्कश चित्रपट गीतं, बँड आणि बेंजो पार्टीचा धिंगाणा. लोकमानसातील कलानिर्मितीच मारली जात आहे.

मांडव उभा राहायला लागला की लग्न गीतातून सुरु होते.

**मांडवाच्या दारी । मागल्या मेढी म्होरं सारी ॥**
**नवरीबाईचं ग्वात भारी ॥**
**मांडवाच्या दारी । आंबा लोंबतो तोरणाचा ॥**
**केला इवाई भरण्याचा ॥**
**वराड उतरलं । शिववरी बाजा हुतू ॥**
**मूळ वराड्या । मामा येतू ॥**
**वरमाईचा गाडा । रासबीदीला थोपला ॥**
**मान मागती आपला ॥**
**वऱ्हाड उतरलं । वराड घर सोडूनी वावरी ॥**
**लई गोताची नवरी ॥**
**वराड उतरलं । आंबा सोडून पिंपरीखाली ॥**
**नवरा मोत्याच्या छत्रीखाली ॥**
**मांडवाच्या दारी । चिकुल चिवंदा झाला ॥**
**वैशाखाच्या उन्हात ॥ बाप नवरीचा पाणी न्हाला ॥**
**मांडवाच्या दारी । झाला चिकुल राडीईचा ॥**

अनुक्रमणिका

**किती सांगू साळू तुला । पदर आवर साडीईचा ॥**
**सोयऱ्याच्या आहेरानं । मांडव झाला लालेलाल ॥**
**बंधुच्या आहेराची । आली परात हिरवीगार ॥**
**मांडाच्या दारी । पाला उडतो उंबराचा ॥**
**बुडता आहेर शंभराचा ॥**
**मांडवाच्या दारी । हळदी कुंकवाच्या परायती ॥**
**अक्षदाच्या येळ । आली ईश्वर-पारबती ॥**
**नेणंता नवईरा । परण्या निघाला दोपाईरा ।**
**लिंब टाकती उताईरा ॥**
**मांडवाच्या दारी । नकू करू बामणा घाई ॥**
**माझ्या मैनाईचं । मामामंडळी आली न्हायी ॥**
**मांडवाच्या दारी । नवरी कापती थरथरा ॥**
**मामा पाठीशी उभा करा ॥**
**मांडवाच्या दारी । बाजूबंद नवरीच्या दंडात ॥**
**जिरं साखर तोंडात ॥**
**मांडवाच्या दारी । बामण बोल तू सावधान ॥**
**नवरी जिंकीतू राजाराम ॥**

या ओव्यातून लग्नाचे एक चलत चित्र उभे राहते. सारे लग्न त्यातल्या घाई गडबडीसह नेमक्या ओव्यातून साकार झालेले आहे. ग्रामीण जीवनातील विवाहाचा सुरेख प्रत्यय अनुभवावयास येतो. गाणारणीच्या मनातील कौतुकाचा आणि अभिमानाचा हा भाव इथे प्रगट झालेला आहे. विवाहातल्या अनेक लोक समजूतीला खोल अर्थ असतो. लोकमानसात अशी समजूत आहे की सून गरीबाघरची करावी लेक श्रीमंताघरी द्यावी. भरण्याचा इवाई करण्यात लेकीचा जन्म सुखात जावा अशीच भावना असते. ग्रामीण संस्कृतीतला माणूस पैहीपाहुण्याला, नात्यागोत्याला घरुन जगत असतो. म्हणूनच ‘नवरीबाईला गोत भारी’ हा कौतुकाचा विषय ठरतो. लग्नात नवरा नवरीच्या मामाला महत्त्वाचे स्थान असते. कारण तो जवळच्या नात्यातला, जिव्हाळ्याचा माणूस, मूळ वराड्या. जुन्या धामधुमीच्या काळात नवरा-नवरीच्या सरंक्षणाची जबाबदारी मामाची होती. म्हणून आजही लग्नप्रसंगी तो नवरानवरीच्या पाठीमागे हत्यार घेऊन खडा पहारा देतो. ज्याचा मान त्याला दिला पाहिजे. म्हणून मानाने विडे दिले जातात. वरमाईचा गाडा राजरस्त्यावर उभा राहतो. त्याला वाजत गाजत आणावे लागते. आता पुढाऱ्यांच्या सत्काराचा नवा मान निर्माण होत आहे.

रोजचे स्नान असतेच पण दिवाळीचे अभ्यंग स्नान महत्त्वाचे, तसेच कळसात न्हाणे महत्त्वाचे. त्याच्या पाण्याने चिक्कुल चिवंदा होतो. सोयऱ्याच्या आहेरापेक्षा बंधूच्या आहेराचे कौतुक भारी कारण त्यात माहेरचा जिव्हाळा आणि प्रेम असते. मंगलकार्याला देवाचा आशीर्वाद हवाच. नवऱ्याबाळाला बाधा होऊ नये म्हणून लिंबलोणाचा उतारा टाकतात. वैशाखाच्या उन्हात जिरे साखर तोंडात घालून लग्न लागते. सप्तपदी वगैरे खेड्यात नसतेच. ‘नवरी जिंकीतू राजाराम’ या शब्द प्रयोगात पूर्वीच्या काळी सुंदर मुलीला लढाई करुन जिंकून आणीत व विवाह करीत त्या प्रथेची आठवण येते.

❐❐❐

# अशी सुरत अनिवार

जुन्या काळातील म्हणजे पन्नास एक वर्षापूर्वीच्या मांडवातील एक चित्र. लगीन घरासमोर गावठी मेढीवर वासे टाकून उभा केलेला मांडव. त्यावर करंजाचे, वडाचे ढापे टाकून केलेली सावली. समोरच्या मेढीला बांधलेली नारळाची झावळं. मधल्या मेढीला उभी केलेली घडासह केळीची खुंट. डहाळ्यावर लोंबणारे आंब्याचे घस. करंजाच्या पानाचा उग्र वास. स्वयंपाकाचा धूर आणि वास. असं रंगागंधाने भरलेले मांडवातील वातावरण.

आता लग्नाचा स्वयंपाक आचाऱ्याकडून करून घेतला जातो. भात-भाजी, कळ्या असे त्याचे सुटसुटीत स्वरुप असते. पण जुन्या काळात पुरणपोळ्याचा स्वयंपाक असे. आता शे-पाचशे माणसांचा पुरणपोळ्याचा स्वयंपाक करायचा म्हणजे तेवढी व्यवस्था पाहिजे. गावातील घरटी एक सुवासिनी तवा, पोळपाट-लाटणं घेऊन स्वयंपाकाला येई. जिथे जागा मिळेल तिथे तीन दगडाची चूल मांडून पोळ्या करायला बसे. पुरुष माणसं स्वयंपाकाला मदत करीत. पाणी आणून देत. मुख्य मांडवांत पाट्यावर मुसळाने कणिक कांडून देत. दोन मोठ्या जात्यावर अर्धवट वाटलेल्या पुरणाचे दळण दळण्याचा कार्यक्रम सुरू होई.

यावेळी पुरुष माणसं जात्यावर ओव्या म्हणत. नटून थटून आलेल्या बायाबापड्यानी मांडव भरुन गेलेला असताना पुरुषांनी म्हटलेल्या या ओव्यांना अधिकच रंग चढे. पुरुष दळतात आणि गाणी म्हणत, याचे बायकात कोण कौतुक! स्त्रियांच्या मनात रुजलेली पुरुषी मानसिकता ही अशी होती.

पुरुषांची ओव्या म्हणण्याची पद्धत थोडी वेगळी होती. दोन कडव्याच्या मध्ये ओवी घालून मोठ्या ढंगदारपणे ही गाणी गायली जात.

**कडवं—** **माळ्याचा मळा । जाईचा आळा ॥**
**तोडती नार । गुंफती हार ॥**
**ओवी—** **गोरीचं गोरंपण । हळदीला मागं सारी ॥**
**गोऱ्यापणाला त्याज भारी ॥**
**कडवं—** **बारीक शेला । वाऱ्यानं गेला ॥**
**नजर झाली त्याला वऽ। बाजूबंदाला, गोपीचंदाला ॥**

(गोऱ्या बायकांच्या अंगावर मूठभर मांस. काळ्या हिरमुसलेल्या)

**ओवी—** **गोरीचं गोरंपण । दिसतं इटाक ॥**
**काळी सावळी नीटास ॥**
**कडवं—** **ऐन्यात का, मैन्यात । एका सव्वा महिन्यात ॥**
**किल्ला बांधला पाण्यात ॥**
**पाच मोटंचं पाणी जातं । रामा तुझ्या बागत ॥ धृ ॥**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| ओवी— | बारीक माझा गळा ॥ नको गाऊस गाडीवर ॥<br>उभी सुंदरी माडीवर ॥ |
| कडवं— | माडीतून खिडकीतून । कोण ग बघितो ॥<br>लाख्या माझा सावकार । चंद्र डुलितो ॥ धृ ॥ |
| ओवी— | आठा दिसाच्या ऐतवारी । कशाचं देणंघेणं ॥<br>तुझ्या पायी म्या केलं येणं ॥ |
| कडवं— | झुण झुण झुण्यात । बसलीया मेण्यात ॥<br>लाल चोळी अंगात । गुलाल भांगात ॥<br>नवलाख मोती नथीला ॥<br>तू कुण्या हौशाची राणी । जातीस पार्वतीला ॥ धृ ॥ |
| ओवी— | अंबारीचा हत्ती । अंबारी घालू दिना ॥<br>नार पुरुषाचं । चालू दिना ॥ |
| कडवं— | आग घडणी । नदी कडनी ॥<br>मोर डुलितो । कुसूंब्या चोळीवर ।<br>रंग खुलितो ॥ धृ ॥ |
| ओवी— | हसू नको नारी । तुझ्या हास्याचा भ्रम मोठा ॥<br>जन्म अस्तुरीचा खोटा ॥ |
| कडवं— | आंब्या लिंबार । जाई जांभळ ॥<br>केळी नारळ । बोरी बाभळ ॥<br>लव्ह बागला । गर्दी झाली फार ॥ धृ ॥ |
| ओवी— | पान खतावण्या । तुझा रंगल्या दात दाडा ॥<br>कुण्या नारीनं । दिला विडा ॥ |
| कडवं— | पाण्याच्या वाटं । सोडली नीट ॥<br>गार गारवा । हिरी बारवा ॥<br>पाण्याला जाती नार । घुम पारवा ॥ धृ ॥ |
| ओवी— | माळ्याच्या मळ्यात । मथीबाईला आलं गोंडं ॥<br>सासू जावाया मागं हिंड ॥ |
| कडवं— | चांग चौथ्याचा । भांग मोत्याचा ॥<br>अशी सुरत अनिवार । मारती लहार ॥<br>सायबाच्या बंगल्यापुढं । कारंज उडं ॥ |

ह्या ओव्या प्रत्यक्ष ऐकायला हव्यात! मोठ्या बहारदार असतात. त्यातल्या ओवीचा कडव्याशी फारसा संबंध असत नाही. कडव्याचा स्वतंत्र बंध असतो. त्यातला ताल, स्वर, ढंग, मोठा खुबीदार असतो. कडव्यातून पुरुषी बाज, शृंगार, विनोद यावर भर असतो. कडव्यातील यमक, लय, आशय याचे स्वतंत्र

अनुक्रमणिका

विवेचन करता येईल. कडव्यामुळे ओव्याची रंजकता वाढविली जाते. लावणीचे कितीतरी मुखडे या लोकगीतातील कडव्यातून उचललेले आहेत. जात्यावरच्या या वैशिष्ट्यपूर्ण ओव्या म्हणण्यात पुरुष काही कमी नसतात बरं का?

❑❑❑

# आधी हळद लावा

लग्न समारंभात आज बऱ्याच गोष्टींना फाटा दिला जात असला तरी हळदी, परना आणि अक्षता हे कार्यक्रम केलेच जातात. मुलगा-मुलगी लहान असल्यापासून कळसात न्हाण्याचे, नवी साडी नेसून वरमाई होण्याचे स्वप्न ग्रामीण स्त्रीने बाळगलेले असते. लग्नात सिमान्त पूजन, स्वागतभेटी झाल्यावर वधूवरासह मातापित्यांना कळसात न्हाऊ घालतात. ब्राम्हण चौक मांडून गणपतीची पूजा करुन लग्न वर्ततो. 'मांडव बोहलं घालून तयार आहे. अमूक तमूक तिथीवेळ धरली आहे. नवरीला घेऊन कार्यसिद्धीस या' असे लग्नमालक म्हणजे वरपक्ष वधूपक्षाला सांगतो. नवरीला हळदीचे पातळ नेसायला दिले जाते. वधूवरांना पाटावर बसवून राशीचक्रावरुन ज्या नावाची हळद निघाली असेल तिने पहिल्यांदा हळद लावावी व नंतर किमान पाच सुवासिनी वधूवरांना हळद लावतात. लोकसंस्कृतीत प्रत्येक विधीच्या वेळी हळकुंडाचा वापर केला जातो. लग्नाचे दळण कांडण करण्याअगोदर जात्याला, मुसळाला, मेढीला हळदीच्या फडक्यात लेकुरवाळे हळकुंड बांधतात. विवाहविधीत हळदीचे वधूवरांच्या मनगटात बांधलेले काकण हे कळसातील दोरे हळदीच्या पाण्यात बुडवून हळकुंडासह बांधतात. हळद खेळणे, हळद काढणे यातही हळदीचा वापर केला जातो. पूजेच्या प्रत्येक ओटीत लेकुरवाळे हळकुंड असतेच. हळद ही आरोग्य व सौंदर्यवर्धक आहे. लेकुरवाळे हळकुंड हे सृजनाचे प्रतीक असते. हळदीत अमरत्त्वाचे लक्षण असते. हळदीचा मान परटीणीला असतो. ती वधूवरांना ओवाळून खालील हळदीचे गीत म्हणते–

**समुद्राच्या काठी**
**ढवळं पवळं नंदी**
**त्यांनी वाकुऱ्या वडल्या**
**त्यांनी हळदाई लावली**

**हळदाई आली एक पाना**
**हळदाई आली दोन पाना**
**हळदाई आली तीन पाना**
**हळदाई आली पाच पाना**

**काढल्या सोन्याच्या कुदळी**
**त्याला रुपीयाचा दांडा**
**त्यानं हळदाई खांदयेली**

**पेटविल्या कातीव चुली**
**ठेवली रुप्याची तपेली**
**त्यांनी हळदाई शिजविली.**

**वाळवली सूर्याच्या तेजानं**
**आणलं ढवळं पवळं नंदी**
**त्यांनी गोण्या भरल्या.**

अनुक्रमणिका

**नेल्या सांगुल्यांच्या पेटंला**
**हळदाई खंडली वरबापानं**
**दिली वरमाईच्या वटीला**
**काढला सोन्याचा पाटा**
**काढला सोन्याचा डाव**
**त्यांनी हळदाई वाटली**

**आधी हळद लावा**
**पांढरीच्या मारुती देवाला**
**मग नवऱ्या बाळाला**
**आधी हळद लावा**
**पांढरीच्या येताळाला**
**मग नवऱ्या गोपाळाला**

**आधी हळद लावा**
**पांढरीच्या ताईबाईला**
**मग नवरी जाईला**
**आधी हळद लावा**
**पांढरीच्या येल्लूबाईला**
**मग नवरी मुलीला**

नंतर परटीन तेल काढते.

हे हळदीचे गीत सलग आहे. त्यात विकसित होत जाणारा आशय आहे. त्यात जमिनीची मशागत करुन हळद लावण्यापासून ती बाजारातून विकत आणून वाटून लावण्यापर्यंतची प्रक्रिया सांगितली आहे.

व्यक्तिविशेषापेक्षा या गीतात सार्वत्रिकरण आढळते. ढवळं पवळं नंदी कोणतीही बैलं असू शकतात. वरबापानं हळदाई खंडली आणि वरमाईच्या वटीला दिली. हे निवेदन लग्नातील कोणत्याही वरबाप-वरमाईला लागू पडते. लोकसाहित्यातून वैभवी जीवनाचे स्वप्नरंजन दिसते. प्रत्यक्षात गरिबी आणि दारिद्र्य असेल तर सोन्याच्या कुदळी, रुप्याचा दांडा, सोन्याचा पाटावरवंटा याचा उल्लेख येतो.

ग्रामीण संस्कृतीत काळी पांढरीला विशिष्ट अर्थ असतो. ‘काळी’ म्हणजे शिवार, शेत, रान जिथे धान्य पिकवले जाते आणि ‘पांढरी’ म्हणजे गावठाण, जिथे लोकांची वस्ती असते ते कोणतीही चांगली गोष्ट अगोदर देवाला अर्पण करावी मग आपण सेवन करावी अशी शेतकऱ्यांची संस्कृती असते. नव्याच्या पुनवेला नव्या धान्याचा नेवैद्य अगोदर देवाला मग आपल्याला. झाडांची पहिली फळं, गाई-म्हैशीचे दूध, विहिरीला लागलेलं पाणी अगोदर देवाला अर्पण केले जाते. तशी आधी हळद लावा पांढरीच्या मारुती देवाला, यल्लूबाईला मग नवरा-नवरीला. गंमत अशी मारुती बिचारा ब्रह्मचारी पण संसारात पडणारा नवरदेव आधी हळद मारुतीला लावायला सांगतो. परण्यालाही मारुतीलाच जातो. यातून लोकमानसाला काय अपेक्षित असेल?

❒❒❒

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

# घुम घुम रे मांडवळा

खेड्यातल्या लग्नात आजही म्हटले जाणारे हे गीत सर्व परिचित आहे. शहरात अक्षताच्या अगोदर नवरा घोड्यावर बसून परण्याला जातो त्यावेळी बँड असतो, नाचगाणी होतात. औषध उडविले जाते. शहरात परण्याला महत्त्व असले तरी खेड्यात परण्याला फारसा रंग नसतो. तो केवळ देवदेवाचा उपचार असतो. पण खरी गंमत वरातीला असते. वरात निघाल्याशिवाय लोकांना लग्न झाल्यासारखे वाटत नाही. ती सजवलेली बैलगाडी वा ट्रॅक्टर, त्यांवर नटूनथटून बसलेली नवरानवरी, करवल्या, बाजूनी गॅसबत्या किंवा ट्युब लाईट, पुढे वाजंत्री, स्पिकर, बँड, लेझीम, बेंजोपार्टी अशी मोठ्या थाटामातात वाजतगाजत वरात निघते. पूर्वी वरातीपुढे कळंवातीणी नाचविल्या जात होत्या. गावातल्या मुख्य मिरवणूक मार्गाने वरात मारुतीचे दर्शन करुन घरी येते. वाजंत्री मांडव धरतात. त्यांना बक्षीस दिल्यावर नवरा-नवरी घरात जाताना बहीण दाराला पडदा लावून दार धरते. आतून हे गाणे म्हटले जाते.

**घुम घुम रे मांडवळा**
**घुमत रमत ॥**

**नवरा आला शिवंपाशी**
**शिव धरली शिवकऱ्यांनी**
**दीन शिवकऱ्यांचा मान**
**नवरी जिंकून नेईन ॥ १ ॥**

**नवरा आला येशीपाशी**
**येस धरली येसकऱ्यांनी**
**दीन येसकऱ्यांचा मान**
**नवरी जिंकून नेईन ॥ २ ॥**

**नवरा आला मांडवापाशी**
**मांडव धरला वाजंत्र्यानी**
**दीन वाजंत्र्याचा मान**
**नवरी जिंकून नेईन ॥ ३ ॥**

**नवरा आला बोहल्यापाशी**
**बोहला धरला कुरवल्यांनी**
**दीन कुरवल्यांना मान**
**नवरी जिंकून नेईल ॥ ४ ॥**

**नवरा आला उंबऱ्यापाशी**
**उंबरा धरला बहिणीने**
**दीन बहिणीचा मान**
**नवरी जिंकून नेईन ॥ ५ ॥**

अनुक्रमणिका

**नवरा आला देवाऱ्यापाशी**
**देवारा धरला वरमाईनं**
**दीन वरमाईचा मान**
**नवरी जिंकून नेईन ॥ ६ ॥**

**घुम घुम रे मांडवळा**
**घुमत रमत ऽऽ**

या गीतात नवऱ्याचा मांडवळा म्हणजे वराड घुमत रमत येण्याचे एक चित्र आले आहे. विशिष्ट लयीत आणि चालीवर हे गीत म्हटलं जातं. त्यात आशयाची एक गतिमानता प्रकट केली जाते. ग्रामसंस्कृती ही सामुहिक जीवनाच्या आधारे विकसित होत असते. सामुहिकता हा या संस्कृतीचा प्राण आहे. हे विवाहप्रसंगी ठळकपणे लक्षात येते. यावेळी पैहीपाहुणे, सगे-सोयरे, इष्ट-मित्र, भाव-भावकी व गाव पांढरीतील लोक उत्साहाने सहभागी होतात. वेसकर, वाजंत्री, परटीण, कोळी, गोधंळी इ. लोकांना काही ना काही देवून मानकाऱ्याचा मान नवरदेव करतो. प्रत्येक ठिकाणी नवरदेव कुणाला पैसाअडका, चोळीखण, नारळ पानसुपारी अशी देणगी देत घराला येतो.

या गीतात प्रत्येक चरणाला 'नवरी जिंकून नेईन' असा शब्द प्रयोग आला आहे. प्राचीन काळातल्या एका लग्न प्रथेचे अवशेष त्यात दिसतात. प्राचीन काळी पराक्रमी पुरुष आपल्या बाहुबलाच्या जोरावर सुंदर स्त्रिया, राजकन्या पळवून आणून तिच्याशी लग्न करीत. अशावेळी युद्धे होत. शत्रूचा पराभव करुन नवरी जिंकून आणावी लागे.

कौरव-पांडवाचे पितामह भीष्माचार्य यांनी विचित्रविर्याला बरोबर घेऊन अंबा, अंबिका व अंबलिका यांना असेच युद्धात जिंकून आणले होते. काही राजकन्येचे पण असत. तिथेही शौर्य पणाला लावून नवरी जिंकून आणीत. सीतेला रामाने आणि द्रौपदीला अर्जुनाने असेच जिंकून आणले होते. कृष्णाने रुक्मिणीला युद्ध करुन पळवून आणले होते. या प्रथेचे अवशेष या गाण्यात दिसून येतात.

आता काळ आणि परिस्थिती बदलली. आता मुलीच्या इच्छेविरुद्ध पळवून आणणे कायद्याने (कलम ३६६) गुन्हा होतो. आता वधू आणि वधूपक्षाच्या संमतीनेच नवरा नवरीला जिंकून नेतो.

या बहिणीने दार धरल्यावरचा संवाद पहा.
'अक्का अक्का दार का धरलं'
'मुलगी दे माझ्या मुलाला' अक्का म्हणते.
मग नवरदेव नवीन नवरीला विचारतो.
'अग, अग अक्का, मुलगी मागत्याय.'

'हुद्या आम्हाला, मग द्यायलाईल तुम्हाला.' असे वचन घेऊन बहीण दार सोडते. वंशशुद्धीसाठी जवळच्या नात्यात लग्ने होत. बहीण हक्काने आणि प्रसंगी हट्टाने आपल्या मुलाला भावाची मुलगी करते. येण्याजाण्याची वहिवाट चालू ठेवते. आता तर लग्न झालंय. आता यांना मुलगी होणार केव्हा, ती मोठी

होणार केव्हा. तोपर्यंत यांनी तिच्या लग्नाचा निर्णयही घेऊन टाकला. परंपरा अशा चिवटपणे रुजविल्या जातात.

मग देव्हाऱ्यावरील कुलैवतांचे दर्शन घेवून वडिलधाऱ्यांचा आशीर्वाद घेतात. नव्या संसाराला सुरूवात होते.

❒❒❒

# साळू निघाली सासऱ्याला

साळू ऊर्फ मैनाबाईचे लग्न थाटामाटात झाले. हळदी, देवदेव, परना, तांदूळ, वरात या गोष्टीतर झाल्याच पण हळद खेळणे, गोपा खेळणे या गोष्टीही झाल्या. मानपानावरुन थोड्या कुरबुरी झाल्या तरी एकूण लग्न चांगले झाले. कुळस्वामीची वावरजत्रा झाली. सत्यनारायणाची पूजा, सोळावी आणि गोंधळही झाला. चार-सहा घरी नवरानवरीला केळवण झाले आणि मैनाबाई माहेरी आली. आठव्या दिवशी मैनाबाईला न्यायला मुराळी आला. साळूला सासरी पाठविण्याचा प्रसंग निर्माण झाला.

मुलीच्या जीवनाला कलाटणी देणारा भावपूर्ण प्रसंग, साहित्यात कवी कुलगुरु कालिदासांनी आपल्या अभिज्ञान शाकुंतल नाटकात हा भावपूर्ण प्रंसग समर्थपणे चित्रित केला आहे. कण्वमुनी आश्रमवासी शंकुतलेला दुश्यंतराजाकडे पाठवितात असा तो प्रसंग आहे. ग्रामीण भागात पूर्वी दळणवळणाच्या सुविधा कमी होत्या. सकाळी जुंपलेली बैलगाडी संध्याकाळी जिथेपर्यंत जाईल तेवढ्या पंचक्रोशीत (सुमारे वीस मैल) पैहीपाहुणे असत. बैलगाडीने मुलीला सासरी-माहेरी पाठवीत. सगळी तयारी करावी लागे.

**साळू निघाली सासऱ्याला । सारा संदुक केला नवा ॥**
**बंधू गाडीची बैलं धुवा ।**
**साळू निघाली सासऱ्याला ॥ गाडी गावच्या पांदीईला**
**बंधू झुली घालतो नंदीईला ॥**

बैलं धुवून रंगवून, त्याच्या गळ्यात कंडे, चाळ, शिंगाला शेंब्या, गोंडं, कपाळावर बाशिंग, पाठीवर झुली घालून तयार करीत. गाडीला तट्या बांधला जाई. छड्या लावून वंगणपाणी व वैरणकाडी करुन मुराळी तयार होत.

पूर्वी पहिल्यांदा मुलगी सासरी जाताना माहेर करीत. त्यात संसारोपयोगी वस्तू असत. आता लग्नातच न्याहारीच्या वेळी या गोष्टी दिल्या जातात. मुलीला सासरी पाठविताना 'भूत्ती' देत. पूर्वी ती पुरणपोळ्याची असे. आता लाडवाची असते. भूत्ती काय दिली याची गावभर बायकात चर्चा होत असल्याने भूत्ती चांगली करावी लागे. या भूत्तीने अमक्या तमक्याची सून नांदायला आली हे गावभर होई. आमची मैनाबाई काय नाचाराची नव्हं, तिला बाजारीची भूत्ती द्यायला. ती भरण्याच्या घरातली, कुणब्याची कन्या. तिची भूत्ती तशीच हवी.

**साळू निघाली सासऱ्याला । भूत्ती तिची दरवळती**
**कुणब्याची लेक जाती ॥**

मुलबाळं असलेली साळू नांदायला निघाली तर

**साळू निघाली सासऱ्याला । भूत्ती देती मी केळांची ॥**
**साळू तान्ह्या बाळांची ॥**

अनुक्रमणिका

आमची मैनाबाई नुकती लग्न झालेली. नवी नवरी. पहिल्यांदा सासरी निघालेली. तिची भूत्ती तशीच चांगली. सर्व तयारी होत आली.

पहिल्यांदा सासरी जाताना मैनाच्या मनात अनंत भावतरंग. ज्या घरात ती जन्मली, वाढली, लहानाची मोठी झाली. खेळली, भांडली, शिकली ते घर आणि घरातील प्रेमळ आई-बाप, भाऊ-बहीण यांना सोडून जाताना तिचे अंतःकरण भरुन येते. माहेर सोडून जाताना होणारे वियोगाचे दुःख आणि नव्याने जीवनात आलेल्या राजकुमाराची, सासरची ओढ अशा द्विधा मनस्थितीत ती असते. तिच्या मनात अनेक प्रश्नांची, शंकाची पाल चुकचुकते. ज्याच्याबरोबर आपली जन्माची गाठ पडली आहे तो स्वभावाने कसा असेल. तो आपल्याला समजून घेईल की नाही. त्याचे घर, घरातील माणसे, सासुसासरे, नणंदा, जावा कशा असतील. ते जाच तर करणार नाहीत, अशा कुशंकानी तिचे मन व्यथीत होते. उघडपणे काही बोलता येत नाही. या भावतरंगाच्या सूक्ष्म छटा लोकगीतात येत नाहीत. कारण लोकगीतात व्यक्तीच्या भावना येत नसून लोकभावना येतात. लोकमानस प्रगल्भ नसते. ते साधे भोळे, भाबडे, अंधश्रध्दाळू, परंपराभिमानी, निष्कपटी असते. ते विचारी, बुध्दिवादी, पुरोगामी असण्यापेक्षा श्रध्दाळू, भावनाशील असते. परंपरेच्या प्रवाहात भावनेची सूक्ष्मताही बोथट बनते.

मैनाचा पाय घरातून निघत नाही

**साळू सासऱ्याला जाती । तिनं कवाडा दिली पाठ ॥**
**जोड मुराळी देती ऊठ ॥**
**साळू सासऱ्याला जाती । तिनं कवाडा दिला हात ॥**
**गिरजाबाई बोलं । साळू उठावं लवकर ॥**

मैनाला माहेरची साडी नेसवली जाते. खणानारळाने तिची ओटी भरतात. सुवासिनीला हळदी कुंकू लावतात. भावजय पाय धुते.

**साळू निघाली सासऱ्याला । भावजय वाणीन धुती पाय ।**
**बघा कौतुक बाबा आय ॥**

मैनाच्या आईची अवस्था बिकट. अंतःकरण भरुन आलेलं डोळ्याला पाण्याच्या धारा.ती केली सवरलेली अनुभवी, पोक्त, व्यवहार चतुर, समंजस, प्रपंचविदुषी. आई आपल्या परीने मुलीवर संस्कार करीतच असते. सासरी जाणाऱ्या मुलीला ती उपदेश करते. या प्रसंगावर कृ. ना. अठल्ये ऊर्फ केरळकोकीळ यांनी 'सासरची पाठवणी' हा सुंदर कवितासंग्रह लिहिला आहे. आपणाकडे उणेपणा येऊ नये म्हणून मुलीची दिनचर्या कशी असावी. केशरचना, वेशभूषा भडक करु नये. लोकात सज्ञनता दिसावी. सुगरणपणाने रुचकर स्वयंपाक करावा. 'काय ग्वाड तर काम ग्वाड.' दिवसभर कामात असावे. कुणाला उलटे बोलू नये. दुखवू नये. मर्जी संपादन करावी. सतीला पती वाचून दुसरा देव नाही. पतीसेवेत उणेपणा नको. जपून राहा, शहाण्यासारखे वाग. असा परंपरेने चालत आलेला उपदेश करते. मुलीला पाठवताना तिची अवस्था –

**साळू निघाली सासऱ्याला । आई रडती धाई धाई ॥**

अनुक्रमणिका

**गेल्यावाचून भाग नाही ॥**
**साळू निघाली सासऱ्याला । मी ग बघती खालीवर ॥**
**पोटीची साळू दिली । सत्ता चालेना तिच्यावर ॥**
**साळू निघाली सासऱ्याला । तिच्या आईची वेडी माया ॥**
**सीता माझी मालयन । मागं हांबरती गाया ॥**
**साळू निघाली सासऱ्याला । तिचं सासर दूर गाव ॥**
**नेणंती साळू माझी । फिर माघारी तोंड दाव ॥**

यावर भाष्य करण्याची गरज नाही. आईची माया कथलाची बापाची लोखंडाची. पुरुष असल्याने तो आपले दुःख संयमाने व्यक्त करतो.

**लेक निघाली नांदायला । बाप बघतो चोरुयानी ॥**
**आसू ढाळतो मोरावानी ॥**
**सीता माझी मालयन । तुझा पदूर मागं मागं ॥**
**माझ्या बंधूला येतो राग ॥**
**साळू निघाली सासऱ्याला ॥ बाप सांगीतू कानी गोष्ट ॥**
**लेकी पदूर घ्यावा नीट ॥**

मुराळी आणि बंधूजी तयार आहेत.

**साळू निघाली सासऱ्याला । तिच्या वटीला कवळा कात ॥**
**संग मुराळी पान खात ॥**
**साळू निघाली सासऱ्याला । चुलता गाडी म्होर उभा ॥**
**साळू जाण्याला किती शोभा ॥**

साळूचा पाय उचलत नाही.

**साळू निघाली सासऱ्याला ॥ तिच्या पापणीखाली झरा ॥**
**वाणीचा बंधू बोल ॥ तिला पंचमीची बोली करा ॥**

भाऊ पंचमीला माहेरी आणण्याची बोली करतो. साळूला पाठवायला लोक जमतात.

**साळू निघाली सासऱ्याला । लेक बापाच्या आवडीची ॥**
**साळूला घालवायला । सभा उठली चावडीची ॥**

दुःखित अंतःकरणाने 'येते गं आई!' एवढे निरोपाचे शब्द तिच्या तोंडून निघतात आणि ती सासरच्या वाटे कुचकुच काटे तुडवीत मार्गाला लागते.

**साळू निघाली सासऱ्याला । म्होरं बंधूजी मागं पती ॥**

अनुक्रमणिका

**साळू माझी मधी । चांदणी चमकती ॥**
**बहिणीला घालवून । भाऊ बसला वेशीपशी**
**सखा शेल्यानं डोळं पुसी ॥**
**साळू निघाली सासऱ्याला । येशी पातूर आयाबाया ॥**
**शिवपातूर बाबाबया । कडंपातूर बंधूराया ॥**

कन्या सासूऱ्याशी जाये । मागे परतूनी पाहे ॥ अशी मागे मागे पाहत, हाताने निरोप घेत, एकदाशी ती दिसेनाशी होते. सासरी जाते. वियोगाचे दुःख या लोकगीतातून विलक्षण ताकदीने साकार झाले आहे.

❑❑❑

अनुक्रमणिका

# ऋतुवंते सखे ग तू न्हाणुले

मैनाबाईचं लग्न झालं. ती नांदायला सासरी गेली. काही दिवसानी न्हाणुलीचा एक लहानसा पण मोठा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आला. मुलगी वयात येताना तिच्या शारीरिक आणि भावनिक विश्वात मोठे बदल होतात. ऋतुप्राप्तीनंतर मुलीचे बालपण संपते आणि बाईपण सुरु होते. ती प्रजननक्षम झाली असे समजण्यात येते. लोकसंस्कृतीने स्त्रीच्या या नवनिर्मितीक्षम पात्रतेचा न्हाणुलीचा हृद्य कार्यक्रम परंपरेत रुजविला आहे.

पन्नास-साठ वर्षापूर्वी आपल्या समाजात बालविवाह सर्रास रुढ होते. पाळण्याला बाशिंग बांधून लग्न करण्यापर्यंत मजल गेली होती. 'अष्टोवर्षा भवेत कन्या' म्हणून आठव्यावर्षीच मुलींचे लग्ने करीत. दहा वर्षाची मुलगी घोडनवरी ठरे. त्या काळात लग्नानंतर तीन चार वर्षानी मुलीला पदूर येई. त्यावेळी न्हाणुलीच्या कार्यक्रमाला एक औचित्य होते.

नवरीला प्रथम न्हाणं आलं की गुरवाकरवी आई-बापाला व इतर नातेवाईकांना साखरपान पाठविले जाई. आईवडिल मुलीलां साडीचोळी, जावयाला पोषाख व घरातील इतर बायकांना चोळीचा खण व पीस घेऊन येत. त्याबरोबर केळी, आंबे या फळांच्या व फराळाच्या पाच दुरड्या, पोळ्यांच्या भूतीची दुरडी, हळदी-कुंकू पानसुपारी, नारळ व ओटीचे साहित्य घेऊन येत. गल्लीतल्या, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सुवासिनीला बोलावून न्हाणुलीचा कार्यक्रम होई.

न्हाणुलीला फुलांच्या मुंडवळ्या बांधून, केसात व हातात गजरे घालून, मखरात किंवा रांगोळी घातलेल्या पाटावर बसवतात. तिला आईबापानी आणलेली नवीन साडी चोळी नेसायला देतात. लेकुरवाळ्या सुंवासिनीकडून ओटी भरतात. या ओटीभरणात फळाचा समावेश असतो. फळाने ओटी भरली की फळप्राप्ती होते अशी समजूत. यावेळी स्त्रिया न्हाणुलीला उद्देशून गाणी म्हणतात.

**मखर गुंफीलं व ऽ**<br>
**मखर गुंफीलं......... ॥ धृ ॥**<br>
**तिच्या मखराला ऐना ।**<br>
**गोरी माझी मालयन**<br>
**श्रीमंत कुणब्याची मैना ॥ १ ॥**<br>
**तिच्या मखराला जाई**<br>
**गोऱ्या माझ्या मालनीच्या**<br>
**कसं कळालं तिच्या आई ॥ २ ॥**<br>
**तिच्या मखराला चाफा**<br>
**गोऱ्या माझ्या मालणीच्या**<br>
**कसं कळालं तिच्या बापा ॥ ३ ॥**

हेच गीत सर्व नात्यातल्या माणसावरुन म्हटले जाते. मखराला लावलेली वस्तू आणि नातं यांचे यमक जुळविलेले असते. उदाहरणार्थ तिच्या मखराला हिरा । कसं कळालं तिच्या दिरा । शेवटचे चरण असे.

**तिच्या मखराला गुंता**
**कसं कळालं तिच्या कंथा!**
**गोऱ्या माझ्या मालयनीची**
**ओटी भरावी भाग्यवंता ॥ ८ ॥**

ऋतुप्राप्ती म्हणजे स्त्रीजीवनातील एक गुपित म्हणून उल्लेख 'पदूर आला' 'बाहेर बसली' असा सूचकतेने करतात. पण वरील गाण्यातून मात्र त्याचा उल्लेख उघडपणे होतो. हळुहळू ते घरातील आणि जवळच्या नात्यातील सर्वांनाच कळते. न्हाणुलीच्या कार्यक्रमाने आणि नंतर वाटलेल्या भूतीने गावभर होते. मग माहेरहून आणलेल्या दुरड्या सुवासिनी उखाण्यात नाव घेऊन सोडतात. पुरणपाळ्याची भूती सर्वांना वाटली जाते. न्हाणुलीला अशी जवळच्या नातेवाईकांची, भाऊपणाची 'वाढप' महिनाभर येत असतात. ऋतुप्राप्तीनंतरच्या पाचव्या दिवशीच्या वाढपाला पुढील गीत म्हटले जाते.

**ऋतुवंते सखे ग तू न्हाणुले**
**शिवगडणी न्हाण तुला आले ॥ धृ ॥**
**माझ्या घरी वाणाची दाटी**
**दुध भरुन खिरीची वाटी**
**पापड लाविते ताटी**
**मध्ये सोलाण्याची आमटी ॥ १ ॥**
**तबक भरुनी मजेचा मेवा**
**हिच्या पंगतीला सख्यानो तुम्ही जेवा**
**रंगमहाली तयारी ठेवा**
**पलंगावरी अत्तरदाणी**
**शिंपीते गुलाब पाणी ॥ २ ॥**
**तबक भरुनी ठेविले विडे**
**प्रेमाने मुखात घातले**
**प्रीतीने नाव घेतले ॥ ३ ॥**

या गीतात न्हाणुलीचे कौतुक आहे. भविष्यकाळात तिला मुलाला जन्म द्यायचा असल्यामुळे तिला चांगले-चुंगले गोडधोड खाऊ घालून तिचे शारीरिक भरणपोषण केले जाते. 'रंगमहाली तयारी ठेवा' या गीताच्या दुसऱ्या चरणात तर सुहागरातीच्या पूर्वतयारीचा उल्लेख आहे. पाचव्या दिवशी न्हाणुलीला हंडाहंडा पाणी तापवून न्हाऊ घालतात. दाढी केलेले पुरुष व न्हालेली स्त्री सुंदर दिसते. यावेळची एक प्रथा अशी हळदी-कुंकू, सुपारी, तांदूळ व बंदा रुपया घातलेले मोदक तयार करतात. त्यातला एक मोदक न्हाणुलीला फोडायला लावतात. मोदकात बंदा रुपया निघाला तर मुलगा होतो व तांदळाचे दाणे निघाले तर मुलगी होते असे मानण्यात येते.

आता मुलींच्या विवाहाचे वय वाढले. लग्नापूर्वीच मुली मोठ्या झालेल्या असतात. त्यामुळे खरे तर आता न्हाणुलीच्या कार्यक्रमाचे औचित्य राहिले नाही. पण अजूनही ग्रामीण भागात लग्नानंतर वधुला प्रथम ऋतुप्राप्ती झाल्यावर न्हाणुलीचा कार्यक्रम केला जातो. आता मुलगी वयात येताना यावर ग्रंथ लिहिले जात

आहेत. रेडिओवर कार्यक्रम मालिका सादर केल्या जातात. पण लोकपरंपरेने स्त्रीच्या सुफलीकरण योग्यतेचा, न्हाणुलीचा कार्यक्रम करुन तिचा सन्मान केला आहे.

❒❒❒

# मला गुदगुली झाली

विवाह म्हणजे दोन जिवांचे शारीरिक व मानसिक मिलन. धरती – आकाश, क्षेत्र-बीज, प्रकृती-पुरूष हा मूळ आदिबंध. निसर्गाच्या विविध रुपातून प्रगट होणारा. देवाब्राम्हाणांच्या साक्षीने विधिवत बांधलेली रेशीमगाठ (लग्नगाठ) म्हणजे विवाह. ही गाठ बोहल्यावर मारली जात असली तरी विवाहोत्तर काळात प्रेमाच्या धाग्याने घट्ट होत जाते. समाजमान्य नैतिक मार्गाने कामभावनेचे शमन आणि प्रजोत्पादन हा विवाहाचा प्रमुख उद्देश असतो.

मैनाबाईचं लग्न झालं. ती नांदायला आली. तिला 'बसवलं.' वाढप झालं. न्हाणुलीचा कार्यक्रम झाला. तिच्या आगमनाने सासरच्या घरात नवचैतन्य अवतरले. तांदळाचा हिरवा शालू नेसून, हातात हिरवा लगीन चुडा, पायात जोडवी-मासूळ्या, गळ्यात साजाचं डोरलं आणि इतर दागिने, कानात बुगड्या, कपाळी रेखीव कुंकू, कळसाचं माणवलेल्या पाण्यानं अंगकांतीवर चढलेलं तेज अशी घरची लक्ष्मी सळसळत्या तारुण्याने घरभर वावरु लागली. तिचे वागणे, बोलणे, लाजणे, काम करणे यामुळे घराला नव्याने घरपण आले. सासरी या नव्या नवरीचं कौतुक होत होते.

अशा काळात तो रात्रीचा प्रसंग आला. तिच्या मनात आकर्षण, ओढ, उत्सुकता, भीती व किळस अशा अनंत भावनाचे तरंग उठले. पण विवाहितेला या प्रसंगाला सामोरे जावेच लागते. या प्रसंगावरचे एक उत्कृष्ट लोकगीत पहा.

**वेणी ग फणी करुनशानी**
**थाट बुगड्याचा ग बाई ऽऽ बाई थाट बुगड्याचा.**
**वेणी ग मध्ये फुल केवड्याचे**
**भांग मोत्याचा ग बाई ऽऽ बाई भांग मोत्याचा**
**चंद्रभागेला स्नान करते.**
**प्रकाश सूर्याचा ग बाई ऽऽ बाई प्रकाश सूर्याचा**
**अंगावरी शालू नेसला**
**जडावू मोत्याचा ग बाई ऽऽ बाई जडावू मोत्याचा**
**कपाळावरी कुंकू लावते**
**तक्त कपाळाचा ग बाई ऽऽ बाई तक्त कपाळाचा.**
**माडीवरी माडी बांधली**
**कोणत्या रंगाची ग बाई ऽऽ बाई कोणत्या रंगाची**
**माडीवरी पलंग घातला**
**जडावू फिरक्याचा ग बाई ऽऽ बाई जडावू फिरक्याचा.**
**पलंगावरती शाल हांतरली**
**उद्धव वाणाची ग बाई ऽऽ बाई उद्धव वाणाची**
**चारी बाजुला समया लावल्या**
**प्रकाश बिजलीचा ग बाई ऽऽ बाई प्रकाश बिजलीचा.**
**पलंगावरी ग डाव मांडिला**
**सोंगट्याचा ग बाई ऽऽ बाई सोंगट्याचा**

**विजून गेली समयी**
**मला गुदगुली झाली ग बाई ऽऽ बाई मला गुदगुली झाली.**

गीत अगदी नेमक्या ठिकाणी थांबते आणि फार मोठा अर्थ सूचित करते. मिलनापेक्षा प्रतिक्षेत खरी गंमत आहे असेच हे गीत. हे गीत मला उदनवाडी ता. सांगोला येथील सौ. शांताबाई वलेकर आणि सौ. सिंधू वलेकर यांच्याकडून मिळाले.

एका अभिसारिकेचा भाव या गीतात आहे. मैनाबाई चंद्रभागेच्या निर्मळ पाण्याने न्हालेली वेणीफणी करुन, वेणीत केवड्याचे फूल माळून. (केवड्याच्या उग्रमधूर वासाने नागभूजंग आकर्षित होतो असा लोकसमज आहे) कानात बुगड्या घालून, भांगात कुंकू व मोती माळून, अंगावर बुट्टीदार जरीचा मोती लावलेला शालू नेसून, कपाळी कुंकू लावून ही नवविवाहिता हातात दुधाचा पेला, अथवा पाण्याचा तांब्या घेऊन रंगमहाली जाते. रंगमहालाचा थाट कसा? माडीवर माडी. तिथं जडावू फिरक्याचा पलंग, त्यावर मऊ गादी, वर उद्धव वाणाची शाल, चारी बाजूला समया लावलेल्या,त्यांचा मंद प्रकाश अशावेळी पतीपत्नीने सोंगट्याचा डाव मांडलेला आहे. शंकरपार्वती अनेकदा सोंगट्यांचा डाव खेळत होती असा उल्लेख लोककथातून येतो.

अशावेळी-**विझून गेली समयी.**
**मला गुदगुली झाली ग बाई ऽऽ मला गुदगुली झाली**

अशा समेवर हे गीत संपते. वाढत्या रात्री अचानक लाईट गेली तर आपल्याला आनंद होतो. याचा अनुभव तुम्हालाही आला असेल. पुढच्या सगळ्याच गोष्टी उघड करुन न सांगण्यातच गंमत आहे. रात्रीच्या पहिल्या प्रहरी सज्जन, दुसऱ्या प्रहरी कामीजन, तिसऱ्या प्रहरी निशाचर-चोर आणि चवथ्या प्रहरी योगी-साधक जागतात म्हणे.

विद्यार्थी असताना एका माडीवर राहात होतो. समोर दूरवर एक मारवाड्याची माडी होती. एक नवविहाहिता रात्री ९ ते १० वाजता शृंगार करताना दिसायची. तिचा नवरा बांगड्याचा मोठा व्यापारी. सकाळी जायचा रात्री उशिरा परत यायचा. चांगला तासभर आरशासमोर तिचा चाललेला शृंगार. खिडकीतून लक्ष ठेवून पहायचो. बरे ती नंतर फिरायलाही घराबाहेर पडत होती असेही नाही. हे लोकगीत वाचल्यावर तिच्या त्या शृंगाराचा आता उलगडा होतो.

हे एक सलग लोकगीत आहे. त्यात विकसित होत जाणारा शृंगाराचा बाह्यवर्णनपर आशय आहे. अश्लीलतेचा अंश नाही. कलात्मक संयमाचा हा उत्कृष्ट नमुना आहे. कोणत्याही चांगल्या लावणीच्या तोंडात मारेल असे हे लोकगीत आहे. सूचकतेने घडविलेले भावदर्शन हे साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असते ते या लोकगीतात दिसते. या गीतात चाल, म्हणण्याचा ढंग आणि शब्दाच्या पुनरावृत्तीने साधलेली लय यामुळे सादरीकरणातही हे गीत तितकेच रंगतदार ठरते.

❒❒❒

अनुक्रमणिका

# गोरीया लेणं लेती

भारतीय स्त्रियांना दागिन्याची हौस भारी. दागिने स्त्रियांचे सौंदर्य अधिक खुलवतात. सौंदर्य हे स्त्रिचे सामर्थ्य आहे तर सामर्थ्य हे पुरुषांचे सौंदर्य आहे असे वि. स. खांडेकर यांनी एका कादंबरीत म्हटले आहे. मुळात स्त्रीचे सौंदर्य हे तिच्या रूपावर अवलंबून असते. हे रूप म्हणजे नाक, डोळे, रंग, कमनीय बांधा. हे तिला अनुवंशिकतेने निसर्गाकडून प्राप्त होते. मूळच्या सौंदर्याला नटून थटून अधिक आकर्षक करण्याकडे स्त्रियांचा कल असतो. त्यातून फणी करंड्यापासून ब्युटी पार्लर पर्यंत शृंगाराच्या सजावटीची व फॅशनची एक दुनियाच निर्माण होते. प्राचीन काळापासून सर्व स्तरातील स्त्रियांना शृंगार करण्याची आवड असलेली दिसते. अजंठा वेरुळ किंवा खजूराहोच्या शिल्पकृतीतून ही शृंगाराभिलाषा दिसून येते. सौंदर्याचा सामर्थ्य म्हणून वापर स्त्रिया पूर्वीपासून करत आल्या आहेत. त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. ती एक स्वाभाविक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. पण स्त्री सौंदर्याचा बाजार होऊ नये. स्त्रियांचे सौंदर्य अलंकाराने वाढते. त्यातून दागदागिन्यांच्या प्रकाराची विविधता निर्माण होते.

संस्कृतीच्या अभ्यासात एखाद्या समाजात विशिष्ट कालखंडात वापरली जाणारी वस्त्रप्रावरणे व दागदागिने यांचाही समावेश होतो. लीळाचरित्रातून स्त्री-पुरुषांच्या पोषाखाचा, अलंकाराचा उल्लेख येतो. शाहीर प्रभाकर एका लावणीत तत्कालीन मराठी स्त्रीच्या अंगावरील विविध दागिन्यांचे वर्णन करतो. वज्रटिका, पानड्या, पेट्या, चंद्रहार, पुतळ्या, मोहनमाळ, मंगळसूत्रे, बाजूबंद, विरोध्या, जोडवी इ. अलंकारातून उत्तरपेशवाईतील मराठी स्त्रीच्या अलंकाराची माहिती मिळते.

लोकगीतातूनही जुन्या काळातील वस्त्रालंकाराचे वर्णन येते. लग्नापूर्वी आईवडील लेकीला हौसेनं दागिने करतात पण त्याचे स्वरुप जुजबी असते. अंगठी, पैंजण, कानातील रींग, चेन इतकेच. पण लग्नानंतर स्त्रीच्या दागदागिन्याच्या हौसेला बहार येतो.

लग्नाच्या बोलीत वधुच्या दागिन्यांचा विषय हमखास असतो. साखरपुड्याला पैंजण, साखळ्या, अंगठी, रींगा यासारखे दागिने घातले जातात. लग्नातील सौभाग्यालंकाराने स्त्रियांच्या लेण्याला खऱ्याअर्थाने प्रारंभ होतो. मणिमंगळसूत्र, जोडवी, पैंजण, चंद्रहार, पाटल्या यासारखे अलंकार तिला लग्नात मिळतात. माहेरकडून मिळालेल्या या दागिन्याला स्त्रीधन म्हणतात.

स्त्रीयांच्या अलंकारात सौभाग्यालंकाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते.

**गोरीया लेणं लेती । मनी डोरलं साजाचं ॥**
**लेणं कंथाच्या राजाचं ॥**
**गोरीया लेणं लेती । बारा तोळ्याचं कारलं ॥**
**वर साजाचं डोरलं ॥**
**मनी डोरल्यानं । सराला झाली दाटी ॥**
**किती सांगू साळू तुला । हावशा कंथाला माग पेटी ॥**
**मनी डोरलं । गोट पाटल्या कवा केल्या ॥**
**आल्या धानाला पटकावल्या ॥**

अनुक्रमणिका

या ओव्यात मनी डोरलं म्हणजे मंगळसूत्र मध्यवर्ती ठेवून इतर दागिन्यांची हौस आली आहे. त्यात कारलं, सर, पेटी, गोट, पाटल्या यांचा उल्लेख येतो. 'मनी डोरलं साजाचं । लेणं कंथाच्या राजाचं' हा सौभाग्यवतीचा प्रमुख दागिना. त्याशिवाय सुवासिनीला शोभा नाही.

पूर्वी खानदानी स्त्रिया नाकात नथ घालीत. मराठमोळ्या स्त्रियांचा हाही एक प्रमुख दागिना होता.

**गोरीया लेणं लेती । मनी डोरलं काळीपोत ॥**
**शोभा द्यायला केली नथ ॥**
**सरजाची नथ । आकुड तिचा दांडा ॥**
**साळू माझ्या मालनीला । नथ शोभती गोऱ्या तोंडा ॥**
**सरजाची नथ । वर मोराची चिल्लीपिल्ली ॥**
**कुण्या हावशीची राणी लेली ॥**

सौभाग्यवतीला नथ शोभून दिसते. बुगड्याचा बाज जरा वेगळाच.

**गोरीया लेणं लेती । नऊ लाखाच्या बुगड्या ॥**
**नखल्या माझ्या बंधवाच्या । खिडक्या रथांच्या उघड्या ॥**

उगीच नाही जाता साताऱ्याला तिची बुगडी सांडतं.
आता या ओव्या पहा.
एका समर्थ बंधूराजानं बहिणीचं मनोहर माहेर केलं. कसं.

**पायी भरुन जोडवी । हाईती पैंजान गजीभार ॥**
**कमरपट्याला घुंगर चार । तीळ बंधीच भवर थोर ॥**
**गळ्या घसाचा लेली सर । हाय डोरलं जोमदार ॥**
**फुलं कानात शोभादार । हायत्या बुगड्या डेरेदार ॥**
**भरतार बोलत्याती । राणी माहेबीराची थ्वार ॥**
**माझ्या वाणीच्या बंधुजीनं । केलं माहेर मनोहार ॥**

एखाद्या कालखंडात स्त्रिया कोणती वस्त्रप्रावरणे व दागदागिने वापरीत होत्या. ह्यावरुन त्या काळातल्या लोकसंस्कृतीचा परिचय होतो. मनी डोरलं, कारलं, पेटी, सरजाची नथ, बुगड्या, जोडवी, पैंजण, कमरपट्टा, घसाचा सर, फुलं, बाजुबंद, मासुळ्या, करंगळ्या हे मराठमोळ्या स्त्रियांचे जुन्या काळातील दागिने होते. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी असल्यामुळे त्यांना दागदागिन्याच्या हौसेसाठी पती वा बंधूवर अवलंबून राहवे लागे.

आज काळ आणि परिस्थिती बदलली. कमी सोन्यातील, नक्षीदार दागदागिन्यांच्या नव्या नव्या फॅशन आल्या. तरी मुळातील भारतीय स्त्रियांची दागिन्याची हौस काही कमी झाली नाही. जगातील निम्मे सोने भारतीय स्त्रियांच्या अंगावर आहे असे म्हणतात. आजच्या सौंदर्यवतीनी दागिन्याची मर्यादीत हौस करायला हरकत नाही पण बँक बॅलन्सचा किंवा पर्सचा सल्ला घ्यायला हवा.

❒❒❒

अनुक्रमणिका

# लेणं कंथाच्या राजाचं

अलंकाराने स्त्रियांचे सौंदर्य वाढते. लेण्या नेसण्याची स्त्रियांना मुळातच आवड असते. सुंदर दिसण्यासाठीचे हौसेचे लेणे वेगळे आणि परंपरेने चालत आलेले सत्वाचे सौभाग्यलेणे वेगळे. हळदीकुंकू, मंगळसूत्र, जोडवी आणि चुडा (काकणे) ही स्त्रियांची सौभाग्यलेणी होत. इतर अलंकारापेक्षा सौभाग्य अलंकार महत्त्वाचे असतात. 'लेण्यात लेणं सौभाग्यलेणं'

**गोरीया लेणं लेती । काय लेवावं पोकाळाला ॥**
**चंद्र कोरला कपाळाला ॥**
**लेण्या नेसण्याची नार । डाव्या बाजूनी माझ्या चाल ॥**
**तुझ्या दागिन्याचं मोल । माझ्या कुंकवाला दिलं काल ॥**
**लेण्या नेसण्याची नार । नार झाकुनी घेती गळा ॥**
**माझं हळदीवरलं कुंकू । माझा उघडा पानमळा ॥**

इतर दागिने कितीही किंमती आणि सुंदर असले तरी त्यांना सौभाग्य अलंकाराची सर येणार नाही. ते डावेच असा भाव वरील ओव्यातून सूचित केला आहे. विवाहित स्त्रिया सौभाग्य अलंकार अभिमानाने घालतात, मिरवतातही.

सौभाग्यवतीच्या कपाळीचं कुंकू हे सौभाग्याचे प्रतीक. मराठमोळ्या स्त्रिया सकाळी अंघोळ झाल्यावर पहिल्यांदा मेण लावून कुंकू लावीत. हा त्यांचा नित्यनेम. कधी चुकायचा नाही. एकदां एक माऊली आपल्या शहरात नोकरी करणाऱ्या मुलाकडे गेली. तिला अंघोळ झाल्यावर कुंकू लावायची सवय. त्याशिवाय ती तोंडात पाणीही घेत नसे. तिने सुनेचे ड्रेसिंग टेबल शोधले. त्यात गंध आणि टिकल्या मिळाल्या. पण त्या लावायची तिची तयारी नव्हती. ती अस्वस्थ झाली. शेवटी शेजाऱ्यापाजाऱ्याकडून शोधून कुंकू आणून द्यावे लागले. अशी जुन्या काळातील स्त्रियांची श्रद्धा होती. हे कुंकूही भंलं मोठं, ठसठशीत, उठावदार आणि लालभडक असे.

कुंकू लावायला हयगय झाली तर त्याची खंत स्त्रियांना वाटे. एकत्र कुटुंबात खटाल्याच्या घरात सासुरवाशीणीची कुंकू लावण्यांत आबाळ व्हायची.

**लाल पिंजाऱ्याचं कुंकू । कुंकू घामानं झालं ओलं ॥**
**मला खटाल्या घरी दिलं ॥**
**थोरल्या घरची सून । भांड्याकुंड्यात गेला येळ ॥**
**तिच्या कपाळी कुंकू शिळं ॥**

कामाच्या रगाड्यात सासुरवाशिणीला कुंकू लावायलाही सवड मिळत नव्हती. कुंकवाचा करंड व मेणाचा करंड या जुन्या स्त्रियांच्या नित्यं वापरातील गोष्टी. त्याची उपमा पती आणि दीर यांच्या संबंधाने फार समर्पकपणे एका ओवीत आली आहे.

अनुक्रमणिका

**कुंकवाचा करंड । मेणाचा दुसयरा ॥**
**माझ्या चुड्याला आसयरा ॥**

दीर हा पतीचा आधार असा भाव या ओवीत किती सूचकतेने व्यक्त झाला आहे. आपल्या चुड्याला आणि कुंकवाला उदंड आयुष्य लाभावं ही सौभाग्यवतीची प्रार्थना असते.

**चांदीचा करंड । त्याला सोन्याचं झाकाण ॥**
**माझ्या चुड्याला ॥ परमेश्वराचं राखाण ॥**
**नारायण देवा । तुला मागत काही न्हायी ॥**
**माझ्या हळदीवरलं कुंकू । माझ्या करंडी घाल लयी ॥**

किती काव्यात्म आहे ही प्रार्थना. कुंकवाच्या बरोबरीने हळदीचा मान. हळद ही नेहमी कुंकवाच्या खाली लावली जाते. तशी ती हौशेची. सणासमारंभात ल्यायची. हळदी कुंकवाचं निमंत्रण ग्रामीण भागातील सुवासिनी सहसा चुकवत नाहीत.

सौभाग्यवतीचा दुसरा अलंकार म्हणजे मंगळसूत्र. ग्रामीण बोलीत त्याला 'डोरलं' म्हणतात. लग्नात अक्षता पडल्यावर नवरीला नवऱ्याकडून मंगळसूत्र घातले जाते. सौभाग्य असेपर्यंत ते तिच्या गळ्यात असते. दोन वाट्या, चार सोन्याचे मणी आणि काळ्या मण्याची पोत एवढे किमान मंगळसूत्रात आवश्यक असते. बरी परिस्थिती असली की चांगले मंगळसूत्र केले जाते.

**गोरीया लेणं लेती । मनी डोरलं साजाचं**
**लेणं कंथाच्या राजाचं ॥**

सौभाग्यवतीच्या गळ्यातील मंगळसूत्र हा सर्वात महत्त्वाचा दागिना. गळ्यात घालायचा चंद्रहार, वजरटीका, कोल्हापुरी साज, वेगवेगळ्या पद्धतीचे सर या इतर दागिन्याला मंगळसूत्राशिवाय शोभा नाही.

जोडवी हा आणखी एक सौभाग्य अलंकार. पायात घालायचे अनेक दागिने आहेत. साखळ्या, पैंजण, मासुळ्या, करंगळ्या, विरुद्या पण सौभाग्यलेण्याचा मान जोडव्यालाच आहे.पूर्वी दहा-दहा भार वजनाची चांदीची वा रूप्याची जोडवी स्त्रियांच्या पायात असत. चालताना त्याचा आवाज होई. आनंदफंदीने 'धन्य तुझे लावण्य' या लावणीत

**मांड्या गुडघ्या सरळ पोटऱ्या पायी जोडवी खणाणी**
**जसे घोड्याचे नाल वाजती आवाज कानी दणांणी**

अशी अतिशयोक्तीपूर्ण उपमा दिली आहे.

'पाच रंगाची पाच पाखरं' या चित्रपटातील 'नाचू किती नाचू किती, जोडवं टचकलं, कंबर लचकली' ही लावणी गाजली होती यातला मूळबंध लोकगीतातलाच आहे.

अनुक्रमणिका

**जोडव्याचा पाय । हळू टाकावा कोनात ॥**
**माझ्या साळाईचा कंथ । नटतो मनात ॥**
**जोडव्याचा पाय । हळू टाकावा मालयनी ॥**
**कंथ ओळखितो चालयनी ।**
**जोडव्याचा पाय । हळू टाकावा चिराईचा ॥**
**दारी पलंग दिराईचा ॥**
**जोडव्याचे पाय । हळू टाकावा दारायीत ॥**
**किती सांगू साळू तुला । कंत झोपीच्या भरायीत ॥**
**जोडव्याचे पाय । कुणा नारीची वाजत्याती ॥**
**बैलं दावणीची भूजत्याती ॥**

यात थोडी अतिशयोक्ती असली तरी जोडव्याच्या लक्ष्मीचा वावर घरादारात कसा होत असेल याची कल्पना येते.

आज सौभाग्य अलंकारात कालानुरुप बदल झाला आहे. कुंकवाच्या ठिकाणी गंध, टिकल्या आल्या आहेत. मंगळसूत्रात विविध नमुने आहेत, जोडव्याचा आकार आणि वजनही कमी झाले आहे. पण अजूनही मराठमोळ्या स्त्रीच्या सौभाग्यलेण्याचा मूळ साज कायम आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

# बारीक बांगयडी

काचेच्या बांगड्या घालण्याची पद्धती भारतीय स्त्रियांमध्ये फार प्राचीन काळापासून रुढ आहे. बांगड्या (चुडा) घालणे सौभाग्याचे लक्षण मानले जाते. चुड्याला सौभाग्य लेण्यात स्थान आहे. फॅशनच्या नावाखाली अलीकडे सुशिक्षित स्त्रियांनी बांगड्या घालणे बंद केल्यामुळे शहरातून बांगड्या दिसत नाहीत. पण खेड्यापाड्यात अजूनही मोठ्या प्रमाणात काचेच्या बांगड्या वापरतात. कळायला लागल्यापासून मुलीला बांगड्या घालतात. लग्नाचे वेळी मामा नवरीला हिरव्या बांगड्याचा लगीनचुडा भरतो. वरमाईलाही मानाचा चुडा भरतात. बांगड्या भरायला बोलविलेल्या आयाबाया त्यासाठी पैसे देतात. खेड्यातल्या लग्नात अजूनही गावातल्या बायकांना, नातेवाईकांना, गडयनींना बांगड्या भरायला बोलवितात. सर्वजणी या कार्यक्रमाला आवर्जून हजेरी लावतात. प्रत्येक बाईला किमान एक डझन तरी बांगड्या भरल्या जातात. काही आंबटशौकीन बायका कोपरापर्यंत चुडा भरतात. त्यामुळे लग्नातला बांगड्या भरण्याचा खर्च किमान चार दोन हजार रुपये होतो.

एकदा लग्न झालं की माहेरी स्त्रीचा हक्क चोळीबांगडीचाच राहातो. माहेरी आल्यावर संक्रांत, पंचमी, दिवाळी या सणाला भावाने बांगड्या भराव्यात अशी पद्धती आहे. किंबहुना स्त्रीचा तो हक्कच आहे.

**बारीक बांगयडी । मला भरूस वाटली ॥**
**हावशा माझ्या बंधवाला । तार पुण्याला पाठवली ॥**
**बारीक बांगयडी । भर म्हणती कासाराला ॥**
**हावशा बंधवाला । उभा केला इसाराला ॥**
**बारीक बांगयडी । पैशाला लाव जोडी ॥**
**हावशा माझा बंधू । सखा हसत चंची सोडी ॥**

या ओव्यातून मैनाबाई भावाकडून हक्काने बांगड्या भरताना दिसते. त्यातून तिचे दारिद्र्य अन् चार दोन आणे सुद्धा खर्च करण्यास स्त्रीचे भावावर अवलंबून राहणे या गोष्टी स्पष्ट होतात. बांगड्या भरणारा तो वैराळ पण अलीकडे त्याला कासार म्हणतात. मुसलमान समाजातील बागवान लोक या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर आहेत. खेड्यात एखादी कासारीण डोक्यावर बांगड्याची बुट्टी घेऊन घरोघरी बांगड्या भरताना आढळत होती. किंवा एखादा कासार घोड्यावर किंवा सायकलवर बांगड्याची चवड घेऊन बांगड्या लावत फिरताना आजही आढळतो. कासाराच्या हातात हात देऊन बांगड्या भरायला बसलेली स्त्री पहा.

**वैराळ दादा । तुझी माझी कोण जात ॥**
**चुड्या कारण दिला हात ॥**

बांगड्या भरणं तसं त्रासदायक आणि वेदना देणारी गोष्ट पण स्त्रिया हौसेने हा त्रास सहन करतात.

**बारीक बांगयडी । गोऱ्या हाताला चडयीना ॥**
**चैन जीवाला पडयीना ॥**
**बारीक बांगडीया । गोऱ्या हाताला रूतयली ॥**
**नेणंती माझी साळू । पोपट सुकयली ॥**

अनुक्रमणिका

जीवन सुखदुःखाचा खेळ. बांगड्या भरताना दुःख होत असलं तरी त्या भरुन झाल्यावर स्त्रीला सुख समाधान मिळते. हसतमुखाने ती उठताना दिसते.

**बारीक बांगयडी । राजवर्खीची तऱ्हा न्यारी ॥**
**अंबारी शेजारी । तिथं डाळिंब्या लहऱ्या मारी ॥**
**बारीक बांगयडी । गोऱ्या हाताला दिसना ॥**
**साळू माझ्या मालनीला । दिष्ट लागली सोसना ॥**
**बारीक बांगयडी । गोऱ्या हाताला चमक्या मारी ॥**
**साळू झऱ्याला पाणी भरी ॥**

बांगडी बारीक, नक्षीदार, उठावदार रंगाची असावी आणि ती हाताबरोबर बसावी अशी स्त्रियांची अपेक्षा असते. पहिल्या ओवीतील उपमा मोठी बहारदार आहे. मैनाबाईनी राजवर्खीच्या चमकदार बांगड्या भरल्या. मग ती डोक्यावर पदर घेऊन अगोदर वैराळाच्या आणि मग घरातील सर्व वडिलधाऱ्या मंडळीच्या पाया पडते. 'अखंड सौभाग्यवती हो जा! जन्म सावित्री चुडा ले जा.' असा आशीर्वाद तिला मिळतो. तिला समाधान वाटते.

कधी कधी सासू मोठ्या मनानं सुनेला बांगड्या भरते. अजून घरचा कारभार तिच्या हातात असतो.

**बांगडी भरु गेली । लेकी सारख्या सुनेला ॥**
**माझ्या मैनाबाईच्या गुणाला । वैराळ हासला मनाला ॥**

आता सुनेची कृतज्ञता कशी अभिव्यक्त होते ते पहा.

**सासू माझ्या सैंदवाचा । तिचा कुसवा नवसाचा ॥**
**वैराळाच्या पानात । चुडा लेती मी हौशाचा ॥**

अलीकडे प्लॅस्टिक, धातू व लाखेच्या बांगड्या बाजारात आल्या आहेत. त्या तुलनेने स्वस्तही आहेत. पण काचेच्या बांगड्याच शुभ मानतात. त्याला काही चित्रपटाची नावे दिलेली आढळतात.

या बांगड्याच्या पाठीमागे लाखेचे चुडे घालण्याची पद्धती होती. पंढरपूर सारख्या तीर्थयात्रेच्या ठिकाणी चुडे घालणे शुभ मानतात. अलीकडे श्रीमंताच्या बायका बांगड्याच्या मागे सोन्याच्या पाटल्या व बांगड्यात बिल्वर घालताना दिसतात. पण बारीक बांगडी राजवर्खीची तऱ्हा न्यारीच!

❒❒❒

अनुक्रमणिका

## काळीया चंद्रकळा

लेण्या नेसण्याची स्त्रियांना हौस भारी. त्यात 'साडी' ही तर तिच्या मनाची कमकुवत जागा. आपल्याला वेगवेगळ्या वाणाच्या साड्या असाव्यात, रोज नव्या नव्या साड्या नेसून आपले सौंदर्य खुलवावे, इतरांना दिपवावे असे स्त्रियांना वाटत असते.

जुन्या काळात ग्रामीण भागातील स्त्रियांना लग्नातच भारी किंमतीच्या साड्या म्हणजे शालू, पैठणी, चंद्रकळा मिळत. हळदीकुंकवाला, सणासमारंभात वा कुठं गेलं आलं तर अशा ठेवणीतल्या साड्या वापरीत. एरवी सासरी माहेरी गरिबी. हातातोंडाशी गाठ. त्यामुळे दोन सुताडी लुगडी आणि दोन चोळ्या मिळायच्या, त्यात लग्नानंतर सुरुवातीच्या काळात माहेराकडून स्त्रियांना लुगडी घेतली जात. आपल्या भावाला एक माऊली म्हणते –

**धन या संपता । हाय सवताची तुझी तुला ॥**
**हावशा बंधुला बोलयीते । साडी चोळीची आशा मला ॥**
**लुगडं फाटलं । आलं दंडाच्या आकाराला ॥**
**हावशा बंधवाला । देती सांगावा वकिलाला ॥**

माहेरच्या साडी चोळीची तिला आशा. तसा परंपरागत हक्कही आहे. कधीमधी स्त्रिया पैहीपाहुण्याच्या, नातेवाईकाच्या गावाला गेल्या तर त्यांना साडी चोळी नेसवली जाते. आजही तशी पद्धत आहे. त्यातूनही स्त्रियांना साड्या मिळतात.

**लुगडं फाटलं । गावा न्हायी कुणाच्या गेली ॥**
**आशा कुणाची न्हायी केली ।**

माहेरी हक्क असला तरी इतरांची ती मेहरबानकीच असते. करणी धरणी उसनी असते. करायची अन् करुन घ्यायची. त्याची आशा आपण कधी केली नाही असे वरील ओवीत म्हटले आहे.

लुगडं किंवा साडी घेतली तर स्त्रियांना कोण आनंद होतो. या आनंदामुळे त्या घेणाऱ्याची कृतज्ञता व्यक्त करतात. त्याचे गाण्यातून कौतुक करतात. आभार मानतात पण त्यात पांढरपेशी औपचारिकता असत नाही. त्यात जिव्हाळा आणि प्रेम असते. लुगडं खरेदी करताना पदर नीट बघावा लागतो. लुगड्यांचा रंग, डिझाइन, पोत यापेक्षाही पदराला महत्त्व असते. कारण पदर स्त्रियांच्या अंगाखांद्यावर, डोक्यावर येत असल्यामुळे सौंदर्याची खुलावट वाढते. म्हणून –

**लुगडं घेतलं । दोन्ही पदार आधी बघा ॥**
**शहाणपणाला होईल दगा ।**

लुगड्याचे पदर चांगले नसतील तर खेड्यातल्या बायका घेणाऱ्यालाच वेड्यात काढतील आणि पदर चांगले असतील तर कौतुकही करतील.

**लुगडं घेतलं । दोन्ही पदार सारखं**

अनुक्रमणिका

**बापलेकाची पारख ॥**

दोन्ही पदर एक सारखं असलं तर ते लुगडं दोन्ही बाजूनी नेसता येते. बापलेक सारखे तसे दोन्ही पदरही सारखे. म्हणून ही पारख चांगली. जर चाट्याने, दुकानदाराने खात्रीने चांगले लुगडे दिले असले तर

**लुगडं घेतलं । राम सीता पदराला ॥**
**माझ्या बंधवाचा । चाटी मैतर घेणाराला ॥**

बंधूजीचा चाट्या संगट लोभ असल्याने त्यानेच चांगले लुगडे दिले.

कधी कधी माहेरी घेतलेले लुगडे मैनाबाईच्या मनात येत नाही. कधी निवड चुकते. कधी मनात असून गरिबी आड येते.

**लुगडं घेतलं । घडी ठेवली बाकावरी ॥**
**गवळण बाई बोलं । लेक रुसली बापावरी ॥**
**लुगडं घेतलं । नाही रेशमाची काडी ॥**
**गवळणबाईला सांगते । नाही नेसत घाल घडी ॥**

कधी कधी असं होतं. भावजय तिच्या भावाला भारी साडी घेऊ देत नाही. ती वाचवायला बघते.

**बंधूजी घेतो साडी । भावजय गुजरी हाकामारी ॥**
**लय भारीची आणू नका । बांगड्या भराय पैका राखा ॥**

भावाच्या मनात होतं बहिणीला चांगलं लुगडं घ्यायचं पण भावजयीनं घोटाळा केला. नणंद-भावजयीचं नातं मोठं मजेशीर असतं. आईही तोंडदेखली लेकीची समजूत काढते पण काही उपयोग होत नाही. एकीकडे बायको दुसरीकडे बहीण. भावाची मोठी पंचाईत होते.

**लुघडं घेतलं । घडी ठेवली खुंटीवरी ॥**
**हावशा बंधू बोलं । बहिणी रुसाव कुठंवरी ॥**

नाईलाज झाल्यावर मग भाऊ लुगडं परत करुन बहिणीजोगं चांगलं लुगडं घेतो. मग ती कृतज्ञता व्यक्त करते.

**बंधुजी साडी घेतो । जशी काळजाची वडी ॥**
**माझ्या बांधवाची । घेणाराची दृष्ट काडी ॥**
**बंधूजी साडी घेतो । जशी काळजाची गोष्ट ॥**
**माझ्या बंधवाचं । घेणाराचं मन मोठं ।**

अनुक्रमणिका

बहिणाईचा रुसवा काही काळच असतो. तिला माहित असते. 'बंधूजी सलामत तर साड्या पचास' त्यामुळे ती भावाचं मन दुखवत नाही.

**दुबळ्या बहिणीला । तिला बंधूजी असावा ॥**
**जुन्या साडीला इसावा ॥**

आहे त्या परिस्थितीत सुख शोधण्याची स्त्रीची जन्मजात वृत्ती असते.

गोरगरीबांच्या बायकांचे हे मनोहर भावविश्व लोकगीतातून प्रकट झाले आहे. त्यात राग, लोभ, आशा, आकांक्षा, रुसवा फुगवा यासर्वाचे प्रतिबिंब पडले आहे.

आता जरा श्रीमंती थाट, 'कुठं आलं गेलं तर सणासुदीला नेसायच्या ठेवणीतल्या साड्या होत्या. जरा भारी, शालू, पैठण, चंद्रकळा. या साड्या स्त्रियांना प्रिय होत्या. बंधुजीचं स्मरण झालं आता हावशा कंताला घेऊन थोडा श्रीमंती थाट बघू. बालविवाहाची चाल रुढ होती त्या काळात लहान वयात नांदून आलेल्या मैनाईचं कौतुक असे.

**काळीया चंद्रकळा । नेसती बांधूयानी ॥**
**लहान वयात । आलीया नांदूयानी ॥**

चांगल्या साड्याचा हट्ट माहेरी कशाला? माग की तुझ्या कंथाला.

**काळीया चंद्रकळा । नेसूनी बघावी ॥**
**हावशा कंथाला मागावी ॥**
**काळीया चंद्रकळा । साऱ्या दिंडींच्या खाली हुती ॥**
**चुड्या माझ्या राजसाला । घरी सूचना केली हुती ॥**
**काळीया चंद्रकळा । नेसूनी अंग दिसं ॥**
**सीता माझी मालयन । हावशा कंथाला मोल पुसं ॥**
**काळीया चंद्रकळा । धुण्यानं झाली गोळा ॥**
**हावशा कंथानं । रुपये दिलं साडेसोळा ॥**
**काळीया चंद्रकळा । एका धुण्यात इटली ॥**
**सांगते सये तुला । नाही हावस फिटली ॥**
**काळीया चंद्रकळा । नेसती छायी छायी ॥**
**बंधूला झाला लेक । बारशाला जाती बाई ॥**

'काळीया चंद्रकळा' घेताना तिच्या मनात उमटलेल्या भाव भावनांचे मनोज्ञ दर्शन येथे घडते.

❒❒❒

# बंधुजी घेतो चोळी

चोळी आणि लुगडे ही जुन्या मराठी स्त्रियांची प्रमुख वस्त्रे. साडीबद्दलचे मराठी स्त्रीचे भावविश्व आपण पाहिले. आता चोळी. तिला संस्कृतमध्ये कंचुकी म्हणतात. वेदकाळापासून ती प्रचलित आहे. शिवणकलेचा उगम चोळी शिवण्यापासून झाला असावा. चोळीत चार-पाच प्रकार होते. चोळ खणाच्या काठावर असलेली नक्षी दंडावर येत असल्याने स्त्रियांचे सौंदर्य वाढते. त्यात पाठीपोटी नीट बसणारी चोळी महत्त्वाची. पूर्वी गाठीची चोळी आणि बटनाची चोळी होती. शक-हुणाच्या आगमनानंतर जॉकीटसारखी चोळी आली. १९२० नंतर गोलपातळाची फॅशन आल्यावर झंपर किंवा ब्लाऊज स्त्रियात लोकप्रिय झाला. झंपरमध्ये रंगाचे प्रकार असले तरी तो कापडाचा तुकडाच. त्यात काठ, नक्षी फारच कमी. त्यातील फॅशन शिवणाऱ्याच्या कौशल्यावर अवलंबून असते. चोळी शिवण्याची पद्धतीही वेगळी असते. ढुशी आणि लाग लावून चोळी शिवली जाते.

लग्नानंतर प्रारंभीच्या काळात भाऊ बहिणीला लुगडं-चोळी घेत असला तरी जसे दिवस जातील तशी ही माया पातळं होत जाते.

**आताच्या कलीमंधी । भाऊ नव्हत बहिणीचं ॥**
**करी माहेयार मेव्हणीचं ॥**

अशी बायकोच्या माहेरकडे भावाची ओढ वाढली की बहिणीचे माहेर चोळीवरच भागविले जाते. त्यात गरिबी असली तर भाऊ चोळीच घेतो.

जवळच्या पंचक्रोशीत दिलेल्या बहिणीची बाजारात गाठ पडली तर

**भरल्या बाजारात । बहीण भावाची पडली गाठ ॥**
**बंधुजी घेतो चोळी । फुटाणी रंग दाट ॥**

हे झालं अनपेक्षित. पण सणासुदीला बहीण माहेरी आली तर भाऊ तिला चाट्याच्या दुकानात घेऊन जातो.

**चाट्याच्या दुकानात । बंधू बसला भोळा राजा ॥**
**उंच घडीला हात माझा ॥**
**चाट्याच्या दुकानात । उंच खणाच इना नावू ॥**
**माझ्या बंधवाला । किती बोटानं खुणा दावू ॥**
**चाट्याच्या दुकानात । चोळी देखिली कडीपाट ॥**
**आली मनाला टाकी हात ॥**
**चाट्याच्या दुकानात । चोळी देखिली लवंगाकाडी ॥**
**हावशा माझा बंधू । माझ्या मनाची हौस फेडी ॥**

अशी मनपसंत चोळीची खरेदी होते.

अनुक्रमणिका

खेड्यापाड्यात गरिबी आणी दारिद्र्य फार. रोज उठावं. कामाला जावं तवा खावं अशी परिस्थिती, कपड्या लत्याची भारीच अबाळ. चांगेल भारीतले कपडे तर सोडाच पण अंग झाकायला जाडीभरडी वस्त्रे मिळणेसुद्धा मुश्कील. अशा एका गरीब माऊलीच्या चोळ्या फाटल्या मग ती भावाला सांगते.

**फाटली माझी चोळी । फाटली धुताधुता ॥**
**माझ्या बंधवाला सांगा । वाड्यात जाता जाता ॥**
**फाटली माझी चोळी । भाया सोडून बगलला ॥**
**माझ्या बंधवाला ॥ सांगा माझ्या जीवलगाला ॥**
**चोळी या फाटली ॥ लाग सोडुनी भूजवरी ॥**
**हावशा बंधूला बोलते । माझा रूसवा तुझ्यावरी ॥**
**हिरव्या चोळीचा । फाटला डावा लाग ॥**
**हावशा माझा बंधू । दिंडी घेवूनी आला वाघ ॥**

अशी गरिबी. लज्जारक्षणाचे वस्त्र फाटले तर घेण्याची ऐपत नाही. सासरी तेवढा अधिकार आणि स्वातंत्र्यही नाही. मग तिने चोळी मागावी कुणाला? ती भावालाच मागणार. भावाने घेतलेल्या चोळीला विशेष महत्त्व. त्यातही ती स्त्री गरिब सासुरवाशीण असेल तर विशेषच. नवी चोळी हे तिचे स्वप्न भावाने घेतल्यावर साकार होते. पुढील ओव्यातून चोळीच्या संबधात प्रेम, हक्क, आर्जव, दारिद्र्याचे सूचन, सोशिकता, नणंद भावजयीतील नाते संबध यांचे दर्शन घडते.

भावाची परिस्थिती गरिबीचीच. त्याने काही तरी करून बहिणीला चोळी घ्यायची ठरवली तर भावजय मोडा घालणार.

**बंधूजी घेतो चोळी । सीता मालन मारी हाका ॥**
**चोळी उनाक घेऊ नका । नंदा दिल्यात थोरलोका ॥**

अशी समंजस भावजय विरळाच. बहुदा ती भावाचे कान भरणार.

**बंधुजी घेतो चोळी । भावजय गुजरी बोलयती ॥**
**बंदा रुपाया मोडू नका । नंदकामिनीला चोळी**
**हालकी काढू नका ॥**

'दूधदही सारू नका, पोर उपाशी मारू नका' असा हा प्रकार. बंदा रुपाया मोडू नका आणि चोळी तर हालकी काढू नका. पण भाऊराया शहाणा. बायकोचे न ऐकता तो बहिणाईला चांगली चोळी घेतो.

**बंधुजी घेतो चोळी । भावजय गुजरी टाकी डोळा ॥**
**बंधुजी माझा शहाणा ॥ काढी रेशमाचा गोळा ॥**

अनुक्रमणिका

एखादी बहीण भाग्यवान असते. चार भावात ती एकटी. त्यात भाऊ समर्थ, उदार आणि प्रेमळ त्यामुळे तिला मुबलक चोळ्या मिळतात.

**चोळ्यांवरी चोळ्या । वलन माझी वाकली ॥**
**बहीण भावाला एकली ॥**
**चोळ्यावरी चोळ्या । माझ्या वलनी देते गाठी ॥**
**हावशा माझा बंधू । दर महिन्याला येतो चाटी ॥**
**चोळ्यावरी चोळ्या । माझ्या वलनी आला पूर ॥**
**बंधूला सांगते । नवा निघाला मोतीचूर ॥**

अशी भाग्यवान बहीण की जिला महिन्याला भाऊ नव्यानव्या चोळ्या घेतात. नुसती चोळी घेऊन उपयोगाची नाही ती शिंप्याने अंगाबरोबर चांगली शिवली पाहीजे.

**चोळी शिव शिंपीदादा । मोती लावून पसापसा ॥**
**चोळी जायची दूरदेशा ॥**
**चोळी शिव शिंपीदादा । काय घेचील शिवनावळ ॥**
**सीता माझी मालयन । चोळी जोगी चंद्रावळ ॥**
**माझा अंगोलोट । शिंपीदादाला काय ठाव ॥**
**बंधू आपली भूज दाव ॥**

अशी कधी अंदाजाने, कधी जुन्या चोळीवरुन माप देवून चोळी शिवली जाते. अशी नवी चोळी घालताना मैनाबाईचे अंतःकरण समाधानाने भरून येते. इथे चोळी केवळ वस्त्र उरत नाही तर लोकजीवनातील परस्पर नात्याचा दुवा बनते. श्रीमंती थाटात वाढलेल्या शहरी माणसाला हे भावविश्व कळणार नाही. पण ग्रामीण भागातल्या गोरगरीब माणसाच्या भावभावना, साधे-साधे प्रसंग वरील लोकगीतून मोठ्या मनोहर पद्धतीने प्रकट झाले आहेत.

❒❒❒

अनुक्रमणिका

## **असं सासर द्वाड बाई**

पूर्वी मुलींची लहानपणी लग्नं व्हायची. आठव्या-दहाव्या वर्षी. परकरी पोर. खेळायचं बागडायचं वय, शिक्षण नाहीच. समजही कमी अशावेळी ती नांदायला जायची. नवरा काय? संसार कशाशी खातात हेही तिला माहित नसायचं. सासरी कुणाशी कसं वागावं, बोलावं, हे तिला कळायचं नाही. मग तिच्या हातून कळत नकळत अनेक चुका व्हायच्या, सासरची सगळी माणसं तिला बोल लावायची.

**सासुरवाशीनीला । तिला बोलतंय सारं घर ।**
**तिचा कैवारी धाकला दीर!**

धाकला दीर शिणचा खेळगडी म्हणून कैवारी.

अशा काळात चार सहा महिने नांदून ती श्रावण भाद्रपदात सणासुदीला माहेरी यायची.

**काळीया चंद्रकळा । नेसती बांधुयानी ॥**
**लहान वयात । आलीया नांदुयानी ॥**

अशी तिची अवस्था. माहेरी आली की फेराच्या गाण्यापासून झोक्यापर्यंत आणि झिम्मापासून फुगडीपर्यंत खेळगाणी रंगायची. या खेळगाण्यात संसारातील सुखदुःखाच्या भावना मोठ्या मोहकपणे गुंफलेल्या होत्या.

**असं सासर द्वाड बाई । कोंडूनी मारीत ।**
**असं माहेर ग्वाड बाई । खेळाया धाडीत ॥**

चार सहा महिने नांदून आलेली एक नेणंती सासुरवाशीण आपल्या सासरच्या माणसाविषयी खेळगाण्यातून म्हणते.—

**बंडगराची वाडी**
**लय बाराखोडी**
**सारं गाव जोडी**
**मला म्हणत्याती बाय ग ॥ धृ ॥**
**सासू माझी गुसू**
**तिनं केलं हसू**
**चोरूनच खाल्लं**
**मला म्हणत्याय बाय ग ॥ १ ॥**
**सासरा माझा खोटा**
**त्याच्या हातामंधी सोटा**
**करील वटावटा**
**मला एकायंच न्हाय ग ॥ २ ॥**
**थोरला माझा दीर**
**जात हुता शेता**

अनुक्रमणिका

**घालीन म्हणाला लाता**
**मी पळालीच बाय ग ॥ ३ ॥**
**मधला माझा दीर**
**तोडीत हता वाळकं**
**फोडीन म्हणला टाळकं**
**मी घावायची न्हाय ग ॥ ४ ॥**
**धाकटा माझा दीर**
**तेच माझं बरं**
**चिरमुरं फुटाणं**
**देत हुता बाई ग ॥ ५ ॥**
**थोरली माझी नणंद**
**हाता मंदी फणी**
**अंतऱ्याची शाहाणी**
**काय सांगू बाय ग ॥ ६ ॥**
**धाकटी माझी नणंद**
**नाकामंदी काटा**
**रिकामाच थाट**
**कोण इचारत न्हाय ग ॥ ७ ॥**
**थोरली माझी जाऊ**
**तिला आला कावू**
**कण्यातील डाव मला**
**मारत हुती बाय ग ॥ ८ ॥**
**मधली माझी जाऊ**
**फोडित होती कांदा**
**कामामंदी माझा**
**पाडत हुती रेंदा बाय ग ॥ ९ ॥**

या गीतात पुढे भाऊ, वडील, आई या माहेरच्या माणसांच्या वागण्याचा प्रेमाचा उल्लेख येतो. सासरच्या तुलनेत ते उठावदार केले जाते.

पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब होतं. त्यात वर्षभर नांदून आलेल्या सासुरवाशीणीने आपल्या घरातील माणसांचे, त्यांच्या वागण्याचे, त्यांनी केलेल्या जाचाचे सुंदर शब्दचित्र या खेळ गीतात काढले आहे. धाकटा दीर आणि थोरली नणंद यांना अपवाद करता बाकीच्या कुटुंबातील माणसांचा कामधंदा आणि स्वभाव वैशिष्ट्येही त्यात आली आहेत. सहजता, गतीमानता, लय आणि गेयता ही लोकगीताची अनेक वैशिष्ट्ये या गीतातून प्रगट झाली आहेत. जुन्या काळातील सासुरवाशीण स्त्रीचे जीवन, त्यातील कोंडमारा व उपेक्षा या गीतातून व्यक्त होतात. उत्कट भावना, उचित कल्पना, काव्यात्म भाषा, नादमाधुर्य याचा सुरेख संगम या लोकगीतात झाला आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

# साळूला सासुरवास

मैनाबाईचं लग्न होऊन चार-सहा महिने झाले. नव्या नवरीचं नवंपण ओसरलं. तिला कामाला जुंपलं. सासरच्या माणसाची खरी ओळख तिला होऊ लागली. सासूबाईनं धारेवर धरलं. दिरानणंदानी साथ दिली. सासुरवास होऊ लागला. सासुरवास कुटुंबसंस्थेला लागलेला कलंक, लोकमानस लोकगीतातून सांगते

**घरचं होतं दूध । पराया घरचं आलं ताक ॥**
**किती सांगू सासूबाई । लेकी सारख्या सूना राख ॥**
**साळूला सासुरवास । नको लावू तू सासूबाई ॥**
**साळू अन्याया जोगी नाही ॥**

पण वास्तव वेगळंच. वरील ओव्यातील उपमा पहा. घरचा मुलगा म्हणजे दूध परक्याघरची मुलगी-सून म्हणजे ताक. दुधाची सर ताकाला कशी येणार? ताक सत्त्वहीन, आंबट, हलकं, कमी महत्त्वाचं. गौण. स्त्री तशीच. साळू अन्यायाजोगी नसली, गुणाची असली तरी सासूबाई काही आपला वळ सोडत नाही. ती सासुरवास करणारच. अशा कित्येक साळूबाईनी शेकडो वर्षे सासुरवासाचा छळ सहन केला आहे. या छळाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. सासुरवासाच्या वेदीवर आपली उमलती जीवने अर्पण केली आहेत. कायदा पुळचट. पुराव्या अभावी सर्वांना मोकळे सोडतो. सासुरवास करणारे, आत्महत्या करायला प्रवृत्त करणारे उजळमाथ्याने समाजात मिरवतात. सासू एक स्त्री. स्त्रीचं दुःख समजून न घेता स्त्रीच स्त्रीची वैरीण होत आहे.

सासुरवास नाना परीने होतो. सून म्हणजे हक्काची मोलकरीणच. पहाटेपासून तिला कामाला जुंपले जाते. म्हणून पहाटे आरवणारा कोंबडा तिला वैरी वाटतो.

**सासुरवासिनीला कोंबडा वैयरी ।**
**बांग देतो दुहेरी ॥**

पूर्वी भल्या पहाटे उठून तिला दोन-तीन शेर दळण दळावे लागे. झाडलोट करावी. शेणघाण काढावे. प्रातर्विधी आटपून अंघोळ करावी. इतरांना अंघोळीसाठी पाणी तापवून ठेवावे मग दिवस उगवणार! मग धारपाणी, स्वंयपाकपाणी, भांडी घासणे, धुणे धुणे, तुकडाभर भाकरी खावून दिवसभर शेतात कामाला जावे. संध्याकाळी परत आल्यावर जळणकाटूक, पाणी आणणे, स्वयंपाकपाणी करुन सर्वांना जेवायला वाढणे. उरले सुरले खाऊन धरणीवर अंग टाकणे. पती सेवेला सामोरे जाणे, असा तिचा दिनक्रम. भाड्याच्या बैलावानी.

**लेकीचा जलम । कुणी घातला येड्यानी**
**बैल राबतो भाड्यानी ॥**
**लेकीचा जलम । भाड्याचा बैल ॥**
**कधी इसावा हुईल ॥**

अनुक्रमणिका

अशा जीवघेण्या कामाधंद्याने तिला जीव नकोसा होतो. बरं असं गाढवासारखं काम करुनही तिचं चार शब्दानी कौतुक नाही. तिला सतत सासरच्या माणसांची बोलणी खावी लागतात.

**सासुरवासीण मी । मला बोलत्यात सारी ॥**
**सांगते बहिणाबाई । कंत मायाळू उभा दारी ॥**

सासूची सतत कुरकूर चालूच असते. शेजारणीला ताक दिलं नाही तर 'एवढं सुद्धा कळत नाही का!' म्हणणार आणि दिलं तर 'तुला कुणी सांगितला होता कारभार' असंही म्हणणार. सतत घालून पाडून बोलणे, अपमान करणे, अवहेलना करणे, माहेरचा उद्धार करणे, नणंदा दिराचे ऐकून टाकून बोलणे. शिव्या देणे, प्रसंगी मारझोड करणं, सतत धाकात ठेवणे. वागण्या बोलण्याचे स्वातंत्र्य न देणे, पुरेसे अन्न न देणे, विश्रांती घेऊ न देणे अशा नाना तऱ्हांनी सासूबाई सासुरवास करीत असते.

सासूची एक मानसिकता असते. घरची कारभारीण. अधिकार गाजवावे असे वय. हक्काची हाताखाली आलेली सून. सून नवऱ्याला ताब्यात घेऊन घरावर हक्क प्रस्थापित करील अशी सुप्त भीती. कौटुंबिक सत्तेच्या वर्चस्वातला संघर्ष, परक्या घरच्या सुनाविषयी नात्याचा, प्रेमाचा अनुबंध नसणे, आपल्या सासूने केलेल्या छळाचा वचपा काढणे, अशी पारंपरिक पुरुषी मानसिकतेतील सासू सुनेचा छळ करते.

सासुरवास म्हणजे तोंड दाबून बुक्क्याचा मार असतो. सुनेला कुणाला सांगताही येत नाही. अशा वेळी तिची अवस्था.

**भिरुड लागयीला । आंब्याच्या फोकयीला ॥**
**अंतरीच गुज । कशी सांगू मी लोकायीला ॥**

अशी होते. त्यात घरात एखादी दुसरी नणंद असली तर साळूबाईच्या दुःखाला पारावारच राहात नाही.

**साळूला सासुरवास । नंदा बायाचा बाजार ॥**
**नेणंत्या माझ्या साळूला । मागं कंताचा आधार ॥**

नवरा चांगला असला तर बरं. तोच तिचा आधार. त्याच्याकडे बघून सारा छळ सहन करायचा. तो आईवेडा असला तर वाटच लागली.

**साळूला सासुरवास । नंदा करत्यात धापधूप ॥**
**कसा कटावा परदेश ॥**

आला दिवस ढकलत ती कट काढते. तिला हे माहीत असते की ह्या नंदा चार दिवसाच्या पाहुण्या आहेत.

**साळूला सासुरवास । नंदेची लावणी ॥**

अनुक्रमणिका

**दोन दिवसाची पावणी मालनबाई ॥**

लग्न न झालेली नणंद असली तर वर्षा-दोन वर्षाची पाहुणी असते इतकेच. साळूबाईचं वय लहान, अशिक्षित, अज्ञान, अनुभव कमी, नवीन घरात कोणताही हक्क नाही, स्वातंत्र्य नाही. पती हाच परमेश्वर, नवऱ्याकडे बघून हेही दिवस जातील म्हणून ती सारा छळ अपमान सहन करते. परंपरेने तिला तशी शिकवण दिलेली असते.

**सासूचा सासरवास । सोसावा एकीनं ॥**
**कुलवंताच्या लेकीनं । मालन बाई ॥**

दिल्या घरी नांदून आईबापाचे नाव करावे असे तिला वाटते.

सणासुदीला ती माहेरी आली तर सासुरवास न सांगण्याकडेच तिचा कल असतो. पण फारच असह्य झाले तर मात्र ती डोळ्यात पाणी आणून आपल्या आईबापाला सांगते. आईबापाला अत्यंत वाईट वाटते. भावालाही दुःख होते.

**बहिणीचा सासुरवास । बंधू ऐकतो चोरावाणी ॥**
**आसवं टाकतो मोरावाणी ॥**

आईबाप पाहुण्याना समजावून सांगण्यापलीकडे काय करणार? आपलेच केस गुंतलेले असतात. फार ताणावे तर मुलीचे नांदणे तुटते. हे कोणच्याच दृष्टीने हितावह नसते. मैनाबाई मोठी धीराची. सहनशील आणि सोशिक, सारा सासुरवास ती सोसत दिवस काढते.

**साळूला सासुरवास । दिरा नंदानी तिला केला ॥**
**बया माझ्या मालनीचा । काट्यावरी जलम गेला ॥**

पण 'चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे' असतात. काळ आणि परिस्थिती बदलते.मैनेला घरातील माणसांच्या सामर्थ्याची आणि कमकुवतपणाची नीट ओळख होते. अंदाज घेऊन सहन करीत, सेवेने, प्रेमाने ती हळुहळू नवऱ्याला मुठीत घेते. सासूचे वय वाढत जाते, ती मनाने, शरीराने कमकुवत होते. नंदाची लग्ने होतात आणि घरचा अधिकार सूनेच्या ताब्यात येतो. मग सून सासूची उपेक्षा करुन सासुरवासाचा वचपा काढते. वृद्धापकाळात सासूला हात दाखविते. एव्हांना तिची मुले मोठी झालेली असतात. त्यांची लग्ने होऊन सूना घरात येतात आणि सासुरवासाची परंपरा पुढे चालू राहते. 'सून आली घरात अन् सासू पडली केरात' अशी अवस्था होते.

❒❒❒

# भरताराचं सुख

लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात पतीपत्नीत वयानुरूप जरा हिरवटपणा असतो. वयाबरोबर माणूस जसा पिकत जातो. तसा संसारही गोड होतो. पण सुरुवातीच्या काळात एकमेकांना पारखणे चाललेले असते. जुन्या काळातले खेड्यातले पुरुष अशिक्षित, रांगडे, नवऱ्याचा घरात दरारा असला पाहिजे. बायकोने नवऱ्याच्या धाकात राहिले पाहिजे असे मानणारे. नवरेशाही गाजविणारे. बायकोवर त्याचे प्रेम असे पण ते रागावून, धाक दाखवून, शिवीगाळी करून प्रसंगी मारहाण करून बायकोला धाकात ठेवीत असत. कुणीतरी आपल्याला भीते, मान देते ही भावना त्यांच्या पुरुषी मनाला सुखावित असे. अशा एका रागीट नवऱ्याची बायको म्हणते.

**पिकलं सीताफळ । हिरवी त्याची काया ॥**
**रागीष्ट भरताराची । पोटात त्याची माया ॥**
**भरताराची खूण । डाव्या डोळ्यातून ॥**
**नेणंती साळू माझी । राधा उठली सयातून ॥**

रागीट भरताराला पिकल्या सीताफळाची दिलेली उपमा किती सुरेख आहे. बायकोला माहित असते, नवऱ्याचे आपल्यावर प्रेम आहे. रागावणे हे सुद्धा प्रेमाच्या पोटातून निर्माण होते. माणूस आपल्याच प्रेमाच्या माणसावर रागावतो. उगीच रस्त्यावरच्या माणसावर कुणी रागावत नाही.

नवऱ्याला जिंकण्याची बायकाची पद्धती वेगळी. नवऱ्याला मुठीत ठेवण्यासाठी स्त्रीस्वभावानुसार त्या वेगळी पद्धत अवलंबतात. प्रसंगी पडते घेऊन, नवऱ्याला मान देऊन, हसून, लाडीगोडी लावून प्रेमळपणे, सेवेने त्या नवऱ्याला जिंकतात.

**रागीट भरतार । बद्या नागाचा फुत्कार ॥**
**हावशाचा राग । मी ग हसून केला गार ॥**

एक अनुभवी प्रपंच विदुषी आपल्या अनुभवाने लेकीला सांगते.

**रागीट भरतार । राग कसा ग वळखावा ॥**
**त्येच्या डोळ्यात पारखावा ॥**
**रुसला भरतार । हायत्या डोळ्याच्या कोरा लाल ॥**
**किती सांगू साळू तुला । राग जाऊ दे मग बोल ॥**
**रुसला भरतार । समजाविते नाना परी ॥**
**गुणाची साळू माझी । गोपा देते मांडीवरी ॥**
**रुसला भरतार । रुसला तर रुसू द्यावा ॥**
**सांगते साळू तुला । शेजेवरी समजावावा ॥**

याला म्हणतात अनुभवाचे शहाणपण. रुसलेल्या भरताराला शांत करण्याचे हे रामबाण उपाय आहेत.

अनुक्रमणिका

शेजवरचा नवरा बायकाच्या मुठीत असतो. यावेळी त्याला शांत करता येते त्याच्या मनात वाट्टेल ते उतरता येते. नवऱ्याला जिंकता येते.

भरताराचं सुख म्हणजे संसारसुख. त्याचा एक आविष्कार शेजेवरी.

**पावसावाचून । काय कराव जमिनीला ॥**
**भरतारावाचून । सुख नाही कामिनीला ॥**

यातून शृंगार अत्यंत सूचकतेने पण प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. किती समर्पक दृष्टांतातून भरताराचे सुख रूढार्थाने अशिक्षित असलेल्या बायकांनी अभिव्यक्त केले आहे. एरव्ही सासूचा प्रचंड द्वेष करणारी सून या बाबतीत मात्र सासूबाईची कृतज्ञता व्यक्त करते.

**बया मालयनीपरास । सासूबाईचा उपकार ॥**
**दिला पोटीचा चंद्रहार । जीव माझा झाला गार ॥**

शृंगार सुचकतेचे व्यक्त करीत संसारसुखाचे वर्णन लोकगीतून येते.

**चांदण टिपूर ग । चांदण्यावाणी रात ॥**
**शेजच्या भरताराची ग । मला देवावाणी साथ ॥**

एक माऊली आपल्या लेकीच्या शृंगाराचे वर्णन करते.

**जावाया सावळ्याची । अंधारी त्याची खाली**
**साळाई माझी बाई । वीज लवत गेली ॥**
**जावाय सावळ्याचा । त्याचा पलंग पितळचा ॥**
**नेणंती मैनाईचा । वर रहीवास पुतळचा ॥**
**लांब लांब भाल । तुझ्या भालाचं खाली शेंड ॥**
**कंत उशाला देतो दंड ।**

यात जावायाच्या पलंगाचा उल्लेख आहे. मैनाईचं कौतुक आहे. टाळी एका हातानं वाजत नाही त्यात उजव्या हाताचा जोर जास्त असतो इतकेच.

शेजचा भरतार बायकाच्या मुठीत असतो. अशी बायकोची समजून असते. पण चतुर शहाण्याची गाठ पडली तर सावधानतेचा व धोक्याचा इशाराही दिला जातो.

**शेजचा भरतार । नको म्हणूस माझा माझा ॥**
**किती सांगू साळू तुला । अंत काढुनी घेतो तुझा ॥**
**शेजचा भरतार । नको म्हणूस आपला ।**
**जसा भुजंग तापला ॥**
**दुबळ्या भरताराची नार । नको करूस हेळना ॥**
**उद्या हालल पाळणा ॥**

अनुक्रमणिका

'नाग' हा पुरुषत्वाचं प्रतीक म्हणून अनेकवेळा लोकगीतातून येतो. जसा भुजंग तापला ही उपमा त्यातूनच आली आहे.

दुबळा भरतार पुरुषत्वाने असेल तर कोणतीही स्त्री ते सहन करणार नाही. पण भरतार कर्तृत्वाने दुबळा असेल तर स्त्रीने तो गोड करुन घ्यावा असा पुरुषप्रधान परंपरेचा उपदेश असतो.

**दुबळा भरतार । रोज आणतो शेर ॥**
**त्याला म्हणावा सावकार ॥**
**दुबळा भरतार । नको करुस हेळना ॥**
**कपाळीचं कुंकू । सोनं दिल्यानं मिळना ॥**
**दुबळ्या भरताराची । सेवा करावी आदरानं ॥**
**पाय पुसती पदरानं ॥**
**भरताराची सेवा । कुण्या गरतीनं केली ॥**
**तिच्या पुण्याईची आवई । गोवागाव गेली ॥**

भरतार कसाही असो तो तिचा परमेश्वर आहे असे माणून त्याची आदराने सेवा करावी अशीच शिकवण स्त्रीला दिला होती.

भारतीय स्त्रीच्या सुखाची परमोच्च पायरी चुड्याच्या अखंडत्वात. तिच्या सुखाचे स्वप्न कुंकवाच्या सावलीत.

**गण गोतावळा । कडकडनी पवणार ॥**
**चुडा माझा राजस । माझा शेवटं लावणार ॥**

म्हणून जुन्या काळातल्या स्त्रियांचं उगवत्या नारायणाला, सावळ्या पांडुरंगाला, तुळस माऊलीला एकच मागणं होतं. 'माझ्या चुड्याला सुखी राख. हळदीवरलं माझं कुंकू जन्मा जाऊ दे.'

**तुळस ग बाई । तुला मागणं काही नाही ॥**
**सुखी ठेव देवा । जोडा जन्माचा । धनी कुंकवाचा ॥**

भरतारला देवाच्या स्थानावर बसवून त्यांच्यातलं माणूसपण विकसित करण्यात भारतीय स्त्रीचं मोठेपण आहे.

❒❒❒

## चुडा माझा राजस

मैनाबाईचा संसार आता सुराला लागला होता. सासरी तिला सासुरवास होत होता. पण दूरचा विचार करुन एका मायेच्या माणसासाठी ती सारं सहन करीत होती.

**साळूनं सासुरवास । सोसला परोपरी ॥**
**भरताराची माया । केला इचार दूरवरी ॥**

एक गोष्ट चांगली होती. तिचा कारभारी चांगला होता. 'जिचा भरतार गुणाचा तिचा संसार सुखाचा.' याचं सारं श्रेय तिच्या गवळी नानाला. तो पारखा सोनार होता. त्यांनी अस्सल शंभर नंबरी सोनं पारखून काढलं होतं. कंतासाठी मैनाबाईनं आपलं माहेरच सारं गणगोत सोडलं होतं.

**मंगळसूत्राला सये । जामीन काळीपोत ॥**
**कंताच्या जीवावरी । सारं सोडलं गणगोत ॥**

देवा ब्राह्मणाच्या साक्षीन तिनं वरलेला पती. मग तो कसाही असला तरी 'पदरी पडलं पवित्र झालं' या भावनेने स्त्रिया स्वीकारतात. मग इथं तर मैनाबाईचा नवरा सर्वार्थाने चांगला होता.

पती-पत्नी, स्त्री-पुरुषाची दोन रुपं. द्विदल धान्यातली दोन दलं. एकमेकांशिवाय अपूर्ण. ती परस्परांना अनुरूप होतात, सहकार्य करतात तेव्हाच संसार परिपूर्ण होतो. ही दोन्ही व्यक्तिमत्वे पूर्ण विकसित आणि समृद्ध असली तर ती परिपूर्णता साधली जाऊन संसार सुखाचा होतो.

या अर्थाने जुन्याकाळातला संसार विजोडच होता. स्त्री सर्वार्थाने गौण. दुबळी, माणूस म्हणून तिला स्वतंत्र अस्तित्वही नव्हतं. शिक्षण नाही. स्वातंत्र्य नाही. जीवनाचा अनुभव नाही म्हणून व्यक्तिमत्त्वाचा विकासही नाही. त्यामुळे संसारात ती गुलामच. सर्वस्वी पुरुषांवर अवलंबून. मग ही गुलामगिरी तिला मिरवाविशी वाटे.

**दुबळं माझं पण । मला दुबळी राहू दे ॥**
**कपाळीचे कुंकू । जोडा जल्माला जाऊ दे ॥**

पतीमुळे तिला अन्न, वस्त्र-निवारा मिळत होता. संरक्षण मिळत होतं. आधार मिळत होता. प्रेम आणि सुख मिळत होतं. कुटुंबात थोडाफार अधिकार मिळत होता. म्हणून भरताराची छाया तिला आंब्याच्या सावली सारखी वाटत होती. तो गेला की मग उन्हाळाच. आई-बाप कितीही समर्थ असले तरी माहेरी तिला थारा नाही. कोणताही हक्क नाही. लग्नापूर्वी ती ज्या घरात हक्काने वावरली ते घर तिला उपरे ठरवी. माहेरी ती चार दिवसाची पावणी. (अलीकडे तिला वडिलांच्या मालमत्तेत मुलांबरोबर हक्क मिळाला आहे.) मग तिला सासरच्या घराशीसर्वस्वाने जोडून घेतल्याशिवाय पर्यायच नाही. लग्नानंतर –

**आईबापाचं राज । एवढं लोकाला सांगायला ॥**
**भरताराचं राज । सये उल्लास भोगायला ॥**

अनुक्रमणिका

या वास्तवाचे तिला चांगलेच भान होते.

त्यामुळे ती सासरशी, तिथल्या माणसांशी आणि विशेषतः भरताराशी समरस होते. सुदैवाने नवरा चांगला मिळाला असला तर ती त्याचे मुक्तकंठाने गुणगान करते.

**भरताराचं सुख । सांगती गोतात ॥**
**नखीच्या धोतराची । केली सावली शेतात ॥**

शेतात तिला ऊन लागू नये म्हणून धोतराची सावली करतो. तिला तळहातावरच्या फोडासारखी जपतो. तिची काळजी घेतो. दूरदेशीच्या माऊलीची आठवणही होऊ देत नाही.

बायकांना 'हावशा' भरतार आवडतो. हौसेने चांगल्या साड्या-चोळ्या घेणारा, दागदागिने करणारा, फिरायला घेऊन जाणारा, बाजारला वा जत्रेला घेऊन जाणारा नवरा बायकांना प्रिय असतो. मग ती त्याचे मनापासून कौतुक करते.

**हावसचा भरतार । हावस करता राहिना ॥**
**साजाचं डोरलं । त्याच्या मुठीत मावना ॥**
**हावसा भरतार । लेणं अस्तुरीला घेतो ॥**
**सोन्याच्या पुतळ्याखाली । चंद्रहार शोभा देतो ॥**
**हावस मला मोठी । कंता संगट बाजाराची ॥**
**अंजिऱ्या चोळीसाठी । कंठी मोडली हजारांची ॥**

पाच पन्नासाच्या चोळीसाठी हजाराची कंठी मोडणारा नवरा खरा हौशी. बायकोवर त्याचा किती जीव. बायका नवऱ्याला कसा हरबऱ्याच्या झाडावर चढवितात पहा. नवऱ्याच्या रूपागुणाचा, चांगुलपणाचा मुक्तकंठाने केलेला गौरव लोकगीतातून येतो.

**समोरच्या सोप्यामंदी । कोण झोपला गोरापान ॥**
**चुडा माझा राजस । आकरी दुधाचा पैलवान ॥**
**सावळ्या सुरतीच । मला लागूनी गेलं याड ॥**
**चुड्या माझ्या राजसाचं । रूप सावळं गुण ग्वाड ॥**
**कपाळीचं कुंकू । लेती मी गव्हावाणी ॥**
**चुडा माझा राजस । दिसतो देवावाणी ॥**

पुरुषांनी आपल्या घरच्या अस्तुरीचं, तिच्या रुपागुणाचं कौतुक उघडपणे क्वचितच केलंआहे. पण बायकांनी मात्र मोठ्या गुणग्राहकतेने आपल्या चुड्याचा गौरव मुक्तकंठाने केला आहे.

कधी कधी बायका आपल्या दागदागिन्याच्या हौसेपायी नवऱ्याला सळो की पळो करतात. त्याला जेरीला आणतात. दागिन्याच्या हौसेसाठी घरदार विकायला लावतात. स्त्री हट्टच तो! बिचाऱ्या नवऱ्याचे

काही चालत नाही. असा स्त्रीहट्ट काही कामाचा नाही. 'भरताराचा संसार नारी आपुल्यापासून' हे तिने लक्षात घ्यायला हवे. संसार दोघांनी काडीकाडीने बचत करून करायचा असतो. उधळमाधळ करुन संसार होत नाही. जिथं दोघांचं एकमत असतं तिथंच संसार सुखाचा होतो. लक्ष्मी तिथंच वास करते.

**अस्तुरी पुरुषाचं । दोघाचं एक मन ॥**
**तिथं लक्ष्मी समाधान ॥**

जिथं पतीपत्नीत बेबनाव असतो तिथे लक्ष्मी वास करत नाही. सुख समाधान नांदत नाही.

**अस्तुरी पुरुषाचा । दोघांचा उभा दावा ।**
**लक्ष्मी बोलयती । मी उगीच आली देवा ॥**

पतीपत्नीने एकमेकांच्या विचाराने, परस्पर सहकार्याने सुखदुःखात सहभागी होऊन काटकसरीने संसार केला तरच तो सुखाचा होतो. स्त्रीलाही तो मानवतो.

**दोंदा वरी द्‌वांद । द्‌वांद पडतं राधाचं ॥**
**सुख कंताच्या राजाचं ॥**

❒❒❒

अनुक्रमणिका

## मैनाबाईला डोहाळे

मैनाबाईची लेण्यानेसण्याची हौस पुरविली. सासुरवास होत असला तरी भरताराचे सुख मिळत होते. बरेच दिवस झाले घरात लहान मूल नव्हते. सासू सासऱ्याला नातवाचे मुख बघायची घाई झाली होती. बाळराजाच्या बाळलीला पाहायला त्यांचे नेत्र आसावले होते. आईबापालाही पोरीचे नांदणे सुराला लागले असे वाटत असले तरी मूल झाल्याखेरीज त्यावर शिक्का-मोर्तब होत नव्हते. आई झाल्याशिवाय कोणत्याही बाईला पूर्णत्व लाभत नाही. मैनाबाईलाही आई व्हावेसे वाटत होते. अशा वेळी तिने –

**हिरव्या चोळीवर । राघू काढून पाहिला ॥**
**तोची दिवस राहिला ॥**

हिरव्या चोळीवर राघू काढण्याचा कल्पनाबंध मराठी लोकवाङ्मयात सर्वत्र आढळतो. राघू पुरुषत्वाचा सूचक तो चिन्हाने दाखविला जातो. पोपटाचा कशिदा पुत्रफल देणारा असतो.

गर्भधारणा झाल्याचे बायकांना कळत असले तरी सुरुवातीला खात्री देता येत नाही. दुसऱ्या महिन्यात लक्षणे दिसू लागतात. मळमळायला लागते. कोरड्या ओकाऱ्या होतात. गरगरायला लागते. खाण्यावरची वासना उडते. गर्भधारणेची खात्री झाल्यावर आई चोरचोळी करते. हिरवा चुडा भरुन, हिरवी चोळी व नारळाने ओटी भरतात. पुरुषांना चोरून केली जाते म्हणून तिला चोरचोळी म्हणतात. भरतारालाही चाहूल लागते.

**माळ्याच्या मळ्यात । भाजी चंदन बटव्याची ॥**
**नार गर्भीन नटव्याची ॥**
**गर्भीन नारीला । कंथ पुसतो आडभीती ॥**
**तुला महिनं झालं किती ॥**
**पहिल्यांदा गर्भीन । कंथ पुसतो रानात ॥**
**दिस नाहीत ध्यानात ॥**
**पहिल्यांदा गर्भीन । नाही कुणाला माहीत ॥**
**तिला पाचवा चईत ॥**

'पांचव्या मासी । निरीबाई उंच दिसे' अशी अवस्था आली की गर्भवतीच्या अंगकांतीवर तेज चढू लागते. मग लाडक्या सूनेचे घरभर कौतुक सुरु होते. कुठे ठेवू अन् कुठं नको असे. त्यात तिला डोहाळे लागलेले. डोहाळ्याला संस्कृतमध्ये 'दोहद' म्हणतात. दोहद म्हणजे दुहेरी इच्छा. एक तिची आणि दुसरी तिच्या गर्भाची. गर्भाची इच्छा प्रभावी. तिच्या मुखातून प्रगटते. तेच डोहाळे. डोहाळे पुरविणे पतीचे आणि सासरच्या मंडळीचे कर्तव्य ठरते. डोहाळे न पुरविल्यास गर्भात दोष निर्माण होतो. पोराचा कान फुटतो म्हणे. गर्भवतीचे डोहाळे नाना प्रकारचे असतात. ते हौसेने पुरविले जातात.

**गर्भीन नारीला । खांऊ वाटतं उंबार ॥**
**सखा धुंडितो डोंगर ॥**
**पहिल्यांदा गर्भीन । डोहाळे लागले बोराचे ॥**

अनुक्रमणिका

**पाय धरती दिराचे ॥**
**पहिल्यांदा गर्भीन । डोहाळे लागले चिंचेचे ॥**
**पाय धरती व्हंजीचे ॥**
**पहिल्यांदा गर्भीन । कंत पुसतो गोठ्यात ॥**
**पिकलं डाळींब ओटीत ॥**
**गर्भीन नारी । तुझा गर्भ ग लाडाचा ॥**
**हावशा कंत । आंबा तोडतो पाडाचा ॥**
**गर्भीन नारीला । तिला गर्भाच्या वकाऱ्या ॥**
**हावशा कंथ । फोडी चिकण्या सुपाऱ्या ॥**
**गर्भीन नारीयीला । लागं डोहाळं ताकाचे ॥**
**चिन्ह दिसतं लेकाचे ॥**
**गर्भीन नारीला । तिला अन्नाची येती घाण ॥**
**पाडाच्या आंब्यासाठी । बंधू झाल्याती बागवान ॥**

वरील ओव्या सुट्या सुट्या एकत्र केल्या आहेत. एकाच गर्भवतीला या सर्व गोष्टीचे डोहाळे लागतात असे नव्हे. बोरे, चिंचा, ताक, कैऱ्या असे आंबट खाण्याकडेच गर्भवतीचा कल असतो. ताकाचे डोहाळे पुत्रसूचक, आमावशेला गर्भ राहिला तर पुत्र व पौर्णिमेला गर्भ राहिला तर मुलगी. पाडाच्या आंब्याचे डोहाळे शुभ, अशा काही समजुती आढळतात. बहुजन समाजात लोकप्रिय असलेले कौटुंबिक अंगाने अभिव्यक्त होणारे डोहाळे गीत असे.

**पहिल्या मासी सासूची पुस । सून तुमचं डव्हाळं कसं ॥**
**पुरवावे डव्हाळं सासू । हाटा जाऊन आणावा ऊस ॥**
**दुसऱ्या मासी सासऱ्याची पुस । सून तुमचं डव्हाळं कसं ।**
**पुरवावे डव्हाळं सासरा । चंदन तोडून बांधा असरा ॥**

पुढे प्रत्येक महिन्यात घरातील नातेवाईक तिला डोहाळे विचारतात. नंदेला ती हिरव्या चोळीवर चंद्र काढायला सांगते. दिराला बाजारातून खीरा आणायला सांगते. बहिणीला वेणीफणी करायला, जाऊबाईला साळी कांडून भात करायला, भावाला बैलगाडी करुन मुराळी म्हणून यायला, बाबाला बिंदल्या तोडं करायला सांगते. शेवटी

**नवव्या मासी आई पुसे । लेकी तुझे डव्हाळ कसं ॥**
**आमचे डव्हाळ पुरवा आई । खोली सारवून सावध राही ॥**
**दहाव्या मासी कथांची पुस । राणी तुमचं डव्हाळ कसं ॥**
**माझे डव्हाळं पुरविसी नाथा । झाला पूत्र हरली चिंता ॥**

पुत्र व्हावा अशीच सर्वांची अपेक्षा, 'झाला पूत्र हरली चिंता ।'

यातच सर्वांचे समाधान 'ज्याच्या पोटी पोरगी त्याच्या पदरी पाप' ही भावना लोकमानसात खोलवर रुजली असल्यामुळे 'डोहाळं' गीतातून मुलीच्या जन्माची अपेक्षाच नाही. 'जो बाळा रे जो' असे पालुपदही

अनुक्रमणिका

या गाण्याना आहे. पाळण्यासारखे ते म्हटले जात असावे. गंमत अशी की मुलीवर मराठी लोकसाहित्यात एकही पाळणा नाही.

आपण पुढे आलो, गर्भवतीला डोहाळे कशाचेही लागू शकतात. काळ्या मातीच्या ढेकळापासून खीरीपर्यंत आणि चिंचेपासून उंबरापर्यंत. शारीरिक दृष्ट्या त्या जीवनसत्त्वाची कमतरता भासते असे स्पष्टीकरण देता येत असेल तरी गर्भवतीच्या डोहाळ्याचे काही गणित मांडता येत नाही. एखाद्या पदार्थाबद्दल प्रचंड तिरस्कार आणि एखाद्याची उत्कट इच्छा निर्माण होते. वाढत्या गर्भाला पोसण्यासाठी जास्त अन्नाची गरज तर असते पण खाऊ तर वाटत नाही अशी तिची विचित्र परिस्थिती निर्माण होते.

तरुण स्त्रियांना डोहाळे लागणे आणि पुरुषांनी ते हौसेने पुरविणे या मनोज्ञ कल्पनेचा साहित्यातून वापर करुन घेतला आहे. सीता गर्भवती असताना रामाने विचारले. तिने गंगातीरावरील उपवने पाहाण्याची इच्छा व्यक्त केली. कालीदासाच्या रघुवंश नाटकात सुदेक्षणेचे डोहाळे दिलीप राजाने व सीतेचे डोहाळे रामाने पुरविल्याचा उल्लेख आहे. प्रिय पत्नीचे डोहाळे पुरविण्यासाठी पुरुष पराक्रमाची, धाडसाची कृत्ये करीत. धार्मिक व पुण्यप्रद कामेही करायला तयार असत.

लोकगीतात घुसडलेल्या लौकिक गीतातूनही अवतारी पुरुषाच्या पराक्रमाचे डोहाळे मातेला लागल्याचे वर्णन येते. रामाच्या वेळी कौसल्येला इंद्रजीत-रावणाला मारुन देवांना बंधमुक्त करण्याचे डोहाळे लागले होते. शिवाजी महाराजांच्या वेळी मातोश्री जिजाबाईला ढाल, तलवार घेऊन, घोड्यावर बसून, शत्रूंचा निःपात करुन पारतंत्र्याची बेडी तोडण्याचे व स्वराज्य निर्माण करण्याचे डोहाळे लागले होते. असे वर्णन डोहाळ्यावरील एका लौकिक गीतातून येते. डोहाळ्याचा कल्पनाबंध असाही अभिव्यक्त होतो.

डोहाळ्याचा संस्कार आर्यांच्या सोळा संस्कारापैकी पहिला. त्याला ‘पुसंवन’ म्हणतात. पुसंवन म्हणजे गर्भसंभव झाल्यावर पुत्र व्हावा म्हणून देवतांना विधीपूर्वक केलेले आवाहन. बहुजन समाजात हा विधी आढळत नाही. दलितात तर डोहाळे सुद्धा आढळत नाहीत. पहिल्यांदा गर्भवती असलेल्या स्त्रीला सातव्या महिन्यांत ‘डोहाळे जेवण’ करतात. हा सोहळा सासरी होत असला तरी माहेरकडून आहेर व वाढप आणतात. ऐपतीप्रमाणे चांदण्यात, बागेत, झोपाळ्यावर डोहाळ जेवण करतात. झुल्याचा संबंध स्त्रीजीवनाशी सतत येतो. कमरेला फुलाचा पट्टा डोक्यावर फुलांचा मुकुट, हातात गजरे बांधून फुलाने सजविलेले धनुष्यबाण हाती देतात. म्हणजे वाडी भरतात. हिरवा चुडा भरून, हिरवी साडी चोळी नेसवून, मखरात बसवून, सुवासिनी बोलावून, हळदी कुंकू करतात. फळाने ओटी भरतात. गर्भीणीला रूक्मिणी – सीता समजून गाणी म्हणतात.

**सीताबाईला डव्हाळं । खाती मुरमाचं खडं ॥**
**रामाच्या बागेमंदी । कलमी आंब्याला आला पाड ॥**

वरील सर्व ओव्या याच प्रसंगात म्हटल्या जातात. गर्भवतीच्या हाती धनुष्यबाण देण्यामागे पुत्र पराक्रमी व्हावा अशी अपेक्षा असावी. गर्भ पोसण्यासाठी आवश्यक असलेल्या अन्नाची गरज डोहाळ जेवणातून भागविली जाते. गर्भवतीची शारीरिक तंदुरूस्ती राहावी, तिला मानसिक समाधान लाभावे या उद्देशाने लोकसंस्कृतीत डोहाळ जेवणाचा कार्यक्रम केला जातो.

डोहाळे तसे मनोज्ञच. स्त्रीला पूर्णत्वाकडे नेणारे. तिच्या नवनिर्मितीक्षमतेचाच सोहळा. अशावेळी तिच्या अंगकांतीवर नवेच तेज चढते. तिला खूप खूप जपावे लागते.

**गर्भीन नारीला । नववा महिना जातू जड ॥**
**बंधुजी बोलात्यात । बहिणी हळूच जोतं चढ ॥**
**गर्भीन नारीला । तिला दिव्याचं लागं ऊन ॥**
**नेणंत्या मैनेचं । तिचं अचाटं गोरंपण ॥**

❒❒❒

अनुक्रमणिका

# जो बाळा रे जो

'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे.' असे एक सर्वपरिचित सुभाषित आहे. भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या मुलगी, प्रेयसी, सखी, पत्नी या भूमिकेपेक्षा मातेला अधिक महान मंगल मानले आहे. मातृत्वामुळेच स्त्रीला पवित्र आणि पूजनीय मानले जाते. विशाल अंतःकरणाच्या ज्ञानेश्वरांसारख्या प्रेमळ पुरुषाला माऊली संबोधले जाते. आई झाल्याशिवाय बाईला पूर्णत्व येत नाही. 'मूलं ही देवाची देण आहे.' अशी पारंपरिक समजूत आहे.

**पोटीची फळं । हायती देवाच्या ध्यानात ॥**
**नको अंदूस मनात ॥**
**पोटीची फळं । नाहीती नारीच्या नावर्षी ॥**
**काय करील देवर्षी ॥**
**पोटीची फळं । देव दियाला उभा झाला ॥**
**मैनाबाईनं शालूचा वट्टा गेला ॥**

मैनाबाई गरोदर होती. डोहाळं जेवणानंतर ती माहेरी आली. एक वेगळं तेज तिच्या कांतीवर झळकत होते. पोटूशी असलेल्या लेकीची आईने सर्वोतोपरी काळजी घेतली. तिला पाहिजे ते चांगलंचुंगलं खायला दिले. पुरेशी विश्रांती दिली. बाहेरवाशाला जपलं. बाबा-दादानं त्याला साथ दिली. खेड्यात दवाखाना तर नव्हताच त्यामुळे डॉक्टरला दाखवायचा प्रश्नच नव्हता. दिवस भरत आलं तसं बाळंतपण कसं होईल होईल याची घराबाराला काळजी लागून राहीली होती. मैनाबाई पहिलटकरीन, तिच्याही मनात चिंता आणि धाकधूक होती. झालं तर सगळं सरळ निसर्गनियमानं होतं नाहीतर कधी कधी मोठी पंचायत होते. बाईच्या जीवावर बेतते. बाळंतपण म्हणजे पुनर्जन्मच असे तिनं ऐकले होते. तुळशीपासून सासर-माहेरच्या सर्व देवांना तिने प्रार्थना केली. एक दोन नवसही केले. खबरदारीचा उपाय म्हणून आईनं गावातल्या एका दायीला सांगून ठेवले होते. तिला बोलावून मैनाबाईला दाखवलं होतं. तिने तपासून काळजी करायचं कारण नाही. सगळं ठीक होईल असं सांगितल्यावर टांगता जीव खाली पडला. या दायीनं गावातल्या अनेक आयाबायांची बाळंतपणं केली होती. तिचा अनुभव मोठा होता.

आईने लेकीच्या बाळंतपणाची सर्व तयारी करुन ठेवली होती. बाळुती-धडुती जमा केली होती. गोवऱ्याचा हुडा लावून ठेवला होता. ओवा शेपवा आणल्या होत्या. सुंठवडा वाटून ठेवला होता. सारी तयारी झाली होती.

एका दिवशी संध्याकाळी मैनाबाईच्या पोटात दुखायला लागले. अनुभवी आईने ओळखले. बाबाला कल्पना दिली. पोटात दुखायचे वाढले.....तगमग ... लवकर मोकळी व्हावी म्हणून दायीनं गरम पाण्यांन आंघोळ घातली. काळ्या मिऱ्याचा कोरा चहा पाजला. सुलभ प्रसूती असलेल्या बाईच्या निऱ्या उतरल्या. पोटात दुखायचं आणखी वाढले. दायीने तिला धरणीवर झोपविले. असह्य वेदना व्हायला लागल्या. कळा....असह्य कळा. आता आपण जगत नाही, असं तिला वाटले. 'आई ऽऽ गं आई' असे आर्तपणे ती ओरडत होती. आई आणि दायी तिला धीर देत होत्या. सोसायला....कळा द्यायला सांगत होत्या. पाच-सहा तासाच्या प्रचंड वेदनेशी, दुःखाशी जीवघेणा संघर्ष केल्यावर रात्री बाराच्या सुमाराला ती एकदाची मोकळी झाली. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. दायीने नाळ कापली. वार काढला, मुलगा झाला होता.

चांगला स्वच्छ पुसला. बाळाने टॅ ऽ टॅ असा आवाज केला. बातमी घरभर, गल्लीभर पसरली. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

बाबा दादांची धांदल उडाली. माळीतच न्हाणी खंदली. त्यात मोठा पसरट दगड ठेवला. एवढ्या रात्री दादानं चार-सहा कळशा पाणी आणलं. खाट-बाजलं मांडलं. बाळ-बाळंतिणीला न्हाऊ घातलं. रात्रभर सारा घांगऱ्या घोळ. घराबारानं सारी रात्र जागवली. मैनाबाईचे मन वात्सल्यानं भरुन आलं. तिनं बाळ डोळा भरुन पाहिलं. स्तन मोकळे करुन बाळाला पाजले. चार दिवस गेले. पाचवी आली या दिवशी ब्रह्माचे भाकीत सटवी बाळाच्या कपाळी लिहिते.

**सटवी घालते अक्षर । ब्रह्म्या वाचतो घाईघाई ॥**
**पुत्र नशिबात हाई ॥**

त्यासाठी बाळंतिणीच्या खोलीत दौत-लेखणी, कागद ठेवतात. जुन्या काळात खेड्यातल्या कुणब्याच्या घरात या वस्तू तरी कुठल्या. गोड्या तेलाचा दिवा तेवढा अखंड तेवत ठेवला होता. पाचवीला न्हाणीची पूजा असते. भोसल्याची वजंता बाळंतीण झाल्यावर बकरं कापून न्हाणीची पूजा केली होती. मैनाबाईला गोड्याचा नैवेद्य करुन न्हाणी पुजली. न्हाणीतले पाणी बाहेर जावू द्यायचे नाही. मांत्रिक व निपुत्रिक स्त्रिया अशा पाण्यासाठी टपलेल्या असतात. मांत्रिकाला ते साधनेला उपयोगी पडते. वांझ स्त्रीने असे पाणी प्याल्यास मूल होते अशी समजूत आहे. सटवाई पूजेला बाळ बाळंतिणीने उशाचे पायसे व पायशाचे उसे केले. कणकीचे पाच दिवे, पाच मुटके, पाच फळे घेऊन सुपात हळदीच्या देवीची पूजा केली. त्यात पाच खारका, पाच सुपाऱ्या, पाच हळकुंडं ठेवली होती. बिब्याला सुई टोचून बाळंतिणीच्या उशाला ठेवली. बाजेभोवती बीनमिठाच्या घुगऱ्या पसरल्या. देवीची पूजा झाल्यावर एका बाईकडून बाळाला ओलांडले.

सटवाई ही मातृ व बाल घातक देवता ती बालसंरक्षक व्हावी. बाळ-बाळंतिणीला अपाय होऊ नये, त्यांचे आरोग्य वाढावे, आयुष्य टिकावे म्हणून ही पूजा केली जाते. सटवाई ही बहुजन समाजाची लोकदेवता. बहुतेक गावात ही देवी गावाबाहेर गोट्याच्या दगडाची असते. सांगोल्यात मात्र सटवाईचे जुने हेमाडपंती सुंदर मंदिर आहे. मूर्तीही चांगली आहे. दोन-चार महिन्यांची मुलं तिच्या पायावर घालायला आणतात. निवदबोणं करतात. सटवाईचा ओव्यांतून संतूबाई, सुभान संतुबाई असाही उल्लेख आढळतो.

बघता बघता सात आठ दिवस गेले. बारसं आले. धुमधडाक्यात करायचे ठरले. बारसं बाळाच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस, जन्मभर ज्या नावाने तो ओळखला जाणार ते नाव ठेवण्याचा हा दिवस. गवळी नाना आणि हावशा बंधूनं थाटात बारसं करायचे ठरविले. सारं घर फुलातोरणांनी सजविले. नातेवाईकांना निमंत्रण गेली, सोनाराकडून बाळाचे कानं टोचले. मुदी घातली. खोबऱ्याची वाटी फोडली, बाळाला नवीन अंगड टोपडं, कुंची शिवली. सरी बिंदली घेतली. मैनाबाईच्या सासरकडील मंडळी आली. गल्लीतल्या आयाबायांना बोलावंल. गव्हाचा चौक मांडून समोर बाळंतिणीला बसवलं शृंगारलेल्या पाळण्यात बाळाला घालून दोघी सुवासिनीनी 'गोंविद घ्या, गोपाळ घ्या' असं म्हणून उचलून खाली वर केलं. देवाधर्मांची, संत महंतांची नांव ठेवण्याचा काळ होता. अष्टमीला रात्री बारा वाजता जन्मला म्हणून बाळाच्या आत्यानं बाळाच्या कानात 'बाळकृष्ण कुर्र,' 'रामचंद्र कुर्र,' 'शिवाजी कुर्र,' अशी नावं ठेवली. इतरांनी तिच्या पाठीत मारलं. तिला मिठाई दिली. सर्वांना घुगऱ्या वाटल्या. शेवंता माळीनीनं पाळणा गायिला

**पहिल्या दिवशी जन्मलं बाळ । कळस सोन्याचा देतोया डहाळ ॥**
**पडला उजेड तिन्ही त्रिकाळ । दिपली नेत्र दोन्ही प्रेमळ ॥**
**कृष्ण जन्मला कंसाचा काळ ॥१॥ जो बाळा रे जो ॥**
**दुसऱ्या दिवशी दुसरा रंग । रुप सावळं गोरं हे अंग ॥**
**जसा झळकितो आरशाचा भिंग । नारी पद्‌मिनी झाल्यात्या दंग ॥**
**तान्हा कृष्णावरी फेकिला रंग ॥२॥ जो बाळा रे जो ॥**
**तिसऱ्या दिवशी वाजती घंटा । साऱ्या नगरीमंदी आनंद मोठा ॥**
**सीता सावित्री बायानो उठा ॥ खारीक खोबरं सुंठवडा वाटा ॥**
**आहेव नारीचा आहेव लुटां ॥३॥ जो बाळा रे जो ॥**
**चवथ्या दिवसी बोलवी बाळी । अनुसयाची वाजी टाळी ।**
**कृष्ण जन्मला यमुना स्थळी ॥ नाव ठेवले वनवाळी ॥४॥ जो....**

असा तिने बारा दिवसाचा पूर्ण पाळणा गाईला. मग रुक्मिणी कांबळेबाईनं रामाचा पाळणा गाईला. त्यातलं एक कडवं असे —

**दहाव्या दिवसी बळी राजा पुजती । नगरीच्या नारी धाऊन येती ॥**
**गोपाच्या जोडीला बळीराजा घेती ॥ जो बाळा रे जो....**

बळीराजाची आठवण आमच्या मातामाऊलीनी लोकगीतातून अजून जपून ठेवली आहे. घुगऱ्या वाटल्यावर बारशाचा कार्यक्रम संपला.

❒❒❒

अनुक्रमणिका

## नेणंता बाळ माझा

मैनाबाई बाळंतपणाला चार-पाच महिने माहेरी राहून सासरी आली. सासरी कामाचा रगाडा. त्यात सासुरवास होत होता. आता ती लेकुरवाळी म्हणून थोडी सूट मिळाली. तान्हं बाळ असल्यामुळे शेतामळ्याला जायला बंदी होती. घरातले आणि बाळाचे करण्यातच तिचा बराचसा वेळ जात होता. बघता बघता मुठी एवढा बाळ आता चांगलाच खेळकर झाला होता. त्याने बाळसं धरले होते. तो रांगायला लागला होता. त्याचे ते निष्पाप हसणे, हातपाय हलवणे, खेळणे, रडणे सारेच आनंददायक होते.

**नेणंता बाळ । बाळ हिंडतो तोऱ्यानं ॥**
**हाली जावळ वाऱ्यानं ॥**
**रांगत रांगत । बाळ आलंया विसाव्याला ॥**
**मांडी देते मी बसायला ॥**

सकाळी सू काढणे, अंगडे टोपडे घालणे, काजळ तीठ लावणे, पाजणे अशी कामं तिला करावी लागत.

**हिरव्या पातळाला । डाग पडला काजळाचा ॥**
**कृष्णदेव कडंला जावळाचा ॥**

बाळाच्या बाळलीलांनी घर भरले होते. तो सर्वांचा आवडता. ज्यानं त्यानं उचलून घ्यावं, हसवावं, मुके घ्यावेत, घडीभर त्याला खाली ठेवू नये. हे पाहून मैनाबाईचं मातृहृदय भरुन येई.

**लाडका एवढा लेक । हाय आईबापाचा लाडाईचा ॥**
**आंबा केसरी पाडायचा ॥**
**अंगात अंगरखा । कडदोर गोपायीचा ॥**
**राया लाडका बापायीचा ॥**

दुपारी पाजून पाळण्यात त्याला झोपवावे लागे. झोके द्यावे लागत. बाळ झोपे पण जरा दंगा झाला की उठे आणि रडायला लागे.

**रंगीत पाळण्याची । वाजती कडी ॥**
**तान्ह्या बाळाची । झोप येडी ॥**

मग पुन्हा त्याला पाजून झोपविताना तिचा बराच वेळ जाई. त्यामुळे बाळ झोपला की घरात शांतता ठेवावी लागे.

सांच्यापारी बाळ खेळायला लागे. हातात घुंगरवाळा दिला की त्याच्या आवाजाने आनंदी होई. घुंगरवाळा घरंगळत गेला की त्यामागे तो रांगायला लागे. यातून सवड काढून मैनाबाई घरातला कामधंदा करी. पण तिचं सारं लक्ष मुलाकडे असे. रांगत तो जात्याखाली पडेल, चुलीकडे जाईल. उतरंडीची गाडगी

मडकी फोडेल याकडे तिला सतत लक्ष ठेवावे लागे. एकदा तिने पायाला दोरी बांधून जात्याच्या खुंड्याला बांधून टाकला होता. असा तान्हाबाळ अंगाखांद्यावर खेळवताना, त्याचे मुके घेताना तिला फार आनंद होई.

**तोंडात घाली त्वांड । माझ्या तोंडाला लागी थुका ॥**
**नेणंता बाळ माझा । मी घेती त्याचा मुका ॥**
**तोंडात घाली त्वांड । मला मुक्याचं लई याड ॥**
**माझ्या बाळाचा मुका ॥ जिलिबी परास ग्वाड ॥**

किती चांगल्या पध्दतीने मातेचे प्रेम या ओव्यातून व्यक्त झाले आहे. वात्सल्याचा इतका सहज स्वाभाविक आविष्कार मराठी कवितेतही पाहायला मिळत नाही. तिन्ही सांज झाली. दिवस मावळला. गोठ्यात गायी परतल्या. पाखरांची शाळा सुटली. ती आपल्या घराकडे परतायला लागली की बाळ कधी खेळायच्या मुडमध्ये असायचे तर कधी पेंगाळून झोपी जायचे. त्याला दुधभात भरवावा लागे. तो खाईना की बडबड गीते-अंगाई गीते म्हणून त्याला भरवावे लागे.

**इंथ इंथ बस ग काऊ, बाळ घालतंय जेवू,**
**चारा खाऽ पाणी पीऽ, भूर्रकन उडून जा.**

ती भूर्रकन उडून जाण्याचा अभिनय करी, मग बाळ एक घास खायी.

**इंथ इंथ बस रे मोरा, बाळ घालतंय चारा**
**चारा खाऽ पाणी पीऽ, भूर्रकन उडून जा.**

कधी कधी ती एक होती चिऊ. एक होती काऊ. चिमणीचे घर शेणाचे. कावळ्याचे घर मेणाचे. एकदा मोठा पाऊस आला. कावळ्याचे घर गेलं वाहून. मग कावळा गेला चिमणीकडे. चिऊताई, चिऊताई दार उघड, थांब माझ्या बाळाला न्हाऊ घालू दे ही गोष्ट सांगे. चिऊकाऊच्या गोष्टी बाळाला आवडत. कधी कधी ती...

अडगुलं मडगुलं-सोन्याचं कडगुलं । रुप्याचा वाळा -तान्ह्यां बाळा -तीट लावूं! हे बडबड गीत म्हणे. तिन्ही सांजेला आकाशात चंद्र तळपत असला तर...

**चांदोमामा चांदोमामा... भागलास का?**
**लिंबोणीच्या झाडामागे... लपलास का?**
**लिंबोणीचं झाड करबंदी... मामाचा वाडा चिरबंदी.**
**मामाच्या वाड्यात येऊन जा... तुपरोटी खाऊन जा.**
**तुपात पडली माशी... चांदोमामा गेला उपाशी.**

चांदोमामाकडे बोट दाखवून ती बाळाला जेऊ घाली. चांदोबा स्त्रीचा भाऊ बाळाचा मामा म्हणून लोकसाहित्यात येतो. बालमनात खोलवर रुजत जातो. पावसाळ्यात आकाशात ढग आले असेल तर...

**येरे येरे पावसा । तुला देतो पैसा । पैसा झाला खोटा । पाऊस आला मोठा ॥**

अशी किती बालगाणी आणि गोष्टी मैनाबाईनं बाळकृष्णाला सांगितल्या, परंपरेने चालत आलेल्या, बालपणापासून ऐकलेल्या, तिला आता उपयोगी पडल्या. मुलात मुल होऊन तिला ही गाणी म्हणावी लागत. बाळाला खेळवावे लागे, भरवावे लागे या गाण्यातला आशय बाळाला कळत नसला तरी त्यातला नाद आणि लय त्याला भावतो. थोड्या कळत्या वयात आशयही उमगतो.

अशा गोष्टीत वेळ होई, तिन्ही सांज गडद होई. वडिल माणसं सांगत.

**दिवस मावळला । मावळुनी झाला लाल ॥**
**किती सांगू साळू तुला । तान्ह्या बाळाला न्हाऊ घाल ॥**

बाळकृष्ण दुडूदुडू धावे. ती बाळाला धरे. तो रडे. ती बाळावर रागावे. जाणती सांगता.

**तिन्ही सांज झाली । नको लागूस बाळाच्या पाठी ॥**
**नेणंत्या बाळाला । त्याला लक्ष्मी सांगे गोष्टी ॥**

तिन्ही सांजेला लक्ष्मी बाळाच्या पाठीमागे येते. मैनाबाई बाळाला तेल लावून कडत पाण्यानं पायावर न्हाऊ घाली. स्वच्छ पुसून, अंगडं टोपडं घालून, काजळ तीट लावून बाळाला पाळण्यात घालून झोके देऊन झोपवी.

बाळकृष्णाला आता समजायला लागले होते. माणसे तो बरोबर ओळखे. ओळखीच्या माणसाने घेण्यासाठी हात पुढे केले की झेप घेई. इतरांनी घेतलं तर रडायला लागे. अ...अ... म... म... करत तो बोबडे बोलायचा मा मा म्हणायला लागला की त्याचंही आईला कौतुक वाटे.

**खेळत रांगत । उंबरा केला पार ॥**
**नेणंता माजा बाळ । मामा म्हणाय झाला थ्वार ॥**
**बोबड्या बोलायीची । मला वाटते मजा ॥**
**माझा इंग्रजी बेंडबाजा ॥**

असा बाळ. दिसायला गोड आणि गुणाचा. एकदा तो सुकला, खाईना, खेळेना, रडायला लागला. लोकांची नजर वाईट. मैनाबाईला वाटलं बाळाला दृष्ट झाली.

**दिष्ट या झाली म्हणू । मी कुणाचं घेऊ नाऊ ॥**
**नेणंत्या माझ्या बाळाला । मी का घालीत होती न्हाऊ ॥**
**दिष्ट या झाली म्हणू । मीठ मव्हऱ्या काळा बिब्बा ॥**
**नेणंता माझा राघू । कुण्या गल्लीला चंद्र उभा ॥**
**दिष्ट या झाली म्हणू । तुला कुणाची लागयली ॥**
**नेणंत्या माझ्या राघूला । काळ लावती गोऱ्या गाली ॥**

अनुक्रमणिका

**दिष्ट मी काढू गेली । मीठ मोहऱ्या लिंबू ताजं ॥**
**नेणंता राघू माझा । सोनं सुकूनी गेलं माझं ।**
**दिष्ट या काढू गेली । पत्रावळीचं होतं पान ।**
**माझ्या नेणंत्या राघुबाचं । लयी अचाट गोरंपण ॥**

मैनाबाईनं मीठ, मव्हऱ्या, बिब्बा, मिरच्या, केस मसबंद बाळावरुन चारपाच वेळा उतरुन चुलीत टाकले. तटतटाय लागल्यावर तर तिची खात्रीच झाली. चुलीचं काळं तिनं बाळाच्या कपाळी लावलं. बोटं मोडून शिव्याशाप दिले. तेंव्हा कुठे बाळ खेळायला लागले. मातेच्या मनाचे समाधान इथे उत्तम प्रकारे व्यक्त झाले आहे. काव्य म्हणूनही ही लोकगीते उत्कृष्ट आहेत.

❒❒❒

अनुक्रमणिका

## छंदखोर बाळा

मैनाबाईचा बाळकृष्ण बघता बघता वर्षा दीड वर्षाचा झाला. चांगला बोलायला लागला. चालायला लागला. अंगपती खाऊ लागला. त्याचं बालपण सुरु झालं. लोकसंस्कृतीत बाळाचे जावळ काढण्याचा एक विधी असतो. बाळाचे जावळ काढायचे राहिले होते. मामाला निरोप गेला. तो तयारीनिशी आला. न्हाव्याला बोलावून मामाकडून एक बट कापायला लावून जावळ काढले. जावळ काढताना बाळ एका ठिकाणी बसत नव्हता. रडून त्याने गोंधळ घातला. सर्वांनी मदत करुन कसंतरी त्याचे जावळ काढले. न्हाव्याला टॉवेल टोपीचा पोषाख झाला. मामाला आहेर झाला. जावळाचे जेवण होते.

**पाच बकऱ्याची दावण । संग मुलाणी खतरी ॥**
**माझ्या नेणंत्या बाळाचा । मामा जावळ उतरी ॥**

मामा चार दिवस राहिला होता. या काळात बाळाला मामाचा लळा लागला. आपला भाऊ आपल्या मुलाला घेतो, खेळवतो, खाऊ देतो. हे पाहून मैनाबाईचे अंतःकरण भरुन आले. एकाच ओवीतून ती मावळ-भाच्याचे गुणगाण गाऊ लागली.

**मावळ्यानं भाचा । समजाविला कसा ॥**
**कांड बत्ताशानं । भरला खिसा ॥**
**मावळ भाच्याची । शिण दोघाची कवळी ॥**
**लिंब झाडाला पिवळी ॥**
**मामाच्या पंगतीला ॥ भाचा बसला सुरतवान ॥**
**मामा निवडक देतो पान ॥**
**वाघ मारला वाघजाळी । ससा मारला घसारटीला ।**
**भाचा मामाच्या पसारीला ॥**

मावळ-भाच्याची जोडी । लिंब झाडाला पिवळी । मातेचे अंतःकरण ते मुलाचं कौतुक करत भावाचं गुणगाण करते. मामा चार दिवसाचा पावणा. तो एके दिवशी आपल्या घरी निघून गेला. बाळकृष्ण घरातला पहिला मुलगा. सर्वांचा आवडता. लाडका. आईचा लाडका होताच पण बापाचाही लाडका झाला. बाप कामावरुन घरात आला की बाळ त्याच्याकडे धावत जाई. अंगाखाद्यांवर खेळे. बाहेर जाताना बरोबर येण्याचा हट्ट धरी.

**लाडका एवढा लेक । धरी बापाच्या धोतराला ॥**
**राव शोभे चातुराला ॥**

जरा मोठा झाल्यावर त्याचे खेळ सुरु झाले. मैनाबाईच्या दिराकडे तो हट्ट करु लागला.

**लाडका एवढा लेक । चुलत्या संगट चावडीला ॥**
**सडा मागतो वावडीला ॥**

अनुक्रमणिका

लाडात वाढलेला पोरगा, आरवाळी, हट्टी होता. आईकडे त्याचे खाण्यापासून खेळण्यापर्यंत काहीना काही हट्ट सुरु असत. मग आई म्हणे –

**छंदखोर बाळा । तुझ्या छंदाला देती गूळ ॥**
**सोड निऱ्याचा माझ्या घोळ ॥**
**छंदखोर बाळा । तुझ्या छंदाला देती नंदी ॥**
**नेणंत्या माझ्या बाळा । नको कामाची करु बंदी ॥**
**छंदखोर बाळा । तुझा छंद असा कसा ॥**
**पाण्यामधला मासा । तुला धरुन देऊ कसा ॥**

बालहट्टच तो. आई त्याला नाना परीने समजावीत असे पण या पोराचे नाना उद्योग सुरु असत.

**छंदखोर बाळ । भरल्या रांजणी धुतो पायी ॥**
**माझ्या नेणंत्या बाळाचा । मामा हसत उभा राही ॥**

नाना तऱ्हेच्या खोड्या. त्याला वैतागून मैनाबाईनी त्याला मळ्याकडे पिटाळले.

**आरवाळी म्हणूनी । असा मळ्याला धुडकावला ॥**
**नेणंत्या माझ्या राघुबानं । वापा दवण्याचा तुडविला ॥**

असा जिथे जाईल तिथे बाळकृष्ण काहीतरी उद्योग करुन ठेवे. अशा आरवाळी, दंगलखोर, खोड्या करणाऱ्या पोराचा शेजारची बेरकी माणसे फायदा घेत. त्याच्याकडून नको त्या गोष्टी करायला लावून आपण नामा निराळे राहत. त्यातनं भांडणे निर्माण होत. विघ्नसंतोषी लोकांना आनंद होई.

**कळीच्या नारदाला । ह्याला कळीचा लयी छंद ॥**
**नेणंत्या बाळानं । पाणी नळाचं केलं बंद ॥**
**कळीच्या नारदानं । कळ घेतली इकांत ॥**
**नेणत्या बाळानं । नंदी सोडलं पिकात ॥**

मैनाबाईच्या हे लक्षात येई. अशा ताटीवाल्याचं ती मढ बसवे. डोक्यावर बोटं मोडून किरडी मोडे. बाळाला अशा गोष्टीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करी. त्याला चांगलं वळणं लागावं म्हणून ती धडपडे. मैनाबाईचा बाळकृष्ण आता शेजीच्या पोरांबरोबर खेळायला लागला होता.

**शेजीच्या बाळानं । माझी भरली वसरी ॥**
**बाळाच्या संगतीनं । बाळ येत्यात दुसरी ॥**
**शेजीच्या लेकराचा । माझ्या अंगणी गोंदुळ ॥**
**नेणंता माझा बाळं । माझा संडीव तांदूळ ॥**

अनुक्रमणिका

शेजारच्या साळूबाईला एक मुलगी होती. तिचं नाव योगायोगानं मैनाबाई होतं. ती चार पोरात एक मोहनमाळ. एकदा मैनाबाईने दोघाना जेवायला वाढले.

**राघु मैनाला । जेऊ वाढलं बरोबरी ॥**
**राघु जेवला वरचेवरी । मैनाबाईची रूंदी भारी ॥**
**राघू मैना । दोघं खेळती आडावरी ॥**
**राघु पेरुच्या झाडावरी । मैना केळीच्या घडावरी ॥**
**राघु मैना । दोघं किलबिलत गेली ॥**
**मैना राघुचा शब्द झाली ॥**

जेवताना मैनाबाईची रुंदी भारी. हा गुण नंतरही बायकात टिकून राहतो. 'राघू पेरुच्या झाडावरी, मैनाबाई केळीच्या घडावरी' यातला बारकावा मोठा मार्मिक आहे. भातुकलीच्या खेळामधली ही राजाराणी. मैनाबाई चुलबोळक्याचां संसार मांडी. बाळकृष्ण बैल-बैल, औत, विहीर, मोट नाडा करी. थोरांचे अनुकरण पोरांकडून अशा खेळातून होत असते. बाळकृष्णाचे वय वाढत गेले तसे त्याने शेजारी पाजारी खेळायचे सोडून गल्लीतल्या पोरात खेळायला सुरुवात केली. त्याच्या खेळाचे स्वरुपही बदलले. शिवणापाणी, गोट्या, विटीदांडू, चेंडू असे खेळ तो खेळू लागला.

**हातात विटीदांडू । डाव्या बगलला चेंडू ॥**
**मामा लगोरी कुठं मांडू ॥**
**हातात विटीदांडू । डाव्या बगलला लगी ॥**
**मामा हावशा खेळू लागी ॥**

बहिणीकडे आलेला मामा असला तर बरंच न्हायतर गावभर जोडलेले मामा असतातच. खायचं आणि पोरात खेळायचं एवढा एकच उद्योग बाळकृष्णाला होता.

**बिदीला खेळत्याती । मला नाही त्याचा घोर ॥**
**नेणंता बाळ माझा । लांडोरी संग मोर ॥**
**बिदीला खेळत्याती । बाळ कुणाचं दंडील ॥**
**माझ्या नेणंत्या बाळाच्या । हाती सोन्याचं कंडील (कडे) ॥**

खेळता खेळता बाळाला जेवायची सुध्दा शुध्द राहायची नाही. मग मैनाबाई काळजी करायची. शोधाशोध करायची.

**हाका मी किती मारु ॥ कंठ सुकूनी गेला माझा ॥**
**नेणंता राघु माझा ॥ कुण्या गल्लीला खेळ तुझा ॥**
**हातात विटीदांडू । कोण्या गल्लीला गेला रावा ॥**
**त्याचं पाऊल मला दावा ॥**

अनुक्रमणिका

मैनाबाईचा जीव थोडा थोडा होई. ती सर्वत्र शोध घ्यायची पण बाळकृष्ण कुठेही सापडत नसे. चार-सहा तासाने तो घरी येई. आई रागाने शिव्या घाली. दोन धपाटे लगावी. आईची माया ती रागाला आली तरी पुन्हा माया करी. जेवायला वाढी. पोरावर रागावल्याबद्दल तिला पश्चाताप होई.

**रागा वैतागानं । शिव्या देते मी वंगाळ ॥**
**नेणंता माझा बाळ । राग घडीचा संभाळ ॥**
**रागा वैतागानं । शिव्या देते मी भडाभडा ॥**
**नेणंता बाळ राजा । माझ्या काळजाच्या घडा ॥**

खेड्यातल्या मुलांचे बालपण असेच जाते. खेळण्या बागडण्यात. अंगणवाडी, बालवाडीचे संस्कार त्यांच्या वाट्याला येतच नाहीत. संस्कार कमी असले तरी अनुभवानेच तो बरच शिकत जातो. खेळत खेळत जगत असतो. जगत जगत शिकत असतो. झाडावर चढणे, पोहणे, नेम धरणे, अशा गोष्टी त्याला शिकवाव्या लागत नाहीत. तो सहजतेने शिकतो. बघता बघता तो शाळेची पायरी चढतो. आईच्या डोळ्यातून तिच्या भावविश्वातून साकार झालेले हे तिच्या मुलाचे बालपण लोकगीतातून मनोहर पध्दतीने प्रगट झाले आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

## शाळेतल्या हरियीला

मैनाबाईचा बाळकृष्ण बघता बघता सहा वर्षाचा झाला. त्याचं बालपण संपलं नव्या परिस्थितीत त्याला शाळेत घातले. आपलं पोरगं शाळेत जातं याचंच आईला कौतुक. मग ती शाळा मास्तर व बाळराजावरून ओव्या रचू लागली. गाऊ लागली.

खरे तर शाळा ही गोष्ट खेड्यात फार अलीकडे आली आहे. मोठ्या गावात शंभर वर्षे व लहान खेड्यात पन्नास वर्षे शाळा सुरु होऊन झाली असतील. त्या अगोदर खेड्यात शाळा नव्हती, म्हणजे बहुजन समाजात शिक्षणही नव्हते. एखादी गोष्ट समाजात नुसती येऊन चालत नाही, ती लोकांच्या अनुभवांचा व जगण्याचा भाग बनल्याशिवाय त्यावर लोकगीते निर्माण होत नाहीत. त्यासाठी पन्नास-साठ वर्षाचा काळ जावा लागतो. आजचे जीवन गतिमान झाले आहे. त्यामुळेही कदाचित लोकसाहित्य निर्माण होत नसावे.

शाळेवरच्या ओव्या तशा नव्या आणि अलीकडच्या परंपरेत त्या खोलवर मुरल्या नसल्यामुळे त्यात कृत्रिमता जाणवते. तोच तोचपणा येतो. अस्सल मातीचा गंध कमी. तुम्ही म्हणाल मग त्यावर लिहिता कशाला. यातून मैनाबाईच्या बाळकृष्णाच्या जीवनातील एक पायरी दाखविता येते. त्या अनुषंगाने आईच्या भावभावना प्रगट करता येतात. नव्या विषयावर लोकगीते (ओव्या) कशी निर्माण होतात हे सांगता येते. अस्सल आणि कृत्रिमतेतला फरकही जाणवून देता येतो. तर मैनाबाईचा बाळकृष्ण शाळेला जाऊ लागला.

**शाळेची पायरी । बाळा चढाया अवघड ॥**
**नेणंत्या माझ्या राघुला । पाटी पुस्तक झाली जड ॥**
**शाळेच्या मास्तराला । देऊ केला मी साळीभात ॥**
**नका छडी मारू । माझ्या बाळाचा कवळा हात ॥**

‘पाटी पुस्तक झाली जड’ हा अनुभव आज आपण घेत आहोत. शाळेतल्या लहान लहान मुलांच्या दप्तरात पाटी, पुस्तके, गृहपाठ वह्या, व्यवसायमाला, कंपास याचं कितीतरी मोठं ओझं आपण देतो. ते कमी करावे असे अलीकडे पालकांचे, शिक्षण तज्ज्ञांचे व सरकारचेही मत झाले आहे. मधून मधून ते कमी करण्याचे थोडेफार प्रयत्न होतात.

पूर्वीच्या काळी खेड्यातील मास्तरांचे घराघराशी संबंध होते. त्यामुळे खेड्यातील बाईमाणूस त्यांना वेगवेगळ्या वस्तू देत. गावातला हा आदर्श माणूस वि. स. खांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे अशा कितीतरी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून अशा मास्तरांचे चित्रण केले आहे. जुन्या काळातील काही मास्तर मारकुटे फार. ‘छडी लागे छमछम विद्या येई घमघम’ अशा सुभाषितांचा तो काळ. मास्तर लहान लहान मुलांना छड्याने बेदममारत. कठोर शिक्षा करत. दुसऱ्या ओवीत आई तळमळून ‘माझ्या बाळाच्या हातावर छड्या मारु नका’ अशी विनंती करते आहे. अशा मारकुट्या मास्तराच्या माराला भिऊन मागच्या पिढ्यातील कित्येक विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या. खेड्यातील मुलांना शिक्षणापासून वंचित करण्याचे महापाप मास्तरांनी केले. त्यामुळे अलीकडे आनंददायी शिक्षणाचा अवलंब केला जात आहे. काळ, परिस्थिती आणि मास्तरही आता बदलले आहेत.

बाळराजा शाळेत जाऊ लागला. क क कढईचा, ख ख खणाचा, ग ग गवताचा असे करत त्याने मूळाक्षरे शिकली. एक रे एक गायीचा खुंटा एक, दोन रे दोन गायीची शिंगे दोन असे करत त्याने अंक

शिकले. क ला काना का, ख ला काना खा, करत बाराखड्या शिकल्या. बे एक बे, बे दोनी चार असे करीत पाढे शिकले. शरद नमन कर, कमल नमन कर असे म्हणत तो वाचायला लागला. आईचे अंतःकरण भरुन आलं. पण भातात खडे, लागले तसे तो जोड अक्षरावर अडखळायचा. पुस्तक घेऊन तो आईकडे येई. ‘आई आई हे काय?’ आई बिचारी अडाणी ती काय सांगणार? पुस्तकातल्या काळ्या अक्षराकडे पाहात ती म्हणायची ‘पुढं वाच.’ बाळकृष्ण पुढं वाचायचा. अंदाजाने शब्दाचा अर्थ त्याच्या लक्षात येई. थोड्या वेळाने पुन्हा काहीतरी आडायचे. बाळकृष्ण आईला विचारायचा. ती सांगायची ‘पुन्हा वाच.’ पुन्हा वाचलं की बाळकृष्णाच्या लक्षात यायचं असं ‘पुढं वाच’ आणि ‘पुन्हा वाच’ या दोन शब्दांच्या आधारावर या अडाणी आईने आपल्या अनुभवाच्या जोरावर पोराला शिकविले. एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करुन समजावून घेतली तर ती करता येते असा तिचा व्यवहारातला अनुभव होता.

बघता बघता बाळकृष्ण चौथी झाला, पाचवीत गेला. *A B C D*अशी इंग्रजी अक्षरे आणि *Cat*कॅट, *Bat*असे इंग्रजी शब्द तो पाठ करायला लागला. आईला वाटले आता मुलगा ‘साहेब’ होणार. मग ती इंग्रजी शिकायला लागलेल्या बाळाचे कौतुक करायला लागली.

**शाळेतल्या हरियच्या ॥ शाई लागली नखायला ॥**
**जातू इंग्रजी शिकायला ॥**
**शाळेच्या मास्तराला । देऊ केली मी तांब्यावाटी ॥**
**लेहणं इंग्रजी शिकण्यासाठी ॥**
**शाळेच्या मास्तराला । देऊ करती मी खारीक ॥**
**नेणंत्या माझ्या राघूचं । लेहणं इंग्रजी बारीक ॥**

आपण शिकलो नाही याची खंत आईला होती. आपला मुलगा शिकत आहे. तो शहाणा होणार, मोठा होणार, नोकरीला लागणार, आपले दारिद्र्य हटणार, म्हातारपण सुखात जाणार अशी आशा तिला वाटत होती, मग ती म्हणते —

**पाटीया पुस्तकांचं । तुझ्या मांडीला झालं वझं ॥**
**नेणंत्या माझ्या बाळराजा । किती गिन्यानी हुरद तुझं ॥**
**शाळेतल्या हरियला । देवू केला मी केळफणी ॥**
**नेणंत्या माझ्या राघुला । नोकरी आली बालपणी ॥**

स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा वीस वर्षात शिकल्यावर मुलाला नोकरी मिळत होती. पण आता नोकरीची परिस्थिती किती बिकट झाली आहे, हे त्या खेड्यातल्या अशिक्षित माऊलीला काय माहीत. बालपणी सोडाच म्हातारपणापर्यंत नोकरी मिळायची पंचायत. सरकारचे झिरो बजेट, अर्थसंकल्प, नवे आर्थिक धोरण, यांत्रिकीकरण, निवृत्तीची वाढलेली वयोमर्यादा, नोकरीतील वशिला, भ्रष्टाचार, जातीयता, परीक्षा, मुलाखतीचे फार्स या कशा कशाची तिला कल्पना नाही. तिला वाटते पोरगं शिकतंय म्हणजे त्याला नोकरी मिळणार. या माऊलीच्या आशा — आकांक्षेची पूर्तता कोण करणार?

❒❒❒

अनुक्रमणिका

# उगवला नारायण

सूर्योपासना फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. ऋग्वेदात उषा व सूर्य सुक्ते आहेत. त्याही पूर्वीच्या मोहोंजोदडो-हडाप्पा येथील सिंधू संस्कृतीत सूर्याची उपासना होत होती. सूर्याची उपासना सर्व काळात सर्व देशात होत आली आहे. निसर्ग हा प्राचीन जीवनाचा अपरिहार्य भाग होता. भौगोलिक परिसर, काळ, तत्कालीन धर्म—नीतीच्या कल्पना व ज्ञानसाधना यातून लोकश्रद्धा निर्माण होतात. निसर्गातील अनेक गूढ गोष्टी आदिमानवालाही समजल्या नव्हत्या. निसर्गाचा भयावह परिणाम तर मानवी जीवनावर होत होता. या भयभावनेतून देव या कल्पनेचा जन्म झाला आहे. निसर्गातील अनेक गोष्टीची अवकृपा होऊ नये म्हणून त्यालाच देव मानून भजण्याची परंपरा निर्माण झाली. सूर्य सकाळी उगवतो, संध्याकाळी मावळतो. रात्री तो कुठे असतो. प्रत्येक प्रहरात व ऋतूत तो वेगळा कसा भासतो. त्याला ग्रहण लागते. तो नित्यनेमाने अखंड प्रकाशाचा वर्षाव कसा करतो इत्यादी प्रश्नांची उकल माणसाला झाली नव्हती. म्हणून माणसाने त्याला सूर्यदेव बनविले.

विश्व व्यापक असेल तरी माणसाचे ज्ञान मर्यादित होते आणि आहे. प्रकाश, तेज आणि अग्नी यांचे श्रेष्ठतम प्रतीक म्हणजे सूर्य. प्रकाशाचे मूळ सूर्य. मानवासह संपूर्ण सजीव सृष्टीचे जीवन सूर्यावर अवलंबून आहे. सूर्यामुळे प्रकाश मिळतो. दिवस-रात्र व ऋतू होतात. सूर्यामुळे पाऊस पडतो. पाणी मिळते. पिके आणि वनस्पती वाढतात. सूर्यामुळे रोगराई नाहीशी होऊन आरोग्य व दीर्घायुष्य लाभते. धरतीला प्रकाशमान करणारा सूर्य आकाशाचा अलंकार आहे. त्याच्यावरच सृष्टीचे जीवन अवलंबून आहे.

**उगवला नारायण । उगवताना लालीलाल ॥**
**चौ प्रितीमीत त्याचं मॉल ॥**

सूर्यासंबंधी विज्ञानामुळे आज बरीच माहिति उपलब्ध आहे. पण सूर्यासंबंधी समाजात अनेक संकल्पना, संकेत रुढ होते व आहेत. अग्नी सूर्यापासून मिळतो. अग्नीला दिलेली आहुती सूर्याला पोहोचते व तो प्रसन्न होऊन वृष्टी करतो. सकाळी सूर्याला केलेला नमस्कार पुण्यफलदायी असतो. यातून वाङ्मयात भूपाळ्या निर्माण झाल्या आहेत. वैदिकांच्या प्रातःसंध्येत त्याला अर्ध्य देतात. सूर्य हा रथात बसून येतो. त्याच्या रथाला सात घोडे असतात. सप्तमीची सर्व वृत्ते सूर्य उपासनेची आहेत. सूर्य सृजनकर्ता असल्याने स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी त्याला नवस करतात. कुंतीला सूर्यापासून कर्ण झाला होता. उषा, प्रत्युषा, संज्ञा, राज्ञी, राणूबाई या सूर्यपत्न्या होत. ताक घुसळण्याच्या रवीला सूर्याचेच नाव आहे. म्हणून ताक रात्री करीत नाहीत. दिवसा करतात. सूर्याची प्रतिके आहेत. अनेक रुपात सूर्यउपासना होत आली आहे. सूर्याच्या प्रतिमा, रथ, कोणार्कसारखी शिल्पांकित मंदिरे उभारुन माणसाने सूर्यदेवाची आराधना केली आहे.

सूर्यदेवाला मराठी लोकसंस्कृतीने कसे स्वीकारले. आमच्या मराठमोळ्या स्त्रियांनी त्याला कसे पाहिले, अनुभवले. उपासना केली. पूजा बांधली आणि त्याकडे काय मागणे मागितले, हे पाहण्यासारखे आहे.

पहिला कोंबडा आरवायला की भल्या पहाटे उठण्याची स्त्रियांना सवय होती. जात्यावर अडशेरीभर दळण दळावे लागे. झाडलोट करुन, सडांसमार्जन करुन आंघोळ अष्टयान केल्यावर सूर्यदेवाचे दर्शन घडायचे. लोकधाटीत द. ग. गोडसे म्हणतात“ग्रामीण गृहणीचा सूर्य हा विशेष आवडीचा देव (आहे).

अनुक्रमणिका

साहाजिक आहे. दळणाची वेळ पहाटेची. गृहणीला सूर्यदर्शनाचा अनुभव रोजचा. उगवत्या सूर्याच्या रंगारूपाचा उजाळा तिच्या प्रत्येही अनुभवाला येणारा. ग्रामीण स्त्रीची सूर्यविषयक जाण, प्रतिमा, भाव आणि श्रद्धा पाहिली की, तिने तिच्या भावविश्वातील सूर्य कल्पनेला रंगारूपाची किती विविध परिमाणे दिली आहेत याची कल्पना येते. उगवला नारायण । लाल शेंदराची पुटी या शब्दात ती रंगछटा नेमकेपणाने टिपते. मराठी काव्यात अरूणोदयाची खूप वर्णने झालीत पण शेंदराची पुडी कोणी उलगडली नाही."

**उगवला नारायण । पाताळ फोडूयीनी ॥**
**उभी दारात । हात मी जोडूयीनी ॥**
**उगवला नारायण । उगवताना तान्हं बाळ ॥**
**शिरी सोन्याचं जावळ ॥**
**उगवला नारायण । उगवताना देखईला ॥**
**रत्न राजाच्या टोपीयीला ॥**

खेड्यातली घरे बहुधा पूर्वेकडे वा उत्तरेकडे तोंड करुन असतात. सूर्योदयाच्या वेळी दारात आले की सूर्यदर्शन होते. लालबुंद गोळा पाताळ फोडून वर येतो आहे असे मनोहर दृश्य दिसते. त्याची किरणे फाकतात. स्त्रीसुलभ अनुभवातून ती उगवणाऱ्या सूर्याला तान्ह्या बाळाची उपमा देते. तांबूस जावळ असलेला तिचा बाळ. सोनेरी किरणाचा उगवता सूर्य तिला जावळ असलेल्या मुलासारखा दिसतो.

उगवणारा सूर्य रोज नवा दिसतो. तो पाहणे हा एक दिव्य सौंदर्यानुभव असतो. तांबडा रत्नजडीत अलंकार ल्यालेला सूर्यदेव पाहून तिचे अंतःकरण भाविकतेने भरुन येते. हात भाविकतेने जोडले जातात. मग ती कृती उक्तीने सूर्यदेवाची पूजा बांधते.

**उगवला नारायण । आहेव नारीच्या आळी गेला ॥**
**गिरजा माझ्या बाईनं । हळदी कुंकवानं लाल केला ॥**
**उगवला नारायण । उगवताना पाहिला ॥**
**हळदीवर कुंकू ॥ बेल वटीचा वाहिला ॥**
**उगवला नारायण ॥ आधी उगव माझ्या दारी ॥**
**दही भाताची कर न्याहरी । मग प्रितीम धुंड सारी ॥**

तिने उगवत्या सूर्याला हळदीकुंकू बेल वाहिला. नेवैद्य दाखविला. आपल्या बाळाला सांगावे तसे ती सूर्यदेवाला सांगते. दहिभाताची न्याहरी कर आणि मग प्रितीम धुंड. डोकीवर पदर घेऊन तिने दोन्ही हात जोडून भक्तिभावाने दर्शन घेतले. अशी पूजा करुन प्रदक्षिणा घातल्या.

या तिच्या नित्याच्या पूजेने सूर्यनारायण प्रसन्न झाला. तिने मागणे मागितले.

**उगवला नारायण । पिवळ्या झाल्या भिंती ॥**
**चुड्या माझ्या राजसाला । आवुक मागाय उभी हुती ॥**
**उगवला नारायण । तुला मागणं काही नाही ॥**
**चुड्या माझ्या राजसाला । आवुक दुनयेचा घाल लयी ॥**

अनुक्रमणिका

**उगवला नारायण । लाल शेंदराची पुटी ॥**
**माझ्या नेणंत्या राघुबाला । आवुक मागती वाडदिडी ॥**
**उगवला नारायण । उगवताना ऊन पडं ॥**
**सासरी माहेरी । आवुक मागती दोन्हीकडं ॥**
**उगवला नारायण । तुला मागणं माझं एक ॥**
**जन्मा जाऊ दे मायबाप । राघु दिल्यालं सुखी राख ॥**

स्त्रीने संपूर्ण आयुष्य सासर – माहेरच्या माणसाला समर्पित केले होते. त्यामुळे ती स्वतःसाठी काहीही मागत नाही. सासर – माहेरच्या माणसाला दीर्घ आयुष्य व आरोग्य मागत आहे. मराठी स्त्रियांची मनोकामना सूर्यदेव पूर्ण करो, हीच प्रार्थना.

❑❑❑

## सकाळच्या पाऱ्यामंदी

सकाळचा प्रहर म्हणजे रामप्रहर. राम मनिमानसी रुजविण्याचा काळ. योगी, मुनी, साधक सकाळी परमेश्वराची आराधना करतात. सामान्य संसारी लोकही सकाळी देवपूजा करतात.

सकाळची वेळ सर्वच दृष्टीने चांगली असते. रात्रीच्या अंधाराचे साम्राज्य संपून प्रकाशाची पहाट होत असते. हवा स्वच्छ, निर्मळ आणि थंड असते. चराचरसृष्टी नव्या तेजाने न्हाऊन निघते. वातावरणात प्रसन्नता आणि उत्साह असतो. फिरण्यापासून दळण्यापर्यंत आणि साधनेपासून अभ्यासापर्यंत कोणतेही काम करायला सकाळची वेळ चांगली असते.

भारतीय लोकसंस्कृतीही प्रकाशाची, तेजाची आणि अग्नीची पूजक आहे. साध्या वाढदिवसाला निरांजन लावून ओवाळण्याची आपली पद्धत आहे, मेणबत्या विझवून अंधार करण्याची नव्हे. त्यामुळे प्रकाशाने चराचर सृष्टीला उजळून टाकणाऱ्या ‘उगवत्या नारायणा’ चे कौतुक लोकगीतातून दिसते. मात्र मावळत्या सूर्याच्या सौंदर्याचे वर्णन फारसे आढळत नाही. सूर्यास्ताची निसर्गशोभा लोकमानसाला जाणवली नसेल असे नाही पण अंधाराकडे नेणाऱ्या मनाला खिन्नता, हुरहूर, एकाकीपण वाटणारी संध्याकाळची वेळ लोकसंस्कृतीने मुक्तकंठाने गौरवली नाही इतकेच.

मराठी स्त्रियांची दिनचर्या भल्यापहाटेपासून सुरु होते. उन्हे अंगावर येईपर्यंत पहाटेच्या साखरझोपेचे सुख घेण्याचे भाग्य फारच थोड्या स्त्रियांना लाभते. खेड्यातल्या स्त्रियांना तर नाहीच. पूर्वी भल्या पहाटे थांबून बांग देणाऱ्या कोंबड्याच्या आवाजाने स्त्रियांना जाग येई. एखाद्या जुन्या मंदिराच्या गावात पहाटेच्या सनई चौघड्याच्या मंजूळ सुरांनी गाव जागवले जाई. सासुरवाशीणीला हा कोंबडा वैऱ्यासारखा वाटे. पण आळस करुन चालत नसे. ‘येपाऱ्याला याप आणि भिकाऱ्याला झॉप’ अशी म्हणच आहे.

**कामाचा कंटाळा । तुला भिकाऱ्याचे पोरी ॥**
**कामाचा सराव । माझ्या देसायाच्या घरी ॥**

पूर्वीच्या काळी स्त्रियांना पहाटे जात्यावर दळावे लागे. सगळं घर आणि जग साखर झोपेत असताना त्या जात्यावर दळणाला बसत. दळणाचे काम तसे अवघड आणि कष्टाचे. हे श्रम हलके करण्यासाठी मग त्या ओव्या गात. देवाधर्माच्या ऐकलेल्या गोष्टी व संसारातील सुखदुःखाच्या अनुभवाला त्या शब्दबद्ध करीत. जात्याच्या खुंट्याला शब्दपालवी फुटे. दगडाच्या पाळ्या सुराच्या बरसातीने न्हाऊन निघत. फिरणारा हात आणि गाणारा गळा यांची एक लयसाधली जाई. प्रत्येक स्त्री गानगंगा होती. बहिणाबाई चौधरीनी म्हटल्याप्रमाणे

**अरे अरे घरोट! तुझ्यातून पडे पिठी ॥**
**तसं तसं माझं गाणं । पोटातून येतं ओठी ॥**

इतक्या सहजतेने स्वाभाविकपणे आणि उत्स्फुर्तपणे या ओव्या निर्माण होत. त्यावर सुरांचा साज चढविला जाई. गाण्याच्या नादात श्रम हलके होऊन मनावरचा ताण कमी होई. जात्यावरच्या ओव्या ह्या

अनुक्रमणिका

अशा श्रमपरिहारासाठी, स्वांतसुखाय निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे त्यात निर्मितीचा अहंकार नाही की इतरांचे मनोरंजन करावे म्हणून मुद्दाम केलेला शब्दसौंदर्याचा साज नाही. कलावंत असल्याचे भानही या माता— भगिनींना नाही.

सकाळची वेळ कामाची. दळण झालं की घर आणि अंगण झाडून काढून त्यावर सडा टाकावा लागे.

**दिवस उगवला । उगवताना झपाझपा ॥**
**साळू लोटती माळीसोपा ॥**
**सकाळच्या पारी । चल अंगण लोटू दोघी ॥**
**सूर्व्या पावना येईल बिगी ॥**

असा माळीसोपा अंगण झाडून झाले की कट्टा झाडते तुळशीचा । राम आला ग कैलासीचा ॥तुळशीकटा झाडून घेऊन पारूसा केस टाकला की मग पाणी तापवून आंघोळ होई. पुरुष माणसाला उठवावे लागे.

**पहाटेच्या पाऱ्यामंदी । वासरु हंबरलं ।**
**राजेंदर रे बंधवा । उठ गवळ्या उजाडलं ॥**

गोठ्यातल्या जनावरांचे शेणघाण काढावे लागते. प्रसंगी ते कामही स्त्रियांनाच करावे लागते. पुरुष मंडळीना आंघोळीला पाणी आणि कपडे काढून द्यावे लागतात. वेणीफणी करुन हळदीकुंकू लावून ती देवपूजेला तयार झाली की मग सूर्यदर्शन व्हायचे. 'उगवला नारायण' या लेखात मागे आपण त्याच्या सौंदर्याचे, पूजेचे दर्शन घेतलेच आहे.

सकाळच्या वेळी दारातल्या तुळशीची पूजा करणे हा मराठमोळ्या स्त्रियांचा नित्यंनेम होता. 'सकाळच्या पारी । राम म्हणत उठावं । मग तुळशीला भेटावं' अशी समजूत असल्याने तुळशीची पूजा करीत.

**पहिली माझी ओवी । पहिला माझा नेम ॥**
**तुळशी खाली राम । पोथी वाची ॥**
**सकाळच्या पाऱ्यामंदी । तोंड बघावं गायीचं ।**
**दारी तुळशीबाईचं ॥**
**सकाळच्या पारी । आधी रामाचं नाव घ्यावं ॥**
**मग चिंतल्या कामा जावं ।**
**राम या म्हणू राम । राम अमृताचा पेला ॥**
**रामाचं नाम घेता । दिसं आनंदात गेला ॥**

तुळशीला हळदकुंकू वाहिलं. अगरबत्ती लावली. तांब्याभर पाणी घातलं, मनोभावे नमस्कार केला की देवाकडे मागणं मागते.

**सकाळच्या पारी ॥ राम राम माझ्या मुखी**
**दैवा भगवाना नारायणा । सर्वी राखावी सुखी ॥**

सकाळी देवाचं नाव घेतलं. पूजाअर्चा केली की मन प्रसंन्न होते. दिवस आनंदात जातो.

पूजाअर्चा झाली तरी सकाळच्या कामाची गडबंड असतेच. धारा काढणे, चहापाणी करणे, पाणी भरणे, बाळाला न्हाऊमाखू घालणे, स्वयंपाकपाणी करणे, धुणे धुणे. अशी अनेक कामे स्त्रियांना करावी लागतात.

सकाळची उन्हं चढत जातात.

**सकाळच्या पाऱ्यामंदी । पसरलं पिवळं ऊन ॥**
**बाई हासलं हिरव रान ।**
**सकाळच्या पारी । उन पडतं ताजं ताजं ॥**
**दुपारी त्याचा ढोल वाजं ॥**

असं घरातलं कामधाम आवरुन स्त्रियांना शेतावर कामाला जावे लागते.

**दिवस उगवला । आला उगवून कोसभर ॥**
**चला जाऊ शेतावर ॥**

❒❒❒

# दिवस मावळला

संध्याकाळची वेळ मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते. दुपारी आग ओकणारा सूर्य नारायण सांच्यापारापासून सौम्य होत जातो. दरक्षणी त्याचे सौंदर्य बदलत असते. क्षितिजाला स्पर्श करण्यापूर्वी तो लाल गोळ्यासारखा दिसतो. 'दिवस मावळला । मावळूनी झाला लाल' अशी त्याची अवस्था होते.

आता प्रकाशाचा अस्त होऊन अंधाराचे साम्राज्य सुरु होणार असते. दिवस तर मावळला आहे पण रात्र तर झालेली नाही; अशा संधिप्रकाशाच्या काळाला संध्याकाळ म्हणतात. संध्याकाळच्या कातरवेळी वातावरणात एक-स्तब्धता, जडता, एकाकीपण भरुन राहिलेले असते. अशी वेळी मनाला एक प्रकारचे औदासिन्य जाणवते. एक अस्वस्थ करणारी हुरहूर लागून राहाते. कवी आणि लेखकांनी संध्याकाळची ही जाणीव शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. गंगाधर गाडगीळांनी 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' सखा कलालांनी 'सांज' अशा कथा लिहिल्या आहेत. कविवर्य ग्रेसनी संध्याकाळच्या कवितेत एकाकी, दुःखद, गूढ जाणिवेला काव्यबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. संध्याकाळच्या मनोवस्थेविषयी ते लिहितात –

**क्षितिज जसे दिसते, तशी म्हणावी गाणी**
**देहावरची त्वचा आंधळी, छिलून घ्यावी कोणी**
**गाय जसे हांबरते. तसेच व्याकुळ व्हावे**
**बुडता बुडता सांजप्रवाही अलगद भरुन यावे.**

कवी आणि लेखकांनी सूक्ष्मतेने वर्णन केलेली संध्याकाळ आमच्या खेड्यातल्या मराठमोळ्या स्त्रियांना कशी जाणवली, भावली आणि अनुभवली हे पाहण्यासारखे आहे. स्त्रियांनी काम करता करताच जीवन पाहिले, अनुभवले आणि गायले आहे. एखाद्या समुद्रकिनारी किंवा महाबळेश्वरसारख्या ठिकाणी जाऊन त्यांनी सूर्यास्ताची शोभा पाहिलेली नाही. ज्या संसारात, शेतात आणि गावात ती पाय रोवून जगत आहे तिथूनच तिने मावळता सूर्य पाहिला.

**दिवस मावळला । झाडाझुडपाच्या आडोशाला ॥**
**चंद्र निघाला कडोशाला ॥**
**तिन्ही सांज झाली । नको दिव्याला दिवा लावू ॥**
**चंद्रसूर्य दोघं भाऊ ॥**

माणदेशासारख्या माळरानाच्या प्रदेशात दिवस झाडाझुडपाच्या आडोशालाच मावळणार. पौर्णिमेच्या सुमाराला दिवस मावळला की चंद्रोदय होतो. सूर्य आणि चंद्रापासून आपणास प्रकाश मिळतो. चंद्रसूर्य दोघे भाऊ असावेत असे आमच्या खेडवळ स्त्रियांना वाटते.

निव्वळ सूर्यास्ताच्या सौंदर्याची वर्णने लोकगीतात कमीच आढळतात. संध्याकाळच्या वेळच्या कामाची वर्णनच जास्त. कृतीसंबंधता हा लोकगीताचा प्रमुख विशेष. दळणकांडण करतानाच ओव्या म्हटल्या जातात. वर्ण्य विषयाचे सौंदर्य आणि हातातलं काम एकाच ओवीत गुंफलेले असते. नागरी परंपरेत कलानिर्मिती करणारी माणसे काम करीत नाहीत आणि काम करणारी माणसं कला निर्मिती करत नाहीत असे दिसते. पण लोकपरंपरेत काम आणि कलानिर्मिती एकाच वेळी होत असते. गीत आणि हात एकाच

वेळी चालतात. दळण कांडणासारखे काम, झिमा फुगडी सारखे खेळ आणि जागरण गोंधळासारखे विधी या अनुषंगाने लोकगीताची निर्मिती होत असते. त्यामुळे संध्याकाळ कामाच्या अनुषंगानेच साकार होते.

खेड्यातील संध्याकाळ. दिवसभर शेतामळ्यात काम करुन बाईमाणसं घराकडे येतात. लेकुरवाळी बाई असली तर ती आल्यावर मुलाला पाजते. बाळाला भरवते. जळणकाटक्या जमवून न्हायला पाणी ठेवते. चार घागरी पाणी भरुन बाळाला तेल माखून न्हाऊ घालते. हा तिचा संध्याकाळचा एक कार्यक्रमच असतो.

**दिवस मावळला । यल फुलला वाळकाचा ॥**
**दारी गजर बालकाचा ॥**
**दिवस मावळला । मावळूनी झाला लाल ॥**
**किती सांगू साळू तुला । तान्ह्या बाळाला न्हाऊ घाल ॥**

रांगणारा बाळकृष्ण म्हणजे संसाराच्या वेलीवरचे फळच. संध्याकाळी ते भुक्याजुन झोपीला येऊन रडायला लागते. दारी गजर मांडते. पोक्त बायका आईला सांगतात. अगोदर बाळाला न्हाऊ घाल. झोपव आणि मग इतर काम कर. याचवेळी गायीगुरं आपल्या गळ्यातील मंजूळ घंटानाद करीत गोठ्याकडे येत असतात.

**दिवस मावळला । दिवा लावावा सुंदयरी ॥**
**गया आल्यात्या गावंदरी ॥**
**दिवस मावळला । गुराढोरांचा झाला यळ ॥**
**किती सांगू बाळा तुला । वाट सोडून चेंडू खेळ ॥**
**तिन्ही सांज झाली । गायी बैलाच्या आधी आल्या ॥**
**मेंढ्या वाड्यात दणाणल्या ॥**
**दिवस मावळला । दिवा लावावा तुळशीपाशी ॥**
**गवळी माझा बंधु । बांधीतू गायी म्हैशी ॥**

कृषी जीवनात, जनावरांना अनन्यसाधारण महत्त्व असते. दिवे लागणीला गायीगुरे, शेळ्यामेंढ्या रानातून गोठ्यात—वाड्यात येतात. अशा वेळी लहान मुलांना जपावे लागते. गायी-म्हैशी दावणीला बांधाव्या लागतात. मग वासरे सोडून धारापाणी काढले जाते.

एवढ्या वेळात कडूसं पडाय लागते. अंधार धरणीवर अवतरायला लागतो. अशावेळी दिवे लावावे लागतात. पूर्वी खेड्यात लाईट नव्हती. बटन दाबलं की प्रकाश ही सोय अलीकडची. पण पूर्वी दगडाचे, लोखंडी दिवे होते. त्याला तेल घालणे, वाती घालणे व दिवे लावणे या गोष्टी कराव्या लागत. नंतर चिमण्या, सुंदऱ्या, कंदील आले. त्याच्या काचा पुसणे, तेल घालणे, वाती नीट करणे या गोष्टी करुन दिवे लावावे लागत. हा नित्याचाच उद्योग होता. पण एखाद्या संध्याकाळी बंधूजी आला तर ती संध्याकाळ सासुरवाशिणीच्या जीवनात आनंदाने भरुन येई.

अनुक्रमणिका

**दिवस मावळला । झाडाझुडपाच्या झाल्या इटी ॥**
**भाऊ बहिणीचं गाव गाठी ॥**
**दिवस मावळला । दिव्याला माझा हात ॥**
**बंधूजीला बोलयते । कारं पावण्या केली रात ॥**
**तिन्ही सांज झाली । दिवा लावावा जोडवाती ॥**
**गुज बोलत्यात आज्यानाती ॥**
**दिव्याला भरायन । मी का घालती आणिक ॥**
**बहिणाई माझा बंधू ॥ आलं गुजाला माणिक ॥**

कडूस पडायच्या आत तिचा दिव्याला हात जातो. अंधार पडायच्या आत दिवा लावावा लागतो. पूर्वी गरीबांना काड्याच्या पेट्याही मिळत नव्हत्या. मग दुसऱ्याच्या घरून दिव्याला दिवा लावून पदराखाली झाकून न्यावा लागे. एका ओवीत एक माऊली म्हणते – चंद्र, सूर्य दोघे भाऊ असल्यामुळे तिन्ही सांजेला दिव्याला दिवा लावू नये. भाऊराया आला तरी त्याचे स्वागत होते. मग स्वयंपाकपाणी झालं की, जेवणखाण होतं. थोडा निवांत वेळ मिळतो. मग आजी नातवाला गोष्ट सांगते. भाऊ बहिणीच्या घरी असल्यामुळे सुखदुखाच्या, जीवाभावाचे, घरप्रपंचाचे हितगुज होते. अशा वेळी दिव्याला भराण थोडं जादाच लागते.

एरवी कामधंद्यात तिला फारशी फुरसत मिळत नाही. पण बैलगाडीतून माहेरी जाताना येताना तिला सूर्यास्त पाहायला, अनुभवाला मिळतो. तोच तिच्या गाण्याचा विषय होता.

**दिवस मावळला । असा लागला उताराला ॥**
**माझ्या बांधवाच्या । किती धरू मी धोतराला ॥**
**दिवस मावळला । माहेर गावीच्या मैलावरी ॥**
**हावशा माझा बंधू । टाकी चाबूक बैलावरी ॥**

पूर्वी लहानपणी लग्न होत. नेणंत्या सासुरवाशिणी भावाच्या धोतराला धरून लवकर माहेरी निघण्याचा आग्रह धरीत. लवकर माहेरी जायला ती उत्सुक असे.

संध्याकाळच्या वेळी घरी लक्ष्मी येते अशी लोकमानसाची समजूत होती. त्यामुळे संध्याकाळी घराचे दार लावत नाहीत. मुळात खेड्यातली संस्कृती ही उघड्या दारांची संस्कृती असते. शहरात फ्लॅटची बंद दाराची संस्कृती असते. बेल दाबून आपण आल्याची जाणीव द्यावी लागते मग दार उघडते. पण खेड्यात घरात माणूस असले की दार सताड उघडेच असते. विशेतः संध्याकाळच्या वेळी लक्ष्मी घरला येते म्हणून दिवे लावतात व दार उघडेच ठेवतात.

**दिवस मावळला । पदर घेते मी माथ्यावरी ॥**
**आली लक्ष्मी जात्यावरी ॥**
**तिन्ही सांजा झाल्या । अशी सांजायी फुलयली ॥**
**दारी लक्ष्मी बोलयली ॥**

अनुक्रमणिका

अशी जाते खेड्यातल्या स्त्रियांची संध्याकाळ. कामाधामात. गेल्या काही लेखातून स्त्रीजीवनाची दिनचर्याच गीतातून उलगडून दाखवली आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

# पंचमीच्या सणाला नाग मी पुजीला

नागपंचमी हा सण स्त्रियांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा. नागोबाला पूजायचा. झोक्यावर झुलायचा. मुक्तपणे गायचा. गाण्यांच्या तालावर नाचायचा, खेळायचा. वैशाखात लग्न झालेल्या सासुरवाशीणी नांदायला जायच्या आणि पंचमीला खेळायला यायच्या. या सणाला स्त्रियांना माहेरी यायची भारी ओढ.

**सणामंदी सण । आली पंचीम खेळायची ॥**
**माझी ती मैनाबाई । वाट बघती मुराळ्याची ॥**

पंचमीचा सण खेळायचा आणि लवकर लग्न झालेल्या मुलींचं वयही खेळायचं. मग ती मोठ्या कळवळ्याने भाऊरायाला सांगते.

**सणामंदी सण । बारा सणाला नेऊ नका ॥**
**सावळ्या बंधुराया । पंचमीला ठेऊ नका ॥**

भाऊ मुराळी आला की मैनाबाई आठ-पंधरा दिवस अगोदरच पंचमीला माहेरी येते. गावातल्या सासुरवाशीणीही माहेरी आलेल्या असतात. पोक्त बायकाही बाहेर पडतात. मग खेळगीतानं पंचमी घुमू लागते.

नुकताच पाऊस पडून गेलेला. धरती हिरवा शालू परिधान करुन सजलेली. आभाळाने ऊन पावसाचा खेळ मांडलेला. खरीपाची पीकं मार्गी लागलेली. शिवारातल्या चारापाण्यानं गोधन समाधानी असताना लोकमानसाला थोडी उसंत मिळाली की नागपंचमीचा सण येतो. गल्लीगल्ली अन् गावनगाव बायका मुलींच्या हसण्या खिदळण्यानं, नाचगाण्यानं धुंद होऊन जातं.

बघता बघता झाडाझाडावर झोके चढायला लागतात. पतंग उडायला लागतात. चक्र करकरायला लागतात. उंच झोक्याच्या लयीनं पोटात गार शिरशिरी भरून जाते. सांच्याला पोरी खेळायला जमतात. ‘आपण दोघी मैतरणी अट्टीच्या…अट्टीच्या, साड्या नेसू पट्टीच्या पट्टीच्या’ असं म्हणत पोरींचे चपळ देह गोलाकार फेर धरतात. पाय जमिनीवर भोवरे होतात. ‘एका हाताची फुगडी, मामा घेत्यात लुगडी’ म्हणंत फुगडी दोन्ही हाताची होते. ‘किस् बाय किस्’ करत घसरफुगडी ताल धरते. ‘नाच ग घुमा कशी मी नाचू’ म्हणत पोरी नाचायला लागतात. पोरीचं बघून थोरी नाचगाण्यात सामील होतात. झीम्मा गीते सूर पकडतात आणि सार पटांगण पायाच्या तालावर गीतांच्या सुरावर जागवलं जातं. देहभान हरपून पोरीबाळी खेळात रममाण होतात. आनंदानं बेहोश होतात. हे सारं पाहून पोरं हळहुळतात. मग ती आट्यापाट्याचा डाव मांडतात. आकाड-श्रावणातल्या वाऱ्यावर पतंग उडवतात. काहीच जमलं नाही तर पोरींच्या खेळात लुडबुडतात. बघता बघता पंचीम येते. श्रावण चतुर्थीला भावाचा उपवास.

**एकादस पारणं । बहीण करते भावाचं ॥**
**नागोबा देवाचं । काय होईल जीवाचं ॥**

अनुक्रमणिका

काही स्त्रिया लाह्या-फुटाणे असे भाजके पदार्थ खाऊन भावाचा उपवास करतात. नाग पंचमी दिवशी न्हाऊन धुऊन सडासारवण होतं. समोरची भींत शाडूने सारवून त्यावर रंगाने व हळदी-कुंकवाने फड्याचा नागोबा काढतात. रांगोळी काढणारे हात नागोबाही सुंदर रेखतात. काजळाच्या काळ्या आणि चुन्याच्या पांढऱ्या टिपक्यांनी सजवतात. शहरात रक्तचंदनी पाटावर नागाची आकृती काढतात. मातीचा फडी असलेला नाग काढून पूजा मांडतात. त्याला हळदीकुंकू फुले वाहतात. पोवते घालतात. दुधालाह्याचा नैवेद्य दाखवितात. पंचमी दिवशी शेतात नांगर धरत नाहीत. घरात चिरणं, वाटणं, कुटणं, बंद. त्यानं नागफणी दुखावते अशी समजूत आहे. डाळ शिजवून त्यात गूळ घालून उकडीचे कानोले करतात. त्याचाच या सणाला मान असतो.

**पंचीमी दिसी । नाग काढीला भिंतीशी ॥**
**बहीण भावाची उपासी ॥**
**पंचमी दिसी । नागोबा पोवतं ॥**
**सोड कुणब्या आऊत ॥**
**पंचमीच्या सणाला । नागाला दुधलाह्या ॥**
**आऊख मागुया भाऊराया ॥**

दुपारी बायकामुली वारूळाला जाऊन नागोबाला पूजतात. जाताना गाणं म्हणतात.

**चल ग सये वारूळाला....वारूळाला,**
**नागोबाला पूजायला....पूजायला.**
**हळदीकुंकू वाहायला....ताज्या लाह्या वेचायला ॥**
**किंवा चला सयानू नागोबाला जाऊ ।**
**पोवतं घालून नाग पाहू ।**
**चला सयानू वारूळाला जाऊ ॥**
**हळदीकुंकू वाहून नाग पाहू ॥**

वारुळाच्या ठिकाणी नागाची पूजा बांधण्यातील आदिबंध असा. वारूळ हे भूदेवतेचे प्रतीक. नाग हा पौरुषाचा प्रतीक. सुजनाशी त्याचा संबंध. म्हणून तो स्त्रीला पूजायला लावतात. एका अर्थाने ही पौरुषाची, सुजनाची, सुफलीकरणाचीच पूजा असते. नागराज हा स्त्रीचा भाऊ किंवा पती या पुरुषत्वाच प्रतीक म्हणूनच लोकसंस्कृतीत पूजला जातो.

भारतीय संस्कृतीत फार प्राचीन काळापासून सर्वत्र नागपूजा होत आली आहे. आदिम काळातील माणूस काही प्राण्यांच्या शक्तीबुध्दीने दिपून गेला. त्याच्या भीतीने घाबरुन गेला. नागसर्प हा असाच सरपटणारा प्राणी. हिरव्या पिवळ्या सतेज कांतीचा. कात टाकून पुन्हा तरुण होणारा, नागमोडी सळसळत जाणारा, फुत्कार करुन फडी काढणारा. विषारी दाताचा. लवलवत्या दोन जिभाचा. डूख धरणारा, दंश करुन वा विळखा घालून माणसाला घायाळ करणारा, त्यामुळे आदिमानवाने भिऊन त्याने त्रास देऊ नये म्हणून त्याची पूजा सुरू केली. मोहोंजोदडोतील उत्खननातही नाग प्रतीमा सापडल्या आहेत. वेदात व पौराणिक ग्रथांत सापांची संरक्षक व विघातक अशा दोन्ही प्रकारची वर्णने येतात. नागराज अनेक देवतांच्या सान्निध्यानेही पूजनीय ठरला आहे. शिवशंकरांनी त्याला गळ्यात भूषणासारंखा वागविला आहे. विष्णू

भगवान शेष शय्येवर पहुडले आहेत. भगवान बुध्दावर त्याने फण्याचे कृपाछत्र धरले आहे. जैनांच्या पार्श्वनाथ-गोमटेश्वरांच्यां अंगावर तो विराजमान झाला आहे. श्रीकृष्णाने कालीया मर्दन केले एवढेच नव्हे तर सारी पृथ्वी शेषाच्या शिरावर तरली आहे अशी समजूत आहे. अनेक मंदिरात त्याच्या मूर्ती आहेत. असा साप लोकसंस्कृतीत भारतभर पूजनीय ठरला आहे. नागवंशाचे लोक व गावे आजही आहेत.

लोकजीवनात साप शेतकऱ्याचा मित्र. उंदराचा नाश करून धान्याचे रक्षण करणारा पण त्याच्याविषयी गैरसमजुती फार. तो डाव धरतो. म्हैशीच्या पायाला विळखा घालून दूध पितो. म्हैशीची नागिणीशी दृष्टादृष्ट झाल्यावर ती मरते. तो भूमिगत धनाचे रक्षण करतो. मृत पूर्वज सर्परूपाने येऊन आपले रक्षण करातात. गरोदर स्त्रियांनी किंवा त्यांच्या पतीने मारला असता वंध्यत्व येते. नागाला पूजले असता भवबंध तुटतो. त्याला दूध पाजले असता बुध्दी शुध्द होते. अशा श्रध्दाही लोकजीवनात आढळतात. अशा नागराजाची पूजा वारूळावर केली जाते.

**नाग भाऊराया । तुला वाहाते दुधलाह्या ॥**
**दर्शनाला येती । गावच्या आयाबाया ॥**
**पंचमीच्या सणाला । नाग मी पूजीला ॥**
**मुराळी यावा मला । पाठी भाऊ मागितला ॥**

भाऊ नसलेली बहीण नागोबाला पुजून भाऊ मागते. नागपंचमीला सापगारूडी घरोघर नागसाप घेऊन फिरतात. स्त्रिया त्याला दूध-लाह्या वाहून दर्शन घेतात. गारूड्याला दान देतात.

नागपंचमीच्या दिवशी संध्याकाळी गावातल्या बायका जमून फेराची गाणी म्हणतात.

कोष्ट्याची रूक्मिणी आणि सावताची द्रौपदा गाणी म्हणण्यात पटाईत. त्या पुढे म्हणतात बाकीच्या मागे. बाळाई, भारजा, चंद्रावळ-यांची कथागीते गायली जातात. बाळाईला पंचीमीला आणून सासरी परत पोहचवितांना सुबाना बंधू तिचा खून करतो. वारूळाला पूजायला गेल्यावर सारजाचा हार तुटून पडतो. शोधून मोती वेचताना तिला रात्र होते. संशय घेऊन सासर माहेरचे तिला कुणीही थारा देत नाहीत. मग ती अंजान डोहात उडी घेऊन आत्महत्या करते. चंद्रावळ मेव्हण्याच्या वासनेची शिकार होते आणि जीवनातून उठते. साप डसल्याच्या प्रतीकातून ही कथा अभिव्यक्त होते. ही गाणी गद्य असली तरी त्यातली कथात्मकता, गतीशीलता, शोकात्मता व लोकाभिव्यक्ती मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते.

फेराची गाणी बहुधा पाटलांच्या वाड्यासमोर होतात.

**पाटलाच्या वाड्या गेली हुती बया ॥**
**नाचून नाचून दमल्या सया ॥**
**हळदीकुंकवाचं बॉट अजून न्हाया ॥**

अशी तक्रार करुन गाण्यातून पाटलाच्या घरचे वाभाडे काढले जातात. विनोद रसात न्हाऊन निघालेले हे गीत पोट धरुन हसायला लावते. हळदीकुंकू अन् चहापान झाल्यावर पुढंच गाणं रंग भरतं. आज नागपंचमीचे भावविश्व एखाद्या विरलेल्या वस्त्रासारखे कळाहीन झाले आहे. कुणी खेळत नाही अन्

अनुक्रमणिका

गात नाही. बायका तर गाणी पार विसरुन गेल्या. किती मोठं भावविश्व आपण गमावून बसलो. आता उरली आहे संस्कृतीहीन पातळीवरील वारुळ आणि नागाची पशुपातळीवरील पूजा.

❒❒❒

अनुक्रमणिका

## ये गं ये गं गवराबाई

शक्तीपूजेची समांतर परंपरा लोकमानसात दिसते, भाद्रपद हा सुफलीकरणाचा महिना. स्त्रीत्वाची, शक्तीची, मातृदेवतेची पूजा होणे स्वाभाविकच आहे. गौरी हे पार्वतीचे एक नाव. पर्वताची कन्या ती पार्वती. शिवाची पत्नी. गणोबाची आई. मुळात भारतीय माणसासारखी काळी सावळी. शंकराने 'काळी' म्हणून तिची थट्टा केल्यावर तिने प्रार्थना करुन गौरवर्ण प्राप्त करुन घेतला म्हणून गौरी. ग्रामीण बोलीत गवर. महाराष्ट्रात तीन-चार प्रकारच्या गौरी पूजा होतात. चैत्र गौर, श्रावणातील मंगळागौर, हरितालिका, गणोबा-गवरी किंवा ज्येष्ठा गौर. चैत्रशुक्ल तृतीयेपासून वैशाख शुक्ल तृतीयपर्यंत महिनाभर काही ठिकाणी गौरीची आरास, पूजाविधी, सुवाशीनीना हळदीकुंकू, ओटीभरण, गीत गायन केलं जाते. ती चैत्रगौर.

अभिजन समाजात श्रावण महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी गौरीपूजा केली जाते. मंगळवारची म्हणून तिला मंगळागौर म्हणतात. विवाहानंतर फक्त पाच वर्षे स्त्रियांनी मंगळागौर करावी असा संकेत आहे. यावेळी पूजाअर्चा, उपवास खेळगाणी मोठ्या प्रमाणणावर होतात.

हरितालिका हे कुमारिकांचे व्रत आहे. शंकरासारखा पती मिळावा म्हणून पार्वतीने तपश्चर्या केली, त्याचे अनुकरण म्हणून कुमारिका हे व्रत करतात.

ग्रामीण लोकपरंपरेत सर्वाधिक लोकप्रिय आहे ती गणोबा-गवरी, भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षात अष्टमीस अनुराधा नक्षत्रावर गौरीचे आगमन होते. नवमीस जेष्ट नक्षत्रावर पूजा म्हणून तिला जेष्ठ गौरीही म्हणतात.

लोकपंरपरेत गणेश उत्सवाला अलीकडे महत्त्व प्राप्त झाले आहे पण मुळात तो गौरीचाच उत्सव होता. यासंबंधीची एक कथा अशी-कोलासूर दैत्याने आकांत मांडला होता. देव स्त्रियांनाही तो त्रास देऊ लागला. देव स्त्रियांनी स्वतःच्या व सौभाग्याच्या रक्षणासाठी महालक्ष्मीची प्रार्थना केली. महालक्ष्मीने कोलासूराचा वध करुन लोकांना भयमुक्त केले. त्याची कृतज्ञता म्हणून हा उत्सव.

कोकणात गौरीचा उत्सव मोठा असतो. गौरी गणपतीतील गौरी या सांस्कृतिक संचिताचा मनोज्ञ मिलाफ आहे. गौरीला लक्ष्मीचे, समृध्दीचे प्रतीक मानले जाते. कृषिसंस्कृतीत भूमीचे प्रतीक म्हणजे गौरी. बळीराजाच्या मागे उरलेल्या राण्यांचे अस्तित्व गौरीच्या रुपाने पूजले जाते. ती शंकराची पत्नी आणि गणेशाची माता पार्वतीदेवीही आहेच. तिचे आगमन संध्याकाळी होते. हळदी कुंकवाच्या पावलानी तिचे आगमन सिध्द करतात. पहिल्या दिवशी भाजीभाकरीचा नैवद्य असतो. गौरीपूजनातून सौभाग्य आणि मातृत्वाचा आदर प्रकट होतो.आपल्याकडे प्रतिष्ठित घरातून मातीची पाच नवीन मडकी आणून एकात धान्य व इतरात पाच खोबऱ्याच्या वाट्या, पाच खारका, पिवळा दोरा घालून उतरंडी रचतात. वर मातीचा सुंदर मुखवटा बसवून उंची वस्त्रे दागिने घालून मोठी आरास करतात. गौरी पाहायला स्त्रिया व मुली येतात. पूजाअर्चा, हळदीकुंकू होते. खेळ नाचगाणी होतात.

**ये गं, ये गं गवराबाई**
**अंगणी तापीत दूध**
**दूधा पिवळी साई**

अनुक्रमणिका

**लेकी गवरा बाई**
**एवढं जेवून जाई**
**आता काय जेवते बाई शंकर आला**
**जोडवी ल्यायला उशीर झाला**

हेच गाणे दागिन्याची नावे बदलून चालू राहते. मंगळागौरीची गाणीही अशीच असतात.

**लवकर धाव रे श्रावणा**
**शंकर आमुचा जावाई**
**आल्याड शंकर धोतर धुतोय**
**पल्याड गौराई न्हाय ग**
**दोन्ही डेर रंगिवलं**
**डाळिंबाची शाई गं**

लोकमानस बाळकृष्णाच्या ठिकाणी स्वतःच्या बाळराजास पाहते. तसेच गौराईच्या ठिकाणी स्वतःच्या लेकीबाळीला पाहते. घरची गरिबी असली तरी स्त्रियांना दागिन्याची हौस भारी मग गौराईच्या गाण्यातून त्याचा आविष्कार होतो.

**अठारी शाय पठारी शाय**
**तुमची गवराई करती काय**
**आमुची गवराई दागिने घडविते**
**गवराई मागते बाजूबंदाचा तोड**
किंवा हे गाणं पाहा
**हिरव्या रानाचं पिवळं ढस**
**गवराई तुमचं माहेर कसं**
**माहेर नव्हं ती सोनारवाडा**
**गौराईच्या साखळ्या झाल्या का न्हाय.**

अशा प्रकारे गौराईच्या गाण्यात दागदागिने व फळबागाचे उल्लेख फार आढळतात. गौराईच्या मडक्यातील पिवळा दोरा गाठी बांधून गळ्यात घालतात. शुभदिनी शेतात पुरतात. विसर्जनानंतर नदीची वाळू घरात टाकल्याने लक्ष्मी राहते, अशी समजूत आहे. याविषयी एका दरिद्री जोडप्याला गौराई साजरी करायला म्हातारीच्या रुपाने महालक्ष्मीने येऊन धनधान्य व गोधन दिले अशी कथा लोकप्रिय आहे. लोक परंपरेतील स्त्रियांच्या मनोरंजनाचे, आनंदाचे हे भावविश्व आपण जपायला हवे.

❒❒❒

अनुक्रमणिका

# कृष्णाचा झाला जन्म

आपण जयंत्या साजऱ्या करतो. शिवजयंती, डॉ. आंबेडकर जयंती किंवा म. गांधी जयंती. प्रतिमा किंवा पुतळ्यांची स्थापना, पूजा, हारअर्पण, मिरवणूक, एखादे व्याख्यान अशी जयंती साजरी करण्याची सर्वसाधारण पध्दत आहे. लोकमानसही जयंत्या साजऱ्या करते पण ते त्यांच्या पारंपरिक पध्दतीने. कृष्णजन्माष्टमी व रामनवमी ह्या युगपुरुषांच्या जयंत्याच होत. तो जयंतीचा सोहळाच असतो.

श्रावण वद्य अष्टमीस कंसाच्या बंदीशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला म्हणून ही कृष्णजन्मअष्टमी. वैष्णवभक्तांचा हा सण उत्तरेत मोठ्याप्रमाणात साजरा केला जातो. आपल्याकडेही गोकुळअष्टमीचा उपवास केला जातो. रात्री बारा वाजता पाळणा सजवून, पाळणा म्हणून, फुले टाकून जन्माचा सोहळा साजरा केला जातो. नवमीस पालखी-दिंडी निघते. काल्याचे कीर्तन होते. प्रसाद वाटला जातो. गोकुळात गाई चारताना सवगंड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करुन त्याचा काला केला व सर्वांसह भक्षण केला म्हणून हा गोपाळकाला, नंतर चौका चौकात दहिहंडी होते. ‘गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला.’ राम आणि कृष्ण हे आपल्या संस्कृतीतील युगपुरुष त्यांच्या जीवनगाथेने कला आणि साहित्य निर्मितीला शतकानुशतके प्रेरणा दिली आहे. तुम्हाला सांगितले तर आश्चर्य वाटेल. संपूर्ण रामायण आणि महाभारत गीतातून म्हणणाऱ्या स्त्रिया आजही आहेत.

कृष्णजन्मासंबंधी साहित्याचे मूलधन मधील हे गीत पहा.

**कृष्णचा झाला जन्म । स्वरगी वाजे घंटा ॥**  
**आनंद झाला मोठा । गोकुळात ॥**  
**कृष्णाचा झाला जन्म । आनंदल्या नरनारी ॥**  
**पाहू गेल्या नंदाघरी । बाळ तान्हा ॥**  
**केवढे पुण्य केले । यशोदा सुंदरी ॥**  
**परब्रह्म पायावरी । न्हाणीयेलं ॥**  
**कृष्णाचं तान्हेपणं । यशोदेच्या घरी ।**  
**नंदाहाती दोरी । पाळण्याची ॥**  
**यशोदाबाई म्हणे । हरि माझा वरसाचा ॥**  
**नाश केला गोरसाचा । गवळणीच्या ॥**  
**यशोदाबाई म्हणे । हरि माझा ग लहान ॥**  
**नका घेऊ गं आळ । तुम्ही गवळ्याच्या नारी ।**  
**कृष्ण देवाच्या खांद्यावरी । घोंगडीची घडी ॥**  
**पेंद्या सुदाम तुझे गडी । सावळ्या कृष्णनाथा ॥**  
**पहाटेच्या प्रहरी । धेनू झोपी गेल्या ॥**  
**मुरलीने जाग्या केल्या । सावळ्या कृष्णाने ॥**  
**गोकुळीचा कृष्णदेव । पावा वाजवितो येताजाता ॥**  
**गवळ्याच्या लेकीसूना । दंग झाल्यात्या न्हाता धुता ॥**  
**पहाटेच्या प्रहरी । नको जाऊ दुरी ॥**  
**जवळ धेनू चारी । सावळा कृष्णनाथ ॥**

अनुक्रमणिका

**पारिजातकाचे झाड । सत्यभामेच्या मंदिरी ॥**
**निल पुष्प शेजेवरी । कृष्णाजीच्या ॥**
**सोळा सहस्त्रसुंदरी । सोळा सहस्त्र महाल ॥**
**कोण्या मंदिरी राहाल । सावळ्या कृष्णनाथा ॥**
**रुसली रुक्मिण । बैसली तळ्याकाठी ॥**
**धरिली हनुवटी । सावळ्या कृष्णाजीनं ॥**
**मारिला कंसमामा । देवकी करे शोक ॥**
**कैसी विरजली (नाहीशी केली) सजणा । माझी दिवाळीची चोळी ॥**
**गाई हंबरती । वासराच्या माया ॥**
**सोडी बिरडे देवराया । प्रपंचाचे ॥**

कंसाच्या बंदीखान्यात अंधाऱ्या रात्री चंद्र मव्हरायला लागला होता तेव्हा कृष्णाचा जन्म झाला. कृष्णाला घेऊन वासुदेव गोकुळाला येत असताना यमुनानदीने दुभंगून वाट करुन दिली. कृष्णजन्माने गोकुळातल्या नरनारीला आनंद झाला. त्या सावळ्या कृष्णाला पाहायला नंदाघरी आल्या. यशोदामातेचे पुण्य मोठं तिने परब्रह्माला पायावर न्हाऊ घातले. अंगाखाद्यावर खेळविले. नंदाने पाळण्याची दोरी धरुन झोके दिले. बघता बघता श्रीकृष्ण रांगायला लागला. डोक्यावर जावळ त्यात खोवलेले सुंदर मोरपंख, कपाळी गंध, हातात बिंदल्या, पायात वाळे असा रांगतयेणारा सावळा बाळकृष्ण सर्वांना मोहवू लागला. वर्षभराचा होताच गवळणीच्या गोरसाचा तो नाश करायला लागला. खोड्या वाढाया लागल्यावर गवळणीनी यशोदेकडे तक्रारी केल्या. दहा बारा वर्षाचा होताच हातात काठी, पाठीवर घोंगडे घेऊन पेंद्या, सुदामा बरोबर तो वृंदावनात गायी राखायला जाऊ लागला. आपल्या सुरेल बासरीने त्याने गायी वासरापासून गवळणीपर्यंत सर्वांना वेड लावले. सत्यभामा रुक्मिणीशी लग्न झाल्यावर त्याने हनुवटीला धरून रूसवा काढला. पुढे त्यांनी आपल्या दुष्ट कंसमामाचा वध केला. या सावळ्या परब्रह्माने प्रपंचपाशातून आपणास सोडवावे. अशी अपेक्षा गीताच्या शेवटी व्यक्त केली आहे.

लोकमानसाला गीता सांगणारा तत्वज्ञ, राजकारण करणारा मुत्सद्दी, बलाढ्य पराक्रम करणारा वीर, पांडवाला युध्दात सारथ्य करणारा सखा या कृष्णाच्या रूपापेक्षा बालकृष्णचं रूपचं अधिक भावते. माणसाचे दैवतीकरण आणि देवाचे मानुषीकरण करणे या गोष्टी परंपरेत सतत चाललेल्या असतात. हा लोकस्वभाव असतो. इथे परमेश्वरी अवतारापेक्षा कृष्ण बाळ, संसारी पुरूष रूपातच दिसतो. त्यातील ठळक घटनाचे अधारे सारा जीवनपटच उभा राहतो. प्रसंगाचे चित्रण असूनही गीत काव्यात्म पातळीवर जाते. हळुवार कौटुंबिक मार्दवाने व स्त्री सुलभ मनोवृतीचा सहज व स्वाभाविक आविष्कार होतो. गाणारी माऊली, कृष्णरूपात आपला विविध रूपातला पुत्रचं पाहाते. शेवटच्या ओवीत मात्र कृष्णाला उंच पातळीवर नेऊन प्रापंचिक पाशातून मुक्त करणारा मुक्तीदाता बनविले आहे.

उद्या परवाचा कृष्णजन्माचा सोहळा आपण साजरा करूच पण ‘गोविंदा आला रे, आला ऽ’ म्हणून दहिहंडीतील आजच्या कृष्ण सवंगड्यांना प्रोत्साहन देऊ.

❒❒❒

अनुक्रमणिका

# सण आला पोळा

पोळा हा बैलांचा सण. शेतकरी समाजात सर्वात लोकप्रिय. ज्यांची बैल चांगली त्यांची शेती चांगली. गायी-बैलावर माणसापेक्षाही जास्त प्रेम करणारे शेतकरी मी पाहिले आहेत. शेतकरी वर्षभर बैलाकडून नाना तऱ्हेची कामे करुन घेतो. बैलांच्या श्रमावर काळ्या आईत धनधान्य पिकवतो. त्यावर आपले पोट भरतो. घर, प्रपंच चालवतो, याची जाणीव शेतकऱ्याला असते. या ऋणातून काही अंशाने मुक्त होण्याचा, बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण म्हणजे बैल पाळा.

आपल्याकडे वेगवेगळ्या भागात तीन प्रकारचे बेंदूर केले जातात. कर्नाटक सीमाभागात ज्येष्ठ पौर्णिमेला कारवणी बेंदूर केला जातो. खरीपाच्या पेरण्या झाल्यावर विश्रांती काळात हा सण असतो. काही भागात आषाढी पौणिमेला 'आकाडी बेंदूर' केला जातो. तर महाराष्ट्रात श्रावण अमावसस्येला 'श्रावणी पोळा' साजरा केला जातो.

पहिल्या दिवशी खांदेमळणी असते. सायंकाळी बैलांच्या खांद्याला हुरमुज मळला जातो. बैलाला अंबोनी वा खिचडा खाऊ घालतात. दुसरे दिवशी नदीत ओढ्यात बैलाला पोहणी घालतात. वाहत्या पाण्याच्या अभावामुळे अलीकडे बैलं स्वच्छ धुतात आणि बैल सजवतात.

**सण माझा आला पोळा**
**बैलकी पोरानं शृगांर केला.**

शिंगाला रंग लावून बेगड चिकटवतात. नवीन दावन, नवीन पेंडी, बैलांच्या गळ्यात कडे नव्या वेसणी, म्होरक्या घालतात. पांढऱ्या बैलाच्या अंगावर रंगाचे ठिपके उठवतात. पायात वाळे, दोरे बांधतात. झुली, बाशिंग, चाळ घालून बैल सजवतात. शिंगाला शेंब्या गोंडे लावतात. त्यावर कुडबुळी घालतात. गायी-म्हैशीनाही धुऊन सजवतात पण कमी. मोठे कुणबी आपल्या सजवलेल्या बैलांची गावातून वाजत गाजत मिरवणूक काढतात. घरी आल्यावर आरती ओवाळून, नेवैद्य दाखवून पूजा करतात. पुरणपोळीचा नेवैद्य खाऊ घालतात. काही ठिकाणी एक शेतकरी घोंगडे पांघरुन खांद्यावर कुळवाच्या फासेला तिफनीचे नळे व चाडे अडकवून पुढे निघतो व दुसरा शेतकरी दहा-बारा फुटावरुन हाताने पाणी शिंपत म्हणतो.

**'चौर चौर, चांगभलं!**
**पाऊस आला चल भलं!'**

अशी गोठ्याबाहेरच्या जनावरांच्या संपूर्ण दावणीला प्रदक्षिणा घालतात. नंतर बैलाला नैवेद्य दाखवून ओली वैरण घालतात.

आमच्या 'नराळे' गावात कारवणी बेंदराला कर काढली जाते. एका मानाच्या शेतकऱ्याची दोन सजवलेली बैलं वेशीत उभी करतात. एकाचे नाव सजगुऱ्या व दुसऱ्याचे जुंधळ्या असते.त्यांच्यासमोर केळीच्या सोपटाचे आंब्याची पाने खोवलेले तोरण धरतात. दोन-दोन तरूण चपळ शेतकरी ही बैले पळवितात. जो बैल जोरात पळून पुढे जाईल ते पीक त्यावर्षी चांगले येते, अशी समजूत आहे.

अनुक्रमणिका

पोळ्याच्या दिवशी बैलांना संपूर्ण विश्रांती देतात त्यादिवशी बैलाकडून काम करुन घेत नाहीत. पोळा साजरा करुन शेतकरी बैलाविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. हा सण साजरा केल्याने धनधान्याची व गोधनाची समृध्दी होते अशी समजूत आहे. बेंदराचे दुसऱ्या दिवशी संपूर्ण गाव शिकारीला जाते. घरी ‘कर’ तळतात. लाडू, करंज्या, कापण्या असे गोडधोड पदार्थ करुन खातात.

पोळ्यासंबंधी ओव्या मिळाल्या नाहीत पण वेगवेगळ्या संदर्भातील गायी बैलांना उद्देशून म्हटलेल्या ओव्या मोठ्या प्रमाणावर मिळतात.

**शिवच्या शेतामंदी । कुंद्यानं केली काशी ॥**
**जोडी खिलारी माणदेशी ॥**
**गाडीच्या बैलाला । चंदी देते मी मनुक्याची ॥**
**जोडी खिलारी । सांगुल तालुक्याची ।**
**खिलारी बैलांचा । औत चालतो शेतात ॥**
**आली लक्ष्मी धावयत ॥**
**लक्ष्मीआई आली । गोठ्याच्या मागईनं ॥**
**गाई नंदीला लागूईन ॥**
**गायीला साखळी । म्हशीला म्होरकी ॥**
**राणी लक्ष्मीसारखी ॥**
**नेणंता गाईराख्या । काठी मागतो बेलाची ॥**
**गाय नंदीच्या तोलाची ॥**
**गाडीच्या बैलाला । मोत्याच्या येसणी ॥**
**भरली चंद्रभागा । नंदी घालावं पवनी ॥**
**बाराया बैलांची । दिली दावण वाटवरी ॥**
**कुणब्याला इचारती । असा पसारा कुठवरी ॥**
**गाडीच्या बैलांला । सूत म्होरक्या काळ कंड ॥**
**वर शेंब्याला लाव गोंडं ॥**
**गाडीच्या बैलांला । त्याला चितबीराच्या झुली ॥**
**आडती झाल्यात दिसभूली ॥**
**बारव्या हिरीवर ॥ दोन पारव घुमत्यात ॥**
**नंदी मोटला चालत्यात ॥**
**मोटच्या मोटकऱ्या । तुझ्या मोटला कवळी खोंड**
**लाव शिंगाला पिवळं गोंडं ॥**
**बाराया बैलालाचं । जोड नांगर कुणायाचं**
**नंदी डफळ्या वानायाचं ॥**
**गाडीया बैलानं । चला मला घालवत ॥**
**हावशा बंधूला बोलयती । सारी करणी आली त्यात ॥**
**दिष्ट या झाली म्हणू । खांद्यावरल्या चाबकाला ॥**
**नंदी मागल्या नाजूकाला ॥**

अनुक्रमणिका

या ओव्यातून बैलाची विविध प्रकारची कामे व त्याचे कौतुक आले आहे. शेतकऱ्याच्या मनानं आणि काळजाने पोळा या सणाकडे पाहिले तर आपणासही या सणाचे महत्त्व पटेल.

❒❒❒

अनुक्रमणिका

# बळीचे राज्य येऊ दे

पावसाळा संपला. गुलाबी थंडीने हिवाळ्याची चाहूल लागली. खरीपाचे धान्य घरात आले. रब्बीची पिके वाढीला लागली. थोडी सवड मिळाली. शिवार हिरवेगार, मुबलक चारा, चारा खाऊन बैलाचा रंग कोसा व्हायला लागलाय. वशींड झुकाय लागते. रानामाळात शिंगाने माती उकरुन तो 'मुकऽड्रीऽ' अशा डरकाळ्या फोडू लागला की बैलक्याला आनंद होतो. गायी म्हैशी चरून जोगावतात. पाख भरत. त्यांचे अंग भरते. तेज येते. भरपूर दूध देतात. खोंड आणि कालवडी शेपट्या वरं करुन उधळायला लागतात. असे गोपाळाचे गोधन तृप्त असते.

अशावेळी धनत्रयोधशीला दिवाळीचा दीपोत्सव सुरु होतो. अंधारातून प्रकाशाकडे, गरिबीतून समृद्धीकडे नेणारा, लक्ष्मीपूजनाचा सण. दारी दिव्याची माळ, आकाशदिवा, अंगणात रांगोळ्या, गवळणी, उदबत्त्याचा घमघमाट, अभ्यंगस्नान, पाचीपक्वान्नाचा फराळ, भाऊबीज, फटाके आणि फुलबाजाची धमाल.

लक्ष्मीची पूजा म्हणजे धनसंपत्तीची पूजा. शेतकऱ्याकडे सोनेनाणे धनसंपत्ती कमीच. मग पूजा करायची कशाची? तो आपल्या गोधनाची पूजा बांधतो. लक्ष्मी गायी म्हशीच्या पावलाने येते असा त्याचा अनुभव असतो. मग तो आपल्या गोधनाला न्हाऊ घालतो. गुलाल, रंग लावून सजवतो. चारापाणी खाऊ घालतो. गंधअक्षता लावून ओवाळतो. औक्षण मागतो. घरात आणि गोठ्यात आरोग्य धनसंपदा वाढावी अशी त्याची प्रार्थना असते.

प्राचीन काळी गोधन महत्त्वाचे मानले जाई. त्याचा विनिमय होई. कृषिसंस्कृतीत हीच खरी संपत्ती होती. सासरी जाणाऱ्या लाडक्या लेकीला गाई आंदण दिल्या जात. रुक्मिणीला पानमळे, ऊसमळे या बरोबर गाई आंदण दिल्या होत्या.

दिवाळीत गुराखी पोरे इडीपीडीच्या गवताच्या काड्या जमवून विशिष्ट पद्धतीने गुंफून इडीपीडी करतात. पहिल्या दिवशी एक फड्याची, दुसऱ्या दिवशी दोन फड्याची अशा क्रमाने शेवटच्या दिवशी पाच फड्याची इडीपीडी केली जाते. सायंकाळी ७ वाजता इडीपीडीत आरती वा दीवा ठेवून गाई गुरे ओवाळली जातात. त्यावेळी गाणे म्हणतात.

**दिन दिन दिवाळी । गाई म्हशी ववाळी ॥**
**गाय चारा । बैल नवरा ॥**
**बैलाचं बाशींग । किकऱ्यानं ताशीनं ॥**
**किकर पडलं आडात । कणगीच्या बुडात ॥**
**कणगीनं दिली हाळी । जानी गाय फळी ॥**
**जानीची खोंड । रेशमी गोंड ॥**
**चालती तिफण । बोलतो नळा ॥**
**इडीपीडी जाऊ दे । बळीचे राज्य येऊ दे ॥**

बैलाच्या दावणीपुढे दुसरे गीत म्हटले जाते.

**काकू काकू, कुणच्या बैलाला झुल घालू ॥ झुल घालू ॥**
**रतन्या बैलाला झुल घालू ॥ झुल घालू ॥**

अनुक्रमणिका

**रतन्या बैल मोठा गुणांचा ॥ गुणांचा ॥**
**पाठीवर झेंडा फुलांचा ॥. . . . . .फुलांचा ॥**
**फूल गेलं दरविशी ॥. . . . . .दरविशी ॥**
**दरविशाने दिला घोडा ॥. . . . . .घोडा ॥**
**घोडा गेला करंजाडात ॥. . . . . .करंजाडात ॥**
**करंजाडातनं उठला वाघ ॥. . . . . .वाघ ॥**
**गुराख्याला आला राग ॥. . . . . .राग ॥**
**रागासह मारला वाघ ॥. . . . . .वाघ ॥**
**ईडी पीडी जाऊ दे । बळीचे राज्य येऊ दे ॥**

प्रदेशपरत्वे चार-सहा गाणी प्रसिद्ध असतात.

**धन धन दिवाळी । गाई म्हशी ववाळी ॥**
**गाई म्हशी कुणाच्या ॥ राम लक्ष्मणाच्या ॥**
**गाई म्हशीने भरला गोठा । शेळ्या मेंढ्याने भरला वाडा ॥**
**ईडी पीडी जाऊ दे । बळीचे राज्य येऊ दे ॥**

एका गीतात गायीच्या मांड्या, कान, पोट यांचे उपमा देऊन केलेले वर्णन येते. दिवाळीत कुणब्याच्या बायका गोठ्याजवळ वा ओट्यावर शेणाने जागा सारवून शेणाच्या गवळणी व बळीराजा घालतात. पाडव्या दिवशी पाचपांडव, गवळणी, वाजंत्री मोठा बळीराजा करतात. त्यावर ऊसाच्या वा ज्वारीच्या पाच ताटाची कोप करतात. आरावर दूध उतू घालवितात. भात शिजवतात. नैवैद्य दाखवतात. मेंढकाही वाड्यात हेच करतो.

पाडव्या दिवशी देवळाभोवजी मेंढरे पळविली जातात. ज्याच्या मेंढ्या चांगल्या सांभाळलेल्या असतातत्याच चांगल्या पळतात. त्याचे गावात कौतुक होते.

आणखी एक प्रथा अशी पाडव्या दिवशी शेतकरी शेतात 'सानवा' पुरतो. सानवा म्हणजे मातीची संक्रांत वा भांडे. त्यात कणकीची लावलेली आरती वर झाकण. भल्या पहाटे शेतकरी घोंगड्याची कांबळ घेऊन रानात जातो. औत फिरणार नाहीत अशा ठिकाणी सानवा पुरतो. खूण करुन ठेवतो. खळ्याचे वेळी हा सानवा काढून खळ्यात ठेवला तर धनधान्य अधिक पिकते अशी समजूत आहे.

दिवाळी हा आर्यपूर्व लोकसंस्कृतीचा सण असावा. नरकचतुर्दशीला अभ्यंग स्नान असते. त्या दिवशी नरकासुराचा वध झाला. निषाद आणि किरात प्रजेवर राज्य करणारा पहिला ज्ञात राजा नरक होय. सीतेचे वडील जनक राजाचा हा दासीपुत्र. नरांचे पालन करणारा तो नरक. आसामाकडे त्याने बलाढ्य राज्य स्थापन केले. दासीपुत्र, अनार्य म्हणून आर्य परंपरेने त्याला नरकासूर केला. पुढे तो आर्यानाही जुमानेना. म्हणून श्रीकृष्णाने सत्यभामेच्या करवी त्याचा वध केला. ती तिथी नरकचतुर्दशी म्हणून ओळखली जाते.

दिवाळीतील गुराख्याची गाणी महत्त्वाची नाहीत पण त्याच्या शेवटी येणारी 'इडा पीडा जाऊ दे, बळीचे राज्य येऊ दे' ही प्रार्थना महत्त्वाची आहे. समूहमनाचा आविष्कार लोकगीतातून होतो आणि परंपरेने टीकून राहातो. म. गांधीनी रामराज्याची, रामदासांनी आनंदभुवनाची, शिवाजी महाराजांनी स्वराज्याची,

मार्क्सने कामगाराच्या राज्याची कल्पना मांडली. पण आमचा कुणबी-कष्टकरी 'बळीचे राज्य येऊ दे' अशीच प्रार्थना करतो आहे हा बळी कोण?

बळी हा अनार्य परंपरेतील महाबलाढ्य राजा. भक्त प्रल्हादाचा नातू. विरेचनाचा पुत्र. त्याने उग्र तपश्चर्या करुन सामर्थ्य मिळविले. इंद्राला हरवून स्वर्ग जिंकला. इंद्राची संपत्ती लुटून नेताना समुद्रात पडली. ती समुद्रमंथन करून काढण्यासाठी बळीने देवाला मदत केली पण समुद्रमंथनातून निघालेले अमृत (संपत्ती) देवांनी हडप केली. बळीराजाला फसविले. हा बळी सर्वगुण संपन्न राजा होता. परमउदार, शूरवीर, पराक्रमी, तेजस्वी, सहिष्णु, गुणग्राहक, मृदूभाषी, सत्यवक्ता, सत्यशाली, प्रजाहितदक्ष, ज्ञानग्राहक, लोककल्याणकारी राज्य चालविणारा राजा होता. त्याने विश्वजय व अश्वमेघ यज्ञ केला. या यज्ञात बटू वामनाने बळीच्या दातृत्वाची व कर्तृत्वाची प्रशंसा केली. त्रिपाद भूमीची मागणी केली. बळी राजाला फसविले. संजीवनी विद्याप्राप्त असलेल्या शुक्राचार्याने वामनाचे कपट ओळखून त्याला विरोध केला. पण दानशूर बळीराजाने त्याचे न ऐकता दान दिले. वामनाने विराट रूप धारण करुन एका पायात पृथ्वी, दुसऱ्या पायात स्वर्ग आक्रमण केला. तिसरा पाय ठेवण्यासाठी नम्रपणे बळीराजाने आपले मस्तक पुढे केले. वामनाने त्याला पाताळात घातले. म्हणजे सुतला येथे दक्षिण भारतात त्याला पाठवून दिले. केरळात आजही 'ओणाय' हा बळीराजाचा उत्सव अपार आदराने साजरा केला जातो. महाराष्ट्रातही 'बळीचे राज्य येवो.' ही प्रार्थना केली जाते. 'बळीचे राज्य' हे लोककल्याणकारी राज्य होते. शेतकऱ्यांचा दोन हजार वर्षाचा अनुभव 'राज्यकर्ते लुटारू असतात.' असा आहे. शिवाजी महाराजांचा अपवाद सोडला तर लोककल्याणकारी राज्य झाले नाही. म्हणून लोकमानस आजही 'बळीचे राज्य येऊ दे' अशी बलिप्रतिपदेला प्रार्थना करते आहे.

❐❐❐

# ओवाळीते भाऊराया

लोकगीते म्हणजे लोकसंस्कृतीचा आरसा. लोकजीवनाचे संपूर्ण प्रतिबिंब लोकगीतातून पडलेले दिसते. लोकांच्या चालीरीती, नातीगोती, सणसमारंभ, श्रद्धानिष्ठ, सुखदुःखांचे प्रसंग या सर्वांना लोककलावंतानी लोकगीतातून शब्दबद्ध केले आहे.

दिवाळीचा सण सर्व सणात मोठा आणि महत्त्वाचा. त्यातील भाऊबीज स्त्रियांच्या दृष्टिने अधिक महत्त्वाची. भाऊबीज म्हणजे बहिण-भावाच्या उदात्त प्रेमाचे प्रतीक. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य. एखाद्याची पत्नी होणं सोपं आहे पण एखाद्याची बहीण होणं अवघड आहे असं कुणीतरी म्हटले आहे. बहीण-भावाचे नाते जसे रक्ताचे असते तसे मानलेलंही असते. रक्षाबंधनाला बहीण भावाला राखी बांधते. भाऊबीजेला बहीण भावाला ओवाळीते आणि भाऊ ओवाळणी घालतो. या प्रसंगातून हे भावबंध अधिक दृढ केले जातात.

दसरा उजाडला की, नवीन सासुरवाशीण स्त्रियांना माहेरची ओढ लागते. आई बाबाला, भावा-बहिणीला भेटायला तिचा जीव आतूर झालेला असतो. सासरच्या रामरगाड्यातून माहेरी चार दिवस निवांतपणे आनंदाने घालविण्याचा हा काळ. म्हणून 'दिवाळीच्या मुळा लेक आसावली,' असे तुकोबा म्हणतात. दिवाळीच्या अगोदर ती माहेरच्या वाटेकडे डोळे लावून मुराळ्याची वाट बघते.

**आगं सणायामंदी सण । आली दिवाळी दिव्यायाची ॥**
**सासुरवाशिण माझी साळू । वाट बघती मुराळ्याची ॥**
**दिवाळी भाऊबीज । भावा-बहिणीचा सण ॥**
**सावळ्या बंधूराया । येती तुझी आठवण ॥**
**मायबापाला सांगते । बारा सणाला येऊ नका ॥**
**दिवाळी-पंचमीला । सासरी ठेवू नका ॥**
**दसऱ्यापासून । हाय दिवाळी इसरोज ॥**
**हावशा बंधूजीची । वाट पाहाती नीतरोज ॥**
**बाई दिवाळी दसरा । माझ्या जीवाला आसरा ॥**
**आग बंधूजीला ओवाळायला । सण नाही दुसरा ॥**
**उचकी लागली । मला उचकीचा दाखला ॥**
**हावशा बंधू माझा । वाट चालतू एकला ॥**
**दुरुन वळखिला । माझा भाऊ व्हय का नव्हं ॥**
**हावशा माझ्या बंधूजीला । शेल्या संबल्याची सव ॥**

असा मुराळी भाऊराया येतो. तिचे मन आनंदाने भरुन येते. रांजणातलं पाणी तांब्याने देऊन ती त्याचे हसतमुखाने स्वागत करते. सोप्यात आकड्याचे जेन बसायला टाकते. केंव्हा निघाला होता याची चौकशी करते. ख्याली-खुशाली विचारते. आपलं सगळं सुगरणपण पणाला लावून पंचपक्वान्नाचं जेवण करते. मस्त जेवण झाल्यावर 'वीसाची चंची, तीसचं पान, लवंगा दोन, जायफळ छान' अशी बंधूजीचे पानखाणे होते.

अनुक्रमणिका

**गुज बोलताना । चंद्र माळीच्या आड झाला ॥**
**नाही गुजाचा झाडा झाला । चंद्र दमूनी पार गेला ॥**

बहीण – भावाचे हितगुज होते. दुसरे दिवशी सासू-सासरा व कंथाची परवानगी काढून लेक माहेरी येते.

बघता बघता दिस सरून जातात. फटाक्याच्या धुमधडाक्यात दिवाळी सुरू होते. धनत्रयोदशीला दीपोत्सव सुरू होतो. दिवाळीचे पहिले अभ्यंगस्नान होते. मग नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा होतो आणि भाऊबीज येते. चंदनाचा पाट, चांदीचं घंगाळ, हंडा हंडा गुलाब जल, सोन्याची निरांजन असा श्रीमंती थाटमाट गाण्यात येतो. पण सामान्याच्या वास्तव जीवनात तो नसल्याने तो सोडून देऊ.

**दिवाळीचा दीवा । जळतो न्हानी नीट ॥**
**बहीण भावाला । लावी पीठ ॥**
**दिवाळीचा दिवा। वाऱ्यानं झौका खातू ॥**
**मामाशेजारी भाचा न्हातू ॥**
**दिवाळीचा दीवा । ओवाळीते कणकीचा ॥**
**माझ्या गवळण बाईचा । पुत्र ओवाळीला जानकीचा ॥**
**दिवाळीचा दीवा । ओवाळीते बाप लेका ॥**
**बंधुजीला सांगते । माझी हक्काची चोळी टाका ॥**
**दिवाळीची चोळी । भाऊबीजेचं लुगडं ॥**
**हावशा बंधूराजा । बाकी राहिली तुझ्याकडं ॥**
**भावानं भाऊबीज । नाही कुणाला कळू दिली ॥**
**हावशा माझ्या बंधवानं । मला पैठण नेसवली ॥**
**माहेर मला केलं । पाचशे हजार गेलं सहज ॥**
**जरीच्या पदराचं । माज्या पाठीला झालं वझं ॥**
**केली बहिणीला भाऊबीज । नाही भावाचं उणं होतं ॥**
**झरा थापला पाणी येतं ॥**
**अगं बहीण भावंडाची । पोटामंदी किती माया ॥**
**असं फोडिल सीताफळ । त्याची साखरेची सया ॥**
**ओवाळीते जीव। भाऊराया तुझ्यावरी ॥**
**पवित्र माया गंगेपरी । असू दे अंतरी ॥**

कशी आहे वेड्या बहिणीची वेडी माया! भावनेने आथंबून वाहणारी. गरिबीतील मनाची श्रीमंती. सुगंधी उठणं असंल तर ठीकच नाही तर पीठानं घासून तेलाने चोळून साबणानं ती भावाला अंघोळ घालते. भावाबरोबर मुलगा न्हाला तर तिला किती कौतुक वाटते. कणकीच्या दिव्याने ती बाप-लेकाला ओवाळते. चोळी लुगड्याच्या भाऊबीजेचा हक्क सांगते. हट्ट धरते. नाही तरी तिने आपल्या माणसाशिवाय हट्ट तरी कोणाकडे करावा. भावाने कुणाला कळू न देता तिची अपेक्षा नसताना पैठण नेसवली तर तिचे अंतःकरण भरुन येते. भावाचे किती कौतुक, किती प्रेम आणि माया. केवळ बहिणच करू जाणे!

अनुक्रमणिका

भाऊबीजे संबंधीचे सांस्कृतिक भावविश्व इतरत्र क्वचितच पाहायला मिळते. माहेरची ओढ, भावाची प्रतिक्षा, भावा-बहिणीचे प्रेम, सासुरवासाचा निःशब्दपणे केलेला स्वीकार, माहेरी अनुभवलेला मुक्त जीवनाचा निर्भय आनंद हे सारे विलोभनीय भावविश्व लोकगीतातूनच प्रगट होते. अभिजनाच्या साहित्यातही जे इतक्या ताकदीने व्यक्त झालेले नाही.

❒❒❒

अनुक्रमणिका

# तुळशीबाईचं लगीन

चराचराशी एकरुप होऊन निसर्गाच्या सहवासात जगण्याची लोकमानसाची प्रवृत्ती असते. चराचर सृष्टीत परमेश्वर भरुन राहिला आहे. हे भारतीय तत्त्वज्ञानाचे सूत्र लोकसंस्कृतीत खोलवर रुजले आहे. पवित्र गोष्टीची श्रद्धा आणि आचार याची व्यवस्था म्हणजे धर्म असे एमिल दूरखाईम म्हणतो. अनेक वस्तू, पशूपक्षी, प्राणी आणि वनस्पती यांना पवित्र मानून लोकसंस्कृतीचा विविधरंगी गोफ विणला आहे. श्रीफळ, सुपारी, हळकुंड, पाने, खारीक, खोबरे या पूजेतील वस्तू पवित्र. देवांची वाहने नंदी, उंदीर, कुत्रे, हत्ती, घोडा, गाय, गरुड, मोर हे पशुपक्षी पवित्र. प्रत्येक दैवत परिवारात एखादी वनस्पती वा वृक्ष महत्त्वाचा. महादेवाला बेल, जोतीबाला दवणा, गणपतीला हराळी, हरितालिकेला तेरडा लागतोच. दसऱ्याला आपटा-सौंदड, दत्तपूजेत औदुंबर, वटसावित्रीला वड, ज्ञानेश्वर माऊलीचा सोन्याचा पिंपळ हे वृक्षही त्या त्या वेळी पूजनीय.

वैष्णव पंथी भागवत-वारकरी संप्रदायात तुळशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मंदिरातच नव्हे तर मराठी माणसाच्या घराघरात लावली जाणारी ही वनस्पती. औषधी गुणधर्माची तर आहेच पण पवित्रही आहे. पुराणात आणि लोकसाहित्यात तिच्या अनेक कथा मिळतात. त्यातून एक पतिव्रता, भक्त आणि विष्णुची प्रिया अशी तिची प्रतिमा उभी राहाते.

प्रत्येक हिंदूच्या दारात तुळशीचे वृंदावन असते. स्त्रिया तुळशीची पूजा करतात. सकाळी अंगण झाडून, सडासंमार्जन करुन रांगोळी घालतात. आंघोळी अष्टांन झाल्यावर तुळशीला पाणी घालतात. प्रदक्षिणा घालून पूजा करतात. मराठी स्त्रीचा हा नित्यनेम.

**ज्या नारी तुळशीपूजन करिती । त्या सदा सौभाग्यवती होती**
**पुत्र, पौत्र संपत्ती । होय तुळशीपूजने ॥**

असे महात्म्य. तुळशीला केलेला नमस्कार सर्व देवाला पोहोचतो. पुष्कळ जपतप, यज्ञयाग, व्रतवैकल्ये केल्याचे पुण्य लाभते. अशी समजूत. 'तुळशी वृंदावन म्हणजे अंगणातील काशी,' 'जेथे तुळशीचे पान तेथे वसे नारायण' वारकरी संतानी रुजवलेली तुळशीची भक्ती जनमानस निष्ठेने करते.

**तुळस माऊली । नको हिंडूस रानाईत ॥**
**जागा देते मी अंगणात ॥**
**माझ्या अंगणात बाई । तुळशीला करा कट्टा ।**
**पाप गेलं चारी वाटा ॥**
**माझ्या अंगणात ॥ तुळशीबाईचा चवरंग ॥**
**तिच्या दर्शनाला ॥ वाड्या येत्याल पांडुरंग ॥**

रानावनातील तुळस वृंदावन करुन अंगणात लावली व तिची पूजाअर्चा केली तर पाप नाहीसे होऊन पांडुरंगाचे दर्शन होईल अशी भोळ्याभाबड्या स्त्रियांची श्रद्धा आहे. त्या संबंधी आचारधर्म असा.

**सकाळच्या पारी । राम म्हणत उठावं ॥**

अनुक्रमणिका

**मग तुळशीला भेटावं ॥**
**सकाळच्या पारी । तोंड बघावं गायीचं ॥**
**दारी तुळशीबाईचं ॥**
**सकाळच्या पारी । तुळशी कडनी माझी वाट ॥**
**हावशा माझा बंधू । मला शिकवी हरिपाठ ॥**
**तुळशीला घाली पाणी । बाई तुळशी खाली झरा ॥**
**बया माझ्या मालनीचा । पतिव्रतेचा नेम खरा ॥**
**सकाळी उठोनी । हात चौकटी बाईला ॥**
**तुळशीच्या कट्यावरी । राम निश्चल पाहिला ॥**
**सकाळच्या पारी । तुळशी कडनी माझा धावा ॥**
**जाती पंढरीच्या देवा ॥**

वारकरी स्त्रिया वारीला जाताना डोक्यावर पितळेचे तुळशी वृंदावन घेऊन जातात. तुळशीच्या पाना-फुलावरुन ओव्या म्हणतात. त्यामुळे पाप नाहीसे होते. पुण्य मिळते. विठ्ठलाचे दर्शन घडते अशी त्यांची श्रद्धा असते.

**पंढरीला जाती । संग नेती मी आईबापाला ।**
**पाणी तुळशीच्या रोपाला ॥**
**पंढरपूरची शेत । दामू बेदल्यानं केली ॥**
**तुळशीची रोप । बीन पेरता उगवली ॥**
**पंढरपूरला जाती । संग माझ्या शिणच्या गडयणी ॥**
**तुळशीची रोप । चंद्रभागेच्या कडयनी ॥**
**पंढरपूरात सगळी पंढरी हिरवी गार ॥**
**तुळशी बनाला आला बहार ॥**

पंढरीचा विठ्ठल महाराष्ट्राचा लोकदेव. विष्णु-कृष्णाचा अवतार. तो कुणाचा कुळस्वामी नाही. कुणाच्या देव्हाऱ्यात नाही. तो वारकऱ्यांच्या हृदयात असतो. गरीबांचा देव. त्याला नैवद्य नारळही लागत नाही. तुळशीची माळ आणि अबीर-बुक्यावर तो खूष असतो. त्याच्या पुजेत तुळसीला फार महत्त्व.

**तुळशीच्या माळा । एक बैलाचं वज्झं ॥**
**सावळ्या पांडुरंगा । तालेवारा लेणं तुझं ॥**
**तुळस पतिव्रता । वाळोनी झाली जुनी ॥**
**देवा माझ्या विठ्ठलानं । त्यांन माळला केलं मणी ॥**
**पंढरीचा देव । नाही कुणाला लागत ॥**
**सावळ्या पांडुरंगाला । माळ बुक्याची आगईत ॥**
**तुळशीच्या माळा । माळा पैशाला येत्या इस ॥**
**सावळ्या पांडुरंगा । गळ्या घालती खाली बस ॥**

अनुक्रमणिका

तुळशीची पांडुरंगाला आवड. म्हणून रुक्मिणीच्या मनात जनाबाईप्रमाणे तिच्याविषयी मत्सर मग सवतीचे भांडण. रुक्मिणी तिचे खूप उणंदुणं काढते. तुळशी वाटेवरले रोप. बुडाला काळी माती. तशी रंगानं काळी. नीट नाकडोळेही नाहीत. आई बाप, गणगोत नसलेली पोरकी. का ग तुळशी वाटला । तुझ्या मंजुळानं माझा पदर फाटला. नुसता पदरच नाही सारा संसार फाटला. म्हणून रुक्मिणीच्या मनात राग. यावर

**तुळसबाई बोलं । नको रुक्मिणी बोलू मधी ॥**
**लेला मंजुळा कंठी । तुझ्या स्वयंवराच्या आधी ॥**
**तुळस बाई बोलं । रुक्मिणी कशानं थोर ॥**
**लेला मंजुळाचा हार । मग लागलं स्वयंवर ॥**

देवतांचे मानुषीकरण करून त्यातून साधलेला हा भावाविष्कार. ज्याला कुणी नाही अशा पोरक्या, असाह्य, अगतिक, गरीब माणसाच्या बाजूने नेहमी लोकमानसाची सहानुभूती असते म्हणून रुक्मिणी पट्टराणी असूनही तिच्यापेक्षा तुळशीला लोकमानसात अधिक स्थान आहे.

अशा तुळशीचा दरवर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीला कृष्णाशी/पांडुरंगाशी विवाह लागतो. तुळशी वृंदावन सारवून सुशोभित करतात. वृंदावनात ऊस व झेंडूचे झाड उभे करतात. आवळा व चिंच ठेवून गोरज मुहुर्तावर बाळकृष्णाच्या प्रतिमेशी विवाह लावतात. हळदी, मंत्र, आंतरपाठ, मंगळाष्टका असा सर्व विवाहविधी असतो.

**तुळशीच्या माळा । कोण करतो लव्हलायी ॥**
**लगीन लावायाला । देव गोविंद आला पायी ॥**

तुळशी, पोरकी, तिला कुणी नाही. म्हणून लोकच तिचे कन्यादान करुन देतात. जमलेल्या मंडळीना चिरमुरे-डाळे यांचा प्रसाद वाटतात. तुळशीची पाने देवाच्या अंगाला लावून अंगसंग घडवितात. तरीही

**रुक्मिण बाई बोलं । देव विठ्ठल येडा बाण ॥**
**तुळसी बाईशी । वर्षा लावतो लगीन ॥**

आपण एवढी पतिव्रता असून देवाशी वर्षाला लगीन लावून दुय्यम ठरतो याची खंत तुळशीच्या मनात असते.

**तुळस बाई बोलं । माझा कशाचा जलम ॥**
**मंदी सावळा जामीयीन । वर्षा लावता लगीन ॥**

❒❒❒

अनुक्रमणिका

# इंद्रायणीकाठी सोन्याचा पिंपळ

वारकरी संप्रदायात पंढरीची वारी देवाची आणि आंळदी-देहूची वारी संताची मानली जाते. ज्ञानेश्वरांनी सुमारे सातशे वर्षापूर्वी कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदी येथे समाधी घेतली. यावेळी आळंदीस मोठी यात्रा भरते. टाळ मृदुंगाच्या गजराने, विठ्ठलाच्या नामस्मरणाने, 'पुंडलीक वरदा हरी विठ्ठल, श्री. ज्ञानदेव तुकाराम' या महामंत्राने सारी आळंदी गाजत असते.

**चला आळंदीला जाऊ । ज्ञानदेवा डोळा पाहू ॥**
**होतील संताचिया भेटी । सुखाचिया सांगू गोष्टी ॥**

हे तुकारामांचे सांगणे लोक या यात्रेला जाऊन अंमलात आणतात. लोकगीतातूनही या तीर्थक्षेत्राचे आणि संत ज्ञानेश्वरांचे माहात्म्य येते. ज्ञानेश्वरांनी संस्कृतच्या साखळदंडात अडकलेले ज्ञान बहुजन समाजासाठी मराठीत आणले. गीतेवर मराठीत भावार्थ दीपिका लिहिली. सामान्यांच्या भोळ्या भाबड्या भक्तीला ज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करुन दिले. भक्ती डोळस बनविली. सामान्य माणसाला उद्धरुन जाण्यासाठी सोपा भक्तिमार्ग सांगितला. स्वर्गाला शिडी लावली. कुळ, जाती, वर्ण यांचे श्रेष्ठत्व भक्तिमार्गात उपयोगी नाही असे सांगून व्यक्तिनिष्ठ भक्तीला लोकसंग्रहाची जोड दिली. मराठी संस्कृती, साहित्य आणि वारकरी (भक्तिमार्गी) संप्रदायाचा पाया घातला. लोकजीवनात ज्ञानेश्वर माऊलीबद्दल कमालीची कृतज्ञता आहे.

आळंदीबद्दल जात्यावरच्या ओव्या अशा

**सोन्याचा पिंपळ । नाही कुणाच्या गावाला ॥**
**आळंदीचे वतन । दिलं ज्ञानोबा रायाला ॥**
**आळंदी वसईली । माळ मैदान पाहुयांनी ॥**
**देव ज्ञानोबा नांदे । कळस सोन्याचा लाऊयानी ॥**
**आळंदी माळावरी । पताका पांढयरी ॥**
**बीन पापाची लांडोयरी ॥**
**आळंदी माळावरी । पताका जरीईची ॥**
**दिंडी आळंदी करायाची ॥**

इंद्रायणी काठी वसलेली. द्वारी सोन्याचा पिंपळ असलेले माऊलीचे समाधीस्थान आळंदी. आळंदी वरील या ओव्यातून केलेले वर्णन कल्पनाचित्राचे एक उत्तम उदाहरण आहे. मोर नाचतो त्याच्या घामाचे बिंदू पिऊन लांडोरी अंडी घालते म्हणून ती बीन पापाची, तसेचज्ञानेश्वरादी भावंडे अखंड ब्रह्मचारी, योगी, पवित्र, विशुद्ध संसारी माणसाला त्याचे कौतुक वाटते. स्त्री पुरुषसंबंधाशिवाय निर्माण झालेला पुत्र, नारीचा वारा नसलेला मारूती ब्रह्मचारी, कनकवार म्हाकूबाई याबद्दल लोकमानसात आदरभाव असतो.

मुक्ताबाई ज्ञानेश्वरांची लहान बहीण. बहीण भावंडाचे नाते मराठी स्त्रीच्या अनुभवाचे. मग ती या संबंधाने ओवी गाते –

**चला सयानू पाहू । आळंदी बावनी ॥**
**ज्ञानोबा शेजारी । मुक्ताई चांदणी ॥**
**आळंदीच्या वाटं । देव ज्ञानुबा एकईला ॥**
**मुक्ताबाई बोलं । दादा अभंग चुकईला ॥**
**वीसबंदाची रोप । मुक्ताबाईच्या पदरात ॥**
**ज्ञानोबा रायाला । दिष्ट झाली आळंदी बाजारात ॥**
**आळंदीच्या माळावर । वीसबंदाची बादशाही ॥**
**ज्ञानोबा रायाची । दिष्ट काढते मुक्ताबाई ॥**
**आळंदी माळावरी । तिथं बुक्याची झाली दाटी ॥**
**ज्ञानोबा-निवरती । मुक्ताबाईची भरी ओटी ॥**

समर्थ भावाशेजारी मुक्ताबाई चांदणीसारखी शोभा देते. ताटीच्या अभंगात अभिमान सोडून मोठ्या मनाने व भूतदयेने लोकांचे अपराध पोटात घ्यावेत. जग बोलणे सोसावे. 'विश्व झालीया वन्ही । संतसुखे व्हावे पाणी' असा ज्ञानेश्वराना उपदेश करणाऱ्या मुक्ताबाईने 'दादा अभंग चुकला, अशी चूक दाखविली तर त्यात वावगे काहीच नाही. वीसबंदाचे एक रोप असते. ज्ञानेश्वर हे दृष्ट लागण्यासारखेच बाळ होते. मुक्ताई त्यांची दृष्ट काढते. आळंदीच्या यात्रेला स्वतः विठ्ठल रुक्मिणी येतात.

**विठ्ठल घोड्यावरी । आई रुक्मिणी मोरावरी ।**
**दोघांची गेली स्वारी । आळंदी शहरावरी ॥**

संसारी विठ्ठल कधी कधी एकटाच जातो. 'सावळा पांडुरंग विठू आळंदी बाजारात' समाधीच्या प्रसंगी प्रत्यक्ष विठ्ठल-रुक्मिणी हजर होती असे नामदेव सांगतात.

आषाढी वारीला ज्ञानेश्वर माऊलीची दिंडी पंढरीला येते. हा पालखीसोहळा आता सर्वपरिचित आहे.

**ज्ञानोबा पालखीत ॥ तुकाराम घोड्यावरी ॥**
**दोघांच्या झाल्या भेटी । वाखरीच्या वढ्यावरी ॥**
**ज्ञानोबाच्या पालखीत । वारकरी आलं लई ॥**
**विठ्ठल देव बोलं । ऊठ रुक्मिणी कर घाई ॥**
**विठ्ठल देव बोलं । आण रुक्मिणी माझी बंडी ॥**
**आळंदीची आली दिंडी । उभी राऊळाच्या तोंडी ॥**
**संताच्या फडावरी । टाळ वाजतो चढुयानी ॥**
**सावळा पांडुरंग । आला राऊळ सोडूयानी ॥**

असे ज्ञानेश्वरांच्या पालखीचे स्वागत प्रत्यक्ष विठ्ठल करतात. यातला सांसारिक भाव पाहण्यासारखा आहे-

**आषाढी वारी । भरली आळो आळी ॥**
**ज्ञानोबा तिचा बंधू । घेतो मुक्ताईला साडीचोळी ॥**

एखाद्या यात्रेत भावाने बहिणीला साडी चोळी घ्यावी तसा हा प्रसंग आहे. आपलेच अनुभव, मनोभाव देवादिकांच्या माध्यमातून लोकगीतातून व्यक्त केले जातात. स्त्रिया स्वतःच्या कल्पनेने निवेदनात रंग भरतात. त्यात त्यांच्या भक्तीचे भावविश्व येते. आपल्याच जगण्यातल्या गोष्टी देवादिकांच्या जीवनात त्या कल्पनेने समाविष्ट करतात. म्हणून त्यांचा विठोबा बंडी घालतो. खांद्यावर घोंगडे घेतो.

ज्ञानेश्वरांचे चरित्र व कार्य लोकगीतातून येत नाही. मात्र रेड्यामुखी वेद वदविणे, भिंत चालवणे हे चमत्कारिक प्रसंग भोळ्याभाबड्या लोकमानसाला अधिक भावतात.

**वाघावरी बसूनी । चांगदेव आला भेटी ॥**
**ज्ञानोबा रायानं । अग चालविल्या भिंती ॥**
**चांगदेवाचं पत्र । कोरा कागद केली घडी ॥**
**देती उत्तर ज्ञानोबा । लाभे मोक्षाची पैलथडी ॥**
**आळंदी वसयली । इंद्रायणीच्या गाळायनी ॥**
**जित समाधी घेतली । एकवीस वर्षाच्या बाळाईनी ॥**

ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाने संसारिकांना पैलथडी गाठणे सोपे झाले. एखाद्या मानवी कर्तृत्वाला परंपरागत लोकगीतातून स्थान मिळणे कठीणच असते. हे भाग्य महाराष्ट्रात केवळ ज्ञानोबा-तुकोबासारख्या संतानाच प्राप्त झालेआहे.

❒❒❒

# एवढी कारंडी मायबाई

माणदेशात धनगर समाज फार. आदिवासी समाजासारखी त्यांची दैवतेही वेगळी. ढालगावचा बिरूबा, चिंचणीची मायाक्का, हुलजंतीचा म्हाळींकराय, फलटण व म्हसवड्या धुळदेव ही मूळची लोकदैवते. त्यांच्या उपासनापद्धती वेगळ्या आहेत. चिंचणीच्या म्हाकूबाईचे भक्त माणदेशात मोठ्या प्रमाणात आहेत. माघ महिन्याच्या कृष्णपक्षात पंचमीला मायाक्का देवीची चिंचणीला मोठी यात्रा भरते. माणदेशातील अनेक लोक या यात्रेला जातात. जाताना व येताना स्त्रिया ओव्या म्हणतात. आज माणदेशात सर्वाधिक ओव्या याच देवीच्या म्हटल्या जातात. सांगोले तालुक्यातील लोटेवाडी (सातारकरवस्ती) येथील भगवान केरू करांडे यांनी मायाबाईच्या गाण्यावरील एक पुस्तकच प्रसिद्ध केले आहे.

प्रत्येक गावात म्हाकूबाईचे पुजारी आणि भक्तीणी आहेत. माणूस आजारी पडला, दुःख झाली, असाध्य रोग असला, पोरंबाळ नसली किंवा संसारात काय हिकडंतिकडं असलं तर माणूस या पुजाऱ्याकडे जातो. पुजाऱ्याच्या अंगात देवी येते. निवदबोण कर. पाच ऐतवार कर, काचुळी घालून वारी माग, सवाष्णी घाल, दूध घाल, लिंबानं भेटीला ये असा काही ना काही उतारा काढून दिला जातो. तो आपण पत्करला आणि गुण आला की मायीबाई घरला आली असे मानले जाते.

**आली आली या मायबाई । आली बीन या सांगाव्याची ॥**
**ह्या का कारंड्या मायवाला । झाली आठवण भगताची ॥**

अशी पाच नवी घरं दरवर्षी देवी घेते. आणि भक्तगण वाढत जातो. मग देवीच्या नावाने रविवारी उपास केले जातात.

**आठा दिसाच्या ऐतवारी । मी करती साखरंच उंड ॥**
**कारंडी मायबाई । राधा वारीला हिंड ॥**
**कारंडी लेणं लेती । काळी काचूळी पिवळी बाजू ॥**
**कारंड्या मायव्याची । वारी मागाय नका लाजू ॥**

देवीला विटाळ भाईरवासा चालत नाही. ऐतवारी ओल्या पडद्याने पाणी घालतात. दिवसभर कडक उपास करतात. अंबाबाईचा जोगवा असतो तशा प्रकारे काळी काचूळी घालून पाचघरी वारी मागावी लागते. काचूळी म्हणजे देवीची चोळी. त्यावर दरबार कोरलेला असतो. वारीत मिळालेली भाकरी उपवास सोडताना खावी अशी पद्धती आहे. 'भिक्षा माझे राज्य की गा बाई' असे चक्रधर स्वामींनी म्हटले आहे.

ज्येष्ठ श्रावणात मायीबाईच्या सवाष्णी असतात. दसऱ्याला जशी धुणीभांडी करुन स्वच्छता करतात तशी स्वच्छता करावी लागते. भंडारा व कुंकू लावून पाच सवाष्णी, दोन गण आणि सासण म्हणजे ढोल आणि कैताळ सांगितले जाते. गण-सुवासनींनी दिवसभर उपवास करायचा असतो. गवताराने शुद्धता करुन ढोल कैताळाच्या गजरात पूजा आरती केली जाते.

**आठा दिसांच्या ऐतवारी । मला गवतार मिळना ॥**
**कारंडी मायबाई । मला गादीला वळना ॥**

अनुक्रमणिका

**कारंडी मायबाई । तुझं कारंडं कळना ॥**
**आली खळीला वळना ॥**

यावेळी पुजारी पुजारणीच्या अंगात येते. चुकल वाकलं तर सांगितले जाते. नंतर गण सवाष्णीला जेऊ घालतात. भरल्या सवाष्णी असतील तर पाच पोळ्या ओटीला घालतात.

**मायबाईच्या सवासिनी । त्यांच्या फराळी देती केळं ॥**
**कारंडी मायबाई । लाडी जेवली निर्मळ ॥**

सवाष्णीच्या रूपाने मायबाई जेवते अशी समजूत आहे. काही घरातून वर्षाला नेमाच्या सवाष्णी असतात.

दूध घालण्याचा एक प्रकार असतो. इतर दैवत पूजेत हा प्रकार आढळत नाही. 'मायबाईचं एवढं दूध! तीन ताळात नाही कुट ।' ते नवसाने घालतात. त्याचं सतपण जास्त. महिनाभर सोवळ्याने गोवऱ्या लावतात वा जमा करून ठेवतात. दसऱ्यासारखी स्वच्छता करतात. अगोदर दोन दिवस नवीन तीन डेरे आणून पुजतात. आदल्या दिवशी ज्वारी जाड दळून वा कुढून घेतात. त्याला इरडं घालणं म्हणतात. दुधाच्या दिवशी चर काढून त्याची पूजा करुन दूध गोवऱ्यावर शिजवतात. दुसरे दिवशी नाचणीचं पीठ घालून वैरतात ते उतू येते. थंड झाल्यावर पूजा करून सवाष्णी, गण जेवू घालतात.

**दुधाच्या डेऱ्यावरी । वर भंडाऱ्याची शाई ॥**
**कणकवार म्हाकूबाई ॥**

कणकवार म्हणजे पाळी न आलेली, लग्न न झालेली, पुरुषाचा वारा न लागलेली. दूध घालताना सर्व गोष्टी व्यवस्थित व्हाव्या लागतात. शिवताशिवत झाली तर मोठी चूक झाली असे मानण्यात येते. लाडी चुकीला क्षमा करत नाही. देवी कडक 'हिरव्या पिठाला आणि कडं' अशी. त्यामुळे पुजारी सांगेल ते पुन्हा करावे लागते. दुधाचे सतपण मोठे.

**मायाबाईचं एवढं दुध । महिमा दुधाचा लई थोर ॥**
**कारंड्या मायव्वाच्या । सतपणाला लई जोर ॥**

वर्षभर देवीची पूजाअर्चा चालू असते. पौर्णिमा रविवारी देवीला निवदबोण होते. गावात मायबाईचं मंदिर असेल तर ढौलकैताळा बरोबर वाजवत निवदबोण देवीला नेलं जाते. पुजारी व भक्तीणीच्या अंगात येते. हा प्रकार माणदेशात आजही हरघडी पाहायला मिळतो.

कर्नाटकात चिंचणीला मायाक्काचे मुख्य ठाणके आहे. तिथे देवीचे भव्य मंदिर आहे.

**चिंचणी एवढं नगर । वाण्या उदम्याचं गाव ॥**
**तिथं धनगराचा देव ॥**
**कृष्णा कोयनाच्या वताला । कोण तांब्याच्या घागरीची ॥**

अनुक्रमणिका

**कारंडी एवढी मायबाई । वाणीनं चिंचणी नगराची ॥**
**कांरडी एवढी मायबाई । सोप्या माळीला येती ॥**
**भोळ्या भक्ताची । वाट पाहाती ॥**

सहाजिकच हजारो भक्त दरवर्षी यात्रेला जातात.

**मायबाईला औंदा । जायायाचं माझं नव्हतं मन ॥**
**माझ्या कारंड्या लाडीयीनं । चिठ्ठ्या धाडल्या दोन ॥**

पूर्वी यात्रेला बैलगाडीने जात. अलीकडे स्वतंत्र एस.टी बस किंवा जीपगाड्या करुन जातात. कृष्णा नदीवर किंवा हल्लाळबाई नदीवर लिंब घेतात. आंघोळ केल्यावर नवीन कपडा परीधान करुन कमरेभोवती लिंबाचे डहाळे बांधतात.

**ह्या ग चिंचणी गावामंदी । लिंबाचं झालं सोनं ॥**
**कारंड्या मायव्वाचं । माझ्या लाडीचं हाय लेणं ॥**
**कृष्णा कोयना ॥ मला दिसत्यात ख्वाल ख्वाल ॥**
**कारंड्या मायव्वाचा । लिंब नेखून हळू चाल ॥**

पाच दगडाचे देव मांडून पूजा करतात. पाच प्रदक्षिणा घालतात. 'चांगभलं' गाजवतात. नदीत लिंब धुतात. मार्गस्थ झाल्यावर विसाव्यापाशी थांबतात.

**विसाव्या पसनं । मायबाईची दिसे न्हाणी ॥**
**कारंडी मायबाई । शिंगू-बैरुला घाली पाणी ॥**

शिंगरुबा व बिरुबा हे मायव्वाचे दोन लहान भाऊ आहेत अशी लोकमानसाची समजूत आहे. यात्रेत गेल्यावर प्रथम देवीच्या भेटीला (दर्शनाला) जातात. प्रत्येक माणसाचा व जनावराचा एक नारळ फोडतात. दुसरे दिवशी हल्लाळबाईवर स्नान करुन पुरणपोळ्याचा नैवेद्य करतात. ढोलकैताळाबरोबर वाजवत देवीला नैवेद्य नेतात. त्यावेळी भक्तांच्या अंगात येते. कुणाकुणांचा नवसाचा दंडवट अथवा लोटांगण असते.

**चिंचणी एवढं गाव । मला दिसतं पटांगण ॥**
**नेणंत्या माझ्या साळूचं । ढोलासंगड लोटांगण ॥**
**दंडवटा परास । लोटांगण अवघड ॥**
**हावशा माझा बंधू । वाटचं लोटी खडं ॥**

देवीचे नवस फेडतात. देवदर्शन होते.

**मायबाईच्या पायऱ्या । वळ्या केसानं झाडती ॥**
**नवस राघूचं फेडइती ॥**
**चिंचणी गावामंदी । ढोल कुणी कणकावला ॥**

अनुक्रमणिका

**चुड्या माझ्या राजसानं । देव कारंडा विनवला ॥**
**मायबाई देवळात । उभी राहीली मी अंधारात ॥**
**कारंड्या लाडीयीनं । मोती दिल्यात भंडाऱ्यात ॥**

दुसरे दिवशी यात्रा परत येते.

**मायीबाईचा यात्रेकरी । म्या वळखला माळावरी ॥**
**काळी काचोळी खांद्यावरी ॥**
**मायीबाईचा भंडारा । लेली कपाळ भरुयानी ॥**
**आली चिंचणी केरुयानी ॥**

असे लोकदेव आणि अशी लोकश्रद्धा.

❒❒❒

अनुक्रमणिका

## नांद्रुकीच्या झाडाखाली तुकारामांची झोपडी

'आम्ही जातो आमुच्या गावा' अशी निरोपाची भाषा करीत संत तुकाराम महाराज गेले. त्याला आता साडेतीनशे वर्षे झाली. आपण त्रिशतकोतत्तर सुवर्णमहोत्सवी बीज सारजी केली. पण मला तर ते नुकतेच गेल्यासरखे वाटतात. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असे सामान्य संसारी माणसाचे खडतर जीवन जगून भक्तीच्या बळावर असामान्य झालेले ते श्रेष्ठ संत होते. 'अणू-रेणूहुनी तोकडा तुका आकाशा एवढा' म्हणून त्यांना वारकरी संप्रदायाचा कळस मानतात.

तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे मराठीचे लोकधन. लोकांचे अनुभव, भावना, वृत्ती-प्रवृत्ती त्यांनी आपल्या कवितेत नेमक्या मार्मिक भाषेत मांडल्या. त्यामुळे त्यांचे कितीतरी अभंगचरण आजही लोकांच्या तोंडी आढळतात.

'बुडती हे जन देखवेना डोळा' या भूमिकेने समाजजीवनातील ढोंग, दंभ, पोकळ पांडित्य यावर कठोर प्रहार करुन त्यांचे पितळ उघडे पाडणारे ते श्रेष्ठ समाजसुधारक होते. विद्रोही, बंडखोर कवी होते. मराठी लोकमानसाने आपल्या हृदयाच्या कुपीत जपून ठेवलेली दोन रत्ने म्हणजे ज्ञानोबा-तुकोबा. महाराष्ट्रात असा एकही गाव नाही जिथे भजनात तुकारामाचा अभंग गायिला गेला नाही. त्यामुळे त्यांची अभंगवाणी अजरामर झाली आहे. म्हणून तुकाराम महाराज आता गेल्यासारखे वाटतात.

मराठमोळ्या स्त्रियांनीही ओव्यातून तुकाराम महाराजांचे देहू गाव, त्यांच्या जीवनगाथेला आपल्या पद्धतीने शब्दबद्ध केले आहे. पूर्वीच्या स्त्रियांना घरातील कुणाच्या तरी बरोबर तीर्थयात्रा घडत असे.

**बापा संगट पंढरी । आई संगट आळंदी ॥**
**बंधू संगट देहू । तीर्थ घडली मला सारी ॥**
**पंढरी करुनी । मला देहूला जायाचं ॥**
**शेंडीचं नाऱ्याळ । मला इंद्रायणीत वाहायाचं ॥**
**पंढरी करुनी । गेली देहूला वाकडी ॥**
**नांद्रुकीच्या झाडाखाली । तुकारामांची झोपडी ॥**

'धन्य देहू गाव पुण्य भूमी ठाव' अशी देहूची कीर्ती. कुटुंबियांसमवेत देहूला जाऊन तिथे इंद्रायणीत स्नान करुन शेंडीचे नारळ अर्पण करुन, नांद्रुकीच्या झाडाखालील तुकारामाच्या समाधीचे दर्शन घेते.

संत तुकाराम महाराज पंढरीच्या पांडुरंगाचे निस्सीम भक्त. 'कन्या सासऱ्याशी जाय । मागे परतूनी पाहे' अशी विठ्ठालाच्या भेटीची ओढ त्यांना लागलेली 'पंढरीची वारी आहे माझ्या घरी' असे सांगणारे तुकाराम महाराज वारीला येत असत.

**पंढरपूरामंदी हायती । पताका सोन्यायाची ॥**
**दिंडी आलीया । देहूच्या वाण्यायाची ॥**

तुकाराम महाराज दिंडने येतात. आजही आषाढी वारीला तुकाराम महाराजांची पालखी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसारखी येते.

**आळंदीच्या वाटेनं । येत्यात कोण कोण ॥**
**ज्ञानोबा तुकाराम । सुरतीचं दोघंजन ॥**
**आळंदी वाटनी । हायती पताका पिवयळी ॥**
**ज्ञानोबा तुकोबा । शिण साधूची कवयळी ॥**
**ज्ञानोबा पालखीत । तुकाराम घोड्यावरी ॥**
**दोघांच्या झाल्या भेटी । वाखरीच्या वड्यावरी ॥**
**बाजीरावाच्या हिरीवरी । जोड रुमाल लोळत्याती ॥**
**ज्ञानोबा तुकाराम । साधू रिंगण खेळत्याती ॥**

आषाढी वारीचे वर्णन या ओव्यात आले आहे. वारकरी संप्रदायाने सर्व जातीजमातीला उद्धरुन जाण्याचा अधिकार दिला. माणसाचे मोठेपण त्याच्या धर्म, जात, लिंग, वर्ण, पैसा यावरुन मानले जाणार नाही तर त्याच्या भक्तीवरुन मानले जाईल असा नवा मानदंड निर्माण केला. त्यामुळे ज्ञानोबा, तुकोबा ही जोडी एकसंघ मानली जाते पण जात्यांध लोकांकडून आळंदीतील 'सिद्धबेट' बुलढोझरने उद्ध्वस्त केले जाते. ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीत तुकाराम महाराजांची आरती म्हणायला नकार दिला जातो. 'भूता परस्परे पडो मैत्र जिवांचे' आणि 'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात' असे मानवतावादी पसायदान मागणाऱ्या ज्ञानोबा माऊलीचे अनुयायी इतके संकुचित कसे? आता वारकरी संप्रदायातही जातीयवाद पसरविला जात आहे. माऊलीच्या शब्दात 'जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो' असे आग्रहाने सांगितले पाहिजे.

तुकाराम महाराज वैकुंठाला निघाले, जाताना ते आपली पत्नी जिजाबाईला म्हणाले –

**तुकाराम बोलं । जिजा माझ्या संग चल ॥**
**मागं हुत्याल तुझं हाल ॥**
**तुका वैकुंठाला जातो । जिजा धर माझा विणा ॥**
**मागं कुणाच्या लेकी सूना ॥**
**तुकाया मनी तुका । जीजी इमानात बस ॥**
**घरी दुधाची तान्ही मस ॥ सोडूनी येऊ कसं ॥**
**कोण करील बडदास ॥**

जिजाबाई संसारात रमणारी सामान्य संसारी स्त्री. तिचे मन संसारातून निघत नाही. मग तुकारामातला परखड समाजसुधारक म्हणतो–

**तुकाराम बोलं । ऐशा झाल्या किती बाया ॥**
**जन्मा येऊनी गेल्या वाया ॥**

शेवटी तुकाराम गेले.

अनुक्रमणिका

**तुका मनी तुका । कुणी गेलेला नाही पाहिला ॥**
**नांद्रुकीच्या झाडाखाली । जोडा रेशमी राहिला ॥**

तुकाराम महाराज विमानात बसून स्वर्गात गेले असे सांगितले जाते. पण त्यांच्या मृत्यूविषयी मोठा वाद आहे. अनेक चमत्काराच्या पाठीमागे प्रस्थापितांचे भयाण कारस्थान लपलेले असावे.

एक ओवी तुकारामाच्या कार्यावर प्रकाश टाकणारी आहे.

**तुका वैकुंठाला गेला । जन्मा येऊन त्वा धंदा काय केला ॥**
**तुकाराम बोलं । म्या जित अभंग रचला ॥**

भाषा वेगळी असेल पण आशय असा तुकारामांनी जिवंत, अक्षर अभंग रचना गेली साहजिकच मराठी साहित्य समृद्ध झाले.

लोकसाहित्यातील एखादी ओवी वाट्याला येणेसुद्धा भाग्याचे असते. खेडूत स्त्रिया अशिक्षित. त्यांना अध्यात्म करायचाही अधिकार नाही. त्यात संत, कवी, समाजसुधारक. शिक्षक यांचे काम मानवी मन-बुद्धीचा विकास करण्याचे. लौकिक दृष्टीने पाहणाऱ्याच्या हे नीट लक्षातही येत नाही. त्यामुळे मराठी लोकगीतातून तुकाराम महाराजांची जीवनगाथा स्थूलपणे चित्रित झालेली आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

## जिजामातेच्या पोटी जन्मला हिरा

सध्या जयंत्याचे दिवस आहेत. रामनवमी, हनुमान जयंती झाली. आता आंबेडकर जयंती आणि शिवजयंती येईल. उत्सवप्रिय भारतीय लोकमानस फार प्राचीन काळापासून युगपुरुषाच्या जयंत्या साजऱ्या करीत आले आहे. गोकुळाष्टमी, रामनवमी. दत्तजयंती, बलिप्रतिपदा, नरसिंहजयंती वगैरे. आज कालानुरुप जयंती साजरी करण्याची पद्धती बदलली असली तरी 'युगपुरुषाचे स्मरण करणे' हे सूत्र मात्र कायम आहे.

**शिवरायाचे आठवावे रुप । . . . . आठवावा साक्षेप**
**. . . . आठवावा प्रताप । भूमंडळी ।**

असे समर्थ रामदास का सांगतात? युगपुरुष जन्माला आला की निसर्ग त्याची मूस मोडून टाकतो असे इमर्सनचे प्रसिद्ध वचन आहे. दर पिढीत महापुरुष जन्माला येत नाहीत. त्यामुळे मानवी समाजाला त्या युगपुरुषाच्या जीवनचरित्रात, विचार कार्यात आपल्या जीवनाची वाट चोखाळावी लागते. दिशा शोधावी लागते. म्हणूनच आपण जयंत्या साजऱ्या करतो.

लोकांच्या हृदयसिंहासनावर आरुढ झालेले छ. शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता आहे.

**निश्चयाचा महामेरू । बहुत जनांशी आधारू ॥**
**अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥**
**यशवंत, कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ॥**
**पुण्यवंत, नीतीवंत । जाणता राजा ॥**

असे शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे समर्पक वर्णन समर्थ रामदासांनी केले आहे. मध्यमयुगीन सुलतानी अंधकारात मराठी माणसाच्या अंतःकरणातील आत्मविश्वास जागवून त्यांना आत्मनिर्भर बनविणारे, परकीयांच्या अन्यायाविरुद्ध जनतेला संघटित करुन स्वातंत्र्याच्या आकांक्षा जागविणारे, रयतेच्या कल्याणकारी स्वराज्याची निर्मिती करणारे, छ. शिवाजी महाराज हे महान युगपुरुष होते. दुर्जनाचे कर्दनकाळ, सज्जनाचे रक्षणकर्ते, आपल्या स्वराज्यात स्त्री-शूद्रांना सन्मानाने वागवून धर्मातीत माणसाच्या प्रतिष्ठेची मानवतावादी कल्पना साकार करणारे असामान्य महापुरुष होते.

शिवचरित्रावर पोवाडे-बखरीपासून कथा-कादंबऱ्यापर्यंत विपुल ललित साहित्य निर्मिती झाली आहे. मात्र लोकसाहित्यात त्यांच्यावर लोकगीते वा ओव्या फारशा मिळत नाहीत.. ज्ञानोबा, तुकोबापासून जनाबाई चोखाबापर्यंत लहानसहान संतावर ओव्या आढळतात मात्र लोकांच्या हृदयसिंहासनात वास करणाऱ्या शिवाजी राजांच्यावर ओव्या मिळत नाहीत हे एक कोडेच म्हणावे लागेल. राज्यकर्ते स्त्रीगीताचा विषय होत नाही का? शिवाजी राजांवर स्त्रियांच्या ओव्या नसतील तर इतर कोणत्याही राजकर्त्यावर ओव्या असण्याची शक्यता फारच कमी आहे. असे का झाले असावे? राजसत्ता व राजे हे ग्रामीण भागातल्या सामान्य स्त्रियांपासून कितीतरी दूर असलेली गोष्ट होती. तो त्यांच्या अनुभवाचा भाग नव्हता. कथा कीर्तनातून संतचरित्रे जेवढी त्यांना परिचित होती तेवढा इतिहास परिचित नव्हता. मधल्या काळात जर मराठ्यांचा इतिहासही ज्ञात नव्हता. एकोणिसाव्या शतकात त्यावर नव्याने प्रकाश टाकण्यात आला.

अनुक्रमणिका

शिवजंयती सुरू होऊन शंभर वर्ष झाली आणि ग्रामीण भागात तर शिवजंयती तीस-चाळीस वर्षापासून साजरी होत आहे. या काळात आधुनिकीकरणामुळे ‘जाते’ गेले आणि स्त्रियांच्या ओव्याची निर्मिती कमी झाली. त्यामुळे शिवाजी राजांवर ओव्या निर्माण झाल्या नसाव्यात.

जयंती म्हणजे जन्मसोहळा. तो पाळणा बांधून फुले टाकून, बारशाचे पाळणे म्हणून, प्रसाद वाटून साजरा करण्याची परंपरा आहे. माझ्या बालपणापासून शिवाजी महाराजांचा एक पाळणा मी ऐकत आलो आहे. बारशाच्या समारंभात तो हमखास म्हटला जातो. शिवजयंतीसाठी तोच पाहू या.

**पहिल्या दिवशी राजदरबारी । आला वंशाला असा क्षत्रीय ॥**
**बाळ शिवाजी पहिल्या अवतारी ॥१॥ जो बाळा जो रे जो...**
**दुसऱ्या दिवशी चला मंदिरी । केली आरास नानायापरी ॥**
**न्हाऊ घालती दासी सुंदरी ॥२॥ जो बाळा जो रे जो...**
**तिसऱ्या दिवशी वाजली घंटा । साऱ्या नगरीमंदी आनंद मोठा ॥**
**उठा बायानो सुंठवडा वाटा ॥३॥ जो बाळा जो रे जो...**
**चवथ्या दिवशी केला शृंगार । आले तानाजी मामा शेलार ॥**
**शिवाजीस शोभे सरदार ॥४॥ जो बाळा जो रे जो...**
**पाचव्या दिवसी पाचवी केली । धन्य अंबिका धाऊनी आली ॥**
**जयप्राप्ती राजाला दिली ॥५॥ जो बाळा जो रे जो...**
**सहाव्या दिवसी लावूनी लळा । कानी कुंडल गळा मोत्याच्यामाळा ॥**
**गंध केशरी कपाळी टीळा ॥६॥ जो बाळा जो रे जो...**
**सातव्या दिवशी सातवी करा । जिजामातेच्या पोटी जन्मला हिरा ॥**
**त्याच्या टोपीला मोत्याचा तुरा ॥७॥ जो बाळा जो रे जो...**
**आठव्या दिवशी आनंद मोठा । आले सेनापती तानाजी उठा ॥**
**हाती तलवार फिरवितो पट्टा ॥८॥ जो बाळा जो रे जो...**
**नववे दिवसी नवरत्न हिरा । जसा मोत्याने गुंफिला तारा ॥**
**त्याच्या स्वरुपाचा प्रकाश सारा ॥९॥ जो बाळा जो रे जो...**
**दहावे दिवसी करुनी साज । घोड्यावर रेशमी जीन ॥**
**फोटो काढावा वरती बसून ॥१०॥ जो बाळा जो रे जो...**
**अकराव्या दिवशी अकरावा रंग । पाहूनी बाळाला सेना झाली दंग ॥**
**पाची हत्यारे राजाच्या संग ॥११॥ जो बाळा जो रे जो...**
**बाराव्या दिवशी बोलवा माळी । केली आरास लावूनी केळी ॥**
**नाव शिवाजी ऐका मंडळी ॥१२॥ जो बाळा जो रे जो...**
**तेरावे दिवशी चला मंदिरी । पाळणा बांधून रेशमी दोरी ॥**
**गाणं गाऊन हलवी सुंदरी ॥१३॥ जो बाळा जो रे जो...**
**चवदावे दिवशी लाऊनी ध्वजा । मर्द मराठ्याने जमविल्या फौजा ॥**
**बाळ शिवाजी दख्खनचा राजा ॥१४॥ जो बाळा जो रे जो...**
**पंधरावे दिवशी नौबत वाजे । बाळ अंबारीत करीत साज ॥**
**संग सेनापती लष्करी फौज ॥१५॥ जो बाळा जो रे जो...**
**सोळावे दिवशी सोळावा केला । रामदास स्वामी विद्या बोलला ॥**

अनुक्रमणिका

**धन्य शिवाजीचा पाळणा गाईला ॥१६॥ जो बाळा जो रे जो...**

पाळणा खरे तर म्हणून बघावा आणि ऐकून पाहावा. त्याशिवाय त्याचा प्रभाव जाणवत नाही. पाळण्यात जन्मकाळचे वर्णन येते. युगपुरुषाच्या समग्र जीवनकार्याचा आढावा तिथे अपेक्षित नसतोच. जन्म हीच सर्वात अलौकिक घटना असते. तरीही वरील पाळण्यात तुटक असे काही संदर्भ येतात. क्षत्रिय वंशात राजदरबारी जीजामातेच्या पोटी हा हिरा जन्मला त्यांच्या जन्माने साऱ्या नगरीला आनंद झाला. सुवासिनी बायांनी सुंठवडा वाटला. अंबामातेच्या कृपाप्रसादाने राजांना जयप्राप्ती झाली. बारशाला मोठी आरास करुन थाटामाटात शिवभक्तीमुळे शिवाजी हे नाव ठेवले. तलवार चालविण्याचे, दांडपट्टा फिरवण्याचे राजांनी शिक्षण घेतले सवगंड्याच्या फौजा जमविल्या. राजाना पाहून सेना दंग झाली. तानाजी मालूसरे, शेलार मामा हे सरदार त्यांना शोभले. यवनांचा निःपात करुन बाळ शिवाजी दख्खनचे राजे झाले. त्यांनी रयतेच्या कल्याणकारी राज्याची, स्वराज्याची स्थापना केली असा प्राथमिक आशय या पाळण्यातून आला आहे.

'आले सेनापती तानाजी उठा' असा अनऐतिहासिक उल्लेख व सजविलेल्या घोड्यावर 'फोटो काढावा वरती बसून' असा अगदी अलीकड्या (कदाचित प्रक्षिप्त) उल्लेखही या पाळण्यात आला आहे.

मुळात पाळणा ही कवीची निर्मिती असते पण पुढे कवीचे नाव गळून पडून तो लोक साहित्याचा भाग होते. बारशाच्या विधीगीतातून म्हटल्या जाणाऱ्या पाळण्यातून युगपुरुषाचा संस्कार केला जातो. असा पाळणा गाण्यामागे शिवाजी राजासारखा कर्तबगार पुत्र व्हावा अशी लोकइच्छा असते. शिवजयंतीच्या निमित्ताने मराठी मातामाऊल्यांनी बारशाच्या वेळी शिवाजी महाराजांचे पाळण्यातून केलेले हे 'स्मरण' रसिकांच्या चरणी अर्पण!

❐❐❐

# शिखरीचा शंभू

माणदेशात शिखर शिंगणापूर हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. तिथे शंभू महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. ते लोकांचे श्रद्धास्थान बनले आहे. धार्मिकदृष्ट्या हे क्षेत्र महत्त्वाचे आहेच पण राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. चालुक्य राजे, छ. शहाजी व छ. शिवाजी महाराज, फलटणचे निंबाळकर, मोरोपंत पिंगळे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, त्रिंबकजी डेंगळे या ऐतिहासिक व्यक्तींचा या स्थानाशी संबंध आला होता. ‘हर हर महादेव’ अशी गर्जना करीतच मराठ्यांनी युद्धात असामान्य पराक्रम गाजविला.

हिंदू दैवत परंपरेत शिव-वैष्णव व शक्ती असे तीन दैवत समूह मानले जातात. त्यातील शिवभक्ती सर्वात प्राचीन आहे. भारतात ती सर्वत्र आढळते. महाराष्ट्रात तर सर्वात प्राचीन मंदिरे शिवाची आहेत. त्यातील एक स्थान म्हणजे शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव.

सह्याद्री पर्वतात, माणदेशाच्या उत्तर बाजूस एका डोंगररांगेत हे शिवमंदिर आहे.

**हा कोथला नामे गिरीवर ।माणनदीच्या तीरावर ॥**
**जेथे शंभूमहादेव शंकर ।आनंदेशी राहीला ॥**

असे या स्थानाचे वर्णन दासगणू महाराजांनी केले आहे.

शंकर-पार्वतीच्या अनेक कथा पुराणात आणि लोकसाहित्यात आढळतात. शंभू महादेव इथे कसे आले ही सांगणारी त्यातील एक कथा अशी. एखदा शंकर पार्वती सारीपाट खेळत होती. शंकरजी डाव हरत होते. नारदांनी चिडल्यावर ते रागाला येऊन येथे राहिले. पार्वती भिल्लीणीचा वेष घेऊन त्याना शोधीत इथे आली. हाच आशय पुढील ओव्यातून प्रगट झाला आहे.

**सोंगट्याचं डाव ।आल्याती आठ नऊ ॥**
**महादेव सांगीतो ।नको गिरजा रडी घेऊ ॥**
**रुसला शंभूदेव ।डोंगरी घाली धूप ॥**
**गिरजा नार शानी ।घेत भिल्लीनीचं रुप ॥**

शंकर पार्वतीचा स्वभाव परस्पर भिन्न. त्यामुळे पतीपत्नी म्हणून ते जितके भांडले तितके इतर कुणी क्वचितच भांडले असतील. शेवटी शोध करीत आलेल्या पार्वतीची चैत्र शुद्ध पंचमीला शंकराशी भेट झाली आणि अष्टमीला पुन्हा विवाह झाला. या काळात आजही शिखर शिंगणापूरला यात्रा भरते. लोक मोठ्या श्रद्धेने सहकुटूंब यात्रेला येतात. एक माऊली अशीच यात्रेला निघाली आहे ती म्हणते.

**शिखर शिंगणापूर ।दुरुन दिसत पारवं ॥**
**गिरजा नारीच्या न्हाणीवर ।झाड बेलाच हिरवं ॥**
**हात मी जोडयीते ।तळ्यापासून शिखराला ॥**
**शंभू पावतो कैकाला ।मी जातेया चैत्राला ॥**
**शंभूचं शिखर ।नार चढती जोमानं ॥**

अनुक्रमणिका

**छत्री धरली रामानं ।पुत्र घेतलाय मामानं ॥**
**नऊ लाखाची पायरी ।मला चढताना झालं ऊन ॥**
**देवा त्या शंभूजीचं ।कधी होईल दर्शन ॥**

मंदिर उंच डोंगरावर असल्यामुळे पूर्वीच्या काळी चालत जाताना असा त्रास होत असे. भक्ताचं मन देवाच्या दर्शनासाठी आतूर झालेले असे.

शिखर शिंगणापूरला श्रावण सोमवार, महाशिवरात्रीला यात्रा भरतात पण खरी यात्रा चैत्रातीलच असते. यावेळी गावोगावचे भक्त कावडीने जलतीर्थ आणून शंभू महादेवाला अभिषेक करतात. ही लाकडाची कावड त्याला लावलेले रांजणासारखे पितळी जलकुंभ व शिडासारख्या दोन लहान मोठ्या भगव्या पताका वाहून नेताना त्याची होणारी हालचाल मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते. लोक श्रद्धेने आजही या कावडी खांद्यावरुन वाहून नेतात. त्यातही मराठवाड्यातून येणारी भूत्या तेल्याची कावड सर्वात मोठी आणि मानाची असते. खाद्यांवरुन वाहून आणताना विशेषतः डोंगर चढताना वाहणाराची कसोटी लागते. भक्तगण महादेवाचा धावा करतात.

**तेल्या भूत्याची कावड ।मुंगी घाटाला थटयली ॥**
**शंभू देवाची गिरजा नार ।कुंकू लेताना उठयली ॥**

भक्ताच्या अडचणीला धावून जाणे देवाचे ब्रीद. देव आणि भक्त यांच्या प्रेमाची निदर्शक अशी ही ओवी आहे. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून देवाच्या काठ्याही येतात. त्यात भातखंडीची काठी सर्वात उंच असते. चैत्र शुद्ध अष्टमीला देवाच्या लग्नाचा सोहळा असतो.

**शिखर शिंगणापूर ।खाली बळीचं देवायाळ ॥**
**गिरजा माहेर जवयाळ ॥**
**शंभूजी शिखरावरी ।बळी बसलाय तळी ॥**
**चैताच्या महिन्यामंदी ।धज लावून गेलाय साळी ॥**

बळी म्हणजे अमृतेश्वर. त्याचे मंदिर डाव्या बाजूला खाली आहे. धज लावण्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार येथे आढळतो. वर्षभर एक कुटुंब हे ५५० फूट लांबीचे पागोटे विणत असते. त्याचे एक टोक शंभू महादेवाच्या शिखराला व दुसरे टोक बळीच्या शिखराला लावून धज लावतात. पूजाअर्चा नैवद्य बोण होते. तेल्या भूत्याच्या कावडीला आहेर होतात.

**वाजंत्री वाजत्यात ।शिंगणापूराच्या चावडीला ॥**
**आहेर हुत्यात ।तेल्या भूत्याच्या कावडीला ॥**

आहेर होताना वाजंत्री वाजविण्याचा प्रकार लग्न कार्यात आजही सर्वत्र आढळतो. पवित्र गोष्टी विषयीची श्रद्धा आणि आचार याची एकजिनसी व्यवस्था म्हणजे धर्म असे दूरखाईमचे मत आहे. प्रत्येक दैवतपूजेत काही वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतीला महत्त्वाचे स्थान असते. महादेवाच्या पूजेत बेल व दवना याला महत्त्व असते.

अनुक्रमणिका

**शिखर शिंगणापूर ।दोन्ही नांदावी जोडीईन ॥**
**शंभूच्या शिखराला ।दवना चढीला गाडीईन ॥**
**शंभूच्या शिखरी ।दवना खात्याती पाखईर ।**
**शंभू देवाची गिरजा नार ।घाली मुंग्याला साखईर ॥**
**महादेवाच्या पिंडीवर ।बेल वाहिला शिळाताजा ॥**
**पुत्र मागूनी गेला राजा ॥**

शेवटच्या ओवीचा संबंध छ. शहाजी महाराजांशी उद्देशून असावा. एखाद्या देवाच्या वा साधू पुरुषांच्या कृपाप्रसादाने मुलगा झाल्यावर त्याचीच नावे ठेवण्याची प्रथा भोसले घराण्यात होती. मालोजी महाराजांनीही नावे अशीच ठेवली होती. शहाजी महाराज शिवभक्त होते. ते अनेकदा शिखर शिंगणापूरला देवदर्शनासाठी येत. शिवशंकराच्या कृपाप्रसादाने जिजामातेला पुत्र झाल्यावर त्याचे नाव शिव-शिवा असे ठेवले असावे. पुढे 'जी' हे आदरार्थी पद लावून शिवाजी झाले असावे. शिवाजी महाराज पिंडीवरल्यासारखे अर्ध चंद्राकार कपाळी गंध लावीत असत. तेही शिवभक्त होते. 'हर हर महादेव' ही गर्जनाही त्याचीच. लोकगीतातील एखादी ओवी इतिहासावर असा प्रकाश टाकू शकते. इतिहास तज्ज्ञानी याचा शोध घ्यायला हवा.

पूरूष देव वा संत या विषयीच्या स्त्रियांच्या ओव्या पाहिल्या तर त्यात एक वैशिष्ट्य सर्वत्र आढळते. पुरुषाचे गुणगाण त्या स्त्रियांच्या संबंधानेच अभिव्यक्त करतात. विठ्ठलाच्या ओव्या रुक्मिणी, जनाबाई, रामावरील ओव्या सीतामाई, बिरुदाच्या ओव्या कामाबाई. मायाक्का, ज्ञानेश्वरांच्या ओव्या मुक्ताबाई, तुकारामांच्या ओव्या जिजाबाई येतातच. शंभू महादेवाच्या ओव्यात गिरजा येतेच. पुरुषाकडे स्त्री स्त्रीच्या भावसंबधानेच पाहाते. देवदेवताकडेही लोकमानस नातेसंबंधाने पाहाते. शिखर शिंगणापूर शंभू महादेव व पंढरीचा विठ्ठल हे मेव्हणे होते. महादेवाची बहीण रुक्मिणी विठ्ठलाला दिली होती.

**शिखरीचा शंभू ।विठू सख्याचा मेव्हना ॥**
**रुक्मिणी बहिणीसाठी ।बांधी पदरी दवना ॥**

शैव-वैष्णवाना एकत्र करणारा लोकदेव म्हणजे विठ्ठल. तो मुळात विष्णुरुप पण मुकुटावर शिवाची पिंड वागविणारा. पण वरील ओवीत या दोन देवतांचा वेगळाच संबंध दाखविला आहे. असा संबंध इतरत्र कुठेही आढळत नाही. लोकमानस देवांचा संबंध लौकिक पातळीवर जोडते. आहे त्यात समाधान मानून सुखाने जगण्याची शिकवण भारतीय परंपरेने दिली आहे. वेगळ्या संदर्भात हाच आशय एका ओवीत आला आहे.

**महादेवाच्या पिंडीवरी ।तीन पानाचा बेल वाहावा ।**
**शेजचा भरतार ।नारी असलं तसा घ्यावा ॥**

शंभू महादेव किती विरक्त, किती भोळा, किती रागीट, किती संतापी पण पार्वतीने त्यांच्याशी हट्टाने लग्न करुन संसार केलाच तसा स्त्रियांनी करावा असेच या ओवीतून परंपरेला सूचवायचे असावे.

❒❒❒

# पंढरीची वाट

कृषिसंस्कृतीच्या स्थितीशिलतेच्या कालखंडात भारतात भक्ती संप्रदायाचा उदय झाला. महाराष्ट्रात ही भक्ती चळवळ प्रामुख्याने वारकरी संप्रदायाच्या विठ्ठल भक्तीच्या रुपाने विकसीत झाली. तसा विठ्ठल हा लोकदेव. संतानी विष्णु-कृष्णाच्या रूपात त्याचे उदात्तीकरण केले. पूर्वपार चालत आलेल्या विठ्ठल भक्तीला लोकसंग्रहाची जोड देवून त्यात नवचैतन्य निर्माण केले. ज्ञानदेवानी गीतेवर रसाळ भाष्य करुन अध्यात्माज्ञान सर्वासाठी खुले केले. नामदेवांनी भक्तीमार्गाचा प्रसार केला. संसारात राहून परमेश्वर प्राप्त करुन घेता येतो असा आत्मविश्वास लोकांत निर्माण केला. चोखामेळ्यापासून जनाबाईपर्यंत अठरापगड जातीतील अनेक संत भक्तिमार्गाने उद्धरून गेले. त्यांच्या सामान्य जीवनाला असमान्यत्व प्राप्त झाले. एकनाथ महाराजांनी ही वारकरी भक्ती संप्रदायाची चळचळ जनमानसात खोलवर रुजविली. त्यातून मराठी संस्कृती आणि साहित्याची निर्मिती व जडणघडण झाली.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आणि बहुजन समाजात वारकरी संप्रदाय आणि विठ्ठलभक्ती खोलवर रुजली आहे. महाराष्ट्रात असं एकही गाव नसेल की जिथे विठ्ठलाचं भजन कीर्तन झालं नाही. लहान मुलं टाळ्या वाजवायला लागले की त्याला लोकमानस ‘विठ्ठल-विठ्ठल’ म्हणायला शिकविते. त्यामुळे मराठी माणसाच्या मनात कुठेतरी खोलवर विठ्ठल भक्तीचा संस्कार रुजविला जातो. आजच्या विज्ञान युगात दळणवळणाची एवढी साधने असताना लाखो भाविक आषाढी कार्तिकी वारीला पायी चालत जातात. मेघराजानं कृपा केली. खरीप पेरणी झाली. पीकं तासी लागली की शेतकऱ्यांची पाऊले पंढरीची वाट धरतात. मैनाबाई शेतकऱ्याची कन्या. तिच्या सासरी-माहेरी पंढरीच्या वारीची पंरपरा होती. लहान असताना ती आई—बापाबरोबर पंढरीला गेली होती. लग्न झाल्यावरही आठ-दहा वर्षापूर्वी ती गावातल्या बायकांबरोबर पंढरीला जाऊन आली होती. चंद्रभागेतच स्नान, विठ्ठलाचे दर्शन, संतांचा सहवास व भजनकीर्तनाचा तिने अनुभव घेतला होता. अलीकडे संसाराचे व्यापताप वाढले होते. कुंटुंबातील कटकटीने ती व्यापली होती. त्यासाठी ती नित्यनेमाने घरातल्या तुळशीची पूजा — अर्चा करीत होती.

**सकाळच्या पारी ।तुळशीकडनी माझा धावा ॥**<br>**जाती पंढरीच्या देवा ॥**

गावातल्या काही बायका दरवर्षी आषाढी वारीला जात. त्या वारी, पालख्या, पंढरपूर, भजन कीर्तन याबद्दल आपले अनुभव सांगत. मैनाबाईची उठबस या बायकात असल्याने तिलाही पंढरीला जाण्याची प्रेरणा झाली. गावात पोथी वाचन, भजन कीर्तन असलं की ती ऐकायला जात असे.

**पोथी पुस्तकाचा ।मला कळना अनुभव ॥**<br>**सावळ्या विठ्ठला ।मला पंढरी दाव ॥**

भक्ती ही आचरणात आणायची गोष्ट आहे. ती पोथ्या पुस्तकातून कळत नाही. यासाठी विठ्ठलाचं नामस्मरण, भजन-कीर्तनात सहभाग आणि संतसज्ञनाचा सहवास आवश्यक असतो. पंढरीला गेल्याशिवाय हा भक्तिसुखाचा दिव्य अनुभव येणार नाही म्हणून तिने या आषाढी वारीला पंढरीला जायचं ठरविलं.

अनुक्रमणिका

एखादी गोष्ट करण्याची बुद्धी परमेश्वरच आपणाला देतो. अशी समजूत आहे. पंढरीला जाण्याची प्रेरणा त्या विठ्ठलानंच दिली.

**पंढरीला जाया ।औंदा नव्हतं माझं मन ॥**
**सावळ्या विठ्ठलानं ।चिठ्ठ्या धाडल्या दोन ॥**
**पंढरपुरामंदी ।रुक्मिण माझी सखू ॥**
**कोऱ्या कागदातं ।तिनं धाडल मला कुंकू ॥**

विठ्ठलानं निरोपाचा अबिरबुक्का आणि रुक्मिणीनं कुंकू धाडून पंढरीला येण्याचं आवाहन केल्यामुळे तिला पंढरीला जावंसं वाटू लागलं.

पण वाटलं म्हणून बाई माणसाला थोडच जाता येते. कारभाऱ्याची परवानगी, सोबत, वाटखर्ची, संसारातील व्यापताप यातून जमायला पाहिजे. वारीला पालखीत जाणाऱ्या बायकांना आपण येणार असल्याचं तिने अगोदरच सांगून टाकलं. पण तिचं जाणं सतत डळमळीत होई. त्यावेळी सखुबाई म्हणाली –

**पंढरीला जाया ।जातो म्हणून राहू नका ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाला ।वाट बघाया लावू नका ॥**

असं म्हटल्यावर तिनं मनाचा निश्चय केला आणि ती तयारीला लागली. कपडे धुतले. भाकरतुकडा केला, तहान लाडू भूक लाडू घेतले. पैशाआडक्याची तयारी केली. आई-बापाला संगं घेतलं. कारभाऱ्याची मनधरणी करुन परवानगी काढली. जिवाभावाच्या सख्या बरोबर होत्याच.

**पंढरीला जाती ।संग नेती मी आईबापाला ॥**
**घालती पाणी ।तुळशीच्या रोपाला ॥**
**पंढरीला जाती ।माझ्या शिणच्या गडयणी ॥**
**तुळशीची रोप ।चंद्रभागेच्या कडयनी ॥**

सगळी तयारी झाली. देवळात वारकरी जमले. वीणा उभा राहिला. टाळमृदुंग वाजायला लागले. 'अलंकापुरी' ने भजनास सुरुवात झाली. 'रुप पाहता लोचनी', 'सुंदर ते ध्यान' असे पाच अभंग झाले. संतांचा अभंग झाला. 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' चा गरज झाला आणि 'रामकृष्ण हरी' करत दिंडी निघाली. दिंडीत दहा बारा बायका सहभागी झाल्या होत्या. मजल दर मजल करत दिंडी चालली. आडवं लागणाऱ्या गावाविषयी ती म्हणते –

**पंढरीला जाया ।आडवं लागती माणगंगा ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाचं ।वर्तमान मला सांगा ॥**
**पंढरीला जाया ।आडवं लागत सांगुल ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाचं ।रुप देवाचं चांगल ॥**

अनुक्रमणिका

जी गावं आडवी लागतील त्याच्याशी यमक जुळवून अशा अनेक ओव्या म्हटल्या.

**पंढरीला जाया ।आडवी लागती जेजूरी ॥**
**विठ्ठलाच्या आधी ।देव भेटला मल्हारी ॥**

जेजुरीच्या खंडोबा मराठी माणसाच्या देव्हाऱ्यातला देव. वाटेत त्याचंही दर्शन होतं.

पंढरीच्या वाटेवरी टाळमृदुंगाचा गजर हरिनामाचा उद्‍घोष करीत दिंडी चालते. पाऊस पडतो. चिखल होतो. थंडीवारा सुटतो. चालून चालून पायाला फोड येतात पण वारकरी कशाची पर्वा करीत नाहीत. त्यांना एकच ध्यास लागलेला असतो. पंढरपूर आणि विठू सख्याचे दर्शन. सगळी संकटं देवार्पण केली जातात.

**पंढरीची वाट ।बाई कशानं ओली झाली ॥**
**सयीला किती सांगू ।राही रुक्मिणी पाणी न्हाली ॥**
**पंढरीची वाट ।वाट चालती चिखलाची ॥**
**संगे सोबत विठ्ठलाची ॥**
**पंढरीची वाट ।कुण्या पाप्यानं नांगरली ॥**
**लाडके मैनाबाई ।गाडी बुक्याची हादरली ॥**
**पंढरीला जाया ।एवढं मोकळं माझे केस ।**
**देवा माझ्या विठ्ठलाची ।माझ्या सांधूची एकादस ॥**

निष्ठा संकटावर मात करते.

पंढरीच्या वाटेवरील नवी माणसं, नवी गावं, तिथले मुक्काम, भक्तांनी वारकऱ्याना दिलेली जेवणं, विठ्ठलनामाचा गजर, भजन आणि रात्रीची कीर्तनं, यामुळे वारकरी भक्तीच्या वेगळ्याच जगात न्हाऊन निघतात. घरप्रपंच, मुलंबाळं, शेतीवाडी, गुरंढोरं, सारंसार विसरुन जातात. हरिनामाच्या भजनाने ही वाटचाल आनंददायी होते.

**पंढरीच्या वाट ।टाळवाल्याचा ताटवा ॥**
**मधी मृदुंग नटवा ॥**
**पंढरीची वाट ।दिंड्या पताका लोळती ॥**
**देव माझ्या विठ्ठलाचं ।साधू रींगाण खेळती ॥**
**पंढरीची वाट ।सयी चालाया हलकी ॥**
**माझे तू मैनाबाई ।संगं साधूची पालखी ॥**

पालखीची संगत, नामदेव-तुकोबांचे अभंग, नाथांच्या गौळणी, भारूड आणि रोज होणारी कीर्तनं यामुळे पंढरीची वारी भक्तीसुखाची मांदियाळी ठरते.

अनुक्रमणिका

प्रेमात भेटी पेक्षा प्रतीक्षेचा आनंद असतो. गड चढताना निसर्गसौंदर्य पाहण्याचा आणि गड चढण्याचा एक आनंद मिळतो. तसा पंढरीची वाट चालताना विठ्ठलदर्शनाच्या ओढीचा व चालण्यातील भक्तिसुखांचा अनुभव मिळतो. प्रत्यक्ष संतानी सांगून ठेवले आहे. भक्तीचे सुख मुक्तिच्या सुखापेक्षा श्रेष्ठ आहे. आठ पंधरा दिवस चालून गेल्यावर पंढरी दृष्टिक्षेपात येते. पूर्वी गावात मंदिराचा कळस सर्वात उंच असे. तो दिसू लागला की गाव आलं असे समजत. पंढरीच्या दर्शनाने वारकऱ्याला होणारा आनंद काय वर्णाचा.

**पहिला माझा नमस्कार ।बाई इसाव्यापासी केला ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाचा ।कळस सोन्याचा पाहिला ॥**

कळसास केलेला नमस्कारसुध्दा देवाला पोहोचतो.

**पंढरपूर बाई ।दुरुन दिसत हिरवंगार ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाच्या ।तुळशी बनाला आला बहार ॥**

भक्तांचा भुकेला पांडूरंग वारकऱ्यांच्या स्वागताला येतो. जसा तो ज्ञानोबा-तुकोबाच्या पालख्याना सामोरी जातो. तसा सामान्य वारकऱ्यांच्या दिड्यांचेही स्वागत करतो.

**पंढरीला जाया ।उशीर मला झाला ।**
**प्रीतीचा पांडुरंग ।आडवा वाटेत आला ॥**
**जाईन पंढरपुरी ।उभी राहीन धर्मशाळा ॥**
**विठ्ठल देव बोलं ।कवा आलीसं लेकीबाळा ॥**

ज्ञानोबापासून तुकोबापर्यंत सर्व संतांनी पंढरीचे बहारदार वर्णन आपल्या अंभंगातून केले आहे. लोकगीतातूनही पंढरीचा महिमा आपल्या परीने वर्णन केला आहे.

**गावामंदी गाव ।गाव पंढरी नाही ऐस ।**
**सावळा पांडुरंग ।तिथंला पाटील हरीदास ॥**
**सकाळच्या पारी ।चंद्रभागेत माझा पायी ।**
**पांडुरंगाचं माझ्या ।अंस तीरथ कुठं नाही ॥**

वारी पंढरीत येते. हजारो वारंकरी चालत पंढरीला येतात. सुशिक्षित बुद्धिवादी माणसाला हा वेळेचा उपव्यय आणि अंधश्रद्धा वाटण्याची शक्यता आहे. पण वारकऱ्यांची निष्ठा आणि भक्ती आणि भारतीय लोकमानस ज्याला ज्ञात आहे त्यालाच पंढरीच्या वारीचे खरे मर्म समजते.

❒❒❒

अनुक्रमणिका

# रूसली रूक्मिण

आषाढी वारीला लाखो भाविक पंढरपूरला येतात. मैनाबाई वारकऱ्यांच्या दिंडीत पंढरपूरला आली. दिंडी एकादशीच्या अंगोदरच दोन दिवस पोहोचली होती. धर्मशाळेत उतरायाची व्यवस्था झाल्यावर तिनं चंद्रभागेत स्नान केलं. विठ्ठलाचं दर्शन घेतलं. 'विठोबा-रूखमाई' च्या जयघोषाने सारी पंढरी घुमत होती. देवदर्शन घेऊन मठाकडे परत येताना सखुबाई म्हणाली. 'रूक्मिणीच्या बुगड्या बघितल्यास का? कशा हिऱ्यानं मढविल्या होत्या. दागिणेतर किती घातले होते बाई! पण हिचं मंदिर मागंचं देवाशेजारी हिला स्थान नाही.' मैनाबाईच्या डोक्यात तोच विचार. विठ्ठल-रूखमाईचा जोडा कसा छान पण हिचं मंदिर वेगळं का? भांडली असंल देवाशी. ती विचार करत राहीली.

तिला गावात ऐकलेली धनगराची ओवी आठवली. विठ्ठल माणदेशातील माळशिरसचा राजा. मल्हारीदेवाचा मांडलिक. पदूबाई ही त्याची पत्नी. भानवस वाड्यापासून तीन कोसावर कचेरी. एकदा भक्तशिरोमणी म्हाळीकरायाचा पाचशे माणसांसह दर्शनाला येत असल्याचा निरोप आला. विठ्ठलानं सोमा प्रधानाकडून पदूबाईला जेवणाची तयारी करायला सांगितली. पदूबाई म्हणाली 'काही दळणार नाही अन् रांधणार नाही. जळून कोळसं होवो तुमच्या भक्ताचं'. 'हा निरोप ऐकून विठ्ठलाने शाप दिला. दुसरे दिवशी नदीवर पाणी भरताना पदूबाईला वेड लागले. ती जंगलात फिरु लागली. तिच्या आईबापाचीही देवाने भेट होऊ दिली नाही. पाऊस पडला. पूर आला. पदूबाई वाहून गेली. विठ्ठलाचा संसार मोडला. तोही विरहाने वेडा झाला. म्हाळीक माळीरायाने तपश्चर्या करुन पदुबाईच्या अस्थी मिळविल्या. पद्‌मतळ्यात कमळातून पदूबाई प्रगट झाली. तिच ही रुक्मिणी विठ्ठलानी सांगितले, 'आता आपला संसार तुटला. एका घरात राहायचं नाही. भेटू, बोलू, भक्तांचं भलं करु.' आजही पद्‌मतळ्यात पदूबाईचं मंदिर आहे. रूक्मिणीचे वेगळे मंदिर आहे.

संतांनी विठ्ठलाला कृष्णरूपात स्वीकारले. ज्ञानेश्वरी, भागवत, अभंग गौळणीतून ही गोष्ट दिसून येते. यामुळे विठ्ठल परिवारात रूक्मिणीला स्थान मिळाले. अभिजनाच्या वाङ्‌मयात रुक्मिणी ही विदर्भाचा राजा भीमकाची कन्या. तिचे कृष्णावर मन जडले. तिने निरोप पाठविला. कृष्णाने युद्ध करुन तिला पळवून नेले. पुढे रूक्मिणीचे स्वयंवर झाले. अभिजनाचे हे आख्यान लोकगीतातूनही पाझरते.

**राजा भीमकाची ।रुक्मिन उपवर ॥**
**अग तिनं लिहिली पत्रिका ।लाविती देशावर ॥**
**राजा भिमक्काची ।रूक्मिन किती शानी ॥**
**अग पाहिला वर ।पंढरीचा राजा धनी ॥**

रुक्मिणी स्वयंवराची कथा मराठी साहित्यात परोपरीने येत असली तरी लोकगीतात ती फारच थोडक्यात येते. रूक्मिणी राजकन्या आणि विठ्ठलाची पट्टराणी. त्यामुळे तिच्या दागदागिन्याचा थाट काय वर्णावा?

**रूक्मिणीची साडीचोळी ।नऊ लाखाची जरतारी ॥**
**देवा भीमकानी ।लेक थोराच्या घरी दिली ॥**
**पंढरपुरामंदी ॥कोण सोन्याच्या जोडव्याची ॥**

अनुक्रमणिका

**माझी ती रखुबाई ।राणी विठ्ठल बडव्याची ॥**
**विठ्ठलाचं राज ।रूक्मिन सांगती बापाला ॥**
**दीड लाख मोती ।माझ्या झुब्याच्या कापाला ॥**

बारा तोळ्याचं डोरलं, सव्वा तोळ्याची बुगडी, शेरशेर सोन्याच्या पाटल्या, मोत्यांचा हिशेब लाखातच असा सगळा श्रीमंती थाटमाट. विठ्ठल आपला मराठी माणसासारखा गरीब साधासुधा.

लोकमानस देवाला मानवी पातळीवर स्वीकारते. विठ्ठल रूक्मिणीचे प्रेम कसे.

**रुक्मिन धुणं धुती ।विठ्ठल खडकावर बस ॥**
**दोघांच्या पिरतीचं ।चंद्रभागेला आलं हास ॥**
**सोळा सतरा नारी ।काय रावळी धिंगना ॥**
**रुक्मिणी वाचून ।इडा देवाचा रंगीना ॥**

खेड्यातले प्रेम पाणवठ्यावर चालते. देवाचे सुद्धा तसेच. विठ्ठल रुक्मिणीच्या भांडणाचं एक कारण म्हणजे भक्त. विठ्ठलाला भक्तांच भारी वेड. तर रुक्मिणीला त्याचाच तिटकारा.

**पंढरपुरामंदी ।कानुपानरचं हायी झाड ॥**
**सावळ्या विठ्ठलाला ।त्याला संताचं लई याड ॥**

विठू माझा लेकुरवाळा ।संगे गोपाळांचा मेळा ।तो सतत भक्तांच्या मेळ्यात असणारा त्यांच्या अडीअडचणीला धाऊन जाणारा. जनाबाईबरोबर दळणकांडण करणारा, चोखामेळ्यांची ढोरं ओढणारा, त्यांच्या पत्नीचे बाळंतपण करणारा. नामदेवाच्या लग्नाला हजर राहाणारा, गोरोबा काकाची मडकी घडविणारा अशी एक चालती बोलती मिथ (प्रतिमा) संतानी निर्माण केली आहे. ती भक्तांच्या दृष्टिने चांगली असली तरी रुक्मिणीच्या दृष्टीने ती वाईटच. देव तिच्या वाट्याला फारसे येतच नाहीत म्हणून तिचा राग. विठ्ठल सतत भक्तांच्या मेळ्यात असतात. ‘आपल्या घरघनीकडे दुर्लक्ष करतात म्हणून रूक्मिणी रुसून बसते.

**रुसली रुक्मिन ।देवा शेजारी बसना ॥**
**अबीर बुक्याचा भडीमार ।तिला सोसना ॥**
**रूसली रूक्मिन ।जाऊन बसली माडीवर ॥**
**अबीर बुक्क्याचा भडीमार ।तिच्या तेलंग्या साडीवर ॥**

सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या नेत्यांच्या बायकांचे नेमके हेच दुःख असते. नवऱ्यानं आपल्या जवळ बसावे, बोलावे, हितगुज करावे, फिरायला न्यावे, हौसमौज करावी. एवढीच सामान्य बायकांची अपेक्षा असते. पण तेही ते पूर्ण करू शकत नाहीत. म्हणून बायका नाराज असतात. तशी रूक्मिणीही नाराज आहे.

अनुक्रमणिका

रूक्मिणीच्या रागाचे दुसरे कारण म्हणजे देवाचे बाहेरचे धंदे. स्त्री इतर कोणतीही गोष्ट सहन करेल पण आपल्या प्रिय पतीवरील इतर स्त्रीचा हक्क ती सहन करु शकत नाही. तो तिला आपल्या स्त्रीत्वाचा अपमान वाटतो. अगोदरच सत्यभामा सवत होती. त्यात राधा, चंद्रावळ आणि इतर अनेक गौळणी श्रीकृष्णावर प्रेम करणाऱ्या.

**रुसली रूक्मिन ।जशी अगीन तापली ॥**
**विठ्ठलाच्या पलंगावरी ।तिनं राधिका देखली ॥**
**सोळा सतरा नारी ।विठू भोगल्या अंधायारी ॥**
**जळती नंदादीप ।रुक्मीन बाईच्या मंदिईरी ॥**

अशावेळी ती रागाने आणि मत्सराने पेटून उठते. रागा वैतागाने रूसून घरसंसार सोडून निघून जाते.

**रुसली रूक्मीन ।सर्व्या पंढरीत नाही ।**
**देव विठ्ठल बोलं ।हिच्या रागाला करु गत काई ॥**

रूक्मिणीचा राग वंगाळ करी गारपाण्याची अंघोळ. कधी ती खिडकीत जाऊन बसते. विठ्ठल सारी पंढरी धुंडाळतो. कधी ती डगरीला जाऊन बसते. साऱ्या नगरीला हसू येतं. रुसलेल्या रूक्मिणीची समजूत काढता काढता देवाची पुरेवाट होते.

**रुसली रुक्मिन ।का ग रूक्मिणी डोळं लाल ॥**
**चोळी जरीची घेऊ चल ।**

एखाद्या सामान्य नवऱ्यासारखं तो चोळी घेऊन तिची समजूत काढतो. रूक्मिणीच्या रूसण्याचं मराठमोळ कारण म्हणजे जनाबाई. जनाबाई नामदेवांच्या घराची दासी पण तिने आपल्या भावभक्तीने पंढरीचा विठू वश केला. प्रेम आणि भक्ती याचं फार जवळचं नातं आहे. प्रेमाचं विकसित रूप म्हणजे भक्ती. व्यक्तीवर केलेलं ते प्रेम. देवावर केलेले प्रेम म्हणजे भक्ती.

प्रेमातील हीनत्व आणि वासना नाहीशी झाली ते उदात्त व महन्मंगल बनलं की, भक्तीच्या पातळीवर जातं. जनाबाईचं विठ्ठलावरील प्रेम, असं भक्तीच्या पातळीवरचं पण लोकमानस स्त्रीभक्ताचं प्रेम, प्रेम आणि भक्तीच्या सीमारेषेवरच स्वीकारतं.

भक्ती-मुक्तीच्या प्रेमापेक्षा लौकिक पातळीवरच ते अनेकदा अवतरते. कान्होपात्रा, जनाबाई यांच्यावरील ओव्या अशाच स्वरूपाच्या आहेत. मराठी स्त्रिया जनाबाईशी अधिक समरस होतात. कारण तिचं सारं सुखदुःख त्यांना आपलं वाटतं. रूक्मिणी-विठ्ठल जनाबाई हा प्रेमबंध मोठ्या मोहकपणे लोकगीतातून अभिव्यक्त झाला आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

# पंढरीला जाती विठूच्या दर्शनाला

विठ्ठलभक्ती आणि वारकरी संप्रदाय हे मराठी लोकसंस्कृतीचे वैशिष्ट्य. संतानी विकसित केलेले आणि मराठी लोकमानसात खोलवर रुजविलेले. विठ्ठल मूळचा लोकदेव. भक्त पुंडलिकांनी विटेवरी उभा केलेला. विष्णू, मस्तकी शिव धारण करणारा, तो गोपाळकृष्ण तसा बुद्ध अवतारही, अनेक देवतातील चांगल्या गोष्टी घेऊन निर्माण केलेला मराठमोळा देव.

प्रत्येक संप्रदायाची व त्याच्या दैवताची एक उपासना पद्धती असते. त्यातून आचारधर्म निर्माण होतो. वारी, एकादशी, तुळशीमाळ, अबीरबुक्का, हरिपाठाची संध्या, ज्ञानेश्वरी-भागवताचे वाचन, भजन, कीर्तन, चंद्रभागेचे स्नान, विठ्ठलदर्शन, संतसहवास यातून वारकरी संप्रदायाचा एक आचारधर्म विकसित झाला आहे. वारी करणारा तो वारकरी. त्यामुळे वारीला अनन्यसाधारण महत्त्व दर महिन्याच्या एकादशीला 'वारी पोहचविणारे,' वारकरी आहेत. पण वर्षातल्या आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्र या चार वाऱ्या आणि त्या एकादशी महत्त्वाच्या त्यातही आषाढी वारीला ज्ञानोबा-तुकोबा यांसारख्या अनेक संतांच्या पालख्या येत असल्यामुळे तिला फारच महत्त्व आहे.

एकादशीला वारकऱ्याचा उपवास. एकादस कशासाठी करायची?

**एवढ्या एकादशी केल्या ।जीवा झाली सोडवन ॥**
**देव माझ्या विठ्ठलानं ।यम लाविलं धुडकावून ॥**

एकादशी केल्यानं पुण्य प्राप्ती होते. चौऱ्याऐंशीचा फेरा चुकतो. अशी लोकांची श्रद्धा आहे. त्यात आषाढी एकादस महत्त्वाची. बारशीला ती सोडण्यासाठी वाघाट्याची भाजी लागते.

**एवढी आकाडी एकादस ।पंढरीच्या लालायाची ॥**
**एवढी कानडी रुक्मीन ।तोडी वाघाटी येलायची ॥**
**आकाडी बारशीला ।करते वाघाटी रसभरी ॥**
**सावळा पांडुरंग ।सोडी बारस माझ्या घरी ॥**

हजारो वारकरी आषाढी वारीला पंढरीला येतात. मैनाबाई अशीच दिंडीत वारीला आली होती. पंढरीत स्थिर झाल्यावर एकादशी दिवशी सकाळी पहिली गोष्ट करायची म्हणजे चंद्रभागेचे स्नान. सकाळी ती सख्याबरोबर चंद्रभागेला गेली.

**पहिली माझी ववी ।चंद्रभागेचा मूळ पाया ॥**
**धन्य तुमची विठूराया ॥**

अगोदर नदी आणि नंतर तीर्थक्षेत्र. भीमानदी पंढरपूरजवळ चंद्रकोरीसारखी वाहाते म्हणून तिला चंद्रभागा म्हणतात. त्यामुळेच इतर ठिकाणी पाहायला न मिळणारे वाळवंट पंढरीला आहे. विठूरायाने अशी रम्य जागा निवडली आहे. वारकरी चंद्रभागेवर अंघोळीला जातात. विठूरायाही पहाटे चंद्रभागेला अंघोळीला येतो.

अनुक्रमणिका

**पहाटेच्या पाऱ्यामंदी ।चंद्रभागा झोपी गेली ॥**
**पांडूरंगानं बाई माझ्या ।अंघोळीला जागी केली ॥**

चंद्रभागा झोपी जाते आणि विठ्ठल अंघोळीसाठी जागी करतात. कशी रम्य कल्पना आहे. वारीत चंद्रभागेचं वाळवंट वारकऱ्यांनी फुलून गेलेले असतं.

**चंद्रभागेची वाळू ।एवढी सोन्याला मागं सारी ।**
**तिथं पिरतीम आली सारी ॥**

उभ्या महाराष्ट्रातून वारकरी येतात. स्नान संध्येपासून भजन कीर्तनापर्यंतच्या गजरात वाळवंट भक्ती रसात न्हाऊन निघते. चंद्रभागेत स्नान केलं की सर्व पापे नाहीशी होतात. पुण्य लाभते. ही श्रद्धा लोकगीतातून प्रगट होते.

**चंद्रभागेचं पाणी ।चुळ भरली गेली तहान ॥**
**पांडूरंचाचं नाव घेता ।चिंता हरली माझं मन ॥**
**पंढरीला जाती ।आईबापाच्या पुण्याईनं ॥**
**आंघोळ केली ।चंद्रभागेच्या पाण्यानं ॥**

कधीकधी चंद्रभागेला पूर येतो. विशेषतः आषाढी वारीला पूर येतो. सारं वाळवंट पाण्याखाली जाते. पुंडलिकाचे मंदिर बुडते. पाणी घाटाला लागते. काही वेळा पंढरीच्या पेठेत शिरते.

**भरली चंद्रभागा ।पाणी लागलं वढायला ॥**
**देव कुंडलिक बुडायला ॥**
**भरली चंद्रभागा ।आली विठूच्या पेठंला ॥**
**बोलती चंद्रभागा ।आली विठूच्या भेटीला ॥**

काय कल्पना आहे पाहा. चंद्रभागेला पूर येतो म्हणजे नदी देवाच्या भेटीला येते. पण पूर काही सर्वकाळ असत नाही. एरवी आपली नदीची वाहाती धार आणि वाळवंटं. चंद्रभागेचं निर्मळ स्नान झालं की मग पुंडलिकाचं दर्शन.

**हाती पाण्याचा तांब्या ।खांदी धुण्याचा पिळा ।**
**पहिल्या दर्शनाला ।पुढं पुंडलिक उभा ॥**
**देवा मंदी या देव ।देव पुंडलिक आधीचा ॥**
**जागा धरला नदीचा ॥**

भक्त शिरोमणी पुंडलिकाची कथा प्रसिद्ध आहे. आईबापाची सेवा करताना भगवान विष्णू प्रसन्न झाले. पुंडलिक सेवेत मग्न. सेवेत खंड पडू नये म्हणून त्यांनी वीट फेकली. त्यावर विठ्ठलाला युगे अठ्ठावीशी उभे केले. हा पुंडलीक मराठी माताभगिनींना आपल्या भावासारखा वाटतो. त्याच्या भेटीसाठी

बहिणी येतात. त्याला भेटून बोलून दर्शन घेऊन झालं की मग घाटाच्या पायऱ्या चढून महाद्वाराने विठूसख्याच्या दर्शनाला जायचे.

**तिसरा माझा दंडवत ।चढ घाटाच्या पायऱ्या ॥**
**सावळ्या पांडूरंगा ।भेटी द्यावी सोयऱ्या ॥**

घाटाच्या पाऱ्या चढताना विठ्ठलाचे दर्शन होईल की नाही याची चिंता लागलेली असते.

**घाटापासून पुढं लागतो चोखामेळा ॥**
**राऊळाच्या बाहेरी ।सारी पताका झाली गोळा ॥**

चोखामेळा राऊळाच्या बाहेर. पुढे महाद्वाराच्या पायरीला नामदेव. विठ्ठलाच्या दर्शनाला येणाऱ्या साधुसंताच्या पायाची धूळ मस्तकी लागावी म्हणून संत नामदेव महाराजांनी इथे समाधी घेतली.

**साधूमध्ये साधू ।नामदेव साधू खरा ॥**
**विठ्ठलाच्या दारी ।झाला पायरीचा चिरा ॥**

नामदेव पायरीवर पाय ठेवायची कुणीची हिंमत व्हावी. त्यांच्या मोठेपणापुढे नतमस्तकच व्हावे. दर्शन घेऊन पुढे जावे. मंदिरात प्रवेश केला की, महाद्वारांच्या चौसोप्यात गणपती. त्याचे दर्शन घेऊन सभामंडपात आले की, मग तुळस, बारी, मुखदर्शन, तुकाराम पादुका, गाथा, आतील अडू असे करीत दर्शन होते.

**गणपतीपासून ।पुढे लागते तुळस ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाच्या ।शिरी सोन्याचा कळस ॥**
**हातात माळ घेऊनी ।उभी राहिली बारीला ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाला ।चिंता पडली हरीला ॥**
**डिकमली पासून ।पुढं लागतो गरुडखांब ॥**
**देवा माझ्या विठ्ठलाचं ।निश्चळ दिसं त्वांड ॥**
**विठू म्हण विठू ॥विठू आडूच्या पलीकडं ॥**
**देवाच्या दर्शनासाठी ।आम्ही बघीना जीवाकडं ॥**

बारीला उभा राहून पायाला कढ येतात. मध्येच 'पुंडलीक वरदा' च्या गजराने चैतन्य संचारते. मुंगीच्या पावलांनी बारी पुढे सरकते. एकदाशी मैनाबाई देवाजवळ येते.

**तुळशीच्या माळा ।बाई पैशाला येत्या नंऊ ॥**
**हात माझा पुरंना ॥देवा विठ्ठला खाली लवू ॥**
**देवाच्या पायावरी ।दोन्ही हात तिसरा माथा ॥**
**विटंवरल्या मायबापा ।नेतर उघड दोन्ही आता ॥**

अनुक्रमणिका

पायाला हात लावून दर्शन घेईस्तोवर बडवे पुढे ढकलतात. धक्काबुक्की होते.

**विठ्ठलाच्या राऊळांत ।बडवी करती हाणामारी ॥**
**देव विठ्ठल बोलं ।गोरगरीब येऊ द्या सारी ॥**

चुटपुटत्या मनानं मारते. ती सभामंडपात येते. कान धरून उड्या मारते. दंडवत घालून दर्शन घेते. गरुड खांबाला भेटते.

**पंढरीला जाती ।गरुड खांबाला दिली पाठ ॥**
**तीर्थ घडती तीनशे साठ ॥**

दर्शन झाल्याचं तिला समाधान वाटते. एवढ्या लांबून पायपीट करत आल्याचं सार्थक झालं असं तिला वाटतं. मग देवाच्या दारी क्षणभर विसावते. देवाकडे पाहात त्याचे गुणगान करते.

**इटवरी इट ।कुण्या योगीयाचा राजा ॥**
**हिरवा मंझील तुरा ताजा ॥**
**विटंवरी उभा ।युग झाल्याती अठ्ठावीस ॥**
**देव माझ्या विठ्ठलाला ।कुणी म्हणना खाली बस ॥**
**पंढरीचा विठू नाही कुणाला लागत ॥**
**त्याला माळ बुक्याची आगत ॥**
**पंढरीचा विठू ।नाही कुणाच्या देव्हायारी ॥**
**त्याच्या गं दर्शनाला ।सारी लोटली जवायारी ॥**

स्त्रियांची श्रध्दा आणि भक्ती जशी इथे व्यक्त होते तशी देवाशी केलेली सलगीही दिसते. साध्या साध्या प्रसंगातून दृश्य उभे केले जाते. देवाच्या सगुण चित्रणावरच लोकगीतातून भर दिला आहे. असा युगे अठ्ठावीसे भक्तांसाठी विटेवर उभा असलेला पांडुरंग. तो कुणाच्या देव्हाऱ्यात नाही? कुणाचा कुलस्वामी नाही? तो कुणाला लागत नाही. काही मागत नाही. निवदबोणंही त्याला लागत नाही. तो कुणाच्या अंगात येत नाही. कुणाच्या नवसाला पावत नाही. मुलंबाळं, पैसा-वैभव काही काही देत नाही. तो फक्त भक्तीचा भुकेला. भक्तांना समाधान शांती आणि मुक्ती देतो. म्हणून वारकरी शतकानुशतके त्याला भजतात.

❒❒❒

अनुक्रमणिका

# मेघराजाचं लगीन

सुगीचा सोनसोहळा संपला. धान्य घरात आले. वैरणकाडी ठेपणीला लागली. शेतमळे उघडे बोडके झाले. शिवारातलं हिरवेपण हरवायला लागले. ऊसाचे खोडवे, पिकाचे सड आणि वाळलेला पालापाचोळा मागं राहीला. झाडांची पानगळ झाली. बांधावरचं गवत वाळलं. एक हिरवं जग भकास झालं. जत्रा संपून गेल्यानंतरच एक उदासवाणेपण शिवारभर पसरलं.

चैत्र – वैशाखाचं ऊन वाढायला लागलं. सूर्यनारायण आग ओकायला लागला. ऊन रणरणाय लागलं. चिमणखडे फुटले. बाभळीवरील किड्यांनी चर ऽऽ असे आवाज काढायला सुरुवात केली. तळी आटली.नाले कोरडे पडले.नद्या खंगल्या.ओढे काठावरचा हिरवेपणा जपण्याचा केविलवाणा प्रयत्न करु लागले. विहीरीचे पाणी खोल गेले. तळी उघडी पडली. पाण्याचे जिव्हाळे आटाय लागले. उमाळे घटका मोजाय लागले. पाण्यासाठी दाहीदिशा झाल्या. भर उन्हात पाण्याचे मृगजळ दिसाय लागले. शिवारभर फिरणारी पाखरं दिसेनाशी झाली. काळीज करपल्या अंतःकरणाने कुणबी हे हिरवं जग उजाड होताना अनुभवू लागले.

उन्हाळ्यात एखाद्या झाडाखाली बैलं बांधून तो वैरण घालत डोक्याला हात लावून बसलेला दिसे. मागचं सारं आठवत पुढचा विचार करत. आठ पंधरा दिवसात समोरच्या लिंबाला वसंतात नवी पालवी फुटली. बघता बघता तो मोहराने लगडला. सृष्टीतल्या ह्या नवचैतन्याने कुणब्याच्या तगमगत्या अंतःकरणात नव्या स्वप्नाचे बीज पेरले. त्याला अंकुर फुटले. भविष्यातील नवे हिरवे स्वप्न त्याच्या मनासमोर उभे राहिले. मग तो भर उन्हात कामाला लागला. उन्हाने जमीन कठीण होण्याअगोदर नांगरायला हवे. त्याने बाजूला पडलेला नांगर काढला. त्याला नाड्याचे येटान घातले. शिवळ जोडली. चार-सहा बैलं जुंपली. आणि शंभर नंबरी नांगर धरला. माती उलथून पडू लागली. कडेकोरनं आडतास घेऊन त्याने नांगरट केली. काळे रान तापणीला पडले. थोडफार पाणी असल्याने त्यानं एकरभर कापूस-व्हंडी अशी उन्हाळी पिक केली.

ऊन वाढतं होते. दिस सरत होते. नांगरुन, पडलेली काळी आई पाहून शेतकऱ्याच्या कारभारनीला मैनाबाईला वाटले.

**आई वाचून माहेर ।कंता वाचून सासर ॥**
**पावसा वाचून रान ।कसं दिसतं भेसूर ॥**
**पावसा वाचून ।काय करावं जमीनीला ॥**
**भरतारा वाचून ।सुख नाही कामिनीला ॥**

आता पावसा वाचून रान हिरवं होणार नाही. शेतमळ्यात पुढचं पाऊल उचलता येणार नाही. मग कुणब्याचे डोळे आभाळाकडे लागले. त्यात साऱ्या साऱ्या विश्वाची आर्तता आणि करुणा साठवलेली होती. 'आता दिसं कडंवर आलं. कशाला परीक्षा बघतूस, पड बाबा एकदा,' कृतिका संपल्या. रोहिण्या निघाल्या. आभाळात ढगांचा पत्ता नाही. मग त्याने मेघराजाची आळवणी केली. साकडे घातले.

**पड पड मेघराजा ।पिकाच्या झाल्या कातीवाती ॥**

अनुक्रमणिका

**कुणबी आल्यात काकुलती ॥**
**पड पड मेघराजा ।गाई गुरांच्या सतवाला ॥**
**शेळ्या मेंढ्याच्या धरमाला ॥**

शिवारात जनावरांना चारा राहिला नाही. प्यायला पाणी नाही. या मुक्या जनावरांची तरी दया येऊ दे. आपलं सगळं जगणंच पावसावर अवलंबून. तो मेघराजा बरसला नाही तर पेरणी होणार नाही. पिकं येणार नाहीत. गाईगुरांना गवत उगवणार नाही. प्यायला पाणी मिळणार नाही. गोरगरीबांचे जीवन फुलणार नाही.

**पड पड मेघराजा ।गोर गरीबा कारण ॥**
**चुड्या माझ्या राजसाच्या ।धान्य लागू दे धारण ॥**

पाऊस पडला तर पेरण्या सुरु होतील. धान्याला थोडी धारण येईल. नाही तर गोरगरीब घेणार तर कसे? पाऊसपाणी दैवावर अवलंबून. पडला तर पडला नाही तर तोंडाचं पाणी पळविणार? पावसानं जास्तच वढ दिली तर भोळ्याभाबड्या शेतकऱ्याच्या मनात येते, कसा येईल तो?

**पड पड मेघराजा ।त्याला पडूसं वाटंना ॥**
**पाप धरणी साठना ॥**

लोकं कशी ही वागायला लागली. धरणीवर पाप लय झालं. त्यामुळेच पाऊस पडत नाही. अशी त्याची समजूत झाली आहे. पावसांच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी अधिकच दैववादी बनला आहे.

रोहिण्या निघाल्या की वातावरणात थोडा फरक पडतो. सारी धरती पावसासाठी आसुसलेली असते. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसतो. भावाआधी बहिणीचा पाळणा हालतो तसा मिरगा आधी रोहिणीचा पाऊस पडला तर वेळेवर पेरणी होईल अशी त्याला आशा असते. आभाळाची बदलती रूपे तो न्हाळत असतो. ढगाच्या कोकळ्या दिसायला लागल्या की, त्याच्या आशा पालवतात. पण पाऊस काही येत नाही. तो निराश होतो. दररोजच्या आशा-निराशेच्या खेळाने त्याचा हिरमोड होतो. उन्हाळ्याची गदमद वाढते. आणि एकेदिवशी आभाळाचे रंगरूप पालटते. संध्याकाळी उत्तरेकडून, फळी धरुन ढग उठतात. वादळवारा घोंगावत येतो. विजांचा चमचमाट होतो. ढगांचे ढोल वाजायला लागतात. गरजायला लागते. धरणीमाता तर कधीची वाट पाहात असते. आकाश हा पुरुष आणि धरणी ही माता हा युगानयुगाचा आदिबंध लोकगीतातून मोठ्या मोहकतेने व व्यापकपणे व्यक्त होतो.

**पडपड पावसा ।इजबाईचा तेलतवा ॥**
**धरणी माता बोलं ।कवा येचील माझ्या गावा ॥**
**पडपड पावसा ।नका करु गाजावाजा ॥**
**धरणी माता बोलं ।आला परानपती माझा ॥**

एखादा तरुण धसमुसळ्या प्रियकराने बऱ्याच दिवसातून आपल्या प्रेयसीला कडकडून भेटावे. तसे आकाश धरतीला भेटायला येते. भव्यदिव्य मीलन नाट्य साकारते.

अनुक्रमणिका

**पडपड पावसा ।इजबाईचा चाबूक ॥**
**मेघराजाची म्हनं माझ्या ।स्वारी निघाली नाजुक ॥**
**पाऊस एवढं पाणी ।इजाबाईनं काढइलं ॥**
**हरीचंदर एवढा वारा ।म्होर जासूद धाडईल ॥**
**पड पडितो मेघराजा ।इजाबाईनं केला चाळा ॥**
**मेघ कुरंदान झाला काळा ॥**
**मेघराजाचं लगीन ।इजाबाई करवली ॥**
**माझ्या सख्याच्या शेतामंदी ।राती वरात मिरवली ॥**

पंचमहाभूतांचा एक भव्यदिव्य लग्नसोहळा साकार होतो. आकाश आणि धरतीच्या मीलनाचा. धरणीमाता थरारुन जाते. तिच्या अंगावर शहारे उठतात. वारा वादळरुप होऊन तिला गदगदून हलवून सोडतो. विजांचे तेज नागिणीसारखे चमकते. अंधारुन आलेल्या आकाशात ती नाच मांडते. ढगांचे ढोल वाजायला लागतात. मेघराजाचे लगीन लागते. धरणी आणि आकाशाचे मीलन होते. पाण्याच्या धारा बरसू लागतात. पावसाच्या पहिल्या थेंबाने मृदगंध सुटतो. वारा तो आसमंतात पसरवितो. धुवाँधार पाऊस आडवातिडवा धरणीवर बरसत राहातो. आकाश पोकळीत साकार होणारे एक भव्यदिव्य नाट्य शेतकरी भरल्या डोळ्याने पाहतो, अनुभवतो. आनंदून बेहोश होतो.

**वळवाचा पाऊस गं ।फळी धरुन उठयीला ॥**
**ताईत माझा बंधू रांजा ।बाळ कुणब्याला नटयीला ॥**

पडत्या पाऊस धारात तो शरीराने आणि मनाने चिंब भिजून निघतो. उन्हाळभर केलेल्या कष्टाचा त्याला विसर पडतो. उरातल्या हिरव्या भविष्याचे एक स्वप्न त्याच्या मनात साकार होते.

**पड पड तो मेघराजा ।जसा मोतीयाच्या धारा ॥**
**गायी वासराला नवा चारा ॥**
**पड पड पावसां ।जसा मोत्याचा शिरवा ।**
**मळा सख्याचा हिरवा ॥**
**पड पड पावसा ।एवढं पडून बरं झालं ॥**
**नंदी तासाला पाणी प्यालं ॥**

मोत्यापवळ्याच्या धारा बरसायला लागतात. अशावेळी कधीकधी गारा पडतात. धरणीमाता भिजून चिंबचिंब होते. तापलेले असूसलेपण तृप्त होते. एक समाधानी शांत वातावरण सर्वत्र भरुन राहते.

वळवाचा पाऊस काही एकाच वेळी सर्वत्र पडत नाही. इथं पडला तर तिथं नाही. आज इकडे तर उद्या तिकडे. जणू तो प्रदेशानुसार पाळ्या लावतो.

**पडि पडीतो मेघराजा ।इजबाईला मारी हाळी ॥**
**माणदेशाला घालू पाळी ॥**

अनुक्रमणिका

**पडि पडीतो मेघराजा ।फळी धरुन बाराकोस ॥**
**सारा भिजवला माणदेश ॥**

पहिला पाऊस पडून गेला की शेतकऱ्याच्या हिरव्या स्वप्नाचा पाया घातला जातो. त्याची गडबड उडते. मशागतीला प्रारंभ होतो. नांगरुन टाकलेली जमीन तो कुळवाच्या दिंडाने लोडतो. ढेकळे फोडून घेतो. फणतो. कुळवाची पाळी घालतो. काडीकचरा काढून टाकतो. माती न्हातीधूती होते. ती मळून तयार होते. हाडाच्या शेतकऱ्याने पेरणीसाठी तयार केलेली जमीन पाहाण्यासारखी असते. चाबकाची वादी मारली तर नक्षी उठते. मऊसूत पावलाचे ठसे उमटावेत असे. मग आणखी थोडा पाऊस झाला आणि मातीच्या पोटी वापसा धरला की पेरणीचा हंगाम सुरु होतो.

❒❒❒

## चाड्यावरीया मूठ

नुकताच पाऊस पडून गेलेला. वातावरणात निर्मळ स्वच्छता, तृप्ती आणि उबदार उत्सुकता भरुन राहिलेले. हिरवे गवत उगवायला लागलेले जणू धरती माता हिरवा शालू परिधान करते आहे. सारी चराचर सृष्टी एका नवनिर्मितीच्या सोहळ्यात गुंतलेली. मातीच्या पोटी उबदार वाफ धरली की वापसा आला असे ओळखून शेतकरी पेरणीच्या गडबडीला लागतो. सुताराच्या मेटावर एकच गर्दी होते.

**सुतार मेटावरी ।कशाची गर्दी झाली ॥**
**मेघराजानं वर्दी दिली ॥**

गावात सुताराची चार दोन घरं. त्यातले एक दोघेच सुताराचे काम करणारे. दारात एखादे लिंबाचे झाड. त्याखाली तासायला सोयीचे व्हावे म्हणून जमिनीत रोवलेला लाकडाचा बुंधा. आजूबाजूला पडलेले लाकडाचे ओंडके, औताची दिंडं, फण, दांड्या, गाडीच्या बावखड्या व चाक. लाकडाच्या ढलप्या आणि भुसा. शेजारी पडलेली सुताराची हत्यारे-तासणी, किकंरे, पटाशी, करवत, ठोकणी. तिफणी भरण्यासठी आलेले शेतकरी आणि काही बघे. असा सुतार मेटाचा बाज असतो.

पेरणीच्या अगोदर सुताराच्या मेटावर एकच गर्दी होते. कुणाच्या तिफणी भरायच्या असतात. कुणाची कुळवाची जाणवळी करायची असते. कुणाचे जू तयार करायचे असते. कुणाच्या तिफणीला फण किंवा दांड्या बसवायच्या असतात. तर कुणाची औतं शाव किंवा करळ झालेली असतात. ती बरोबर करायची असतात. पाऊस एकाच वेळी पडल्याने सर्व शिवारात एकाच वेळी वापसा येतो. पेरणीची औतं तयार करुन घेण्यासाठी सुताराकडे एकच झुंबड उडालेली असते. पेरणीची वेळ शेतकऱ्याच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची असते. आषाढ श्रावणात एखादे म्हातारे कोतारे गचकले तर मढं झाकून ठेवून शेतकरी पेरणी करतो. दुःख पोटात घालून त्यांना पेरणी करावी लागते. वापसा गेला तर हंगाम जातो हे त्याला चांगले माहित असते. मृत्तिकेच्या उस्तवारीला तीन-चार दिवस मोडतात म्हणून ही वेळ त्याला साधावी लागते.

आपल्याकडे पेरणी तीन वेळा होते. जून-जुलैमध्ये खरीपाची, ऑगस्ट – सप्टेंबरमध्ये रब्बीची आणि नोव्हेंबर – डिसेंबरमध्ये गहू, हरभऱ्याची. उन्हाळी हंगामात काही ठिकाणी भुईमूगाची पेरणी होते. तिफणी रोज वापरात नसल्याने प्रत्येक हंगामात त्या नव्याने दुरुस्त करुन घ्याव्या लागतात. सुताराला दादा-बाबा करुन तिफण-कुळव मनासारखा तयार करुन घेतला की शेतकरी पेरणीसाठी तयार होतात.

**सुताराचं मेट ।तिफणीबाईचं माहेयार ॥**
**हावशा माझं बंधू ।झालं मुराळी तयायार ॥**

सुताराचं मेट हे तिफणी बाईचं माहेर आणि शेत हे तिचे सासर. तिथे ती चालणार स्त्रियांनी आपल्या अनुभवातली सासर – माहेरची उपमा किती चपखलपणे वापरली आहे. वापसा आला, औत तयार झाला की, शेतकऱ्याची घरधनीनं लिपनात जास्तानीने ठेवलेले बी – भराण काढते. त्यात बाजरी, हुलगे, मटकी, मूग, तूर अशी नाना धान्ये असतात. कधी दुसऱ्याकडून वा बाजारातून विकत आणले जाते. पेरणीची तयारी

होते. जवळच्या शेतात पेरणी असली तर शेतकरी जुवावर औत घालून शेतात जातो. लांबच्या शिवच्या शेतात पेरणी असली तर बैलगाडी जोडतो.

**दूरच्या शेतायाची ।त्याची पेरणी गाडीवर ॥**
**हात अंगठीचा चाड्यावर ॥**

इथे पेरणी हा शब्द तिफण – रासणी या औतासाठी वापरलेला आहे.

पेरणीसाठी किमान दोन बैलजोड्या लागतात. एक तिफणीला, दुसरी रासणीला. नसल्यास पैरा करतात. मोठे शेतकरी जोड तिफणी घालतात. मागे दोन रासण्या लागतातच. सकाळी आठ वाजता औत शेतात जातात. कडेवर जोडणी होते. सापतीने बैले जुंपतात. तिफणीला व कुळवाला येटान घालतात. तीन फनावर नळे उभे करुन त्यावर चाडे दोराने घट्ट बांधले जाते. चाड्याला चाडीगाठ मारावी लागते. ती आली नाही तर पेरणीच करता येत नाही. तिफणीच्या मागील बाजूस दांडीच्या खुट्याला दोन दार अडकविले जातात व दोन दोर पुढे दांड्याला बांधून चांगली वड काढावी लागते. शेतकरी पोटाला चांमड्याची वटी बांधतो. पट्टापद्धतीने पेरणी करायची असेल तर म्हणजे बाजरीत मटकी, मूग पेरायचे असेल तर एक वटी चाड्याला बांधतो, बेर सारखं पडतंय का नाही याची खात्री करुन घेतो आणि ‘गण गण दा’ असं देवाचे नाव घेऊन चाड्यावर मूठ ठेवतो.

**चाड्यावरी या मूठ ।बैलाला म्हणी बाबा ॥**
**पहिल्या तासाला देव उभा ॥**

बहिणीच्या नावाने चाड्यावर मूठं धरली तर वसरीखालील पेव गव्हा-हरभऱ्याने भरतात असा उल्लेख एका ओवीत येतो. शेताच्या नंबरा कडंनी पेरणी सुरु होते.

**चाड्या वरीया मूठ ।काय बघतो ढेपणीला ।**
**नंदी चालत्या तिफणीला ।**

इंग्रज सरकारने जमिनीची मोजणी करताना नंबरावर मातीच्या वा दगडाच्या तीन उरळ्या किंवा ढेपणी घातल्या होत्या. शेजारचा शेतकरी या ढेपणीकडे पाहून पेरणी हद्दीप्रमाणे होते की नाही हे पहात असतो.

पेरणी ही शेतीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट असते. पेरणारा शेतकरी तज्ज्ञ असावा लागतो. शेतीच्या इतर कामात थोडे इकडें तिकडे झाले तरी चालते पण पेरणी आणि कोळपणी चांगलीच झाली पाहिजे. नाही तर शेतकऱ्याचे न भरुन येणारे नुकसान होते. म्हणून म. फुले यांनी शेतकरी शिक्षणाच्या इयत्ता कुळवणी, नांगरणी, कोळपणी व पेरणी यावर केल्या होत्या. शेतकऱ्याच्या पोराला रूढ शिक्षणाबरोरबर असे जीवनोपयोगी शिक्षण द्यावे. असे सुचविले होते. पेरणीसाठी बैलंही चांगली असावी लागतात. तासाने जाणारी, दिवसभर दमदारपणे व चपळाईने चालणारी. पेरणी सकाळी आठ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत चालते. शेतकरी हातावर भाकरी घेऊन खातो. त्यामुळे बैलालाही विसावा मिळत नाही. अशा गुणी बैलांकडून पट्टीच्या पेरणाराची पेरणी शेतात चालू असते. घरधणीन गीतातून त्याचे कौतुक करते.

अनुक्रमणिका

**तिफण माऊलीचं ।चाडद्वार सईल ॥**
**घरच्या गायीचं बैईल ॥**
**तिफण माऊलीचं ।चाडद्वार हालत्यात ॥**
**नंदी जोमानं चालत्यात ॥**
**तिफण माऊलीचं ।चाडद्वार खचणीचं ॥**
**नंदी मोराच्या नाचणीचं ॥**

बैलं कशी घरच्या गायीची, खिल्लारी. जोमानं चालणारी, औताला मोरावाणी नाचणारी ॥पेरणांराही तसाच तज्ज्ञ.

**माझ्या सख्यांची पेरणी ।जशी मोत्याची ववणी ।**
**बैलं तिफणीला मव्हनी ॥**

पेरणी कशी झाली आहे हे पीक उगवल्यावर म्हणजे तासी लागल्यावर लक्षात येते. सारख्या अंतरावर, सरळ रेषेत, जास्त दाट नाही, जास्त पातळ नाही. दैवार पडल्यावर अशी पिके मोत्याच्या ओळीसारखी दिसतात. त्यात सख्याची पेरणी, ती चांगली असणारच. तिफणीचे काम तुलनेने कमी कष्टाचे पण जास्त कौशल्याचे तर रासणीचे काम जास्त कष्टाचे आणि कमी कौशल्याचे असते. तिफणीला फण तर रासणीला फास असते. त्यामुळे ती बैलाला जड जाते. मधून मधून वसावी लागते.

**तिफण बाईनं ।तिनं काढली वल्ली माती ॥**
**माझ्या नेणंत्या राघुबाला ।माग रासणी जड जाती ॥**
**तिफण माऊलीनं ।तिनं मनाचा केला पेरा ।**
**माग रासण्या शिणला ॥**

रासण्या शिणला तरी पेरणीच्या हंगामात हाडाच्या शेतकऱ्याच्या अंगात हत्तीचे बळ संचारलेले असते. चराचर सृष्टी निर्मिती सोहळ्यासाठी उत्सुक झालेली असते. आभाळ उत्सुक, धरणी उत्सुक, शेतकरी पेरणीसाठी आसुसलेला. एक आदिम चैतन्य त्याच्या नसा-नसातून भरून वाहात असते. साऱ्या पेरणीलाच वेग आलेला असतो. नांगरी परंपरेतला हा प्रसंग अनुभवण्यासारखा असतो.

**चाड्यावरीया मूठ ।चाडदोरला दिला रंग ॥**
**वाटचा वाटसरु ।तिफणी पाहून झाला दंग ॥**
**पाऊस पाण्यायाची ।फळी मांडली दुरुयानी ॥**
**कुणबी निघाला पेरुयानी ॥**

पेरणीनंतर आणि विशेषतः धुळवाफेच्या पेरणीनंतर पाऊस पडला तर तो अत्यंत उपयुक्त ठरतो. उगवण चांगली होते.

अनुक्रमणिका

**तिफण माऊलीनं ।तिनं माऊलपण केलं ॥**
**नंदी तासाला पाणी प्यालं ॥**

तिफण माऊलीच्या कृपेने पाऊस आला अशी कुणब्याची समजूत. शेतकरी असा मातीत गाढून घेतो. राबतो, पेरतो, धान्य वाढवितो, पिकवितो म्हणून तुमच्या आमच्या पोटापाण्याची व्यवस्था होते. म्हणून या देशातल्या प्रत्येकाने पेरणाऱ्या हाताविषयी कृतज्ञ असले पाहिजे. शेतकरी सुखी तर जग सुखी.

❒❒❒

अनुक्रमणिका

# शिवच्या शेतामंदी

लोकगीत ही कृषिसंस्कृतीची निर्मिती आहे. हजारो वर्षाच्या कृषि संस्कृतीने इथले लोकमानस व लोकसंस्कृती घडविली आहे. आपला देश खेड्यांचा. खरे भारतीय जीवन खेड्यात पाहायला मिळते. म्हणून म. गांधीनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. खेड्यातल्या शेतकऱ्याच्या जीवनानुभवाचे प्रतिबिंब स्वाभाविकपणे लोकगीतातून पडलेले दिसते.

खेड्यात गाव पांढरीला जितके महत्त्व असते. तितकेच किंवा त्यापेक्षा जास्त काळीला असते. काळीवर पांढरी जगते. काळीआई पिकली तर पांढरीचा रुबाब. ऋतुचक्राप्रमाणे शेतीचे एक कृषिचक्र असते. पेरणीपासून मळणीपर्यंत. नांगरटीपासून नांगरटीपर्यंत.

मैनाबाई शेतकऱ्याचा कन्या आणि शेतकऱ्याची पत्नी. तिच्या व्यक्तिमत्वाची सारी जडणघडण नांगरी (कृषि) परंपरेत झालेली. ती गावात राहात असली तरी तिची शेतीवाडी रांनात होती. शेती गावांपासून लांब, शिववर. म्हणून त्याला शिवचं शेत म्हणत.तिथे विहीर, काळी कसदार जमीन. थोडी माळरानाची शेती लागवडीखाली आणलेली. सकाळचा कामधंदा आवरुन तिला शेतावर जावे लागे. गावातल्या पाटील देशमुखांच्या बायंका सोडल्या तर बहुतेक शेतकऱ्यांच्या बायकांना शेतात जावे लागते. शेतात हंगामानुसार शेतीची कामे सुरु असतात. तिचे शेत कसे –

**शेताला जाती गोरी ।शेत काळजाची वडी ॥**
**माझ्या हावशा राजसाची ।बारा बैलांची जोडी ॥**

शेत काळजाच्या वडीसारखे. बारा बैलांचा मोठा कुणबावा. आता शेतात नांगरटीचे काम चालू आहे. नांगरटीचे काम कष्टाचे.

**शिवच्या शेतामंदी ।बारा बैलांची एकवड ॥**
**चुड्या माझ्या राजसाला ।काळी जमीन जाती जड ॥**
**शिवच्या शेतामंदी ।गार सावली पांगऱ्याची ॥**
**चुड्या माझ्या राजसाची ।तिथं बैठक नांगऱ्याची ॥**

उन्हाळा असल्याने नांगरटीचे काम सकाळी दिवस उगवायला सुरु होते. दिवस माथ्यावर आला की, भाकरीचा वकुत होतो. नांगऱ्यापेक्षा आगल्याला (बैल हाणनारा) भुका जास्त लागलेल्या असतात. ते भाकरीची वाटच पाहत असतात.

मैनाबाई सकाळचे सर्व आवरुन स्वयंपाकपाणी करुन शेतात भाकरी घेऊन येते. डोक्यावर पाटी, पाटीत भाकरी, भाकरीवर दुधाचा तांब्या, कालवणाची तवली, भाजी, कांदा – लोणचं इत्यादी गोष्टी असतात.

**भाकरीची पाटी ।माझ्या मानला झालं वजं ॥**
**शेती भुक्याजलं गणराज ॥**

अनुक्रमणिका

**शिवच्या शेतामंदी ॥तिथं हावशाची रामकाठी ॥**
**मैनाबाई उत्तर तिथं पाटी ॥**

भाकरी आल्यात म्हंटल्यावर नांगर थांबतो. पाणी आणले जाते. रानातल्या जेवणाची खुमारी काही औरच असते. सणकुन भुका लागलेल्या असतात. त्यामुळे भाजीभाकरीही पक्वान्नापेक्षा चांगली लागते. त्यात घरच्या अस्तुरीनं केलेले जेवण आणि प्रेमाने वाढलेले त्यामुळे ते अधिकचं रुचकर होते.

मैनाबाई शेताला जाताना तिच्याबरोबर कामाधामाला जाणाऱ्या तिच्या सख्या असतात. ती कौतुकाने आपले शेत दाखविते.

**चला सयानू पाहू पाहू**
**पाहू शेतीची नांगरट**
**माझ्या सख्याची नांगरट**
**हायत करड्याचं पिवळं पट्टं**
**तुरीबाईला शेंगा दाट**
**हरबऱ्याचं डहाळं मोठं**
**चुड्या माझ्या राजसाच**
**जवसावरी सारा फिट**

तुरीच्या शेंगा, हरबऱ्याचे डहाळे खायला मिळतील म्हणून काहीवेळा तिच्या सख्या शेतात येतात. शेतकऱ्याला आपलं शेत मग ते उघडे माळरान का असेना दाखविण्याची मोठी हौस असते. तशी मैनाबाईलाही होती.

मघा-पूर्वा नक्षत्रांचा पेरणीसाठी पाऊस पडला की रब्बीची पेरणी होते. मागे आपण पेरणीसंबधी पाहिले आहेच तरीही –

**शिवच्या शेतामंदी ।उभी राहाती लवणी ॥**
**माझ्या सख्याची पेरणी ।जशी मोत्याची ववणी ।**

पेरणी झाली, हस्त नक्षत्राचा पाऊस पडला की बघता बघता पिकं ताशी लागतात.

**शिवच्या शेतामंदी ।वळकू येतात पेंडवलं ॥**
**माझ्या राघुबाचं ।ताशी लागलं जुंधळं ॥**

मग भांगलणाची एकच घाई होते. बायका सांगितल्या जातात. पाती धरल्या जातात. खुरप्याने तण काढले जाते. माती हलवली जाते. याकाळात मैनाबाईला भारी त्रास पडतो. घरातलं सारं करावं लागतच पण दिवसभर तिला भांगलावे लागते. कामे करुन घ्यावी लागतात. गवत साठवावे लागते.

अनुक्रमणिका

खुरपण झाली की थंडी सुटते, पिकं वाढतात. बघता बघता शाळू पोटऱ्याला येतो. कणस पडतात. दाणे भरतात. शिवच्या शेतात पाखराचा भारी त्रास. मग शेताशिवारात पाखरं राखायला माणसं येतात. हा ऽ हू ऽचा एकच काल्लोळ माजतो. सारं शिवार चैतन्याने गजबजून उठते.

**शिवच्या शेतामंदी ।चिमण्या बायाचं माहेयार ॥**
**केल्या गोफणी तयायार ॥**
**शिवच्या शेतामंदी ।आटूळा ढेपणीचा ॥**
**चंग वाजतो गोफणीचा ॥**
**शिवच्या शेतामंदी ।शाळू आलायं हुरड्याला ॥**
**चुड्या माझ्या राजसाचा ।चंग आवाज भोरड्याला ॥**
**शिवच्या शेतामंदी ।चिमण्या करती चिवचिव ॥**
**राखण करतो सदाशिव ॥**

पिकं डोलाय लागतात त्याचा एक गंध शिवार भरुन राहातो. हुरड्याचा हंगाम सुरु होतो. आखट्या पेटतात. शेताशेतातून धुराचे लोट आकाशाला भिडतात. कणस भाजली जातात. ताजा ताजा गरम हुरडा खाल्ला जातो. बघता बघता पिकं पिवळी पडतात. मग काढणी होते. पिकं कात्रीला लावतात.

**शेती घातली मोडणी ।तिथं आल्यात आयाबाया ॥**
**चुडा माझ्या राजसा ।काड कातरीला पाया ॥**
**शेती घातली मोडणी ।नारी करत्यात पाणी पाणी ॥**
**हावशा माझा बंधू ।करतो कोळीयाची बोलवणी ॥**

कोळी पखाल घेऊन शिवाच्या शेतात कशाला मरायला येतो. शेतकऱ्यालाच कोळ्याच्या रेड्यासारखे पाणी आणावे लागते. खळ्यात मोडणी सुरु होते. शेतकऱ्याला रात्री राखणीला थांबावे लागते.

**शिवच्या शेतामंदी ।नको भीवूस माझ्या भीवा ॥**
**तुझ्या मदनावरी दिवा ॥**

आता मळणी मशीनवर खळे करणे फार सोपे झाले आहे. पण पूर्वी बैलं फिरवून वा बडवून खळे केलं जाई. रास तयार होई. पोती भरली जात.

**पिकलं पिकलं ।पिकल्यालं नवलं काई ॥**
**माझ्या सख्याच्या शेतामंदी ।नंदी राबत्यात लई बाई ॥**
**पिकलं पिकलं ।जन बोलत चावडीला ॥**
**माझ्या सख्याच्या शेतामंदी ॥राशी लागल्या वावडीला ॥**

अशी खळ्याची चर्चा गावात पोहचली की बलुतेदार, अलुतेदार, मागतकरी खळ्यावर जमा होतात.

**खळ्याच्या काठाला ।दानधरम कुणी केला ॥**

अनुक्रमणिका

**कुणबी भरण्याचा पिकला ॥**

कुणब्यासारखा उदार दाता नाही. पाखरापासून चोरचिलटापर्यंत आणि किड्यामुंग्यापासून मागतकऱ्यापर्यंत अनेकांचा तोच पोशिंदा. भरभरुन पिकलं तर तो उदार अंतःकरणाने भरभरून देतो. शिल्लक राहिल्यालं पिवळं सोनं घरात येतं. त्यातूनं एखादा नग दागिना हौसेने कारभारणीला घडविला जातो.

**शिवच्या शेतामंदी ।माळाचं केलं मळं ॥**
**सासू-सूनाचं पिवळं गळं ॥**

❒❒❒

# भरल्या बाजारात

सुगी सरली खळं झालं की धनधान्य बाजारात येतं. कुणबी पिकवण्यात शहाणा असला तरी बाजारात वेडा ठरविला जातो. घाम गाळून पिकविलेल्या धान्याची किंमत त्याला मिळत नाही. शेतीमालाच्या भावाने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. त्यातूनच शरद जोशीचे आंदोलन सुरु झाले. हा झाला मोठा प्रश्न. पण बाजाराला खेड्याच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याकडील बाजार ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे. साधारण मोठ्या खेड्यात आठवडी बाजार भरतात. एका ठराविक वारी उत्पादक व ग्राहक एकत्र येतात. परस्पर सामंजस्याने, बिनबोभाटपणे आर्थिक व्यवहार होतात. ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेने अशा बाजाराचे फारसं कोणतंही नियोजन न करताही वर्षानुवर्ष बाजार ही संस्था सुरळीतपणे चालू आहे. आर्थिक व्यवहार होत आहेत. बाजारात शेतकरी धनधान्य विकतात. मजुरांचा पगार होतो. धान्याची, भाजीपाल्याची, तेलामिठाची, अंडी-कोंबड्यांची, कपड्या-लत्यांची खरेदी-विक्री होत असते. देणं-घेणं, उधार-उसनवार बाजार दिवशीच होते. कित्येक छोटे व्यापारी बाजारावर जगतात. बाजारात घराघरातील कारभारी मंडळी येतात. व्यवहारकौशल्य पणाला लागते. काट्यावर सौदे होतात. परस्परविरोधी हितसंबंधाच्या मध्यावर व्यवहार होतात.

खरं तर बाजार हे पुरुषांचे क्षेत्र. प्रतिष्ठित घरातल्या गरती बायका बाजारला जात नाहीत. पण कष्टकरी समाजातल्या बायका बाजारला जात होत्या आणि आहेत. आपल्या व्यवहारकौशल्याने घरप्रपंच चालवीत होत्या. खेड्यातल्या एरवीच्या स्थितीशील दिवसापेक्षा बाजारच्या दिवसाचा थाट वेगळा असतो म्हणून लहान मुलींच्या खेळगाण्यातही हौसेने बाजारला जावेसे वाटते.

**रंगू बाजारला जाते, जाऊ द्या की रं!**
**केळं फुटाणं खाते, खाऊ द्या की रं!**

असं गंमतीने म्हटले जाते.

पूर्वी चूल आणि मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र. चार पुरुष माणसात त्यांचा वावर नसे. त्यामुळे पुरुष माणसात जायला त्या भीत. लाजत. बाजारसारख्या ठिकाणी त्या क्वचितच जात. काही कारणांनी गेल्या तर सभ्यतेने वागत. परपुरुषाचा वारा लागू न देणाऱ्या काळात त्या बाजारला गेल्या तर –

**भरल्या बाजारात ।माझा पदूर काकणात ।**
**नटव्या बंधवाची ।सभा वाण्याच्या दुकानात ॥**
**भरल्या बाजारात ।माझा पदूर नखाईत ॥**
**बंधू शंभर लोकाईत ॥**
**भरल्या बाजारात ।वाजू देईना जोडवं ।**
**गवळी माझ्या नानाजीला ।कोण लावील आडवं ।**

आपल्या वागण्याने पित्याला, पतीला, भावाला कमीपणा येऊ नये, अशी त्यांची इच्छा असते.

बाजारात धान्याची खरेदी-विक्री होते. कुणब्याचा शेतमाल बाजारात जातो. पैसा घरात येतो. मैनाबाई मोठ्या अभिमानाने सांगते.

**भरल्या बाजारात ।माल कुणाचा आला लयी ॥**
**चुड्या माझ्या राजसाची ।अडत्या करीतो सई ॥**
**भरल्या बाजारात ।बैल पाखऱ्या घामाघाम ॥**
**चुड्या माझ्या राजसाला ।अडत्या घालतो रामराम ॥**
**भरल्या बाजारात ।अडत्या करतो उलाघाली ॥**
**चुड्या माझ्या राजसाची ।मालाची गाडी आली ॥**

कुणब्याचा माल व्यापाऱ्याच्या अडतीवर विकतो. व्यापारी गोड बोलून शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कसा लुबाडतो याची कल्पना अशिक्षित स्त्रियांना कशी असणार? आणि ती ओव्यात तरी कशी येणार? ती आपला माल गाडीने अडतीवर जातो. याचाच अभिमान बाळगते.

कधीतरी मैनाबाई बाजारला जाते. एवढ्या माणसात जाण्याच्या तिला क्वचितच प्रसंग येतो. सोबत असावी म्हणून ती मुलाला घेऊन जाते.

**भरल्या बाजारात ।माझा येडीचा अवतार ॥**
**नेणंता राघू माझा ।संग सोन्याचा पवितर ॥**

पंचक्रोशीत माहेर असल्याने बाजारात सावळा बंधुराजा भेटतो.

**भरल्या बाजारात ।ओळखू येईना माझं मला ॥**
**हवशा बंधवानं ।हात शेल्याचा वर केला ॥**
**भरल्या बाजारात ।गार सावली कुठं पाहू ॥**
**सोन्याच्या छत्रीखाली ।बंधू वकील माझं भाऊ ॥**

भावा बहिणीची भेट होते. ख्यालीखुशाली होते. अशावेळी भाऊ बहिणीला चोळी घेतो.

**भरल्या बाजारी ।भावाबहिणीची पडली गाठ ॥**
**बंधुजी घेतो चोळी ।फुटानी रंग दाट ॥**

कधी कधी हक्काने बहीण भावाकडून साडी घेते.

**चाटी म्हणू दादा ।सोड दिंड्याच्या गाठी ।**
**हावशा बंधवाला ।आणला माघारी साडीसाठी ।**

अशी खरेदी होते. वैराळाकडून ती चुडा भरते. कधी किडूकमिडूक मोडून सोनाराकडून जोडवी करुन घेते. बाजारातली खरेदी स्त्रिया स्वतः करीत नाहीत. वडील, बंधू, पती, मुलगा असं कुणीतरी पुरुष

तिच्यासाठी खरेदी करीत असतो. यावरुन तिचे आर्थिक परावलंबीत्व दिसून येते. कधी कधी भाऊ काही घेत नाही. तिच्या आशेची निराशा होते.

**भरला बाजार ।भरुनी वसरला ॥**
**आताच्या कलीमंदी ।भाऊ बहिणीला विसरला ॥**

पूर्वी खेड्यात दळणवळणाची साधने नव्हती. पोष्ट असलं तरी लिहिता वाचता येत नव्हतं. मग बाजारातून — बाजारात असे सांगावे धाडले जात. असे सांगावे हेच पूर्वी गोरगरीबांचे पत्राचे काम करीत.

बाजारात नातेवाईकांच्या, पैहीपाहुण्यांच्या गाठीभेटी होत. कधीतरी बहिणीचा बाळ भेटे.

**भरल्या बाजारात ।कुणी धरला माझा हात ॥**
**बहिणीचा बाळ बोलं ।चल मावशी एक रात ॥**

अशा आंग्रहामुळे तिला बहिणीकडे जावे लागे. बाजारात इतर नातेवाईकांची भेट होई.

**भरल्या बाजारात ।इन हुडकती ईवायाला ॥**
**जरीमंजील जावायाला ॥**
**भरल्या बाजारात ।सासू हुडकती जावायाला ॥**

बाजारात जावायाला पोषाख घ्यायचा झाला तर जावाई-इवाई यांना शोधलेच पाहिजे.

तरुण स्त्री-पुरुषांचे प्रेमसंबंध बाजारात जुळतात, फुलतात, उमलतात. गाठीभेटीचे, हौसेने एकमेकाला काही घेण्याचे ठिकाण म्हणजे बाजार.

**भरल्या बाजारात ।कशाचं देणंघेणं ॥**
**तुझ्या पायी म्या केलं येणं ।**

अशा प्रेमात पडलेल्या भावाची बहीण म्हणते.

**भरल्या बाजारात ।नार नखीची हळू बोलं ।**
**हवशा बंधवाला ।माझ्याला पडली भूल ॥**

असा प्रेमात पडलेला भाऊ आपल्या प्रेयसीसाठी चोळी घेतो.

**लुगड्याचं मोल ।देतू चोळीच्या खनाला ।**
**चाटी नवल करीतू॥तुझ्या भडंगपणाला ॥**

प्रेमापुढे पैशाचे काय मोल! बाजारात अशाही गोष्टी घडतात. बाजार हा अशा अनेक दृष्टीने खेड्यातील वैशिष्ट्यपूर्ण प्रकार असतो.

❒❒❒

अनुक्रमणिका

## मुंबई शहरामंदी

माणदेशाचं मुंबईशी फार जवळचं नातं आहे. कोकणी माणसं जशी मुंबईवर जगतात तशी आमचीही जगतात. माणदेश हा दुष्काळी भाग. माळरानाच्या जमिनी.पाऊस कमी. कधी पडला तर पडला नाही तर नाही. धरणाचं पाणी नाही. शेतीचं आधुनिकीकरण मुंगीच्या पावलाने होत आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेती नेहमीच आतबट्ट्याची. दर तीन वर्षांनी दुष्काळ ठरलेला. शेतीच्या दयनीय अवस्थेमुळे शेतीपूरक उद्योगधंदेही वाढले नाहीत. माणसाच्या हाताला काम नाही. पोटाला अन्न नाही. त्यामुळे इथली तरुण माणसे जगण्यासाठी, पोटभरण्यासाठी बाहेर जातात. वऱ्हाडपासून गोव्यापर्यंत आणि ऊसतोडीपासून मुंबईपर्यंत सर्वत्र कामधंदा करताना आजही दिसतात.

मुंबईचे औद्योगिकीकरण झाल्यावर गिरणी, गोदीत काम करण्यासाठी दुष्काळी भागातली माणसं गेली. त्यांना मुंबईत ‘घाटी’ म्हणतात. त्यांनी घाम गाळून मिळविलेल्या पैशावर गावाकडची माणसं जगत होती. बदलत्या काळानुसार लोकसाहित्याची निर्मिती होत असते. पण ते जीवन पाचपन्नास वर्षे लोकांच्या अनुभवाचा विषय व्हावे लागते.

मैनाबाईचा एक भाऊ तरुण वयात जगण्यासाठी मुंबईला गेला. धडपडून गिरणीत कामाला लागला. ‘मुंबईवाला’ म्हणून नात्यागोत्यात त्याला मान होता. पूर्वी दळणवळणाच्या सुविधा कमी होत्या. त्यामुळे तो सटीसहामासी गावाकडं आल्यावर त्याची आणि मैनाबाईची भेट व्हायची. आठवण झाली की ही वेडी बहिण आपल्या दूरदेशीच्या भावावरुन ओवी गाई.

**मुंबईची म्हमादेवी ।तुला तांदळाचं बोण ॥**
**हावशा माझा बंधू ।तुझ्या मुलखी माझं सोनं ॥**
**मुंबईची म्हमा देवी ।तुला सोन्याचं कंबायाळा ॥**
**हावशा माझ्या बंधवाला ।तुझ्या नगरी संभायाळ ॥**

गावदेवतेचे गावावर व तिथल्या माणसावर कृपाछत्र असते. ही देवता त्यांचे रक्षण करते. त्यांना सुखदुःख देते अशी लोकसमजूत आहे. मुंबईचे दैवत मुंबादेवी. मुंबईवर तिची कृपा. आपल्या भाऊरायाला तिच्या नगरीत सांभाळावे, यश द्यावे मैनाबाई प्रार्थना आहे.

**मुंबईची म्हमादेवी ।तुझ्या सोन्याच्या हायत्या केशा ।**
**हावशा माझ्या बांधवाला ।यश देवून धाड देशा ॥**

ही मैनाबाईने केलेलती प्रार्थना म्हमादेवीने ऐकली.

**मुंबईची म्हमादेवी ।कुण्या राजसाला पावयली ।**
**हावशा माझ्या बंधवानं ।धज सोन्याची लावयली ॥**
**आठ दिसाच्या ऐतवारी ।माझ्या हमालाला सुट्टी**
**वाणीचा बंधु माझा ।म्हमादेवीला पेढ वाटी ।**

अनुक्रमणिका

गिरणीतला कामगार म्हणून का असेना भावाला पैसाअडका मिळत होता.

भाऊरायाची बायकामुलं गावाकडंच राहायची. कुणातरी जोडलेल्या मायबहिणीकडं खानावळ खायची आणि बैठकीच्या खोलीत बिछाना टाकून झोपायचं. घर संसारापासून बायका मुलांपासून दूर एकटं राहायचं. भावनिक कोंडमारा व्हायचा.

**माझी मैना गावावर राहिली ।**
**माझ्या जिवाची होतीया कोहिली ।**

या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लावणीत ही विरहभावना नेमक्या पद्धतीने व्यक्त झाली आहे. भाऊ दिवाळीला, गावजत्रेला मुलांना कपडे, खाऊ, पैसाअडका आणि इतर संसारोपयोगी साहित्य घेऊन येई.

**मुंबई शहरामंदी ।तिथं मिठाई कशी शेर ॥**
**हावंशा बंधु माझा ।देशा निघाला सावकार ॥**
**आगनगाडीचा धूर ।धूर निघतो वरच्या वर ॥**
**मुंबई शहराचा ।देशा निघाला सावकार ॥**
**आगनगाडीला ।नका म्हण राकशीन ॥**
**तीन बोटाच्या रुळावरुन ।कशी चालती मोकाशीन ॥**

त्याकाळात दळणवळणाच्या सुविधा कमी होत्या. देशावर यायचं म्हणजे कुर्डुवाडीवरुन लातूर – मिरज – बार्शी रेल्वेने. मुंबईत हमाली करत असला तरी देशावर तो सावकारच. असा भाऊराया दिवाळीला रजेवर गावी आला चार आठ दिवस राहिला. मैनाबाई माहेरी आली होती. परत जाताना मुंबई दाखवायची म्हणून तो मैनाबाईला बरोबर घेऊन गेला.

त्याने बहिणीला फिरुन मुंबई दाखवली.

**मुंबईचा राहाणेवाला ।सांगतो खानाखूना ॥**
**दरयाकडंला दारुखाना ।**
**मुंबईची म्हमादेवी ।सारी मुंबई काळीकुट ॥**
**चाले दर्यात आगबोट ॥**

मुंबईत मैनाबाईने गोदी, दर्या आणि आगबोटी पाहिल्या. भारताचे प्रवेशव्दार, चौपाटी, वाळकेश्वर, मत्स्यालय, राणीचा बाग, म्हमादेवी पाहिली. भाऊराया ज्या गिरणीत कामाला होता ती गिरणी पाहिली. ती म्हणते,

**पहाटेच्या पाऱ्यामंदी ।गिरणीबाई हळू कोक ॥**
**पाळीवाल्याची पहिली झोप ॥**
**हात मी जोडते ।गिरणीबाईला जाता जाता ॥**

अनुक्रमणिका

**हावशा माझा बंधु ।साच्यामध्ये उभा होता ॥**
**मास्तर मुकादम ।दोघं बसलं फळीवरी ॥**
**साचे चालतात कळीवरी ॥**
**मुंबई शहरामंदी ।बत्या जळत्यात काळ्यानिळ्या ॥**
**गिरणीवाल्याच्या रातपाळ्या ॥**
**मुंबई शहरामंदी ।तिथं पैक्याचं जंजाळ ॥**
**माझ्या बंधवाचं ।काम गिरणीचं वंगाळ ॥**

इथं नारायण सुर्वे यांच्या ‘गिरणीची लावणी’ या कवितेची आठवण होते. ती अवाढव्य गिरणी. तिथली सतत घडघडणारी यंत्रे, पाळ्यात काम करणारे कामगार, त्यातलाच आपला भाऊ.भावाला पैसा मिळत असला तरी गिरणीतलं काम वंगाळ. पण गावाकडं जगणं मुश्किल असल्यामुळे काम केल्याशिवाय पर्याय नाही.

भाऊराया जिथं राहत होता तिथली वस्ती अनेक जातीधर्माची. त्यांचं खाणपिणं, राहणं पोषाख, भाषा, धर्म सगळं वेगळं.

**मुंबईची म्हमादेवी ।सारी मुंबई आरशाची ।**
**बोली कळना पारशाची ।**

भाऊराया खानावळीत खात होता. मैनाबाई तिच्याकडेच राहिली होती.

**मुंबई शहरामंदी ।तिथं आपलं नाही कोणी ॥**
**तिथं जोडल्या मायबहिणी ॥**

अशा जोडलेल्या नात्यानाच शहरात महत्त्व असतं. नात्यागोत्याची रक्ताची माणसं फारशी नव्हतीच. खानावळवाली माऊली चांगलीच म्हणायची. तिही खेड्यातली. जेवण चांगलं करत होती अस नाही. पणं दोनवेळेला पोटाला घालत होती. त्यात प्रेमाचा भाग कमी. व्यवहाराचाच जास्त. जग हे दिल्या घेतल्याचे होते. ती स्वतःच्या भावाची खानावळ घेत होती.

**मुंबई शहरामंदी ।तिथं नाहीत शेतमळं ।**
**बहीण भावाची घेती खानावळ ।**

मैनाबाई आठदहा दिवस मुंबईत होती. तिथले जगच वेगळे. तिथले रस्ते, वाहने, इमारती, गर्दी, झगमगाट पाहून ती दिपून गेली. भावाने साडी-चोळी घेऊन तिला गावी पाठविली. कालानुरुप नवे जीवनानुभवसुद्धा लोकगीतातून कसे मांडले जातात हे यावरुन लक्षात येईल.

❒❒❒

## वाणीचा बंधू माझा

जात्यावरची ओवी सर्वाधिक प्रेमाने, जिव्हाळ्याने, कौतुकाने कुणाविषयी गायली जात असेल तर ती भावाविषयी. बहिण-भावाचं नातं उदात्त, गंगेच्या पाण्यासारखे पवित्र आणि मंगल.

**भावा ग बहिणीच्या ।प्रेमाला नाही सर ॥**
**गंगेच्या पाण्यापरी पवितर ॥**

एकाच आईबापाच्या पोटी जन्मलेली कुटुंबाच्या शीतळ सावलीला वाढलेली, एकाच जीवनरसावर पोसलेली ही बहीण-भाऊ.

**लसूण कोथंबीर ।एका दंडान पाणी पिती ॥**
**बहीण भावाला शोभा देती ॥**

बहीण – भाऊ एकत्र खेळलेली, भांडलेली, दंगामस्ती केलेली. एकत्र बालपण घालवलेली. रक्षाबंधन आणि भाऊबीजेसारख्या सणसमारंभातून लोकसंस्कृतीने हे नाते महन्मंगल केलेलं, जोपासलेलं, वाढवलेलं. पुढे तरुण होत असताना भाऊ बहिणीचे रक्षण करतो.

**उभ्यागल्ली जाते ।कोण घेईना माझं नाव ॥**
**वाघासारखं माझं भाव ॥**
**शंभर माझं ग्वात ।नाही गोताची गरज ॥**
**थोरला माझा बंधुराज ।माझा किल्याचा बुरुज ॥**

आपला भाऊ वाघासारखा आहे, तो किल्ल्यांच्या बुरूजासारखं संरक्षण देतो असे मैनाबाई अभिमानाने सांगते. पुढं बहिणीचं लग्न होतं. भाऊ त्याच घरात वाढतो. मात्र बहिणीचं रोप कांदा वांग्यांच्या रोपासारखं इतर वाफ्यात लावलं जातं. तिथेच तिच्या जीवनाला फुलाफळाने बहर येतो. बहिणीची वाट वेगळी होते. नातं दुरावतं. बहीण भावाच्या नात्याचा पदर एका वेगळ्या पातळीवर जातो.

आषाढ सरत आला, श्रावण सुरु झाला किंवा दिवाळी-दसऱ्याला सासुरवाशिणीला माहेरची ओढ लागते. 'दिवाळीच्या मुळा लेक आसावली' अशी तिची स्थिती होते. ती मुराळ्याची वाट पाहाते. मुराळी बहुदा भाऊच असतो. क्वचित भाचा असतो. माहेरचं गाव, कुटुंब, आई-बाप, भाऊ-बहिण, गडयणी यांची तिला आठवण होते. त्यांना बघावसं वाटतं. ती दोसरा काढते. पण तिला बोलता येत नाही. ती वाट पाहात राहाते. कधी उचकी लागली तर

**उचकी लागली ।का ग उचकी तुझी घाई ॥**
**माऊली बाईनं ।सय केलीया कशापायी ॥**

नागपंचमी, दिवाळी, संक्रांतीला आईलाही आपली लेक माहेरी आणावी असे वाटते. नाहीतर पंचीम नाचारती वाटते. मातेचे अंतःकरण लेकीसाठी ओढ घेत असते. मैनाबाईही सांगावा धाडते.

**सांगून धाडयती ।आला श्रावण झुलावा ॥**
**न्यायला पाठवा मुराळी ।मला माहेरी बोलवा ॥**

अशी ही लेकीची आस आणि सांगावा पाहून आई मुलाला पाठवून देते. भाऊ बहिणीच्या घरची वाट धरतो. जुन्या काळात दळण-वळणाच्या सुविधा कमी होत्या. बैलगाडीनेच बहिणीला माहेरी आणले जाई.

**माझ्या माहेराच्या वाटं ।गाडी कुणाची चंगाळाची ॥**
**सांगते सये तूला ।हावशा माझ्या मुराळ्याची ॥**

असा बंधूजी मुराळी होऊन येतो. एखादा गरीब भाऊ असला, बैलगाडी नसली तर एकटाच चालत येतो.

**उचकी लागली ।काय उचकीचा दाखयला ॥**
**वाणीचा बंधू माझा ।वाट चालतो एकला ॥**

सासरच्या रामरगाड्यात पिचून गेलेल्या आणि सासुरवासाने छळल्या गेलेल्या सासरवाशिणीला सणाच्या अगोदर आलेला मुराळी पाहिला की फार आनंद होतो. ती दुरूनच त्याला वळखते. अंगात अंगरखा, त्याला सोन्याची बटन, हातात घड्याळ, शेलासंबला किंवा वाकडी टोपी यावरुन ती आपल्या भावाला वळखते.

**पाठीचा भाऊराजा ।आला ग माझ्या दारी ॥**
**डोळ्याची निरांजनं ।ओवाळीते त्याला सारी ॥**

ती दुरूनच डोळ्याच्या निरांजनाने ओवाळीते. भावाला पाहिलं की तिचं मन हारकून जातं. आनंदाने, प्रेमाने, कृतज्ञतेने भरुन येतं.

**सांगून धाडयती ।माझ्या सांगाव्यासंगं आला ॥**
**हावशा बंधू माझा ।किती मायाळू जलमला ॥**
**लोकांच्या बंधूवाणी ॥माझा बंधू न्हाय नारी ॥**
**माझ्या बंधवाला ।शहामृगाला मया भारी ॥**
**बहीण-भावांडाची ।त्याची पोटामंदी माया ॥**
**असं फोडिलं सीताफळ ।आत साखरेची सया ॥**

सासूरवासाचे सारं दुःख पोटात घालून ती हसतमुखाने स्वागत करते. तिचे डोळे पाण्याने भरुन आलेले असतात.

**माझ्या घराला पावयना ।बाय मी देखीला अंगणी ॥**
**झाऱ्या बुडविला राजणी ॥**

अनुक्रमणिका

**बंधूजी पावयना ॥सया म्हणती कोण आला ॥**
**चंद्र वाड्यात उगवला ॥**

कशी विलक्षण सुंदर प्रतिमा आहे. या गीताचे ते खास वैशिष्ट्य आहे. आता भाऊ तिच्या घरात पावना आणि ती स्वतःच्या आईबापाच्या घरांत पावणी ठरते. ती पाणी देते. बसायला जान टाकते. हातपाय धुऊन चहापान होतं. ख्यालीखुशाली झाली की, ऐनवेळी भावाला खायला काय करावे असा प्रश्न मैनाबाईला पडतो.

**बंधुजी पावयना ।काय करू मी खायाला ॥**
**उठा बंधुजी जेवायला ।तूप भिनल शेवायाला ॥**

लवकर होणारा शेवायाचा भात ती तूपसाखर घालून वाढते. रात्रीच्या जेवणाचा बेत मात्र खासच असतो. बंधुजी पावना बसाय देते चंदनाचा पाट, भोजनाला करते जीरेसाळीचा भात, येळलवंगाची करते शाक, पिण्याला पाणी चंद्रभागेचं पाक, पान खायाला चिकणी सुपारी, काळा कात, केली बहिणीनं चालरीत, गेला बंधुजी आईला सांगत; बहिणी असाव्या जलमात. चांदण्यारात्री बहीणभावाचं अंतरीचं गुज (गप्पा) होतं. चंद्र माळीच्या आड जातो पण गुजाचा झाड होत नाही. दुसरे दिवशी परवानगी काढून बहीण माहेरी येते. असा भाऊ हक्काचां मुराळी असतो.

**हिरव्या चोळीवर ।मोर काढते दख्खनचा ॥**
**सांगते सये तुला ।बंधू मुराळी हुकमाचा ॥**

बहीण सणाला माहेरी आली तर हौसेने माहेर करणारा बंधुराजा गाण्यात कौतुकाचा विषय होतो.

**बारीक बांगयडी ।मला भरुस वाटयली ॥**
**हावशा बांधवाला ॥तार माहेरी पाठवली ॥**

बहिणीचा माहेरी साडीचोळीचा हक्क असतो हे भाऊही मानतो. चोळी फाटली तर ती हक्काने भावाला मागणार! दागदागिने करायचे असले तरी ती भावाकडेच हट्ट धरणार. मागे यासंबंधीचे भावविश्व आपण पाहिले आहेच. दिवाळीची भाऊबीज तर बहिणीच्या हक्काची.

**भाऊबीजे दिसी ।बहीण ओवाळीते भावा ॥**
**जतन करी देवा ।माझ्या माहेरीचा दिवा ॥**

भाऊबीजेला ओवाळले की भाऊ ओवाळणी घालतो.

**दिवाळीचं ताट ।ताट झालया माझं जड ॥**
**हावशा बंधवानं ।मला ओवाळीला सिंहगड ॥**

भावाने कुणाला कळू न देता बहिणीला पैठण नेसवली.

**बंधुजी घेतो साडी ।रेसिम काडी दाट ॥**
**हावशा माझ्या बंधवाचं ।घेणाराचं मन मोठ ॥**
**हात भरला काकनानं ।वटी भरली नारळानं ॥**

अनुक्रमणिका

**हावशा बंधवानं ।केलं माहेर सावळ्यानं ॥**
**जलमा येऊनी ।भाऊ बहिणीला आसावा ॥**
**जुन्या साडीला विसावा ॥**

असं मनोहर माहेर करणारा भाऊ बहिणीला असावा. असं लग्नानंतर पाच-सात वर्षे बहिणीचं माहेर होतं. तिला मुलंबाळं झाली की ती आपल्या संसारात रमते. भावाचं लग्न होतं. भावजय घराचा ताबा घेते.

**बंधुजी आपुला ।भावजय वाणीनं दुसयरी ॥**
**आपुल्या बंधुसाठी ।बळ चढावी वसयरी ॥**

कधी कधी भाऊ बायकोच्या आहारी जातो.

**अंबारीचा हत्ती ।अंबारी घालू दिना ॥**
**नार पुरुषाचं चालू दिना ॥**

घरच्या गणागोतापेक्षा भावाचा ओढा बायकोच्या माहेरच्या माणसाकडे वाढत जातो. बाईलेच्या गोता आवडीने पोसी ।माता पितीयाशी दवडितो ॥असे तुकोबांनी ही म्हटले आहे.

**आताच्या कलीमंदी ।भाऊ नव्हत बहिणीचं ॥**
**करी माहेर मेव्हणीचं ॥**

अशी अवस्था होते. त्यात आईबाप कालवश होतात आणि माहेर भयाण होतं.

**आईबापाच्या माघारी ।कोण माहेरी गेली येडी ॥**
**कवटाळल्या खांबमेढी ॥**

भाऊ संसाराने गांजला जातो. बहिणीची माया पातळ होते. सटीसहामासी बहीण आली तर चोळी बांगडीवर बोळवण केली जाते. मग बहिणीला असं म्हणायची पाळी येते.

**नको मजला देऊघेऊ ।नको माझं तू चालयेवू ॥**
**वाणीच्या माझ्या बंधवा ।गोड शब्दानं बोलयवू ॥**

दिस जातात. मुलं मोठी होतात. बहीण आपल्या मुलासाठी भावाची मुलगी करुन माहेर जोडून घेते.

**बंधू ईवाई करु गेले ।त्याला कशाला दोघंचौघं ॥**
**माता सांगील ऐकू दोघं ॥**
**बंधू ईवाई करु गेले ।दीरभावाचं मोडूयनी ॥**
**आली माहेर जोडूयनी ॥**

अनुक्रमणिका

आता भावा-बहिणीचे नाते व्यांही-विहिणीच्या पातळीवर जाते. लेकीसाठी भावाचं येणं-जाणं वाढतं. बंधुरायाची बालपणीची सोबत मी म्हातारपणी नव्या नात्याने जोडून घेते.

❒❒❒

अनुक्रमणिका

# ओवी माता माऊलीला

स्त्री ही परमेश्वराची सर्वोत्तम निर्मिती आहे म्हणून म. फुले, स्वामी विवेकानंद तिला पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानतात. भक्त ही देवाची लेकरे नसून ती रूपे आहेत असे हिंदू मानतातं. तशी स्त्री ही प्रत्यक्ष देवाची मूर्ती आहे. तिचे हे देवत्व तिच्या मातृत्वात जास्त आढळते.

भारतीय समाजात आणि संस्कृतीत स्त्रीची एका बाजूने प्रच्छन्न निंदा केली आहे. तर दुसऱ्या बाजूने तिचा कमालीचा गौरवही केला आहे. स्त्री ही संसारातील मोहाचे कारण, वासनेचे आगर, पापाची उत्तरपेठ, नरकाची कसवटी अशा शेलक्या विशेषणांनी तिची निंदा केली आहे. ही निंदा तिच्या मादी, प्रेयसी, सखी, पत्नी या रूपाची आहे. पण याच प्रेम आणि वासनेच्या अवस्थेतून ती माता झाली की मग ती महान, मंगल, पवित्र, पूजनीय ठरते. पुरुषप्रधान संस्कृतीने आपल्या सोयीसाठी सीता, सावित्री यांसारख्या पतिव्रतांचा आणि पातिव्रत्याचा गौरव केलेला आहे. पण पुरुषाचा जन्म स्त्रीच्या पोटी होत असल्याने त्यापेक्षाही तिच्या मातृत्वाचा गौरव सर्वाधिक केलेला दिसतो. 'मातृदेवो भव', 'न मातु ऽऽ परमदैवतम्,' 'यंत्र नार्येस्तु पूज्यन्ते,' मातामाऊली, आदिशक्ती अशा वचनानी शब्दांनी तिचा गौरव होतो. जिजामाता, मेरी, कुंती, यशोदा या महान मातांचाही गौरव होतो. ज्या ज्या गोष्टीपासून निःस्वार्थ प्रेम, वात्सल्य भेटते, भरण पोषण होते त्या त्या गोष्टींना माता संबोधले जाते. जसे गोमाता, भूमाता, राष्ट्रमाता, विठोबामाऊली.

काळजाच्या कुपीत जपून ठेवण्यासारखी मराठीतील दोन अक्षरे म्हणजे 'आई'. आई म्हणजे मूर्तिमंत प्रेम, वात्सल्याचा सिंधू, मांगल्याचे माहेर, पावित्र्याचे तेज, अमृताचा झरा, क्षमेचा सागर, त्यागाची मूर्ती, सुखाची सावली, सेवेचा आदर्श. ऋग्वेदापासून आजपर्यंत अनेक साहित्यिकांनी मातेचा महिमा गाईला आहे. कवी यशवंतांनी 'आई कुणा म्हणू मी, आई घरी ना दारी, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी!' म्हटले आहे. 'प्रेमस्वरुप आई, वात्सल्य सिंधू आई, बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी' असा माधव ज्युलियनांनी आईचा वियोग प्रगट केला आहे. सानेगुरुजींच्या 'शामची आई' पासून मॅक्झिम गॉर्कीच्या 'द मदर' पर्यंत अनेक ग्रंथ आईवर लिहिले आहेत. आई एक नाव असतं. घराघरात गजबजलेलं गाव असतं. ती लेकराची माय, दुधाची साय, लंगड्याचा पाय, धरणीची ठाय असते. आई जन्माची शिदोरी असते. असे फ. मु. शिंदे म्हणतात.

सानेगुरुजींनी आईचा गौरव करताना म्हटले आहे.

**आई माझा गुरु, आई कल्पतरु ।सुखाचा सागरू आई माझी ।**
**कृतीचे माहेर, मांगल्याचे सार ।अमृताची धार, आई माझी ।**

साहित्यात आईची विविध रूपे साहित्यिकांनी गौरवली आहेत.

लोकसाहित्यातून आईच्या प्रेमाचे अखंड पाझर वाहाताना दिसतात. प्रेयसीवरील प्रेम सिद्ध करण्यासाठी आईचे काळीज नेऊन देताना ठेचकळून पडल्यावर 'तुला कोठे लागले का रे बाळा?' असे विचारणारे आईचे अंतःकरण एका प्रसिद्ध लोककथेत दिसते. लोकगीतातूनही स्त्रियांनी आईचे महन्मंगल स्तोत्र परोपरीने गायिले आहे. लेकीच्या बालपणी आई तिचा गौरव करते. मात्र लेक सासरी नांदायला गेल्यावर ओव्यातून आईचा गौरव करते. लेकीच्या माहेरासाठी आई सासरी नांदत असते.

अनुक्रमणिका

आईची माया अवघ्या बाळावरी ।गवळणीने केला खोपा अवघड झाडावरी ॥सुगरण चिमणी आपला खोपा बाळासाठी विणते. सासुरवाशीणीला माहेरची ओढ वाटते ती सर्वाधिक आईच्या भेटीसाठी. 'रुणझुणच्या पाखरा जा माझ्या माहेरा, घरच्या आईला सांगावा सांग जा!' यात माऊलीच्या भेटीची ओढच प्रगट होते. ज्या माऊलीने नऊ महिने नऊ दिवस पोटात वागवून जन्म दिला, जग दाखविले तिच्याविषयी मैनाबाई ओव्यातून कृतज्ञता व्यक्त करते.

**आई या म्हणू आई ।ओवी माता माऊलीला ॥**
**नऊ महिने नऊ दिस ।होती निऱ्याच्या सावलीला ॥**
**आई या म्हणू आई ।माझ्या जन्माच्या येळ ॥**
**आई बसली कोड्यात ।नाना दुचित वाड्यात ॥**

स्वतःचा जीव धोक्यात घालून जीवघेण्या प्रसववेदना सहन करुन आईने आपल्याला जन्म दिला.

**काशी म्हण काशी ।काशी कुणी पाहिली ॥**
**गवळण माझ्या बाईनं ।दुनिया मला दावयीली ॥**

अशा जन्मदात्या आईला उलटे बोलणे पाप आहे अशी लोकांची समजून असते.

**नऊ महिने नऊ दिस ।होती बयाच्या डाव्याकुशी ॥**
**माझ्या गवळण बाईला ।तिला माघारी बोलू कशी ॥**

आईने हाताचा पाळणा आणि डोळ्याचा दिवा करुन मैनाबाईला लहानाचे मोठे केलेले असते. त्या उपकाराची फेड होणार तरी कशी?

**मांडीचा पाळणा ।डोळ्याचा केला दिवा ॥**
**गवळण माझ्या बाईचा ।मी उपकार फेडू कवा ॥**

घास घास भरवून आईने लेकीला रजाचा गज केलेले असते. पुढे मोठेपणीही लग्न झाल्यावर सासुरवाशीणीला एखादा पदार्थ खाऊ वाटला तर आईशिवाय तिला कुणी करुन घालत नाही म्हणून ती म्हणते.

**जीवाला खाऊ वाटे ।दुधातुपातली खीर ।**
**आत्मराजा दम धरा ।माझी गवळण नाही घरा ।**
**पाची पक्वान्नाचे ताट ।वर केळाची हाय फणी ॥**
**हाक मला मारली कुणी ।माझी गवळणबाई शहाणी ॥**

असं लेकीला चांगलंचुंगलं खाऊ घालण्यारे अंतःकरण फक्त आईजवळच असते. आईचं प्रेम तिच्या सगळ्याच गोष्टीतून दिसते. साधी न्हाऊ घालण्याची गोष्ट.

अनुक्रमणिका

**शेजी न्हाऊ घाली ।नाही भिजला न्हाणी धोंडा ॥**
**माझी गवळण न्हाऊ घाली ।गेला वेशीला लोंडा ॥**

अशी भरपूर पाण्यानं आईच न्हाऊ घालते.
लेकीच्या सुखदुःखाला धाऊन येते ती आईच, म्हणून ती म्हणते –

**सुखाला भरतार ।दुःखाला माऊली ॥**
**सुख वाटं जीवा ।गार उंबराची सावली ॥**

एखाद्या वेळी मैनाबाई आजारी पडली, जीवाला जडभारी झालं तर शेजारीपाजारी इतर गणगोत नुसती चौकशी करुन सहानुभूती दाखवतात पण आई मात्र सेवेला हजर असते.

**जीवाला जडभारी ।शेजी उंबऱ्याच्या आत ॥**
**गवळण माझी बाई ।माझी समय सारी रात ॥**

किती समर्पकपणे आईचा सेवाभाव व्यक्त केला आहे. म्हणूनच –

**शंभर माझं गोत ।माळावरली हराळी ॥**
**गवळण माझ्या बाईची ।गोष्ट मातची निराळी ॥**

खरंच आईची गोष्ट वेगळीच. नांदून आलेली सासुरवाशीण आपला सासुरवास आणि मनातलं सुखदुःख केवळ आईजवळच व्यक्त करते.

**गुज बोलायाला ।मला कशाला हवीत लोक ॥**
**बया माझी गवळण ।आहे गुजाला प्राणसखी ॥**

ह्या सगळ्या ओव्या ती जात्यावर दळताना म्हणत असते. जातं तर जड जात असते. मग तिला आईची आठवण होते. आपण काही मेल्या आईचे दूध प्यालेलो नाही. आईच्या दुधाविषयीचा अभिमान ती प्रगट करते.

**थोरलं एवढं जातं ।जसं हराण पळतं ॥**
**बयाचं दूध पेली ।सये मनगटी खेळतं ॥**
**जातं का ओढावं ।नख बोटाच्या आगरी ॥**
**आई तुझे दूध पिले ।मधाच्या घागरी ॥**

यातून तिला कामाची प्रेरणा मिळते. अशा आयुष्याचे दान देणाऱ्या, लहानाचे मोठे करणाऱ्या जिवाभावाला होणाऱ्या आईचे उपकार फिटणार कसे?

अनुक्रमणिका

**शेजीचा उपकार ।मी फेडीन भाजीपाल्या ॥**
**माऊलीचा उपकार ।मला फिटना काही केल्या ॥**

हे उपकार फिटत नाहीतच पण आईबापाची सेवा करण्याची संधीही आपल्याला मिळत नाही अशी खंत स्त्रीमनात असते. म्हणून ती आईचा आणि तिच्या ऋणांचा गौरव ओव्यातून करते.

**आई या म्हणू आई ।माझ्या आईचं उसनं ॥**
**माझ्या जन्मा पसनं ॥**
**आई या म्हणू आई ।माझ्या तोंडात येती लई ॥**
**काटा मोडला हुती सई ॥**
**आई या म्हणू आई ।तिच्या इतकं गोड काई ।**
**साखर बाईला ।कडूपणाचा लेश नाही ॥**
**आई या म्हणू आई ।तोंड माझं या झालं ग्वाड ॥**
**माझ्या आईचं मला याड ।**

अशी आहे मातृभक्त मैनाबाई. आईला देव मानणारी. काशीला गेल्याचं पुण्य तिला आईच्या दर्शनात घडते.

**काशी मन काशी ।काशी कुण्या गावायात ॥**
**घेते दर्शन नित्य ।काशी उंबऱ्याच्या आत ॥**

या ओव्यातून आई विषयीचे प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य, कृतज्ञता प्रगट होते. मायलेकीच्या सनातन नात्याचा गोडवा, त्यातला भावनात्मक आविष्कार या गीतांना कवितेच्या पातळीवर आणतो.

अशा प्रकारे मराठमोळ्या स्त्रियांनी आईचे गुणगान मोठ्या जिव्हाळ्याने, प्रेमाने आणि अंतःकरणपूर्वक केले आहे.

❒❒❒

## गवळी माझा नाना

**नानांजी माझी वड ।आई माझी वडाई ॥**
**दोघांच्या सावलीची ।किती सांगू मी बढाई ॥**

नवऱ्याच्या घरी नांदायला गेलेल्या प्रत्येक सासुरवाशीणीला आपल्या आईबापाविषयी असेच वाटत असते. आईबापाच्या कृपाछत्राखाली शीतल सावलीला घालविलेले सुखाचे बालपण तिला आठवते.

**बाबा माझा चंदन ।आई माझी वडफांदी ॥**
**जलम माझा झाला ।दोघांच्या कडेखांदी ॥**

बालपणीचा सुखाचा काळ, आईबापानी केलेले प्रेम आणि लाड मैनाबाईला सासुरवासाच्या जाचक पार्श्वभूमीवर अधिकच महत्त्वाचे वाटतात. मग माहेर कसेही असो. ती आईबापांची बढाई सांगू लागते. आईविषयी आपण मागच्या लेखात पाहिले. आता नानाविषयी. लेकीच्या जन्माचं भारतीय कुटुंबात स्वागत होत नाहीच. पण मैनाबाईच्या जन्माच्या वेळी तिच्या बापाच्या मनासारखं झालं. तिच्यावेळी आई गरोदर असताना नाना म्हणायचे, पोरगी व्हायला हवी तर आई म्हणायची पोरगं पण झालं मात्र नानांच्या मनासारखं‘पहिली बेटी तूपरोटी’ म्हणून साऱ्या घरानं तिला काहीशा नाराजीनं पण नानाजीच्या इच्छेमुळे कौतुकानं स्वीकारलं नानानी लेकीला कौतुकानं वाढविलं.

**बालपणीचं सुख ।माईनं दाखविलं ॥**
**गवळी माझ्या नानाजीनं ।हार पाळण्याला लाविलं ॥**

खेड्यातील जुन्या काळातलं, एकत्र कुटुंबातलं वातावरण. स्वतःच्या पोराला अंगाखांद्यावर खेळविण्याची सुद्धा चोरी. नाही तर लगेच बाप ‘बाईलभाड्या’ ठरायचा. त्यामुळे जुन्या काळातला बाप कासव जसं आपल्या मुलावर दुरुन प्रेम करतं तसं दुरूनच प्रेम करायचा. आईची गोष्ट वेगळी होती. बापाची वेगळी. इच्छा असली तरी बाप तसं करु शकत नव्हता. पण त्याचं मुलीवर प्रेम आणि लक्ष होतच.

नानांच्या सावलीला लेक लहानाची मोठी झाली. तिला नानांनी काही कमी पडू दिलं नाही. बेताची का होईना हौसमौज केली. आज हे सारं आठवलं की मैनाबाईला वाटते.

**वाटंवरला वड ।पान त्याची किती रुंद ॥**
**नाना माझ्या वडिलांची ।गार सावली करवंद ॥**
**तोडला चंदन ।सुटला दरवळ मातीचा ॥**
**चंदन माझा नाना ।खरा चंदन जातीचा ॥**

मैनाबाईने आपल्या बापाला चंदनाची उपमा दिली आहे. बाप खरा अस्सल चंदन. त्याच्या सुवासाने जिथे माती सुगंधीत होते तिथे माणसाचे काय? मैनाबाई तर त्याची लेक. त्यांच्याच संस्कारात, शिस्तीत वाढलेली. नाही म्हटलं तर हा चंदन तिलाही घडवायला कारणभूत ठरला होता. सभ्यता आणि सुसंस्कृतपणा ती त्यांच्यापासूनच शिकली.

अनुक्रमणिका

**उभ्या मी गल्ली जाती ।दंडभूजा मी झाकुयनी ।**
**नाव नानाचं राखुयनी ॥**
**आम्ही बहिणी बहिणी ।जशा लवंगा तिखट ॥**
**आम्ही राखीला ।नानाचा शेला धुवट ॥**
**आम्ही बहिणी बहिणी ।मिऱ्या परास आम्ही आग ॥**
**नानाच्या मंझीलांला ।आम्ही नाही पडू दिला डाग ॥**

लेकीनी अशी कोणतीही गोष्ट केली नाही की ज्यामुळे नानाच्या नावाला काळीमा लागेल.

बघता बघता केळीच्या कोक्यासारख्या पोरी मोठ्या होतात. बापाची चप्पल पोराच्या पायाला आली की पोरगा मोठा झाला असे समजतात. आईचा हिशोब असा.

**माझ्या अंगाची चोळी ।तुझ्या अंगाला दाटयली ॥**
**माझ्या साळाईनं ।शीण राधाने गाठयली ॥**

अशी पोरगी मोठी झाली की आईचं बापाच्या मागं टूमनं लागतं. ‘पोरीच्या लग्नाचं तेवढं बघा.’ मग बापाचं खरं काम सुरु होतं. ती वरपित्याच्या घरी पायतानं झिजवितो. चांगल्या कुळातले पै-पाहुणे बघून, घरदार शेतीवाडी असलेला, मुलीला जोडा शोभावा असा वर शोधून काढतो. आपल्याला शक्य आहे तितका खर्च करुन करणीधरणी, रीतरीवाज करुन लग्न करुन देतो. आपली मुलगी चांगल्या घरात जावी. सुखासमाधानात नांदावी अशीच प्रत्येक बापाची अपेक्षा असते.

लग्न झाले की मैनाबाई नांदायला जाते. संसार रेघरुपाला लागला की, आपल्या कुंकवाचा धनी बघून तिला आपल्या बापाचे कौतुक वाटायला लागते.

**माझ्या चुंडियाचं सोनं ।पेटला मांडलं ॥**
**गवळी माझ्या नानाजीनं खंडिलं ॥**
**माझ्या चुडियाचं सोनं ।हजाराला मासा ॥**
**गवळी माझा नाना ।पारख्या हुता तसा ॥**
**चुडियाचं सोनं माझं ।तसंच राहाणार ॥**
**गवळी माझा नाना ।हुता पारखा सोनार ॥**
**चुडियाचं सोनं ।सोनं आख्खं उन्हात ॥**
**नानानं पाठविल कुंकू ।केवड्याच्या पानात ॥**

या ओव्यात चुडियाचं सोनं म्हणजे कुंकवाचा धनी पती त्याचं मोठेपण अव्याहतपणे मान्य केलं आहेच पण असा पती आपणाला पारखून दिल्याबद्दल नानाचं कौतुकही आहे.

लग्नानंतर मैनाबाईसारख्या सासुरवाशीणीला हक्काचं विश्रांतीस्थान म्हणजे माहेर. बऱ्या वाईटात, सुख-दुःखात सहभागी होणारी माहेरची माणसे. त्यामुळे मैनाबाई बापाविषयी म्हणते.

अनुक्रमणिका

**शितळ सावलीला ।टेकवलं वझं ॥**
**गवळी नाना माझा ।विसाव्याचं झाडं माझं ॥**

आईबाप असलेलं माहेर म्हणजे लेकीचं विश्रांतीस्थान. आईबाप असताना लेकीचं माहेरही घसघशीत होतं. मग ती साडीचोळी असो किंवा करणीधरणी असो.

**शितळ सावलीला ।चिमण्या झाल्या गोळा ॥**
**गवळी माझा नाना ।माझा हावसचा पानमळा ।**

आईबापाच्या कर्तृत्वाच्या काळात त्यांच्याच आग्रहाने भाऊ बहिणीचा माहेरातील हक्क मान्य करतो.

**पिकला उंबर ।शेंड्या दांड्यांशी झाला लाल ॥**
**बंधुजी बोलत्यात ।बहिणी चवथाई घ्याया चल ॥**

असा बाप म्हणजे पिकला उंबर बाहेरुन लाल आतून गोड.

काळ जातो. आईबापाचं वय वाढत जातं. त्यांना म्हातारपण येतं. जुनी पानं गळतात आणि नवी येतात. एकेदिवशी मैनाबाईचं कृपाक्षेत्र हरवतं. लेक धाय मोकलून रडायला लागते. बापाच्या आठवणी काढून गहिवर घालते. म्हणून मेल्यावर रडायला तर लेक असावी असे लोकमानसाला वाटते. बापाचं जाणं मैनाबाईच्या अंतःकरणाला लागून राहातं. माहेरचा आधार तुटला असं तिला वाटतं. अशावेळी जेव्हा ती माहेरी येते. चुलत्याला पाहाते तेव्हा तिला बापाची प्रकर्षाने आठवण येते. पण चुलता तो चुलता, तो काही बापाची सर करत नाही.

**पिकला उंबर ।गावाच्या खालतां ॥**
**बापाची सर ।काय करील चुलता ॥**
**बापाच्या जाण्याचं दुःख प्राप्त झालं ॥**
**सांगते बंधू तुला ।माझ्या डोळ्याला पाणी आलं ॥**
**डोळ्याला पाणी ।पाणी आलया खडूळ ॥**
**गवळी माझ्या नानाजीची ।सय झालीया वाडूळ ॥**
**डोळ्याचं पाणी ।पाणी पापणी थटईल ॥**
**गवळी माझ्या नानाजीचं ।मला अवघड वाटईल ॥**
**लोकांच्या लेकी ।गुज बोलल्यात बापाला ॥**
**गवळी माझा नाना ।चंद्र ढगात लपईला ॥**

असं आहे बाप गेल्याबद्दल मैनाबाईचं दुःख. आईबापामाघारी माहेर भकास होतं. तिला बंधुजीच्या राज्यात कुणी विचारीत नाही.

अनुक्रमणिका

**आईबापाच्या माघारी ।कोण माहेरी गेली येडी ॥**
**कवटाळल्या खांबमेढी ॥**

अशी तिची अवस्था होते. एक खंत मैनाबाईच्या मनात सतत होती. नानाजीची सेवा आपल्या हातून घडली नाही. शेवटच्या काळाबद्दल तर तिला फारच वाईट वाटतं. ती म्हणते –

**लेकीचा जलम ।कुणी घातला वेड्या देवा ।**
**जेच्या पोटी जलम घ्यावा ।त्याची घडना मला सेवा ॥**
**लेकीचा जलम ।देवा घेऊनी चुकली ॥**
**मायबापाच्या सेवेला मुकली ॥**

पण काही गोष्टी जीवनात अशा घडतात की त्याला काही इलाज चालत नाही.

❒❒❒

# शेजारीन सया

माणसाचे जगणे हा अनेक भावबंधाचा गोफ असतो. माणसामाणसातले संबंध विविध पध्दतीने वेगवेगळ्या पातळ्यावर निर्माण होतात. स्त्रिया ह्या नातेसंबंध निर्माण करण्यात सेतूसारख्या काम करतात. लग्नानंतर मुलगी सासरी नांदायला जाते. दोन कुटुंबे आणि परिवार रक्ताच्या नात्याने जोडले जातात. प्रेम आणि आपुलकीच्या धाग्यांनी नातेसंबंधाच्या रेशीमगाठी निर्माण होतात. स्त्रियांना सासर-माहेरची अनेक नाती असतात. आई, वडील, चुलता-चुलती, सख्ये व चुलत भाऊ बहिणी, आजी-आजोबा, आत्या-मावशी अशी माहेरची जवळची नाती असतात. तर लग्नानंतर पती, सासू-सासरे, दीर, जावा, नणंदा अशी नवी नाती निर्माण होतात. या प्रत्येक नात्याचे काही परंपरेने रुजलेले संकेत आहेत. परस्पराशी वागण्यातून व जबाबदाऱ्या पार पाडण्यातून ते प्रगट होत असतात. सहवास, आपुलकी, आधार, प्रेम व जिव्हाळा यामुळे नात्याला अर्थ प्राप्त होतो. त्यातल्या काही नात्यासंबंधीच्या लोक परंपरेतल्या भाव-भावना आपण मागे पाहिल्या आहेत.

रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती जरा वेगळ्या प्रकारची पण निखळ प्रेमसंबंधातून निर्माण झालेली असतात. गडयणी, भाऊपणा यातून झालेल्या मैत्रिणी, व्यवसायिक संबंधाने निर्माण झालेले स्नेहभाव ही अशी जोडलेली नाती असतात. शेजी किंवा शेजारीण हेही असेच वेगळ्या प्रकारचे नाते आहे. पूर्वीच्या गावाची वसाहत जातीय पद्धतीने झालेली होती. जातीच्याच गल्ल्या असत. त्यामुळे शेजार हा बहुधा एकाच जातीचा, भाऊबंदाचाच असे. क्वचित कडेवर घर असले तर पराया जातीचा शेजार असे. प्रेम आणि स्नेहासाठी सहवास ही अत्यंत आवश्यक गोष्ट असते. शेजारणीविषयी स्नेह वा द्वेष सहवासानेच निर्माण होतो. नात्याने कुटुंबातील माणसाविषयी प्रेम निर्माण होते पण त्याच्या पुढची पायरी म्हणून येशू ख्रिस्तानी ‘शेजाऱ्यावर प्रेम करा’ असा संदेश दिला. तुकडोजी महाराजांनी गावकऱ्यावर प्रेम करा, एक गाव एक कुंटुंब झाले पाहिजे असे सांगितले. माणसाच्या स्नेहाच्या कक्षा रूंदावल्या, पुढे प्रदेश, राज्य, देश व विश्व अशा माणसाच्या प्रेमाच्या कक्षा रुंदावत जातात. माणसाचे माणूसपण विकसित होत जाते. समाजात समूहभावना, बंधुभाव व एकता निर्माण होते.

भारतीय समाजात शेजाऱ्याशी वागण्याचे काही संकेत तयार झाले आहेत. परस्परांच्या अडीअडचणीला उपयोगी पडणे, सुखदुःखात सहभागी होणे यालाच शेजार धर्म म्हणतात.

मैनाबाईच्या चारदोन शेजारणी होत्या. त्यात गिरजाबाई जवळच्या. शेजारधर्माला जागणाऱ्या. शेजारणीशी मैनाबाईचे तसे चांगले संबंध होते. त्याच्याशी कसे वागावे, कसे संबंध ठेवावे याचे शिक्षण तिला परंपरेने दिले होते.

**शेजी घरा आली ।बस म्हणाया तिला हवं ॥**
**माझ्या मातची मला सव ॥**
**शेजी घरा आली ।बस म्हणती प्रीतीनं ॥**
**गवळणं माझ्या बाईनं ।मला शिकवलं गरतीनं ॥**

आईकडून शेजारधर्म मुलगी शिकते. स्त्रिया मर्यादित विश्वास वावरत असल्या तरी संबंध जोडण्याचे त्यांना बाळकडूच मिळालेले असते.

अनुक्रमणिका

शेजारधर्मात उसन्यापासन्याला महत्वाचे स्थान असते. सामान्याचे संसार गरिबीचे. संसारात काय एक लागतयं. एक असलं तर एक नसतंय. ऐनवेळेला पैहीपाहुणे येतात. त्यांना पाहुणचार करावाचं लागतो.

**शेजारीन सया ।मला उसनी घाल डाळ ॥**
**माझ्या बहिणीचं आलं बाळ ॥**
**शेजारीनबाई ॥गरज करावी बोटव्याची ॥**
**ताईत बंधुजीची ।सभा आलीया नटव्याची ॥**
**शेजारीन सया ।दे गं उसनं वेलदोडं ॥**
**नेणता माझा राघु ।झाडं दरव्याच्या कडं ॥**

वेळप्रसंगी शेजारणीकडून उसनंपासनं आणून चालती घडी भागविली जाते. उसनं देणं घेणं ही जनरीत आहे. पुष्कळदा यालाच शेजारधर्म म्हणतात.

दुःखाच्या प्रसंगी पहिला आधार शेजाऱ्याचा असतो. घरात कुणी आजारी पडलं, दुखलं खुपलं, पडलं लागलं, खरचटलं तर पहिली मदत शेजाऱ्याकडूनच होते. आईच्या मृत्यूच्या वेळी असंच झालं मैनाबाई म्हणते.

**नऊ महिने नऊ दिसं ।वागविलं मला ॥**
**निधनाच्या येळ ।शेजी झाली तुला ॥**

शेवटच्या काळात लेक जवळ नसते. शेजारीपाजारीच सारं काही करतात. सासुरवाशीणीच्या दृष्टीने तर शेजार म्हणजे अर्धे माहेरच असते. शेजीजवळच आपले मन मोकळे करता येते. दुःख सांगता येते. मन हलके करता येते. त्यामुळे जगण्याला आधार मिळतो. माहेरची माणसं दूर अंतरावर असतात. सासुरवाशिणीनं आपलं दुःख सांगावं तरी कुणाला? दुधाची तहान ताकावर भागवावी तसं मग ती आपलं हृदय शेजीजवळ व्यक्त करते.

**गुज बोलायला ।दार माळीचं ढकल ॥**
**माझी तू शेजीबाई ॥मग हुरदं उकल ॥**
**अंतरीचं गुज ।माझ्या हुरदी झाली गोणी ॥**
**मायेची माझी शेजी ।माप घेणारी झाली राणी ॥**
**शेजारीन बाई ।तुझा शेजार चांगला ॥**
**गवळण माझी बाई ।नाही आठवली तुझ्यामुळे ॥**

अंतःकरणातलं सुखदुःख शेजारणीजवळ व्यक्त करता येते. सासुरवाशीणीचं दुःख ऐकून घेणारी, सहानुभूती दाखविणारी, आधार देणारी म्हणून शेजारणीला महत्त्वाचे स्थान असते.

अनुक्रमणिका

आईची सर शेजारणीला येणार नाही. ही गोष्ट खरीच. शेजी न्हाऊ घालते तर धोंडा भिजत नाही आईने न्हाऊ घातले तर पाण्याचा वेशीला लोंढा जातो. शेजी जनलोकाला दाऊन जेऊ वाढते मात्र आई कवाड लावून लेकीला जेऊ घालते, असा फरक पडतो. पण आईशी शेजीची तुलना होऊ शकते यातच तिचे मोठेपण आहे. निदान ती न्हाऊ घालते, जेऊ घालते हेही काही कमी नाही.

शेजार जुना होत जातो. शेजीचा स्नेहभाव वाढायला मुलंबाळ कारणीभूत होतात. शेजारपाजारची लहान मुलं एकत्र खेळतात, बागडतात.

**शेजीच्या बाळानं ।माझी वसरी भरली ॥**
**बाळाच्या संगतीनं ।बाळं येत्याती दुसरी ॥**
**शेजीच्या लेकराचा ।माझ्या अंगणी गोंधुळ ॥**
**नेणंता बाळ माझा ।माझा सडीव तांदुळ ॥**
**शेजीच्या लेकरांनं ।माझा भरला वाडा ॥**
**हरीला बोलईते ।ने जा बाहेर तुझा गाडा ॥**

मुलं एकत्र खेळतात. खोड्या करतात. कधीकधी भांडतात. रडतात. मग शेजी गाऱ्हानं घेऊन येते.

**शेजी घरा आली ।पाट दिला मी बसायला ॥**
**राघु माझ्या मैनेचा ।आली अन्याय पुसायला ॥**

पोराला समजावून सांगितले जाते. दम दिला जातो. शेजीची समजूत काढली जाते.

**शेजारीनं बाई ।एका दिलानं दोघी वाघू ॥**
**अंगणात खेळे ।तुझी मैना माझा राघू ॥**

पण कधीकधी आपआपल्या पोरांची कड घेऊन भांडण होते. पोरांची भाडणं मिटतात पण थोरांची मनं विटतात. शेजारणीशी इर्षा करणे ही बायकांची एक प्रवृत्ती असते. कामाधामापासून घरात एखादी वस्तू आणण्यापर्यंत ईर्षा केली जाते.

**शेजीचं झालं काम ।माझी पारुशी हायती भांडी ॥**
**माझ्या बंधवानं ।त्यानं गुजाला दिली मांडी ॥**
**शेजीचं झालं काम ।तिच्या मागतं होईल माझं ॥**
**साळू मला आवरु लागं ॥**

कामातला इसाळ चांगला असला ती तो इथेच थांबत नाही. शेजारणीनं एखादी वस्तु आणली. हांडा, घागर घेतली, गॅस-मिक्सर घेतला, टी व्ही, गिझर घेतला की परिस्थिती नसतानाही नवऱ्याच्या मागं घाई लावली जाते. साडी, दागदागिन्याच्या बाबतीत तर विचारूच नका. नथ दाखविण्यासाठी घर जाळायलाही बायका कमी करत नाहीत. याला म्हणतात इसाळ.

शेजारच्या परिस्थितीत कमालीचा फरक असला तर मात्र संपत्तीच्या मिजाशीची खिल्ली उडविली जाते.

**शेजीची संपदा ॥नाही माझ्या खातरत ॥**
**कपाळीचं कुंकू ।नित्य पाहाते मी आरशात ॥**

मग शेजीची संपत्ती वसरीचा केर ठरतो. मग आपली मुलंबाळ रत्नाचे खांब वाटतात.

ईषेतून द्वेष जन्मतो, द्वेषातून मत्सर वाढतो आणि बघता बघता मैत्रिणी असलेल्या शेजारणी डाईच्या वैरीणी होतात. कमकुवत जागा हेरल्या जातात. साध्यासाध्या कारणावरुन ठिणग्या पडतात. मग कोंबड्या कुत्र्यावरुन, गुराढोरावरुन, पोरासोरावरुन भांडण सुरू होतात. भाषा बदलते.

**शेजारीन बाई ।तुझा शेजार सोन्याचा ॥**
**येतो बाई राग ।तुझ्या उगीर बोलण्याचा ॥**
**शेजीच्या बोलण्यानं ।माझं मन विटलं ॥**
**पान केळीचं फाटलं ॥**

केळीचं पान फाटल्याची उपमा सुंदर आहे. मन विटली जातात. शब्दानं शब्द वाढत जातो. एकमेकींचीच उणीदुणी काढली जातात. प्रसंगी भांडण हातघाईवर येते. सख्या शेजारणी पक्क्या वैरिणी होतात म्हणून शेजारणीसारखी मैत्रीण नाही आणि शेजारणीसारखी वैरीण नाही असे म्हटले जाते. स्त्रीगीतातून शेजारणीची ही दोन्ही रूप साकार होतात.

❒❒❒

## तुला माझा भाऊपणा

रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती जीवनात अधिक महत्त्वाची ठरतात. ती अधिक सुखदायक व प्रेमाची असतात. मैत्री हे असेच नाते आहे. लोकगीतात त्याला 'भाऊपणा' म्हणतात. भाऊपणा म्हणजे साधारण पोक्तवयात समंजसपणे जोडलेले मैत्रीचे नाते असते. लोकगीतातील हे नाते दोन स्त्रियांमधील भाऊपणाचच आहे.

लग्न झाल्यावर मैनाबाई नव्या गावात सासरी नांदायला आली. त्यामुळे माहेरची बालपणाची माणसं जशी दुरावली तशा शिणंच्या गडयनीही दुरावल्या. थव्यातील पाखरं उडून जावीत तशा त्याही दूरदूर निघून गेल्या, सासरी आल्यावर मैनाबाईला सारी नाती नव्याने जोडावी लागली तशा मैत्रिणीही.

जुन्या काळात खेड्यातला पाणवठा हा एका अर्थाने महिला मंडळांचे ठिकाणच होतं. मग तो नदीचा काठ असो वा बारवची विहीर असो. तिथं सकाळी संध्याकाळी स्त्रिया पाण्याला येत. दुपारी धुणं धुण्याला येत. सहवास ही मैत्रीची पहिली अट असते. तिथं त्या थोड्या मोकळेपणे आपली सुखदुःख एकमेकीला सांगत. त्यातून वयाने, स्वभावाने, गुणाने सारख्या असलेल्या स्त्रिया मनाने जवळ येत. त्यातूनच भाऊपणाचे नाते निर्माण होई.

**तुझा माझा भाऊपणा ।पडला बिदीला (रस्त्याला) ।**
**झाला इचार नदीला ॥**
**तुझा माझा भाऊपणा ॥पडला पाण्याला जाता जाता ॥**
**शिणची गडयनी ।ठेव घागर बोलू आता ॥**
**तुझा माझा भाऊपणा ॥पडला हिरीवरी ॥**
**किती सांगू गडयनी॥येईल लोकांच्या डोळ्यावरी ॥**

मैनाबाईनं भाऊपण्यानं गावातल्या चारदोन मैत्रिणी जोडल्या होत्या. त्यात मुसलमानाची सलमा, सोनाराची गीता आणि मराठ्याची साळूबाई ह्या प्रमुख होत्या. त्यातही साळूबाईशी तिचे अधिक सख्य. तिचं घर वरल्या आळी. मळ्याला जाताना मैनाबाई तिच्या घरी जाई.

**तुझा माझा भाऊपणा ।रस्त्यावर तुझी माडी ॥**
**मळ्याला जाताना गुत्ता पाडी ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।घर तुझं वरल्या आळी ॥**
**शिणची गडयनी ।येव गुजाला संध्याकाळी ॥**

मैत्री ही धर्म जातीच्या पलीकडे जाऊन प्रेमाने जोडली जाते. मुसलमानाची सलमा, सोनाराची गीता, कुणब्याची साळू व मैनाबाई पाणवठ्यावर एकत्र येत. पूर्वी जातीयता फार पाळली जाई. एका पंगतीला वेगवेगळ्या जातीची माणसं एकत्र जेवत नसत. म्हणून म. गांधीना सहभोजनाचे कार्यक्रम आयोजित करावे लागले. पराया जातीचा हा दुरावा मैत्रीतही ईतीचं अंतर पाडतो. मैनाबाई म्हणते –

अनुक्रमणिका

**तुझा माझा भाऊपणा ।हाय पराया जातीचा ॥**
**तुझ्यामाझ्या भोजनाला ।हाय अंतर ईतीचा ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।तू ग मुसलमानाची मैना ॥**
**तुझ्या संगतीनं ।बोली मराठी येईना ॥**

संगतीचा गुण तो असा. परस्पर सहवास, संगत, एकमेकांना समजून घेणे, सहकार्य करणे, गोड बोलणे यातून सख्य वाढत जाते. मैनाबाईची साळूबाईशी झालेली मैत्री ही अशीच वाढत गेली.

**संगतीचा गुण ।तुझी संगत मोलायाची ॥**
**माझ्या बहिणीवाणी ।साळू मंजूळ बोलायची ॥**

समान स्वभाव आणि गुणानं भाऊपणा वाढतो.

**तुझा माझा भाऊपणा ।पडूनी पडयेला ॥**
**तुझ्या गुणानं जोडयेला ॥**

टाळी एका हाताने वाजत नाही. साळूबाईच्या गुणानं हा भाऊपणा जोडला असला तरी मैनाबाईकडंही ते गुण होते म्हणून तो वाढला. व्यवहारात माणसं समान हितसंबंधानं, स्वार्थानं एकत्र येतात. पण मैत्रीचं नातं वेगळंच असतं. ते देण्याघेण्याच्या, स्वार्थाच्या पलीकडे निःस्वार्थपणे जोडलेले असते.

**तुझा माझा भाऊपणा ।पडूनी पडयेला ॥**
**लोभाअंती जोडयेला ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।जन म्हणती देतीघेती ॥**
**शिणची गडयनी ॥जीवाभावाला माझ्या हुती ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।भाऊपणाची मैनाबाई ॥**
**चोळी घेचील नवल काई ॥**

यात प्रेमाचा हक्क दिसतो. काळजाचं नातं जीवाभावानं जोडलं जातं. प्रेमाच्या सिंचनानं भाऊपणाचं रोपट वाढतं. या रेशीम गाठी दृढ होतात.

**तुझा माझा भाऊपणा ।काय पडण्याची तारीईफ ॥**
**रेशमी दोरीची ।गाठ बसली बारीक ॥**

असं साळू आणि मैनाबाईचं भाऊपणाचं नातं. त्या सतत एकत्र दिसत. कुठं जायचं झालं तर एकत्र जात. एकत्र गप्पागोष्टी करत. एकमेकीच्या जीवाभावाला होत. सणासुदीला काय चांगलचुंगलं केलं तर एकमेकींना सोडून खातं नसत. दिवसातून एकदा तरी भेटल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

अनुक्रमणिका

**तुझा माझा भाऊपणा ।घडी लोटना पारायची ॥**
**जोडली मायबहीण ।कडी काढावी दारायची ॥**

अशा त्या एकमेकींना भेटायला येत.

**तुझा माझा भाऊपणा ।जनलोकाची काय चोरी ॥**
**शिणची गडयनी ।येव वाड्याला बिनघोरी ॥**

जनलोकांच्या डोळ्यांवर हा भाऊपणा आला. जनलोक बोलायला लागली. तेव्हा ती परसदारानं येऊ लागली. लोक खुनशानं बोलायला लागले. पण मैत्री घट्ट होती.

**तुझा माझा भाऊपणा ।एकमेकीच्या तोलाखाली ॥**
**झालं इमान बेलाखाली ॥**

कुणाचंही फार सख्य लोकांना पाहावत नाही. मग ते तोडण्यासाठी लोक प्रयत्न करतात.

**तुझ्या माझा भाऊपणा ।एका लवंगाचं सात भाग ॥**
**भाऊपणा तोडायला ।चौकी बसली जागोजाग ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।उंच नारळाच्या घडा ॥**
**भाऊपणा तोडायला ।मोठ्या मोठ्याच्या पडल्या भिडा ॥**

समाजात जसे कळीचे नारद असतात तशा कळ लावणाऱ्या मंथराही असतात. त्यांनी एकमेकीच्या चहाड्या सांगितल्या. मनात विष कालविलं. किल्मीष निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी साळू-मैनाची मैत्री अबाधीत होती.

**तुझा माझा भाऊपणा ।चल रस्त्याने दोघी जाऊ ॥**
**निंदा करत्याला बाजू देऊ ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।तुझ्या मनात माझं मन ॥**
**काय करत्याल बाराजन ॥**

लोक संधी साधून नाना भानगडी करीत असतातच. साळू-मैनाची मैत्री तुटत नाही. म्हटल्यावर लोकांनी त्यांच्या चारित्र्यावरही शिंतोडे उडविले. त्याचे झाले असे. मैनाबाईचा लहान दीर होता. तो मैनाबाईशी जसा हसत खेळत रहायाचा तसा साळूबाईशीही. लोकांनी या मनमोकळ्या संबंधाचा फायदा घेऊन कंड्या पिकविल्या. मैनाबाईच्या मनातही संशयाची पाल चुकचुकली. तिला साळूबाईचं निर्मळ वागणं बोलणं वेगळचं दिसायला लागलं. तिचं एक मन म्हणायचं,

**साखरेचा लाडू ।परवरी फोडू कसा ॥**
**बारा वर्षाचा भाऊपणा ।एका खिनत मोडू कसा ॥**

अनुक्रमणिका

संशयामुळे मैनाबाईच्या वागण्या बोलण्यातही पूर्वीचा मोकळापणा राहिला नाही. तिने अबोला धरला.साळूबाई म्हणाली.

**तुझा माझा भाऊपणा ।कुणी कालविलं राळं ।**
**नको मनात आणू काळं ॥**
**तुझा माझा भाऊपणा ।कुणी कालविलं मीठ ॥**
**शीणची गडयनी ।सोड अबोला बोल नीट ॥**

साळूबाईला मैनाबाईच्या वागण्याचा उलगडा होईना. जेव्हा साळाईला ही गोष्ट समजली तेव्हा तिला आश्चर्याचा धक्काच बसला. काय करावे हेच तिला सुचेना. लोकांना विकृत आनंद झाला. मित्राच्या मृत्यूपेक्षा मैत्रीचा मृत्यू अधिक दाहक असतो. मैनाबाईला तर फारच दुःख झालं. अस्वस्थपण जाणवलं. चार आठ दिवस असेच गेले. न बोलता न भेटता –

**तुझा माझा भाऊपणा ॥बारा वर्षे झाली दोन ॥**
**शिणची गडयनी ।तुझ्या गुणाची आठवण ॥**

आणि एक दिवशी तिच्या दिरानचं मैनाबाईलाच असा काही प्रकार नसल्याचं शपथेवर सांगितलं. कुणाचं तरी ऐकून आपण भाऊपणा तोडल्याबदद्ल मैनाबाईला पश्चाताच झाला.

**तुझा माझा भाऊपणा ।एका खिनत मोडईला ॥**
**तुझ्या मंजूळ बोलण्याचा ।मला इसर पडईला ॥**

ती तडक साळाईच्या घरी गेली. तिच्या गळा पडून रडली. आपली चूक तिनं मान्य केली. ढगाळ आकाश जाऊन स्वच्छ सूर्यप्रकाश पडावा तसे मैत्रीवरील संशयाचे ढग नाहीसे झाले. त्या दोघी म्हणाल्या.

**तुझा माझा भाऊपणा ।कसा पडूनी पडईला ॥**
**शिणची गडयनी ।लावू शेवट कडईला ॥**

असा साळू – मैनाचा भाऊपणा कडला गेला.

आपल्या मर्यादित विश्वात माणसं जोडून जीवन अर्थपूर्ण करण्याचं उपजत शहाणपण स्त्रियांना असते. भाऊपणाने जोडलेल्या माणसामुळे जगणे अर्थपूर्ण होते. एकटेपण कमी होते. मनाचे भरण पोषण होऊन जगण्यात रस निर्माण होतो.

❒❒❒

## पान खाण्याचा छंद मोठा

**तांबोळीन बाई ।तुझ्या दुकानाखाली कट्टा ॥**
**नखल्या माझ्या बंधुजीला ।पान खाण्याचा छंद मोठा ॥**

ही ओवी आहे मैनाबाईच्या नंणदेची. तिचं नाव सीताबाई. परवा ती चार दिवस माहेरी आली होती. ती गाणारी. गळा बारीक. नणंदेला पुरणपोळीचं जेवणं करावं म्हणून मैनाबाईनं जात्यावर गहू दळायला घेतलं. नणंदेने दळायला आणि गायला साथ दिली.

**बारीक तुझा गळा ।साथ देणारी कोण हुती ॥**
**नणंदायी माझी बाई ।राती पावणी आली हुती ॥**

एरवी मैनाबाईचा गळा आयाबायांच्या ओळखीचा. शेजीबाईनं विचारलं, 'साथ देयाला कोण हुती,' मैनाबाईनं सांगितलं, 'राती नणंदायी आली हुती' गीतात अशी संवादात्मकता येते.खरे तर पुढे सीताबाईनंच बंधुजीवरून अनेक ओव्या म्हटल्या. त्यातल्या तिच्या भावाच्या म्हणजे राजारामदादाच्या पान खाण्याच्या छंदावरील ओव्या जरा वेगळ्या आणि महत्त्वाच्या.

खेड्यातल्या बहुतेक जाणत्या माणसाला पान खाण्याचा छंद होता आणि आहे. तसा राजारामदादानाही तो होता. देवधर्म पूजाअर्चेच्या निमित्तानं घरात पानं – सुपारी असतेच. त्यात वडीलधारी मंडळी पान खात असतातच. तो वारसा पुढे चालत राहतो. कष्टकरी माणसाला तेवढाच विरुंगळा. खेड्यात पान खाण्याला कुणी वाईट व्यसन म्हणत नाही.

**पान खतावण्या ।चुना लावतो देठाला ॥**
**नखल्या माझ्या बांधवाच्या ।सदा लालाई व्हाटाला ॥**

उगीच नाही आपला अभिताभ बच्चनही 'खैके पान बनारसवाला' म्हणून नाचला ते यामुळेच!

खरे तर पान खाणे वैद्यकशास्त्राच्या दृष्टिने आरोग्याला चांगले.त्रयोदशगुणी. कडू – तिखट उष्ण – मधूर, खारट – तुरट असलेला पानविडा वातकफहारक, कृमी दुर्गंधी नाशक असतो. तो पचनाला मदत करणारा, जोम वाढविणारा, मुखशुद्धी करणारा, पुरुषाचे रुप आणि सौंदर्य वाढविणारा आहे.

शहरातल्या पानपट्टीवर नाना प्रकारचे विडे मिळतात. खेड्यातले आपले साधे पान. नागवेलीची दोन पानं, चुना, सुपारी आणि कात एवढाच प्रकार असतो. एखादा फार हौसेने पान खाणारा, असला तर लवंग, वेलदोडे, जायफळ, ठेवतो. पण असे शौकीन कमीच.

भारतीय परंपरेत पान खाण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून म्हणजे दोन हजार वर्षापासून चालत आली आहे. नागवेलीच्या पानाच्या कथा. काहीही असल्या तरी नागवेलीच्या पानाचा शोध जंगलात वास करणाऱ्या नागवंशीय लोकांनी लावलेला असावा. हे त्यांचा खाण्यासाठी वापरही करीत असत. पुढे अभिजनानी तो स्वीकारला. पानांची लागवड केली. आपल्या धार्मिक, सामाजिक जीवनात विविधतेने वापर

करुन त्यास प्रतिष्ठा दिली. पुजोपचारात व मंगलकार्यात पाने व अखंड सुपारीचा वापर करतात. लग्नकार्यात मानाचे विडे दिले जातात. निमंत्रितांना पान-सुपारी देतात. अवघड कार्याच्या पैजेचा विडा उचलण्याची पद्धतही इतिहास काळात रूढ होती. राजदरबारी सन्मानित पाहुण्यांना पानविडे देण्यासाठी पानसेविका असत. ललित साहित्यातील शृंगाराची खुलावट वाढविण्यासाठी पानविड्याचा लेखकांनी कौशल्याचा वापर केला आहे. पान खाण्याचा प्रकार सर्वत्र आढळतो. शहरातील चौकाचौकात पानपट्ट्या आहेत. सांगोल्यासारख्या गावात आठवड्याला दोन ट्रक पाने खपतात यावरुन लोक किती पान खात असतील याची कल्पनाच केलेली बरी. थोडक्यात भारतीय समाजाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात पानविड्याला महत्त्वाचे स्थान आहे.

पानाचं गाणं फारचं लांबलं. खेड्यातलं जीवन साधं तसं पान खाणंही साधं. पूर्वी पानासाठी पट्ट्यापट्ट्याच्या कप्प्याने मोठ्या होत जाणाऱ्या चंच्या वापरत. पुढे तीन कप्प्याच्या कापडी रंगीत नक्षीदार पिशव्या आल्या. पानपुडा, बटवा हाही वापरात असे. त्यात पानं, सुपाऱ्या अडकित्ता, चुन्याची डबी, कात, तंबाखू असा सराजम असे. पान खाणे ही गोरगरिबांची हौस आणि थोडीफार चैनही होती. राजारामांच्या रुबाबदार पान खाण्याचे कौतुक बहिणाई करते.

**पान खतावण्या ।तांबूल टाकतो गल्लोगल्ली ॥**
**नखल्या माझ्या बंधूजीची ।सूरत लालाची मखमली ॥**
**पान खतावण्या ।चुना लावतो देठाला ॥**
**नखल्या माझ्या बांधवाच्या ।सदा लालाई व्हटाला ॥**
**पाच पानाचा विडा ।केलाय पिळदार ॥**
**हावशा माझ्या बंधू ।वर लंवगाचा खिळा मार ॥**
**पान खतावण्या ।इळाची किती खातू ॥**
**पान मळ्याची खुती घेतु ॥**
**पान खतावण्या ।सुपारीची गणना नाही ॥**
**माझ्या ग बंधुजीच्या ।बैठकीला लोक लयी ॥**

या ओव्यांतून भावाच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाचे, त्यांच्या पान खाण्याच्या छंदाचे व उदारपणाचे कौतुक आहे. 'वीसाची चंची, तीसाचं पान, जायफळ एक, लंवगा सात, माझा बंधूजी पान खातो, रस्त्याने जातो' असे वर्णन एका कडव्यात आहे. स्त्रिया नवऱ्याचं नाव उखाण्यात घेतात. त्यातला बैठकीच्या पान सामानाचा थाट पहा. . . . . 'सतरंजीची शोभा, पान पिकलं पुन्याचं, चुना लोनावळ्याचा, कातगोळ्या धारच्या, वेलदोडे इंदूरचे, जायफळ नगरची, जायपत्री मद्रासची, चिकणी सुपारी सोलापूरची, ताट बिल्वराचं, घुंगराचा अडकित्ता बागणीचा, एवढं सामान विड्याचं' असा थाट स्वप्नरंजनात्मक पद्धतीने गाण्यात येतो.

राजारामाला पान खाण्याची सवय तशी लवकरच लागली. खेड्यात पान विकणाऱ्या जमातीला तांबोळी म्हणतात. हे तांबोळी मुसलमान समाजातले. सर्वच दृष्टीने थोडे खालच्या दर्जाचे. पानबीडी विकणारे तांबोळी, मणी-मंगळसूत्र गाठविणारे आतार, भाजीपाला विकणारे बागवान, बांगड्या भरणारे कासार, विविध वस्तू विकणारे मणेरी हे मुसलमान समाजातील गरीब व्यावसायिक. व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसं' मध्ये चित्रित केलेली तांबोळ्याची खाला याच समाजातली. आमच्या

खेड्यात तांबोळ्याची एक तरुण मुलगी पान विकत बसलेली असे. राजाराम नेहमी तिच्याकडून पान खरेदी करत. ओव्या तशा सुट्या. पण विशिष्ट पद्धतीने मांडल्या तर त्यातून पूर्ववयातील एक भावकहाणी उभी रहाते. जी सीताबाईने गायली होती.

**तांबोळ्याच्या मुली ।पान देताना नको गाळू ॥**
**नखल्या माझ्या बंधवाला ।चांद-सूर्याला नको न्याहळू ॥**
**तांबोळीनं बाई ।पान विकताना झोपी गेली ॥**
**नखल्या माझ्या बंधूजीनं ।शेला टाकून जागी केली ॥**
**तांबोळीन बाई ।पान देताना हासली ॥**
**नेणंत्या माझ्या बंधूजीची ।शिण कवळी दिसली ॥**
**तांबोळीन बाई ।पान रूपयला देती बारा तेरा ॥**
**नखल्या माझ्या बंधूजी ।पान खाणारा शिलेदारा ॥**
**तांबोळीन बाई ।पान देताना चुकली ॥**
**नखल्या माझ्या बंधूजीला ।माझ्या चांदाला दिपली ॥**

एकदा बैलगाडी गावातून घेऊन जाताना राजारामानी पान विकतं घेतलं. तिची रुंदीभारी.

**तांबोळ्याच्या मुली ।पान देवावं घाईघाई ।**
**नंदी नाचतो चार पायी ॥**
**पानाड्या पानखातू ।तुझं रंगले सोळा दात ।**
**नखल्या माझ्या बंधूराजा ।कुणी दिलाय तुला कात ॥**
**पान खतावण्या ।तुझ्या रंगल्या दात दाडा ॥**
**नखल्या माझ्या बंधवाला ।कुण्या नारीनं दिला विडा ॥**

आता कुण्या नारीनं विडा दिला असेल हे वेगळं सांगायची गरज नाही. प्रेम असलं तरच पान रंगतं. राजारामाचं सोडाच पण उलट्या संदर्भाने येणारी श्रीकृष्णावरील ओवी अशी –

**मथुरेच्या बाजारात ।देव झाल्यात तांबोळी ॥**
**चंद्रावळीच्या रुपासाठी ।पान नवतीची कवळी ॥**

आता कृष्णाजीचा असा पराक्रम तर सामान्यांचे काय?

वरील ओव्यांतून पान खाणाऱ्या भावाचे कौतुक आहे. तांबोळ्याच्या मुलीचे व्यक्तिचित्र आहे. पायरी पायरीने विकसित होत जाणाऱ्या एका मुग्ध प्रेमाची भावकहाणी आहे. ती बहिणाई सीताबाईला माहीत होती. तिच्या अवलोकन-अनुभवातून तिनं गायली. पण मैनाबाईचं चित्त मात्र थाऱ्यावर नव्हतं.

❐❐❐

अनुक्रमणिका

## गावाला गेलं म्हणू

सुगी सराईचं दिवस संपलं. काढणी झाली. मोडणी झाली. खळं झालं. धान्य घरात आलं. पाडवा झाला. चैत्र-वैशाख उजाडला. वसंतानं निसर्ग फुलून आला. उन्हं वाढायला लागली. खेड्यातल्या माणसाला कामाधंद्यातून थोडी उसंत मिळाली. मग गावाला जाणं आलंच. पैहीपाहुण्याला भेटायला, विवाहासाठी, जत्रेला, देवदेवतांच्या दर्शनासाठी.

मैनाबाईचा संसार आता चांगलाच सुराला लागला होता. तिच्या लग्नाला आता सात-आठ वर्षे झाली होती. मुलं मोठी होत होती. तिचे पती राजाराम तसे चांगले पण एवढ्या संसारानंतर त्यांना आता बायकोत पूर्वीइतका रस राहिला नव्हता. एकदा ते काही कामानिमित्त गावाला गेले.

**गावाला गेलं म्हणू ।गावासारखं होऊ नका ॥**
**वाट बघायला लावू नका ॥**

मैनाबाईनं आपल्या कंथाला गावाला जाताना सांगितले होतं, 'लवकर या' 'शेतमळा, घर कामाचं, गाव रीकामटेकड्याचं.' 'गावासारखं होऊ नका' म्हणजे तिकडेच रमू नका.

आज तुलनेने दळणवळणाच्या चांगल्या सुविधा झाल्या आहेत. पण पूर्वी खेड्यातल्या माणसाला गावाला जायचं झालं तर एक तर चालत जावे लागे नाहीतर घोड्यावरुन किंवा बैलगाडीतून. जवळच्या गावाला गेलं तरी जायला एक, राहायला एक आणि यायला एक असे किमान तीन दिवस मोडत. लांबच्या गावाला जाणं झालं तर आठ-पंधरा दिवस सहज लागत.

राजाराम गावाला गेले. ते काल येतो म्हणून सांगून गेले होते पण काल ते काही आले नाही. जुन्या काळात बायकांची एक सवय होती. पुरुष माणसं जेवल्याशिवाय आपण जेवायचं नाही कारण पती म्हणजे परमेश्वर ते जेवून संतुष्ट झाले की बायकांनाही समाधान वाटत असे. काल मैनाबाईनी रात्री उशिरापर्यंत वाट पाहिली.

**पाची पक्वान्नाचं ताट ।वर झाकती दोन्ही हात ॥**
**किती बघू मी तुझी वाट ॥**

पण कारभारी काही काल आलं नाहीत. शेवटी ती वाट पाहून पाहून थकली.

**गावाला गेलं म्हणू ।येतू म्हणून गेलं काल ॥**
**चुड्या माझ्या राजसाची ।वाट बघुनी डोळं लाल ॥**

रात्री उशीरापर्यंत तिने वाट पाहिली. वाट बघून बघून तिचे डोळे लाल झाले पण कारभारी काही आले नाहीत. शेवटी नाईलाज झाल्यावर तिनं चार घास खाल्ले आणि झोपली.

अनुक्रमणिका

दुसरा दिवस उजाडला. नित्याची कामंधामं सुरु झाली. पण कारभारी गावाला गेल्यामुळे मैनाबाईचं चित्त काही थाऱ्यावर नव्हतं. घरात मुलंबाळं, सासु-सासरा, दीर-जावा असूनही घर भयाण वाटत होते.

**गावाला गेलं म्हणू ।माझ्या गळ्याची गळपेटी ॥**
**चुड्या माझ्या राजसापाठी ।गाव भयाण लागेपाठी ॥**

घर तर भयाण वाटत होतेच पण एका जिवलगाशिवाय सारं गावही भयाण वाटत होते. तिच्या मनात नाना विचार यायला लागले. जाता-येता वाटेत काय बरं वाईट तर झाले नसेल. खेड्यातल्या वाटा आडवळणी. जंगलझाडीतून जाणाऱ्या. त्या काळात चोराचिलटाचे, वाटमारीचे प्रकार घडत. जंगलातल्या जनावरांचा हल्ला होण्याची भीतीही असे. पण पुन्हा तिला वाटे, असं कुठलं व्हायला. मागे दोनदा जाऊन आले होते. दोडा! आपलं मनच वाईट.काहीतरीच मनात येतं. पुन्हा तिला वाटे, ज्या कामासाठी ते गावाला गेलेत त्यात काही तिढा तर पडला नसेल. पण काम झालं नाही तर नाही, परत यायला काय हरकत. पुन्हा तिला वाटे पाहुण्यानी चार दिवस ठेवून तर घेतलं नसेल. . . पण एवढे दिवस ते तर कशाला ठेवून घेतील. पुन्हा तिला वाटे तिकडून मेव्हणीच्या गावाला तर गेले नसतील.

एकदा तर तिच्या मनात आलं, एखाद्या गावभवानीच्या नादी लागून त्यात तर मश्गूल झाले नसतील? असे नाना विचार तिच्या मनात येत पण तिला कळायला काहीच साधन नव्हते. फोन तर नव्हताच नव्हता पण तार करावी – पत्र पाठवावे अशी व्यवस्थाही नव्हती. तिचं गाव तसं आडवळणी. तरी तिने तालुक्याच्या बाजारला जाणाऱ्या एक दोन माणसाकरवी सांगावा धाडला होता.

**सांगून धाडयती ।माझा सांगावा जाऊ राहू ॥**
**आडवळणी माझं गावू ॥**

सांगावा पोहचला की नाही माहित नाही पण कारभारी काही आलं नाहीत. मैनाबाई विरहानं व्याकुळ झाली. 'गावाला गेलं म्हणू मला करमना कुठंकुठं' अशी तिची अवस्था झाली. प्रिय व्यक्तीच्या विरहाने थोडा काळ सुद्धा मोठा वाटायला लागतो. दिवस कसातरी कामाधंद्यांत जायचा पणं रात्र खायला उठायची.

**गावाला गेला बाई ।मव्हा जरीचा पटका ॥**
**रान उठलं खायला ।रात देते ग चटका ॥**
**कोन्ह्याही गावी गेलं ।येऊ केलं काल ॥**
**आंबियाची डाल पिकून झाली लाल ॥**
**माळ्याच्या मळ्यामंदी ।काय गुलाबा तुझी हवा ॥**
**वास घेणारा गेला गावा ॥**

पूर्वी स्त्रिया नवऱ्याचे नाव घेत नसत. 'हेनी त्येनी' अशी नामाची भाषा त्या वापरत. त्यात एक खुमारी आणि लज्जत होती. झाकल्या सौंदर्याची. कंथाचा उल्लेख ते वापरत असलेल्या गोष्टीवरूनही होत असे. मव्हा म्हणजे माझा जरीचा पटका गावाला गेला नाही तर जरीचा पटका घालणारा गेला. दिवसभर शेतामळ्यात

अनुक्रमणिका

जावं लागे. मैनाबाईला रान खायला उठे. रात्र तर फारच तळमळायला लावी. चैत्र-वैशाखाचे महिने असल्यामुळे आंबियाची डाल पिकूनी झाली लाल. याचा सरळ अर्थ होऊ शकतो. तशी ती तरुण असल्याने त्याचा ध्वन्यार्थही होऊ शकतो.

कारभाऱ्याच्या वाटेकडे सतत तिचा कान असे.

**गावाला गेलं म्हणू ।येशी बाहेर माझा कान ॥**
**कवा येत्याल गाडीवान ॥**

पाहुण्याची बैलगाडी घेऊन येतील असं तिला वाटे. ती स्वयंपाक करीत असली तरी तिचं मन कंथाच्या वाटेकडे.

**साळीचं तांदूळ ।आदणी बोलत्यात ॥**
**वाट सरदार चालत्यात ॥**

तांदूळ शिजताना येणारा आवाज व नवऱ्याच्या चपलाचा आवाज यातलं साम्य ती सूचकतेने व्यक्त करते.

कारभाऱ्याला गावाला जाऊन बरेच दिवस झाले. किती दिवस झाले? जाताना ते ठेवणीतलं नवं धोतर, अंगरखा, जरीचा पटका घालून गेले होते. ती वैतागून म्हणते.

**गावाला गेलं म्हणू ।असं कसं गावाला जाणं ॥**
**नवं धोतर झालं जूनं ॥**

किती दिवस झालं असत्याल याची नुसती कल्पनाचं करा. असं कसं गावाला जाणं, हायका काय काळजी?,बायका-मुलांची. घरप्रपंच्याची. शेतमळ्याची. गुंराढोरांची. का आपलं पाण्यात पडल्यासारखं जाऊन बसायचं. तिला कारभाऱ्याचा रागही आला.

पुरुष बाहेर कुठेही गेला आणि कितीही काळ राहिला तरी घराशिवाय त्याला सत ना गत. शेवटी एकादाशी कंथ आलं. तिनं येताना पाहिलं.

**लेण्या नेसण्याची ।म्या का वासुद (चिंता) नाही केली ॥**
**चुड्या माझ्या राजसाला देखताना ।बिन जेवता भूक गेली ॥**

कारभारी गावाला गेल्यापासून मैनाबाईचं लेण्या नेसण्याकडे फारसे लक्ष नव्हते. त्याची तिनं चिंताही केली नव्हती. पण कारभाऱ्याला पाहताच तिला कित्ती कित्ती आनंद झाला म्हणून सांगू ते सांगायला माझे शब्द अपुरे आहेत.

❒❒❒

अनुक्रमणिका

## कंथ माझा दारूच्या धुंदीत

मैनाबाईचे भरतार राजाराम तसे चांगले गृहस्थ होते. पण गेल्या चार महिन्यापूर्वी ते गावाला गेले आणि पाहुण्याच्या संगतीनं बिघडले. तसे कधीतरी घेत पण त्यांना दारूचे व्यसन नव्हते. त्यांची बहीण एका खेड्यात दिली होती. मेव्हणे पिणारे.फाल्गुन महिन्यात आलेले पाव्हणे. त्यात मेव्हणे. त्यांना आयतीच संधी मिळाली. बहिणाबाईने अचानक आलेल्या भावाचे स्वागत केले.

**माझ्या घरला पावना ।जान टाकती आकड्याचे ॥**
**हावशा माझ्या बंधवाचं ।येणं आवचीत फाकड्याचं ॥**

भाऊ घरला आला की बायका आपले सगळे सुगरणपण पणाला लावून स्वयंपाक करतात तसं बहिणीने पुरणपोळ्याचा बेत केला.

**पावण्याला पाहुणचार ।मी का घालती पुरायान ॥**
**खाली साखरंचं आळं ।वर तुपाचं दुरायानं ॥**
**पावण्याला पाहुणचार ।तेलच्या करती लालीलाल ॥**
**दारू बकऱ्याची नाही चाल ॥**

पण पाहुणे इरसाल. त्यांना असल्या बामणी बेताने पाहुणचार केल्यासारखे वाटेना. पोळीपेक्षा त्यांना नळी प्यारी. त्यांनी बकरा मारून जंगी बेत केला.

बहिणाबाईने अगोदरच ओळखून सांगून टाकले.

**पाहुण्याला पाहुणचार ।पोळ्या करु का बकरा मारू ॥**
**बंधुला किती सांगू ।खेड्या गावाला नाही दारुं॥**

पण बाईमाणसाचं ऐकत कोण? मटनाचे जेवणं म्हटल्यावर अगोदर थोडी घेतली पाहिजेच. त्याशिवाय जेवणाला रंगत नाही. बहिणाईने कळवळून सांगितले. चांगले पोटभर जेवा. पिण्याचा घोळ घालू नका.

**पाहुण्याला पाहुणचार ।बकरा मारती ताजा लोळ ॥**
**दारूच्या पाण्यासाठी ।नका घालू तुम्ही घोळ ॥**

पण बहिणीचं न ऐकता मेव्हण्याने पाहुण्यासाठी खास ब्रँडी आणली. मेव्हण्या मेव्हण्याची बैठक बसली. पिणे सुरु झाले.

**पाहुण्याला पाहुणचार ।बकरा मारुनी केला नास ॥**
**दारु बरांडी येतो वास ॥**

अनुक्रमणिका

मग मेव्हण्यानी आग्रह करुन पाहुण्याला पाजली. राजारामांना थोडी जास्तच झाली. त्यांचा जीभेवरचा तोल सुटू लागला. बडबडणे, भेलकांडणे, शिवीगाळ करणे, रडणे हा सगळा प्रकार झाला. वाघाच्या तोंडाला रक्ताची चटक लागावी तशी माणसाला चटक लागते. राजाराम चांगले आठ-पंधरा दिवस पाहुण्याकडे होते. ते पिण्यात चांगलेच तयार झाले. एका दिवसी अंड्याचा बेत होता.

**घरला पाहुणा ।पोळ्या अंड्याच्या करती ताज्या ताज्या ॥**
**हावशा बंधू माझा ।आला दारुचा चैनबाजा ॥**

राजाराम गावाला आले तेव्हा ते चांगलेच पिंडके झाले होते. गावातही तळीरामचे टोळके होतेच. पूर्वीच्या गावात कल्लाळ नावाची एक हिंदी भाषिक जमात होती. ते माडावर, शिंदीच्या झाडावर चढून दारु काढत. गावाच्या बाजूला झोपडीवजा गुत्ता असे. पुरुष माणसं दारू काढण्याच्या कामात गुंतलेली असत. आणि कल्लाळांच्या बायका गुत्त्यावर बसून दारु विकत. आडबाजूला असलेल्या गुत्त्याचे एक वेगळेच जग होते. इथे सर्व समाजातील, सर्व स्तरातील व सर्व वयोगटातील माणसे असत. त्यांच्या जगात जातीभेद पाळला जात नसे. नवशिक्यापासून अव्वल ग्रॅज्युएटपर्यंत सर्व पातळीवरचे पिणारे इथे भेटत. त्यांची जात एकच पिंडके, पिणे, आग्रह करणे, वेगळ्याच जगात वावरणे, बडबडणे, शिवीगाळी करणे, प्रसंगी मारामाऱ्या करणे, भेलकांडणे, रस्त्याच्या कडेला पडणे हे सर्व प्रकार तिथे दिसत. त्यांचा पृथ्वीवरचा स्वर्ग वेगळाच होता. त्यांना दिवसा चांदण्या दिसत. आणि रात्रीच्या सूर्यप्रकाशात त्यांची मुशाफिरी सुरु असे. या जगात राजाराम सहभागी झाले.

पुढे कल्लाळाचे गुत्ते मागे पडले. हातभट्टीवाले आले. ते चोरून देशी दारु विकत. दारुबंदीचे धोरण राबविल्यावरही स्वातंत्र्योत्तर काळात देशी दारुची सरकारमान्य दुकाने खेड्यात निघाली. विदेशी दारूच्या शोरुम निघाल्या. बिअरबार, परमीट रूम आल्या. राजरोसपणे दारूची विक्री होऊ लागली. साखर सम्राटांनी लिकरच्या फॅक्टरी सुरु केल्यामुळे हातभट्याचे कुटीर उद्योग बंद पडत चालले आहेत. प्रकार बदलले तरी नशापाणी कायम आहे. उलट त्याला समाजात प्रतिष्ठा मिळत आहे. न पिणे आता मागासलेले ठरत आहे. घरातला कर्ता माणूस दारू प्यायला लागला की त्याचा सर्वाधिक त्रास त्यांच्या बायका-मुलांना होतो. राजारामांनी दारू पिणे सुरु केल्यावर मैनाबाईनी गावातल्या कल्लाळीनीला कळवळून सांगितले.

**कल्लाळीन बाई ।नदी पल्याड तुझं गावू ॥**
**चुड्या माझ्या राजसाला ।नको दारूची सवं लावू ॥**

पण कल्लाळीनं आपला धंदा बघणार. तिने विनंती मान्य केली तरी राजारामांची साथ हवी. त्यांनी दारू सोडणे मनावर घ्यायला हवे. पण त्यांचे पिणे तर वाढतच होते.

**कल्लाळीन बाई ।तुझ्या दारूला आग लागू ।**
**दारूच्या धुंदीतल्या ।माझ्या कंताला कुठं बघू ॥**
**कल्लाळीन बाई ।तुझ्या दारूचा पसारा ॥**
**दारूच्या धुंदीमंदी ।कंत माझा रूमाल इसरला ॥**

राजारामाचे व्यसन मर्यादित होते तोपर्यंत कसेतरी ठीक होते पण पुढे ते वाढतच गेले. त्यांना आपल्या अंगावरच्या कपड्याची व डोकीवरच्या रूमालाची शुद्ध राहिना. पुढे त्याची अवस्था अट्टल दारूड्याची झाली.

**कल्लाळीन बाई ।नको करूस कलाकला ॥**
**चुड्या माझ्या राजसानं ।सगळ्या रस्त्यानं कालवा केला ॥**

राजारामानी दारूच्या व्यसनापायी घरातले पैसेआडके दागदागिने, धनधान्य, भांडीकुंडीसुद्धा विकली. शेतमळा ओसाड पडला. काही जमिनी विकल्या. रोज दारू पिऊन येणं. शिवीगाळ करणं, मैनाबाईला मारझोड करणे अशी कोणत्याही दारूड्याची नीयत, ती त्यांचीही होती. कौटुंबिक परिस्थिती कफल्लक झाल्यामुळे कल्लाळीन बाईची दारूची उदारी तटली. तिने तगादा लावला.

**कल्लाळीन बाई ।करती तुझी बोळवन ॥**
**दारूच्या धुंदीमंदी ।कंत माझा घेतो रस्त्याने लोळवन ॥**

असं काहीतरी सांगून मैनाबाईने कल्लाळणीची बोळवन केली. पण रोजच्या पिण्याने उधारी वाढतच गेली. एकदा तर कल्लाळणीन बाई आणि मैनाबाईचं भांडण झालं. कल्लाळीन जहांबाज. भांडणात तरबेज आणि अनुभवी. तिने गुत्त्यावर येणारे अनेक पुरुष पाहिलेले. तिने कलाकला करायला सुरुवात केल्यावर वैतागून मैनाबाई म्हणते,

**कल्लाळीन बाई ।नको करुन कलाकला ॥**
**किती दारूची माप पेला ।त्याचा हिशोब सांग मला ॥**
**त्याची किंमत देते तुला ॥**

आपलंच नाणं खोटं तर कल्लाळणीला बोलून उपयोग काय? राजारामाच्या दारुच्या व्यसनापायी मैनाबाईच्या संसाराचा खेळखंडोबा झाला. अशी खेड्यातली कित्येक घरे बाई आणि बाटलीच्या व्यसनात बरबाद झाली आहेत.

**दारू मन दारू ।बरांडी कैफाची ॥**
**पराया नारीच्या संगतीनं ।घरं बुडाली कैकांची ॥**

❒❒❒

# नखऱ्याची नार

संसारात संकटं ही फेर धरुन येतात. राजारामदादा दारू प्यायला लागल्यापासून मैनाबाईच्या सुखी संसाराला ग्रहण लागले होते. दिवसेन् दिवस, आर्थिकदृष्ट्या संसार गोत्यात येत होता. संसारात सौख्यही राहिलेले नव्हते. त्यात राजाराम अलीकडे ज्या लोकांच्या संगतीत वावरत होते, ती गावातली खुशालचेंडू मंडळी होती. घरची अजिबात उस्तवारी न करता सकाळ संध्याकाळ खायचं आणि गावातनं पोळासारखं फिरायचं. एखाद्या कट्ट्यावर नाहीतर चावडीत, देवळात उचापती करत बसायचं. फारच गमना गेलं तर पत्त्याचा डाव मांडून रमी खेळत बसायचं. चहापाण्याला कुणाला ना कुणाला गंडवत राहायचं. संध्याकाळ झाली की, दारुच्या गुत्याकडे पाय वळायचे. उशीरपर्यंत पीत राहायचं. रात्री-अपरात्री भेलंकडत घराकडे जायचे, असा उद्योग.

या खुशालचेंडूत काही बायकांचे नादी होते. त्यात सुगी झाल्यावर गावात नाचगाणं करणाऱ्या पातरांचा मेळा आला होता. नदीपलीकडच्या गावात एक कळवातीनीचा वाडा होता. तिच्या तरुण मुली या ताफ्यात होत्या. नाचगाणं म्हटल्यावर उभ्या गावाच्या अंगात चळ भरला होता. अलीकडे गावात तमाशा आला की, जसे उभे गाव चेकाळते, ताल सोडते, तसा प्रकार या नाचगाण्याच्या ताफ्याने झाला होता. त्यात राजारामदादाचा खुशालचेंडू कंपू आघाडीवर होता.

**गावा आलात्या पातरा ।जागा मागत्या येशीपशी ॥**
**नखल्या माझ्या बंधुजी ।मात्या पित्यांच्या सासुरवासी ॥**
**गावा आल्यात्या पातरा ।नदी पल्यांड तुझा वाडा ॥**
**नखल्या बंधुजीच्या ।हाती कंदील पानपुडा ॥**

सासुरवास हा स्त्रियांच्या अनुभवाचा पण येथे तो शब्द पुरुषाच्या संबंधी वापरला आहे. माता-पित्याचा मुलाला सासुरवास कसला तो काही खरा नव्हे. म्हणूनच हाती कंदील आणि पानपुडा येतो.

रात्री दहा वाजले की नाचगाणं सुरु होई. राजाराम आणि मंडळी मोक्याची जागा धरुन बसत. ‘आधी गणाला रणी आणला’ आणि ‘लवकर यावे सिद्ध गणेशा’ हे गण झाले. ढोलकीच्या मुखड्याच्या बोलाने प्रेक्षकांची मने थरारून जात. पदराची शिडे करून तरुण नाचणाऱ्या मुली घुंगराच्या तालावर नाचत येत. नृत्याचा धुंद आविष्कार होई. ‘बुगडी माझी सांडली गं’ ‘राया मला जरतारी शालू आणा.’ ‘चिंचा आल्यात्या पाडाला हात लाऊ नको माझ्या झाडाला’ ‘या रावजी बसा भाऊजी’ यासारख्या एकापेक्षा एक इरसाल लावण्या सादर होत. गाभुळ्या चिंचा पाहून मंडळीच्या तोंडाला पाणी सुटे. दोलत जादा होई. एखादा आंबट शोकीन ‘चिंचा नकोत’ ‘पाडाला पिकलाय आंबा म्हण’ अशी फर्माईश देई. पहाटेपर्यंत हे नाचगाणं चाले.

कधी कधी या रंभापातरच्या मुली नट्टापट्टा करुन गावातून जाताना दिसत. गावातील तरुण मंडळी आशाळभूतपणे पाहून जीव टाकीत.

**रंभा पातरच्या मुली ।रस्त्याला का ग उभी ॥**
**नखल्या माझा बंधू ।म्होरं गेलेला माग बघी ॥**

अनुक्रमणिका

**रंभा पातरच्या मुली ।का गं रस्त्याला मोकळी ॥**
**नखल्या माझ्या बंधुजीला ।माझ्या वाघाला साकळी ॥**

कसली साकळी आणि काय घेऊन बसलाय. अशावेळी सगळी बंधने झुगारून पुरुष माणसे मोहवश होतात आणि पशू बनतात.

**गावा आल्यात्या पातरा ।गावाबाहेर तुझी सजा ॥**
**नखल्या बंधू माझा ।घरच्या राणीची घेतो रजा ॥**

जन्माची साथ देणांऱ्या पतीपरायण सेवाभावी पत्नीला सोडून पुरुष माणसे अशा नखरेवाल्या नाचगाणारणीच्या पाठीमागे लागतात. तिच्या नादानं स्वतःची आणि कुटुंबाची बरबादी करून घेतात. आजही चौफुला, मोडलिंब यासारख्या ठिकाणी असलेल्या संगीत बारीतील बायकांच्या नादी लागून कित्येक चांगल्या घराण्यातील श्रीमंत शेतकऱ्यांची मुले बरबाद झाली आहेत.

हे झाले पातराविषयी. त्या तर बोलून चालून पोटासाठी नाचगाण्याचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया होत्या. पण प्रत्येक गावात चार-दोन नखरेवाल्या बायका अशा असतात की त्या गावाला वेड लावतात. तशा त्या मोकळ्याच असतात. नट्टापट्टा करुन पायात पैंजण घालून झुणूक झुणूक वाजवत गावभर भटकत असतात. पुरुषांना आकर्षित करुन नादाला लावणे, त्यांना खेळविणे आणि पैसे उकळणे हाच त्यांचा उद्योग असतो. पठ्ठे बापूरावांच्या ‘नटारंगी नार’ लावणीतल्या सारख्या या बायका असतात. गरत्या पतिव्रतांना या बायकांचे वागणे आवडत नाही. त्या आपल्या भावाला किवा भरताराला फशी पाडतील या भीतीने गाण्यातून त्याचा अधिक्षेप करतात.

**नखऱ्याची नार ।तुझा नखरा केसावरी ॥**
**डौल केळीचा ऊसावरी ॥**
**नखऱ्याची नार ।तुझा नखरा तेलावरी ॥**
**फुगा पाडती गालावरी ॥**
**नखऱ्याची नार ।तुझा नखरा माहेरी ॥**
**धन्याच्या कोथिंबीरीचा ।वास मळ्याच्या बाहेरी ॥**

कृषिजीवनातील अत्यंत समर्पक उपमा येथे दिल्या आहेत. तो ऊस आणि ती केळी. केळीची उपमा तरुण सुंदर स्त्रीला देण्याची पद्धत लोकगीतात सर्वत्र दिसते. म्हणून केळीचा डौल ऊसावरी, केस विंचरण्याच्या पद्धतीवरुन स्त्रियांची चाल कळते. बॉबकट येण्या अगोदरचा तो काळ होता. नखरेवाली बाई गालावर केसांचा फुगा पाडी. कोथिंबीर आपण कोवळी वापरतो. पण ती फुलाला व धने यायच्या रंगाला आली की तिचा वास मळ्याबाहेर जातो. तसा तरुण नखरेवाल्या बायकांच्या तारुण्याचा गाजावाजा गावभर होतो. किती बारीक निरीक्षण आणि सुंदर उपमा आहेत पाहा. तारुण्यात पशू सुद्धा सुंदर दिसतात तसा हा प्रकार. त्याचा हा अधिक्षेप. मात्र सूक्ष्मपणे पाहिल्यास असे दिसते की, अशा बायकांच्या नादी लागणारा पुरुष मात्र लोकगीतातून स्त्रियांच्या कौतुकाचा विषय ठरतो.

अनुक्रमणिका

**भरल्या बाजारात ।नार नखीची हळू बोल ॥**
**नखल्या माझ्या बंधवाला ।माझ्याला पडली भूल ॥**

राजारामानाही अशी भूल पडली आणि ते गावातल्या एका बाईच्या नादी लागले. स्त्री बाकी काही सहन करेल पण स्वतःच्या पतीवर हक्क सांगणारी सवत सहन करु शकत नाही. तो तिच्या स्त्रीत्वाचाच अपमान असतो. मैनाबाईलाही ते सहन झालं नाही.

**बाजींद्या नारीचं ।तुझं कळंना खरं खोटं ॥**
**जांभळ्या बाईला ।फळ लागलं उफराटं ॥**

जांभूळाख्यानाच्या पौराणिक कथेचा संदर्भ याला आहे. अशा बायकांना संसार नसतोच. चोराला चांदणे आणि वेश्येला पुत्र काय कामाचे? मुलंबाळं नसल्याबद्दल त्यांना हिणवले जाते.

**नखऱ्याची नार ।उभी दिसते कळवातीन ॥**
**जन्मा येऊन ।नाही झाली बाळांतीन ॥**

नखऱ्याची नार बाळंतीण होवो किंवा न होवो, तिने मैनाबाईच्या संसारात बिब्बा घातला, एवढे मात्र खरे.

❑❑❑

अनुक्रमणिका

# पराया नारीसाठी

पराया नारीचा विषय तसा स्फोटक. कोणत्याही खेड्यात आणि समाजात आढळणारा. वरवर न दिसणारा पण आतून असणारा. वास्तव. स्त्रियांच्या माहितीतला, चर्चेतला आणि क्वचीत अनुभवातला. स्त्रीगीतातून प्रगट होणे स्वाभाविकच होय.

मैनाबाईचे पती राजाराम त्यांना दारू पिण्याचा नाद लागला होता. खुशालचेंडूच्या संगतीत ते वावरत होते. गावात नाचगाणं करणाऱ्या पातरा आल्या होत्या पण त्यातली पाखरं काही खुशालचेंडूच्या हाती लागली नाहीत. पण गावात नखऱ्याच्या पर्कुड्या होत्याच. राजारामदादा गावातल्या एका बाईच्या नादी लागले. तिच्या मोहजालात अडकले. खरेतर त्यांनाच अडकून घ्यायचे होते. बाहेरख्याली पुरुषाला लागलेला कामिनीचा नाद वाईटच. घरात मैनाबाईसारखी सुंदर, तरुण, सेवाभावी, पतिपरायण पत्नी असूनही तिच्या प्रेमाची अवहेलना करून तिच्या मनाचा, भावनांचा, सुखाचा यत्किंचीतही विचार न करता ते बाहेरच्या नादाला लागले होते.

सामाजिक दडपणामुळे खेड्यातली अशी प्रकरणे चोरूनच चालतात. पराया नारीसाठी वेडा झालेला पुरुष, मग नाना उपद्व्याप करतो.

**घरची अस्तुरी ।जसा अंब्याचा उधाळा ॥**
**पराया नारीसाठी ।झाला नदीचा बगळा ॥**

बगळा रानावनात हिंडतो. पाणस्थळीच्या जागा शोधतो. सोंग घेऊन ध्यान लावून बसलेला असतो. मासा आला की टिपतो. तसे हे पुरुष बाईच्या मागावर लक्ष ठेवून असतात. ती कुठे भेटेल याच्या ते शोधात असतात. दिवसा कुणाला दिसणार नाही अशा घराच्या वळचणीला कोलवा धरून उभे राहतात. चांदण्या रात्री सावलीला वा दिव्याच्या अंधाराला ते आपल्या माशुकाची वाट पाहतात. तिथेच तिला चोरून भेटतात. मांजर चोरून दूध पित असले तरी ते इतरांच्या लक्षात येतेच.

**पराया नारीसाठी ।सखा वळचणीखाली उभा ॥**
**घरची अस्तुरी ।हाय हळदीचा गाभा ॥**
**घरची अस्तुरी ।ज्याची त्याला देते शोभा ॥**
**पराया नारीसाठी ।वल सावलीला उभा ॥**

घरच्या अस्तुरीचा गौरव करीत पुरुषाचे हे असभ्य वर्तन एथे स्पष्ट केले आहे. घरची अस्तुरी हळदीच्या गाभ्यासारखी सुंदर असली, त्याला शोभा देणारी असली तरीही यांचे लक्ष बाहेरच असते. नाना उपद्व्याप करून ते पराया नारीच्या प्राप्तीसाठी धडपडत असतात. भावनेच्या आहारी जाऊन प्रसंगी वाट्टेल ते धाडस करतात.

घरची अस्तुरी ।हाय लसना कापराची वडी ॥
पराया नारीसाठी ।टाकी बुरजावरून उडी ॥
नखीच्या धोतराला ।घनपसा लागला ॥
पराया नारीसाठी ।गेला भिताड येगायला ॥

अनुक्रमणिका

खेड्यातले चोरटे प्रेम पडक्या घराच्या खिंडारातून चालते. धोतर फाटले तरी याचे त्याला भान नसते. प्रसंगी डोकीचा पटका हातंरायलाही तो कमी करीत नाही. बोहरख्याली पुरुषाला आपली प्रतिष्ठा जाते, इज्रत कमी होते याचे कोणतेच भान असत नाही. म्हणतात ना कामी जनाना ना लज्ञा ना भय. निरल्लज्ञपणे अशावेळी ते काहीही करायला तयार होतात.

**घरची अस्तुरी ।हाय खोबऱ्याचं खांड ॥**
**पराया नारीसाठी ।घाली मोरीमध्ये तोंड ॥**

बरे घरात सुंदर तरूण पत्नी असते. ती त्याला संसार सुखाचे समाधान देत नाही असेही नसते. उलट

**घरची अस्तुरीची निंदा ।काय करशी नादाना ॥**
**तुझ्या शेजची कामिना ।तुझी तुला आटपना ॥**

अशीच अवस्था असते. इरड करायची सवय लागलेल्या जनावरांला दावणीतली वैरण गोड लागत नाही. उकीरंडे फुकायची सवय लागलेल्या माणसाला घरच्या टोपल्यातली भाकरी गोड लागत नाही. तसा हा प्रकार असतो. बाईचा नाद वाईट म्हणतात ते काही खोटे नाही. पोरीच्या खेळगाण्यातही गंमतीने त्याचा अधिक्षेप केला आहे.

**उकिरड्यावर उकिरड, लिपाव किती ॥**
**ठिवल्या रांडला, जपाव किती ॥**
**समय म्हण समय, चांदीची समय ॥**
**ठिवल्या रांडला, दाखवतोय म्हमय ॥**

बाईच्या नादाने वेडे झालेले पुरुष तिची मर्जी संपादण्यासाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करतात. सुरवातीला ते तिला चोरून चोळी, झंपर घेऊन देतात.

**घरची अस्तुरी ।पुरणाची पोळी ॥**
**पराया नारीसाठी ।घाली खिशात चोळी ॥**

जरा निर्ढावल्यावर मंग साडी घेऊन देतात आणि शेवटी माडीही बांधून देतात. बाई तर उखळायलाच बसलेली असते.

**घरची अस्तुरी ।फुटक्या खांडाला झाली राजी ॥**
**पराया नार ।रोख रुपये मागे आधी ॥**
**घरची अस्तुरी ।पान देऊन समजली ॥**
**पराय नार ।बाई लाखानं कोमेजली ॥**

अनुक्रमणिका

वासनेची भूक जशी शमत नाही तशी पैशाची हावही संपत नाही. अशा बायका पुरुषाला धुऊन खातात. लुबाडतात. कितीही श्रीमंत माणूस असला तरी वर्षा-दोन वर्षात कंगाल होतो. संसार उध्वस्त होतो आणि घरादाराचा लिलाव करावा लागतो.

**घरची अस्तुरी ।जसा पाण्याचा तलाव ॥**
**पराया नारीसाठी ।केला घराचा लिलाव ॥**

'पराया नारीच्या संगतीनं घर बुडाली कैकाची' हेच उशा पुरुषाचे प्राक्तन असते. पण ते आमच्या मैनाबाईच्या वाट्याला यावे हे तिचे दुदैव. बरे नुसते पैसे जाऊन हे प्रकरण थांबत नाही. असे अनैतिक संबंध धोक्याचे असतात. एक माऊली प्रेमापोटी सल्ला देते.

**पराया नारीची ।जरा जपून कर चोरी ॥**
**तिच्या शेजेवरी ।नको झोपूस बिनघोरी ॥**
**तिचा तरी नवरा शिरावरी ॥**

खेड्यात ज्या मारामाऱ्या आणि खून होतात त्याला असे अनैतिक संबंधच कारणीभूत असतात. अशावेळी तुरुंगातसुध्दा जाण्याची पाळी येते.

**घरची अस्तुरी ।जसा दारुचा सुरूंग ॥**
**पराया नारीसाठी ।यानं भोगला तुरूंग ॥**

राजारामावर एवढी पाळी आली नाही. पण मैनाबाईचा सुखी संसार उद्ध्वस्त झाला हे मात्र खरे.

समाज जीवनाचा अनुभव नसलेल्या सोवळ्या लोकांना हे सारे भयाण आणि अश्लील वाटेल. पण ते समाज जीवनातलं सत्य आणि वास्तव आहे. तेच लोकगीतातून स्त्रियानी मांडले आहे. पराया नारीचा अनुभव म्हणजे शेवाळलेल्या दगडावर पाय ठेवण्याचा प्रकार असतो. तो निसरून पाडणार आणि दुखापत करणार. कडू इंद्रावण अंतरबाह्य कडूच निघणारं. आजच्या एड्सच्या जमान्यात तर हा नाद भारीच वाईट. जीवावर बेतणारा. घरच्या अस्तुरीशी एकनिष्ठ राहा हाच आजच्या युगाचा संदेश आहे. त्याने पुरुषाचे, कुटुंबाचे आणि समाजाचे भले होणार आहे. पण अशा बाहेरख्याली पुरुषाला सांगणार कोण? मराठी स्त्रियांनी लोकगीतातून ह्या मांजराच्या गळ्यात घंटा बांधली आहे. घरच्या अस्तुरीचे गुणगान करीत पराया नारीचा अधिक्षेप केला आहे. वढाळ पुरुषांचे वाभाडे काढले आहे.

❒❒❒

अनुक्रमणिका

## दुबळ्या संसाराची

सुखाचा संसार हा पृथ्वीतलावरचा स्वर्ग आहे. चांगला संसार करणे ही सामान्याच्या दृष्टिने असामान्य गोष्ट असते. 'उत्तम व्यवहारे जोडोनिया धन' असा संसार करावा असे संत तुकाराम महाराज सांगतात. संसाराला काय लागत नाही. पोटासाठी अन्नधान्य, अंग झाकायला वस्त्रे, फाटका तुटका का असेना निवारा, मुलांना शिक्षण, औषधोपचार, सणासुदीचा दैवधर्माचा खर्च, लग्नकार्याचा खर्च अशा नाना गोष्टी संसाराला लागतात. त्या पुन्हापुन्हा कराव्या लागतात. फाटक्या संसारातला माणूस या आणाने वैतागतो. संसार हा काटकसरीने आणि दक्षतेनं करावा लागतो. त्यासाठी पति-पत्नीत सामंजस्य, प्रेम असावे लागते. एकानं कमवायचं आणि दुसऱ्यानं उधळायचं असा संसार होतं नाही म्हणून म्हणतात, संसार रथाची दोन्ही चाक धड असावी लागतात.

खेड्यात मुलगी पाहताना ती संसाराला कशी आहे हे अनुभवी लोक पाहतात. मुलगी कामसू, काटकसरी, व्यवहारदक्ष असेल तर ती संसाराला चांगली असे मानण्यात येते. जी मुलगी आईबापाचा, भावाचा संसार चांगला करते ती स्वतःचा संसार चांगला करेल असे समजले जाते. पण पुरुष कसा संसार करेल हे मात्र फारसे पाहिले जात नाही.

चांगल्या चाललेल्या सुखी संसाराला कधी कधी ग्रहण लागते. संसारात काही संकटे अशी येतात की, त्यातून सावरायला बराच वेळ लागतो. कुणीतरी आजारी पडते, दवाखान्यात दहापंधरा हजार खर्च होतो. दुष्काळ, रोगराई, भूकंप यानं संसार उद्ध्वस्त होतात. दारातलं एखादं जनावर अचानक मरतं. मोठा खड्डा पडतो. भांडण-तंटा होऊन कोर्ट कचेरी होते, मोठा खर्च येतो. कधी एखाद्या व्यवहारात घाटा येतो. हातावर पोट असलेल्या माणसाला अशा धक्क्यातून सावरणं अवघड जातं. अशा संकटाना सामोरे जाता यावे म्हणून माणसं पै-पैसा साठवून काडीकाडीनं संसार करतात.

मैनाबाईचा संसार सुरवातीच्या दहा वर्षात दृष्ट लागावा असा होता. घरदार, शेतीवाडी, मुलबाळं सारं सारं काही चांगलं होतं. पण एका वेगळ्या कारणानं तिचा संसार गोत्यात आला. ग्रामीण भागातल्या स्त्रियांच्या दुःखाला अनेकदा पुरुष जबाबदार असतात. राजारामदादा तिचे कंथ. त्यांना दारू पिण्याचं व्यसन लागलं आणि तिच्या सुखी संसाराला कर्करोग लागला. कर्करोगाने शरीर पोखरावे तसे दारुच्या व्यसनाने तिचा संसार पोखरला. लोकांच्या संगतीनं तिचा नवरा बिघडला. राजारामाला रोज पाचपन्नास रुपयाची दारु लागे. त्यांनी कामधंदा सोडला. शेतीवाडी आतबट्ट्यात आली. मग हळुळळू घरातला पैसाअडका सोनंनाणं, जमीनजुमला, भांडीकुंडी सावकाराच्या घशात गेली. गरीबी आली. रोजच्या भांडणतंट्यानं घरातलं स्वास्थ्य हरवलं.

**तोडला चंदन ।टाकला गराडा ॥**
**पुरुष नाही धड ।झाली नारीचा पवाडा ॥**

एकेकाळी श्रीमंती भोगलेल्या माणसाला आलेली गरीबी फारचं वाईट असते.

**धनसंपदाची नार ।लाडू बुंदीचं लागे कडू ॥**
**गेली संपदा निघुनी ।मग अंबाडी लागे ग्वाडू ॥**

अनुक्रमणिका

अशी अवस्था मैनाबाईचीही झाली. गरीबी मोठी वाईट असते. गरीबाची समाजात पत आणि प्रतिष्ठा नसते. त्यांच्या शब्दाला किंमत नसते. जग हे दिल्याघेतल्याचे असल्याने जवळचे लोक पाठ फिरवतात. खंडीभर गोत असूनही एक नाही कामाचं अशी गत होते. गरीबाला सतरा ठिकाणी तोंड वेंगाडावे लागते. स्वाभिमान विकावा लागतो. पदोपदी लाचारी पत्करावी लागते. शेजीला साधं उसन मागितलं तर ती अपमान करते.

**शेजीच्या घरी गेले ।ती बोलली उशीरानी ॥**
**माझे तू गडयनी ।नाही जायांची दुसऱ्यांनी ॥**

मैनाबाईला आपल्या दुबळ्या संसारामुळे गरीबीचा अनुभव पदोपदी येत होता. ती एकट्यानं संसाराचा गाडा रेटत होती.

**संसाराची नाव ।वडिता वडंना ।**
**पाण्यातील नाव ।वोलवल्या वाचून चालना ॥**

पाण्यातील नावेला दोन्ही बाजूनी वल्हे मारले तरच ती पुढे जाते. एका बाजूने वल्हे मारल्यास ती एकाच जागी फिरत राहाते. तसे मैनाबाईच्या संसाराचे झाले होते. तिच्या कंतानी नुसते बसून खाल्ले असते तरीही रडतखडत संसाराची नाव चालली असती. पण त्यानी तर नावेला भोकच पाडले होते. खेड्यातल्या स्त्रिचे दुःख दारिद्र्याचे तर असतेच पण व्यसनी नवऱ्यामुळे मोडखळीला आलेला संसाराचा गाडा नीट ढकलता येत नाही याचेही असते.

भाऊपण्यानं जोडलेल्या साळूबाईजवळ मात्र ती आपलं अंतःकरण उघडं करी. दुबळ्या संसाराचं गाऱ्हाणं सांगी. साळूबाई तिला आधार देऊन समजूत काढी.

**दुबळ्या कंताचं ।नार सांगते गाऱ्हानं ॥**
**चांद पुनवेचा ।त्याला येटिल गिऱ्यांन॥**

साळूबाई म्हणायची संसारात असे प्रसंग येतात. त्याला धीराने सामोरे जायला हवे. चंद्र सूर्यालासुध्दा गिराण लागते. तिथं तुझं माझं काय?

**दुबळ्या पनाईनं ।नाही कुणाला सोडलं ॥**
**चंद्रसूर्य चातुराला ।त्याला गिऱ्यानं येडयील ॥**

मैनाबाईला हे पटत होतं पण प्रत्यक्ष भोगणं कठीण जात होतं.

अशा संकटाच्या वेळी स्त्रियांना माहेरचा आधार वाटतो. मैनाबाईचं माहेर समर्थ होते. भावानं थोडाफार हातभारही लावला पण 'आईबापाचं राज एवढं लोकाला सांगायला' असतं. एवढा दहा वर्षे संसार केल्यावर आणि आईवडिल गेल्यावर भाऊ भावजय कुणाच्या? त्यांच्या दाराला तरी किती वेळा जायचं. परंपरेतली शिकवण अशी.

अनुक्रमणिका

**दुबळ्या भरताराचं ।हालकं पातळ नेसावं ।**
**आईबाप समरथ ।त्याच्या वसरी नसावं ।**

मैनाबाई मोठी धीराची बाई. तिची जीवनेच्छा मोठी चिवट. तिने मोठ्या धैर्याने आपला दुबळा संसार नेटानं चालविला. मी एक पाहिलंय, दारुड्या नवऱ्यावर बायकांचं प्रेम भारी. मैनाबाईचंही नवऱ्यावर प्रेम होतचं. त्याचं पिणं मर्यादित ठेवण्याचा तिने प्रयत्न केला.

मैनाबाईच्या दुबळ्या संसारात आता आशेचा एकच किरण होता. तो म्हणजे तिची मुलं. मुलं गुणी होती. ती शिकत होती. थोरला बाळकृष्ण आता दहावीला होता. मधली मुलगी सहावीला होती. धाकला तिसरीला होता. परिस्थितीचे भान ठेवून मुलं अभ्यास करीत होती. आईला घरकामात मदत करीत होती. मैनाबाई त्यांना जपत होती. वाढवत होती. लावणीच्या आंब्याची उपमा देऊन ती म्हणते.

**लावणीचा आंबा ।पाणी घालती कौलानं ॥**
**नेणंता बाळ माझा ।आंबा वाढतो डौलानं ॥**
**लावणीचा आंबा ।पाणी घालती वंजळीनं ॥**
**नेणंती साळू माझी ।चाल घेतली जांभळीनं ।**
**लावणीचा आंबा ।पाणी घालते मोगामोगा ॥**
**आंबा येऊ दे मनाजोगा ॥**

तिच्या दुबळ्या संसारात एवढी एकच चांगली गोष्ट होती. आज ना उद्या हेही दिवस जातील, मुलं मोठी होतील, नोकरीला लागतील, आपला पांग फेडतील, नाचार संसार मोडिला येईल अशी तिला आशा होती. नाहीतरी गरीब माणसे आशेवरच जगत असतात. ती म्हणते –

**दुबळ्या संसाराची ।जनलोकाला येते घाण ॥**
**नेणंती बाळ माझी ।हायती सुरुची झाडं लहान ॥**
**दुबळ्या संसाराला ।आले त्याला मी घाया ॥**
**सांगती सये तुला ।चुनगती माझा पाया ॥**
**दुबळ्या संसाराचं ।दिसं निघोनी जात्याल ॥**
**बाळ जोडीला येत्याल ॥**
**दुबळ्या संसाराची ।सालं आल्याती सरत ।**
**सांगती सये तुला ।बाळ झाल्याती करती ॥**

ग्रामीण भागात असे दुबळे नाचारती संसारच फार. सुख सांगावे जनाला दुःख सांगावे मनाला या शिकवणीमुळे जात्यावरच्या ओव्यातून नसलेल्या वैभवाची गीतेच जास्त. तरीही अपवादाने आलेल्या या ओव्यातून दुबळ्या संसाराचे चित्र उभे राहाते.

मैनाबाईच्या संसाराचे पुढे काय झाले.

❒❒❒

# जीवाला जडभारी

प्रत्येक माणूस केव्हा ना केव्हा आजारी पडतो. तापथंडीसारख्या किरकोळ आजाराचं सोडा कारण असे आजार काही न करता चार आठ दिवसात बरे होतात. पण त्यापेक्षा मोठ्या आजारानं माणूस महिना पंधरा दिवस हातंरूणाला खिळून राहिला की, त्याला आरोग्याचे महत्त्व तर कळतेच पण जगण्याच्या अस्तित्वाचे एक नवे भान येते. त्यातून त्याला आपली जीवाभावाची माणसं कोण याचाही साक्षात्कार होतो. असं मोठं आजारपण माणसाला जगण्याचं एक नवं भान देऊन जातं.

हा अनुभव लोकगीतातूनही मांडला आहे. मैनाबाई एकदा आजारी पडली. चांगली आठ पंधरा दिवस हातंरूणाला खिळून होती. जेव्हा तिचा नाईलाज झाला तेव्हा तिने हातंरुण धरले. तापाने तोंड कडवट झाले. जीभेची चव गेली. अन्नावरची वासना उडाली. अशक्तपणा आला. घरगुती उपचार करुन ती दडपून झोपली.

रात्रीच्या विश्रांतीने तिला दुसरे दिवशी थोडे बरे वाटायला लागले. तिने घरातली कामं केली आणि संध्याकाळी किंचीत थंडी वाजून पुन्हा ताप आला. तापात ती उसणू लागली. तुळशीचा काढा, पाण्याची पट्टी असं करुन ती झोपून राहिली.

खेड्यातलं जुन्या काळातलं वातावरण. अज्ञान, अंधश्रध्दा, कुपोषण, अनारोग्य साथीचे रोग फार. सासुरवाशिणीला शिळंपाकं खाण्याची सवय, स्वच्छतेचा अभाव. कामाधंद्याच्या रगाड्यातून स्वःताकडे पाहायला उसंत नसायची. दवाखान्याच्या सुविधा नाहीत. त्यात सासुरवाशीण स्त्रियांकडे पाहणार कोण? त्यामुळे मैनाबाईचं आजारपण वाढत गेलं. काट्याचा नायटा व्हावा तसं झालं.

जीवनात ती अशी कधी आजारी पडली नव्हती. वैद्य-डॉक्टरची पायरी कधी चढली नव्हती. इंजेक्शन, गोळ्या, औषधं तिला माहित नव्हती. त्यात गेल्या चार सहा महिन्यात फार मोठा त्रास झाला होता. शरीर मनाची आबाळ झाली होती. तिच्या कुंकवाचे धनी राजाराम दारुच्या व्यसनात बुडून गेले होते. त्यांना बाहेरख्यालीपणाचा नादही लागला होता. घरचं खायचं आणि दिवसभर गावातून पोळासारखं फिरायचं. संसाराकडे, बायकामुलांकडे त्यांचे अजिबात लक्ष नव्हते. संसाराचा गाडा मैनाबाईलाच ओढावा लागत होता. घरातलं झाडलोट, धुणंपाणी, भांडीकुंडी, सारवणसुरवण, स्वयंपाकपाणी सारंसारं तिलाचं करावं लागत होतं. गोठ्यातल्या जनावराची झाडलोट, वैरणकाडी, धारापाणी तिलाच बघावं लागे. एवढं करुनही तिला दिवसभर शेतात कामाला जावे लागे. सारं अंग आंबून जाई. असं संसारासाठी रात्रदिवस मरुनही तिला समाधान नव्हते. रोज रात्री नवरा दारू पिऊन येऊन भांडण करी. प्रसंगी मारझोड करी. मनाला कोणतंच स्वास्थ नव्हतं. कधीकधी तिला या साऱ्या साऱ्यांचा विट येई. 'प्रारब्ध खोटं जीवाला सुख नाही कुठं' अशीच तिची अवस्था होती. या साऱ्याचा परिणाम म्हणजे तिनं हांतरूण धरलं.

दोन दिवस हलकं पडायचं आणि पुन्हा तापथंडी वाजून यायची. अशा जीवघेण्या आजारात माणसाला आधाराची, सेवा-सुश्रूषेची गरज असते. पण सासरी तिची सेवा करणार कोण? मग तिला आईबापाची आठवण झाली.

**सुखाला भरतार ।दुःखाला बाबाआई ॥**
**आराम वाटं जीवा ।गार उंबराची सावली ॥**

भरताराचं सुख तर राहिलं नव्हतंच पण आईबापाची सावलीही जवळ नव्हती.

**जीवाला जडभारी ।उंबऱ्याला दिलं उसं ॥**
**गवळण माझी बाई ।तुला कळालं नाही कसं ॥**

मैनाबाई आजारी असल्याचे माहेरी कळावे कसे? दळणवळणाच्या सुविधा कमी. येणं-जाणं कमी. पत्र-फोन अशा सुविधांचा तर पत्ताच नव्हता. कुणाकडून तरी सांगावा धाडावा तेव्हा कुठे चार-साहा दिवसाने कळायचे. मैनाबाईनं बाजारच्या माणसाकडून सांगावा धाडला. मैनाबाई जास्त आजारी असल्याचे एकूण माहेरी धक्काच बसला. ते ताबडतोब निघाले.

**जीवाला जडभारी ।सांगा वाड्यावर जाता जाता ॥**
**माऊली बाईनं ।तांब्या ठिवला तोंड धुता ॥**
**गवळी माझ्या नानाजीनं ।घास ठिवला घेता घेता ॥**
**वाणीच्या माझ्या बंधवानं ।चंची ठेवली पान खाता ॥**
**बहिणाई बोलं ।रात होईल गाडी जुंपा ॥**
**सीतामालन बोलयती ।लावा कंदील निघू आता ॥**

अशी माहेरची माणसं बैलगाडी घेऊन रात्रीच भेटायला आली. मागं एकदा असंच झालं होतं. कुणी वैऱ्यानं चाडी केली. आणि माहेरची गाडी रात्रीच आली होती.

**जीवाला जडभारी ।कुण्या वैऱ्यानं केली चाडी ॥**
**वाणीच्या माझ्या बंधवाची ।आली रातऱ्यानं गाडी ॥**

पण त्यावेळी मैनाबाई फारशी आजारी नव्हती. आता ती खरंच आजारी होती. सगळ्याच माता-माऊलींच्या माहेरी बैलगाडी असेल असे नाही. अशी काही बातमी समजली की, खांद्यावर धोतर टाकून भाऊ धावत येतो. अशावेळी त्याला चालताना धोतरही जड होते.

**जीवाला जडभारी ।कसं कळालं रानाईत ॥**
**वाणीच्या माझ्या बंधवाला ।कडू लागलं पानाईत ॥**
**जीवाला जडभारी ।तुला कळलं तालीआड ॥**
**माझ्या बंधवाच्या हाती ।झालं धोतर झालं जड ॥**

अशी माहेरची माणसं बहिणीच्या समाचाराला धावत येतात. मैनाबाईच्या माहेरची माणसं आली. त्यावेळी

अनुक्रमणिका

**जीवाला जडभारी ।आयाबायांनी भरला वाडा ॥**
**गवळन माझी बाई ।आली वाघीन वाट सोडा ॥**
**जीवाला जडभारी ।शेजी उंबऱ्याच्या आत ॥**
**माऊली माझी बाई ।आली हरणी धावा खात ॥**
**जीवाला जडभारी ।शेजी बघत्या सान्यातून ॥**
**बया माझ्या मालनीच्या ।गंगा लोटल्या डोळ्यातून ॥**

अशी माऊली धावत आली. आतड्याची मया माऊलीशिवाय नाही. निरपेक्ष आणि अंतःकरणापासून. माता म्हणजे वात्सल्याचे मूर्तिमंत प्रतीक. माऊलीची तुलना शेजीशी कशी होणार? माऊलीची माया शेजीला कुठली.

**माऊलीची मया ।शेजी सयीला कुठली ॥**
**जशी तुपाची किटली ।पागळून सुटली ॥**

आईची माया लोण्यासारखी मऊ. थोड्याशा दुःखाने वितळणारी. लेकीची अवस्था पाहून आईचे डोळे आसवांनी भरुन आले. तिने कपाळावर हात फिरवला. डोकं मांडीवर घेऊन विचारपूस केली. आईबाप आल्यावर मैनाबाईला आधार आला.

त्यारात्री तिला खरंच जास्त झालं हुतं. तरवणीसुद्धा घोटत नव्हतं. मन हलकं झालेलं. आता यातनं आपण उठत नाही, असं तिला वाटायचं. आईनं हांतरुण-पांघरुण बदललं. अंग पुसून घेतलं. कपडे बदलले. रात्रभर ती उशाशी बसून राहिली. कोणीतरी सांगितलं म्हणून मधून मधून साखरपाणी पाजीत राहिली. माऊलीनं केलेली सेवा अशी –

**जीवाला जडभारी ।शेजी आल्या तशा गेल्या ॥**
**माऊली माझी बाई ।माझी समई सारी रात ॥**
**जीवाला जडभारी ।खडी साखर घोटना ॥**
**सीता माझी मालयन ।माझी उशाची उठना ॥**

अशी माऊलीनं सेवा केली. मैनाबाईचे डोळे उघडत नव्हते. ती म्हणाली –

**जीवाला माझ्या जड ।धरनी लोळती माझं केस**
**माझे तू गवळण बाई ।डोकं घेऊनी मांडी बस ॥**

मग ती मांडीवर डोकं घेऊन बसली. जुन्या काळात सासुरवाशिणीचे केस मोकळे सोडत नसत. केस भुईला लोळले तर सौभाग्यला धोका असतो अशी समजूत होती. जास्त झाल्यावर आईने आग्रह धरला. वैद्याला किंवा डॉक्टरला घेऊन या.

**जीवाला जडभारी ।डोई दुखते राहुनी ॥**
**गवळन बाई बोलं ।आणा वैद्याला जाऊनी ॥**

**जीवाला जडभारी ।शेजी कवल्याला सव्वापार ॥**
**गवळन बाई बोलं ।आणा घरला डाकदर ॥**

मैनाबाईची सासू अडानी आणि श्रद्धाळू. तिचा देवाधर्मावर फार विश्वास. ती म्हणाली –

**जीवाला जडभारी ।त्याला कशाला वैद्यवाणी ॥**
**भांग्या माझ्या देवाचा ।आणा अंगारा तीर्थपाणी ॥**

गावदेव सिध्दनाथाचा अंगारा लावून तिनं नवस केला. 'माझ्या सूनंला बरं वाटू दे. तुला निवद-बोणं करीन. बकरं कोंबडं कापीन.' शेवटी दिरानं डॉक्टरला आणलं. त्यानी तपासलं. दोन इंजेक्शन व औषध दिलं. चार आठ दिवसाचा औषधोपचार केल्यावर मैनाबाईला बरं वाटायला लागलं.

❒❒❒

अनुक्रमणिका

# लक्ष्मी आली घरा

संसारी माणसाला आपल्या घरात सुख समाधान नांदावे असे वाटत असते. दुःखाची बांधवडी असलेल्या संसारात सुखासाठी सारी धडपड चालू असते. ही गोष्ट खरी आहे की, जीवनातील सर्व सुखे पैशाने मिळविता येत नाहीत. पण हीही गोष्ट तितकीच खरी आहे की, भौतिक जगातल्या अनेक गोष्टी पैशाने खरेदी करता येतात. त्यामुळे लोक पैशाच्या पाठीमागे धावत असतात. माणूस जगतो म्हणजे निसर्गाने दिलेल्या पंचइंद्रियांनी तो या जगाचा आस्वाद घेत असतो. ही इंद्रियसुखे पैसा फेकून विकत घेता येतात, हे रोजच्या व्यवहारात आपण पाहतो, अनुभवतो. 'पैसा फेकला की इथे राजाची राणीसुद्धा मिळते' हे या विचाराचे घोषवाक्य आहे.

या जगात धनवंताला सर्वत्र मान्यता असते. श्रीमंताच्या शब्दाला समाजात किंमत व प्रतिष्ठा असते. शहाण्या पण गरीब माणसाला जगात फारशी किंमत नसते. थोडक्यात धनसंपदा ही लौकिक जगात महत्त्वाची असते.

लोकपरंपरेत धनसंपदेला लक्ष्मी असे म्हणतात. लक्ष्मी म्हणजे विष्णुची पत्नी. ती धनलक्ष्मी. ही लक्ष्मी आपल्या घरला यावी म्हणून स्त्रिया लोकगीतातून आळवणी करतात. धनसंपदेचा काही भरवसा नसतो. चौदा चौकड्याच्या लंकापतीचे राज्य जाते. तेव्हा आलेली लक्ष्मी जाऊ नये. ती दीर्घकाळ घरात नांदावी म्हणून स्त्रिया तिची पूजा बांधून तिला भजतात. ज्या घरात माणसं सतत उद्योगात रमलेली असतात. काटकसरीने संसार करतात. सुखासमाधानाने राहातात. तिथेच लक्ष्मी वास करते.

मैनाबाईच्या दुबळ्या, नाचार संसाराची आपणाला कल्पना आहेच. नवऱ्याच्या दारूच्या व्यसनामुळे फार दिवस तिने हालअपेष्टात काढले होते. शंकरपार्वतीलासुद्धा विचार पडला.

**ईश्वर—पारबती ।दोन्ही बसली इचाराला ॥**
**लयंदी झालया नाचाराला ॥**

पार्वतीच्या आग्रहान शंभूमहादेवाच्या कृपेने तिचे नाचारपण मोडीला आले. तिची मुलं कर्तीसवर्ती झाली. वाघासारखी शेतमळ्यात राबू लागली. विशेष म्हणजे राजारामदादानी दारू सोडली. त्याचे असे झाले. गावात एक विठ्ठलबुवा नावाचे महाराज आले. ते विठ्ठलभक्त होते. भजन-कीर्तनाचे आणि हरिनाम सप्ताहाच्या रुपाने त्यांनी साऱ्या गावाचे वातावरण बदलले. बऱ्याच लोकांना त्यानी माळकरी व वारकरी बनविले. राजारामदादांनासुद्धा उपरती झाली. पश्चाताप झाला. त्यांनीही पंढरीच्या विठोबाची माळ घातली. मैनाबाईचे गाऱ्हाणे देवाने ऐकले. माळकरी झाल्यावर राजारामदादा अंतरबाह्य बदलले. वारकरी झाले, देवाधर्माला लागले, घरात सौख्य नांदू लागले. संसाराची काळजी ते करु लागले. शेतमळ्यात कामाधंद्याला लागले. कुणब्याच्या घरची लक्ष्मी ही काळ्या आईतून निर्माण होते.

**दैवाच्या माणसा ।तुझं दैव शेतामंदी ॥**
**चुड्या माझ्या राजसाच्या ।धनरेषा हातामंदी ॥**

राजारामाच्या हातावरली धनरेषा मध्येच तुटली होती. कुणब्याचं दैव शेतात. शेतात मनापासून घाम गाळला तरच हातात धनरेषा उमटते.

**खिलारी जोडीचा ।औत चालतो शेतायात ॥**
**आली लक्ष्मी धावयत ॥**

कष्ट करणाऱ्यालाच लक्ष्मी प्रसन्न होते. राजाराम आणि मुलं शेतात राबत होती. शेतीची मशागत चांगली केली. वेळेवर पाऊस पडला. वापशाने पेरणी झाली. खुरपण केलं. वेळेवर औषध फवारणी केली. खतं दिली. पाणी दिलं तरच शेत पिकतं. त्यासाठी विहिरीला मुबलक पाणी असावे लागते. पाण्याच्या नांदत्या विहिरीतच सुगरण चिमण्या खोपा करतात.

**शिवच्या शेतामंदी ।चिमण्या बायांनी केली कोप ॥**
**तिथं लक्ष्मी घेती झोप ॥**

अशा पाण्याच्या शेतात पीक भरपूर येतं. काळी आई भरभरून देते. बाजारात धारण चांगली आली की शेतकऱ्याचे भाग्य उजाडते.

**लक्ष्मी पिकली ।शेता नि शिवारात ॥**
**सावळा घरधनी ।मोती भरु दे घागरीत ॥**

गोधन हे कुणब्याचे खरे धन. या गोधनामुळे शेतकऱ्याच्या घरी लक्ष्मी येते. खिलारी गायीला सलग खोंड झाली. वर्ष-दोन वर्षे संभाळली तर ती वीस-पंचवीस हजाराला एक याप्रमाणे विकतात. म्हैशीला रेडी झाली. जर्सी गायीला कालवड झाली तर शेतकऱ्याची गरिबी हटते.

**लक्ष्मी आई आली ।आली उठत बसत ॥**
**वाडा गवळ्याचा पुसत ॥**
**लक्ष्मी आली ।गोठ्याच्या मागईन ॥**
**गायी नंदीला लागूईन ॥**

गायी – गुरांच्या पायात लक्ष्मी असते. असे शेतकरी मानतो. शेतकऱ्यापेक्षाही मेंढपाळाला लक्ष्मीचा वरदहस्त अधिक लाभतो.

**लक्ष्मी आई आली ।सोप्या माळीला कंठाळली ॥**
**चुड्या माझ्या राजसाच्या ।मेंढवाड्याला पैसावली ॥**

ज्या घरावर लक्ष्मीची कृपा होते. त्या घराचे भाग्य उजाडते. चारीबाजूंनी पैसा घरात येऊ लागतो.

**लक्ष्मी आई आली ।सोन्याच्या पावलानं ॥**
**चुड्या माझ्या राजसाचं ।जोत चढती डवलानं ॥**

अनुक्रमणिका

**लक्ष्मी आई आली ।आली पांढऱ्या घोड्यावरी ॥**
**रंग शिंपती वाड्यावरी ॥**

लक्ष्मी ही तिन्ही सांजच्या वेळी घरी येते. अशी समजूत आहे त्यामुळे खेड्यात तिन्हीसांजेच्या वेळी घराचे दार लावत नाहीत. अंधार पडायला लागला की दिवे लावतात.

**तिन्ही सांजा झाल्या ।अशी सांजाई फुलयली ॥**
**दारी लक्ष्मी बोलयली ॥**
**आली आली लक्ष्मी आली ।अंधार करुयनी ॥**
**अंजान माझा राघू ।उभा कंदील धरुयनी ॥**

संध्याकाळी एखादी सुवासिनी आली तर तिला लक्ष्मी समजून हळदीकुंकू लावतात. लक्ष्मी ही घरातील कुणाच्या तरी पावलात असते अशीही समजूत आहे. घरात नव्याने आलेल्या बाळराजाच्या ठिकाणीही ती असेल.

**लक्ष्मी आई आली ।दाराला देती थाप ॥**
**माझ्या बाळाची पहिली झोप ॥**

ही लक्ष्मी सुनेच्या पावलाने घरात येते. म्हणून लग्न झाल्यावर उंबऱ्यावरील धान्याचं माप आत लवंडून नवरी घरात प्रवेश करते. घरच्या थोरल्या सूनेचे नावही लक्ष्मी ठेवण्याची जुनी परंपरा आहे. कधी ही लक्ष्मी दारातल्या गायी – म्हैशीच्या रूपातही असते. निर्मळ मनाच्या, उदार अंतःकरणाच्या म्हाताऱ्या आई – आजीच्या रूपातही ही लक्ष्मी असते. तिच्या माघारी घर उदास बनते.

धनसंपदा ही येते आणि जाते याचे भान लोकसंस्कृतीला असल्यामुळे घरात आलेली लक्ष्मी जाऊ नये म्हणून स्त्रिया प्रार्थना करतात. मार्गशिर्ष महिन्यात दर गुरुवारी लक्ष्मीव्रत करतात.

**लक्ष्मी आई आली ।तुका आल्याली जाऊ नको ॥**
**चुड्या माझ्या राजसाचा ।धरला पालव सोडू नको ॥**

आपण दिवाळीला घराघरात लक्ष्मीपूजन करून हीच भावना व्यक्त करीत असतो.

❒❒❒

अनुक्रमणिका

## बंधुला झाला लेक

मुलाचा जन्म ही कुटुंबातील सर्वाधिक आनंददायक घटना असते. त्यामुळे आईबापाला तर आनंद होतोच पण नात्यागोत्यात ही बातमी आनंददायक ठरते.

मैनाबाईच्या एका भावाला बरेच दिवस मुलगा नव्हता. पहिल्यांदा तर मूळबाळच होत नव्हतं. नंतर सलग तीन मुली झाल्या. वंशाला दिवा आणि म्हातारपणाची काठी असावी. भाव-भावजयीने नवससायास, देव देवऋषी व औषधोपचार केले. मुलांसाठी बरेच दिवस प्रयत्न चालू होते.

मैनाबाई माहेरी गेल्यावर तिलाही हे दुःख जाणवे. तिने आपल्याला भाचा व्हावा म्हणून गावदेव सिध्दनाथाला नवस केला.

**माहेरचा देव ।आम्हा बहिणीला कशापायी ॥**
**नवस केलाय भाच्यापायी ॥**

भांग्या सिध्दनाथ तिच्या नवसाला पावला. भावाला मुलगा झाला. दोन दिवसापूर्वी तिला साखर आली. तिला किती म्हणून आनंद झाला. ती भेटेल त्याला सांगत सुटली. तिने गावभर साखर वाटली.

**साखर शेरणी ।घ्या ग बायानू पेला पेला ॥**
**माझ्या बंधुला लेक झाला ॥**
**साखर शेरणी ।घ्या ग बयानू आणिक ॥**
**माझ्या बंधुला झाला ।झाला हिऱ्याला माणिक ॥**

आता मुलगा झाला की पेढे वाटतात. पूर्वी साखर वाटत असत. राजे महाराजांना पुत्र झाला की हत्तीवरून साखर वाटली जात असे. मैनाबाईने भाचा झाला म्हणून साखर वाटली.

बघता बघता आठ – दहा दिवस गेले. भावाच्या मुलाचं बारसं आलं. तिला न्यायला घोडं आलं. बारशाच्या निमित्ताने माहेरी जायला मिळणार.

माहेरच्या माणसांच्या गाठीभेटी होणार हे एक आणि बारशाला मुलाचं नाव ठेवण्याचा मान आत्याचा. तिने रामचंद्र घ्या. कृष्णदेव घ्या असं म्हणून बाळाच्या कानात कुर्र ऽऽ केल्याशिवाय नावचं ठेवलं जात नाही. त्यामुळे सातानवसाने झालेल्या भाचाच्या बारशाला जायचं म्हटल्यावर तिला किती आनंद झाला होता.

**काळी या चंद्रकळा ।नेसती छाई छाई ॥**
**बंधुला झाला लेक ।बारशाला जाती बाई ॥**

बारशाला ती मागेही गेली होती. दोन वर्षापूर्वी तिच्या दुसऱ्या एका भावाला तिसरा मुलगा झाला. त्यावेळी मात्र तिला जमलं नव्हतं. ती बारशाला गेली नव्हती.

अनुक्रमणिका

**बंधुला झाला लेक ।आली साखर माझ्या गावा ।**
**दीर दाजीबा तुम्ही जावा ।रामचंद्र नाव ठिवा ॥**

असं सांगून तिने दिराला पाठवून दिलं होतं. पण आताची गोष्ट वेगळी होती. नवसानं तिच्या लहान भावाला लेक झाला होता. बारशाला गेलंच पाहिजे होतं. आता बारशाला जायचं म्हटल्यावर बाळाला अंगडटोपडं आणि काहीतरी सोन्याचांदीचा दागिना घेतला पाहिजे.

**बंधुला झाला लेक ।आम्हा बहिणीला आलं घोडं ।**
**तुझ्या बिंदल्या माझं तोडं ॥**

असे दागिने घातल्यावर बाळ कसं दिसेल याची कल्पनाही तिने मनात केली.

**बंधुला झाला लेक ।तुझं पंजांन माझं तोडं ॥**
**माझ्या बांधवाचं बाळ ।दिसे मोत्यावानी ग्वाड ॥**

बारशासाठी बाळाला पायात घालायचं चांदीचं तोडं मैनाबाईने सोनाराकडं बसून घडवून घेतलं. उंच खनाळाचं अंगडटोपडं घेतलं आणि ती बारशाला गेली.

बारशाचा थाट मोठा मांडला होता. रेडिओ लावला होता. घरावर लायटिंग केलं होतं. पाळणा फुलानं सजविला होता. घुगऱ्या घातल्या होत्याच. पण गल्लीला जेवण केलं होतं. संध्याकाळी गावातल्या सुवासिनी आल्या. गव्हाचा चौक मांडून बाळंतीणीला बंसवलं. तिची खणानारळानी ओटी भरली. शृंगारलेल्या पाळण्यात बाळाला सुवासिनींनी ‘गोविंद घ्या गोपाळ घ्या’ असं खालीवर घेऊन निजविले. मग मैनाबाईने नावरस नाव तातोबासह पाच नावं घेऊन बाळाच्या कानात कुर्र ऽऽ केलं. सख्यानी तिच्या पाठीत बुक्क्या मारल्या. तिचं तोंड गोड केलं. घुगऱ्या वाटल्या. मग पाळणा म्हटला.

**पहिल्या मासी पैला मासुळा ।**
**गर्भ नारीचा रंग पिवळा ।**
**पिंड घडविती हरी सावळा ॥जू बाळा रे जू ।**
**दुसऱ्या मासी पदर बंद ।**
**हिरव्या चोळीवर काढीला चांद ।**
**मायबापाला झाला आनंद ॥जू बाळा रे जू ॥**

द्रोपदीबाईने रामाचा, कृष्णाचा, शिवाजीचा पाळणा गाईला. घुगऱ्या वाटल्या. जेवणाचा कार्यक्रम झाल्यावर बारसे संपलं. पुढे हा भाचा दिसामासा मोठा झाला. पुढच्या दिवाळसणाला तो रांगायला, बोलायला लागला.

**वळणाचं पाणी ।वळणी साचलं ॥**
**बंधवाचं बाळ ।आत्या म्हणून हसलं ॥**

अनुक्रमणिका

त्याच्या पुढच्या वर्षी

**वळणाचं पाणी ।वळनानी जातं ।**
**माझ्या बंधवाचं बाळ ।आत्या म्हणून मागं येतं ॥**

असं नुकतंच चालायला, बोलायला लागलेलं. बाळ आत्यालाही आवडतं.

**बंधुजी परास ।भाच्या बाळाचं मला याड ॥**
**आंब्यापरास पेरु ग्वाड ॥**
**बंधुजी परास ।भाच्या बाळाची आगत ॥**
**मुदला परिस ।मला व्याजाची लज्ञत ॥**

पुढे हाच भाचा मोठा होतो. भाऊ संसारात गुंतत जातो. बहिणीला आणायला जायला त्याला सवड होत नाही. मग तो पोराला पाठवून देतो. आत्याला न्यायला भाचा मुराळी येतो. बदललेल्या परिस्थितीत भाचा मुराळी आला, दैव माझे मोठं असे म्हणायची तिला पाळी येते.

**बंधुजी असताना ।भाचा मुराळी कशापायी ॥**
**बंधुचं बाळ बोलं ।आत्या तुमचं दैव लयी ॥**

दैव मोठंच म्हणायचं. याच नेणंत्या भाच्या मुराळ्याचा कंता शेजारी पाट मांडून पाहुणचार करावा लागतो. कधी तो माहेरच्या वाटेवर रुसून गाडी सोडून बसतो. त्याला समजावावे लागते. पुढे तोच कधी कधी जावईबापू बनतो. कधी सूनेचा भाऊ म्हणून आत्याच्या घरची वाट चालती ठेवतो.

❒❒❒

अनुक्रमणिका

# बंधू इवाई करू गेले

मैनाबाईचा बाळकृष्ण बघता बघता मोठा झाला. वडिलांच्या दारुच्या व्यसनाने बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे त्याला शाळा सोडावी लागली. खेड्यातल्या असंख्य मुलांच्या वाट्याला येणारे दुर्भाग्य त्याच्याही वाट्याला आले. शाळा सोडल्यावर त्याने गुरे राखली. शेतीवाडीची कामे करण्यात दोन तीन वर्षे घालविली. म्हटले तर खेळण्यात म्हटले तर शिकण्यात, कोळपणी आणि पेरणी अंगपती करायला लागल्यावर तो पट्टीचा शेतकरी झाला. अंगात तारुण्याची रग भरत होती. मारूती मंदिरासमोरच्या गोट्या आणि नाल तो सहजतेने उचलू लागला. धान्याची पोती पाठीवर घेऊन थापीला लावू लागला. कुणाला तरी धुंडाळत असल्यासारखी त्याची नजर भिरभिरायला लागली. गावातल्या गल्लीबोळातल्या त्याच्या चकरा वाढल्या. आईबापावरही तो गुरगुरायला लागला.

मैनाबाईला वाटलं आता पोराचं लगीन करायला हवं. गळ्यात लोडना बांधला की आपोआप सरळ येईल. खेड्यातली गरीब माणसं आशेवर जगत असतात. त्यांची जीवनेच्छा मोठी चिवट असते. जुन्या काळात स्त्रियांना कुटुंबात व समाजात कोणतेच स्थान नव्हते. कुठेचं मान सन्मान मिळत नव्हता. मैनाबाईने तर फारच हाल अपेष्टात दिवस काढले होते. अशावेळी आपल्या लावणीचा आंबा (मुलगा) मोठा होईल. त्याच्या लग्नात कळसात न्हायला मिळेल, बंधूच्या आहेराचं नव लुगंडं नेसून मांडवात वरमाई म्हणून मिरवता येईल. आयाबाया आपल्याला मान देतील. अशा आशेवर बायका जगत होत्या. मैनाबाईला नाही म्हटले तर अशी आशा होतीच.

बाळकृष्णाच्या लग्नाची चर्चा अगोदर गावात सुरु होती. ‘लाडू कवा देताय पोराच्या लग्नाचे? अशी विचारणा होऊ लागली होती. एके दिवशी मैनाबाईने विषय काढला.

‘ऐकलं का?’<br>
‘काय?राजारामदादा<br>
‘मी म्हणते औदा पोराचं लगीन करुन टाकू.’<br>
‘हं’<br>
‘तुम्ही जरा लक्ष घाला.’<br>
‘लग्न करायचं काय तोंडाचं काम हाय का?’<br>
‘मग काय तसंच ठिवता काय?’<br>
‘तसं ठिवून कसं चालंल.’<br>
‘पोराचं तर लगीन करायला हवं.’<br>
‘त्याला बी पाचपन्नास हजार सहज लागत्याल. अन् पोरी तर सांगून आल्या पाहिजेत.’<br>
‘आपण काय जहागीरदार न्हायं लागून गेलो, पोरींच्या बापांची रीघ लागायला.’<br>
‘मग काय आपूनच जायचं काय? माझ्या पोराला पोरगी देता का म्हणून.’<br>
‘तेला काय व्हतंय. आता तसाच काळ आलाय.’

पोराच्या लग्नाच्या विषयाला असे तोंड फुटले. पैहीपाहुण्यांच्या कानावर घातले. एक दोन पोरी ठिकाळल्या. त्यातली एक पसंत पडली न्हाय. एकीचे पाहुणे लागत नव्हते.

जुन्या काळात जवळच्या नात्यात लग्न करण्याची पद्धत फार होती. एक तर पैहीपाहुणे बघायला लागत नव्हते. हाड बाटत नव्हते. वंशशुध्दी राहात होती. माणसे पूर्वपरिचित असल्यामुळे धोका कमी होता. आर्थिक परिस्थिती जवळजवळ सारखीच असल्यामुळे देण्याघेण्यात ओढाताण होत नव्हती. एकमेकांना सावरुन घेतले जात होते. त्यामुळे लोक नात्यात लग्न करणे अधिक पसंत करीत असत. त्यात मुलाच्या आईचा ओढा नेहमी आपल्या माहेरकडे असतो. त्यालाही परिस्थितीच कारण असते. काळाबरोबरच बहीणभावाचं नातं दुरावत जातं. लग्नानंतर वर्षातून दोनदा येणारा भाऊ आता दोन तीन वर्षातून एकदा येतो. भावाला झाल्या लेकी भाऊ-बहिणीला विसरला अशी स्थिती होते. म्हणून हे नातं नव्या रुपात जोडून घ्यावं असं बहिणीला वाटतं. मग बहीणीच्या मुलाला भावाची मुलगी केली जाते. मामाच्या मुलीवर भाचा बायको म्हणून पहिल्यांदा हक्क सांगतो. कधीकधी मुलाला बहिणीची मुलगी केली जाते. भाऊ बहीण व्याही विहीण होण्याचा विचार करतात.

**आंब्याच्या झाडा खाली ।अशी बसली पाखरं ।**
**इनइवाई एका मातची लेकरं ।**

याची बीज पूर्वीच्या लग्नातच रुजवली जात. भावाचं लग्न लागलं. वरात गावातून मिरवून आली की बहीण दार धरते.

**घुम घुम रे मांडवळा ।घुमत रमत ॥**
**नवरा आला उंबऱ्यापाशी ।**
**दार धरलं बहीणीनं ।**
**दिन बहीणीचा मान ॥**
**नवरी जिंकून नेईन ॥**

असं गाणं म्हणते. त्यावेळचा संवाद पाहा.
'अक्का, अक्का, दार का धरलं.'
'माझ्या मुलाला मुलगी दे.'
नवरदेव नव्या नवरीला विचारतो.
'अग, अग, अक्का मुलगी मागते.'
'हुंद्या आम्हाला, द्यायला येईल तुम्हाला.'

लग्न झाल्यावर मुलगी जन्मायच्या अगोदरच बहीण भाऊ व भावजयीकडून असं वचन घेते.

मैनाबाईला याची आठवण झाली. भावाची एक मुलगी मोठी झाली होती. लग्नाला आली होती. माहेरी गेल्यावर बाळकृष्ण तिच्याबरोबर भातुकली खेळायचा. मोठी माणसं गमतीनं हा तुझा नवरा, ही तुझी बायको, म्हणून चिडवायची. बाळकृष्ण मामाच्या घरी पाणी आणायचा.

**मामाच्या घरी ।भाचा राघू आणि पाणी ॥**
**लेक मामाची केली राणी ॥**

अनुक्रमणिका

बाळकृष्णासाठी भावाच्या मुलीला मागणी घालायला काय हरकत आहे? असे मैनाबाईला वाटते.

भावाला ओवाळायचं निमित्त करुन ती दिवाळीला माहेरी गेली. भावाला आनंद झाला. दिवाळी झाली. चोळी बांगडी केली. मैनाबाईनं भाचीला मागणी घातली. भाऊ समर्थ. मुलगी देईल की नाही याची खात्री नव्हती. दुसऱ्या एका भावानं आम्ही विचार करुन सांगतो. असे आश्वासन दिले. पंधरा दिवसांनी होकार आला. मुलगी आणि मुलाचं घरदार पाहाण्याचा प्रश्नच नव्हता. सर्वांना सर्व गोष्टी परिचित होत्या. तेव्हा आता बैठकच बसवायची.

भावजयीचा तोरा नको म्हणून या लग्नाला मैनाबाईच्या दीर भावजयींनी विरोध केला पण

**बंधू ईवाई करु गेले ।नको म्हणत्यात माझं दीर ॥**
**बंधू वरझलं माझं घर ।**

या विचाराने मैनाबाईनी दीराचा विरोध सहन करीत कमी केला. ती ठाम राहिली. ज्याचं याड त्याला ग्वाड. आपण कशाला वाईट व्हा, असा दिरानीही सुज्ञपणे विचार केला. बैठकीचा दिवस ठरला. बैठक मुलीकडे होती. दिरालाही तिने बरोबर घेतले.

**बंधू इवाई करु गेले ।दीर दाजिबा संग चला ॥**
**सोयऱ्या बंधूजी भीड मला ॥**

भाव-भावकीतली बरीच माणसं निघाली. मैनाबाईला वाटलं एवढी माणसं कशाला?

**बंधू इवाई करु गेले ।याला कशाला चारचौघं ॥**
**माता सांगील ऐकू दोघं ।**

पण नको कुणाला म्हणायचं म्हणून ती सर्वांना घेऊन लग्नाच्या बैठकीला माहेरी आली. खरे तर लग्न ठरविण्यात पुरुषांचा पुढाकार असतो. पण अशा लग्नात बहीणीला फार महत्त्व असते. निर्णय तिच्याकडूनच होतो.

पाहुणे स्थिरावल्यावर चहापाणी झाले.

**नणंदा, भावजया ।बोलत्यात कोनात ॥**
**इनीइनी हुयाचं मनात ।**

मैनाबाईला वाटलं.

**बंधू इवाई करु गेले ।माझ्या परास गंभीर ॥**
**हाताला आला माझ्या ।उंच झाडाचा हंजीर ॥**

अनुक्रमणिका

बैठक सुरु झाली. मैनाबाईने सांगितले विहीणबाई तुम्हाला मागत नाही काही. माझं मागणं थोडं थोडं. नवऱ्या मुलाला कंठी, कडं. कंठी कड्याची झाली कुशी, नवऱ्या मुलीला टीका ठुशी, टिका ठुशीचं लेण फार, नवरीला चंद्रहार, चंद्रहाराचा मोती खोटा, नवऱ्याला बसायला हत्ती मोठा. असं मागणं केलं.

**बंधू इवाई करु गेले ।इन बोलते नागर ॥**
**मागे पैशाची घागर ॥**

असं झाल्यावर लग्न कसं ठरायचं. त्यात भावानं एक शाळा केली होती. त्याने बायकोला पुढं करुन गुडग्यानं रांगायला सांगितलं होतं. आपण गप्प होता. भाऊ आपला असला तरी भावजय वाणीन परक्याची. ती कशालाच कबूल होईना. मुलगी अन् नारळ देऊ म्हणाली.

**बंधू इवाई करु गेले ।भावजय वाणीन तीनताड ॥**
**माझ्या बंधवाला ।मी बोलविते सोप्याआड ॥**

सोप्याआड घेऊन मैनाबाईने भावाला समजावून सांगितले. एवढं द्या आम्ही लग्न करतो. नाहीतर दोन तोळं सोनं घालून लग्न करून द्या. भाऊ गप्प. तो बायकोचा सल्ला घेई. भावजय काहीच मान्य करायला तयार होईना तेव्हा भाऊ म्हणाला.

**बंधू इवाई करु गेले ।भावजय वाणीनं बोलना ॥**
**बंधूजी बोलत्यात ।बहीणी इलाज चालना ॥**

भाऊ बायकोच्या ऐकण्यात. लग्न कसं ठरणार? लग्न ठरवायचं तर मनात होतं. पण देण्याघेण्याचा घोळ दिवसभर मिटत नव्हता. शेवटी मातेवर निर्णय सोपवायचा ठरला. म्हातारी जुनी. मोठ्या हातानं संसार केलेली. माणसात वावरलेली. तिला ऐकायला कमी येत होतं. कुणीतरी तिला समजावून सांगितलं. तिनं निर्णय दिला. 'पोरीच्या अंगावर तोळाभर सोनं घालून कन्यादान करुन द्यावं.' सर्वांना पटलं. दोन्ही अंगानी भावानी लग्न करायचं ठरलं.

**बंधू इवाई करु गेले ।दिराभावाचं मोडूयानी ॥**
**आली माहेर जोडूयानी ॥**

लेकीसाठी बंधू वाड्याला येईल म्हणून मैनाबाईने बंधु इवाई केला. भाऊ बहीण व्याही-विहीण झाली. नवं डोरलं केलं तरी जुना साज उपयोगी आला.

❒❒❒

अनुक्रमणिका

## अहेव मेली नार

वृद्धापकाळ आणि मरण ह्या मानवी जीवनातील नैसर्गिक गोष्टी. उगवलेला सूर्य मावळणार. वसंतातील झाडावरची नवी पालवी ग्रीष्मांत पिकून गळून पडणार. उदय-अस्त, जन्म-मरण ह्या अटळ गोष्टी. मरणाचे गूढ माणसाला उकललेले नाही. त्यावर अनेक तत्त्ववेत्त्यांनी, संतमहंतांनी व साहित्यिक कलावंतांनी चिंतन केले आहे. निसर्गनियमाने येणारे मरण भोळ्याभाबड्या मराठी स्त्रियांनी कसे स्वीकारले आहे हे लोकगीतातून पाहण्यासारखे आहे.

संसाराच्या रामरगाड्यातून दिवस कसे गेले समजलेच नाही. मैनाबाईचे आयुष्य उतरणीला लागले. लेकीबाळी नांदायला गेल्या. आपआपल्या संसारात रमल्या. मुलं करतीसवरती झाली. त्यांचीही लग्नयाव झाली. सूना आल्या. नातवंडं झाली. आजी आजी म्हणून मैनाबाईच्या अंगाखांद्यावर खेळू लागली. संसारवेल मांडवाला गेली. राजारामदादाही थकले. त्यांचे वय झाले. कामधंदा होईना. ते वारकरी झाल्याने भजन-कीर्तनात रमू लागले. घरचा कारभार लेका-सूनांच्या हाती गेला. आणि म्हातारा-म्हातारी स्वतःच्या घरात हळूहळू निकामी ठरत गेली. साध्यासाध्या गोष्टीसाठी दहा-बारा रुपये लेकाकडं मागावे लागत. मैनाबाई भरल्या हातानं संसार केलेली बाई तिला हे अवघड वाटे.

**भरताराचं राज ।जसा काचेचा बंगला ॥**
**लेकाच्या राज्यामंधी ।वारा अंधूक लागला ॥**
**भरताराचं राज ।लुटीलं सवण्यावाटं ।**
**ह्यांची फिर्याद नाही कुटं ॥**
**भरताराचं राज ।ओटीतला मेवा ॥**
**पोटीच्या बाळा तुला ।हिशेब किती द्यावा ॥**
**भरताराचं राज ।वटीच्या खारखा ॥**
**पोटीच्या बाळाचा ।कायदा शिपाया सारखा ॥**

भरताराच्या राज्यात घरातला कारभारं स्त्रियांच्या हाती असतो. त्यांना देण्याघेण्याचं, करण्यासवरण्याचे, पैसे खर्चण्याचे किमान स्वातंत्र्य असते. पण लेकाच्या राज्यात सारा कारभार सुनांच्या हाती जातो. भरतार आणि लेक यांच्या काळात स्त्री परतंत्रच पण दोघांच्या काळातला फरक या ओव्यातून आला आहे.

**तरवाडाची फुलं ।सोन्यापरास चातूर ॥**
**भरताराची सर ।नाही करत पुतर ॥**

वय झालं. शरीर थकलं. नव्याने आता काही करण्याची उमेद राहिली नाही. डोळ्यांला कमी दिसायला लागले. मन पापुद्र्यासारखं हलकं झालेलं. आता आपले फार दिवस राहिले नाहीत. याची जाणीव मैनाबाईला झाली.

पिकलं पान, एकदिवसी गळून पडणारं ।

अनुक्रमणिका

**आकाशी वावडी ।वारं तवर तिचा भर ॥**
**पडली धरणीवर ।झाला कांबीचा चक्काचूर ॥**

शरीरात चैतन्य आहे, तोवर त्याचा दिमाख. हे चैतन्य म्हणजे वार गेलं की सारं संपलं.

स्त्रियांची जीवनेच्छा चिवट. संसारातून मन निघत नाही. पण शरीर थकलेलं. आता मैनाबाईची एकच इच्छा होती. हातपाय चालत्यात तोवर अहेवपणे मरण यावं. भरल्या कुंकवानं जावं.

**पाणी यायच्या आधी ।बाई वळाण बांधावं ।**
**भरताराच्या आधी ।बये मराण मागावं ॥**

शेतीतील उपमा आहे ही. पाणी फुटून वाटोळं होण्याआधी वळानं बांधावं. तसं वैधव्याचं भयाण जीवन वाट्याला येण्याअगोदरच सौभाग्यानं मरण यावं, अशी भारतीय स्त्रियांची इच्छा असते. कपाळी सौभाग्य लेणं, गळ्यात मंगळसूत्र, हातात चुडा आणि पायात जोडवी असताना हिरव्या पाताळात जावं. असं मरण भाग्याच्या नारीला येतं. ती स्वर्गाची सुवासीन होते. तिथल्या बागेत फुले तोडते. मैनाबाई सांगते, अहेव मरणाची चाल आमच्या घराण्यात आहे.

**अहेव मरणाची ।आहे माझ्या माहेराची चाल।**
**बया माझ्या गवळनीनं ।इंद्रसभेला दिलं पाल ॥**

मैनाबाई अशीच अहेवपणी आईला भेटायला जाणार. अहेवपणे मरण यावं असं भारतीय स्त्रियांना का वाटत होतं. खरं तर नवऱ्यापेक्षा तिचं वय चारसहा वर्षांनी लहान. लग्नाचेवेळी घेतलेली दक्षता. पण नवऱ्याआधी आपण जावं असं स्त्रियांना का वाटत होतं? याला कारण भारतीय समाजातील विधवांची दयनीय अवस्था. पतीशिवाय स्त्रिला माणूस म्हणून स्वतंत्र अस्तित्वच नाही. पती म्हणजे तिचे जीवन सर्वस्व. तो गेला की तिच्या जीवनाचा उन्हाळा झालाच. पती गेला की तिच्या दुःखाला पारावारच नाही. तिला जबरदस्तीने सती जायला लावत. उच्चवर्णीयात केशवपन करून विद्रूप करीत. तरूणपणी वैधव्य आले तर भावनिक कोंडमारा करीत. उभे आयुष्य जाळावे लागे. चुकून पाय घसरला तर भ्रूणहत्या, नाहीतर आत्महत्या. विधवा म्हणजे पांढऱ्या कपाळाची. तिचं तोंड पाहणेसुद्धा अशुभ. कोणत्याही समारंभात तिला स्थान नाही. दिराच्या किंवा भावांच्या घरात तिला पोतेऱ्यासारखे जीवन वाट्याला येई. दिवाभितीसारखं अंधाऱ्या माजघरात उभे आयुष्य तिने मौलकरणीसारखे राबावे. असं दारूण जीवन म्हणजे तीळ तीळ मरणचं. त्यापेक्षा मरण बरे. भारतीय समाजातील अशा वास्तवामुळे स्त्रियांना अहेवपणी मरण यावे असे वाटत होते.

मरण कसं यावं.

**अहेव मेली नार ।चोळी लुगडं दांडीवरी ॥**
**शिर कंताच्या मांडीवरी ॥**
**माझ्या निधनाच्या येंळं ।माझ्या मुखाला आला राम ॥**
**न्यायाला मला ।आलं यमाचं इमान ॥**

अनुक्रमणिका

**अहेव मरणाची ।मला लई आवड ॥**
**म्होरं पतीपुत्र ।मागे कुंकवाची कावड ॥**

असं मरण यावं अशी मैनाबाईची इच्छा. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या पद्धतीने मैनाबाईने पाहिलेलं आणि गीतातून गायिलेलं मरण पाहा.

**अहेव मेली नार ।कुडी दिसते भेसूर ॥**
**चुड्या तिच्या राजसाला ।कुठं लागला उशीर ॥**

ज्या शरीराला पंचपक्वाने खायला घातली, वस्त्र अलंकारांनी सजविले असे शरीर प्राण गेल्यावर प्रेत होते. भेसूर दिसायला लागले. रडारड सुरु झाली. माणसे गोळा झाली. नातेवाईक येणार होते म्हणून राजारामदादा बेलाची पानं आणायला गेले. त्यामुळे थोडा उशीर झाला. येताना त्यांनी हिरवी साडी आणली.

**अहेव मेली नार ।त्याचा बोभाटा कुणी केला ॥**
**हाती पातळाची घडी ।कंथ चावडीवरून गेला ॥**

शंभर गोतात चुडाच शेवट लावणार. शेवटचं हिरवं पातळ त्यांनी आणलं. आणि आपण गेल्याचं गावभर बोभाटा झाला. जोडा फुटला. आयुष्यभर सुख-दुःखात जिनं जन्माची साथ केली ती जोडीदारीण अगोदर गेल्यानं राजारामदादाच्या दुःखाला पारावार राहिला नाही.

**अहेव मरण ।कंत रडे खळखळा ॥**
**लग्नाचा जोडा ।नाही मिळत येळोयेळा ॥**

खरंच होतं. लग्नाचा जोडा फुटला.जगण्यातला राम संपला. एकाएका आठवणीने हृदयाचा बांध फुटला. हुंदके दाटून आले. डोळ्याच्या आभाळधारा लागल्या.

मैनाबाईला भिंतीला टेकून बसविले. शेजारी-पाजारी आले. भाऊपण्यानं जोडलेल्या आयाबाया आल्या. गहिवर घालून रडणं चालूच होतं. पुरुषमाणसं दुचीत होऊन बसली होती. काही पुढची तयारी करीत होती. बंधुजी आलं. भावजय वाणीन आली. चुलते मालते आले. व्याहीविहीन आली. कवळ्या अंतःकरणाची लेक आली. तिनं ऊर बडवून गहिवर घातला. आता सारा गोतावळा जमा झाला. माणसं तयारीला लागली. ताटी बांधली. पाणी घांतलं. नवं लुगडं नेसवलं. कुंकू लावलं. ताटीवर घातले. गुलाल टाकला. रडारड वाढली. खांदकरी तयार झाले. ताटी निघाली.

**अहेव मरणाची ।वाटे नारीला मऊज ॥**
**पुढे चाले कंत ।मागे गोताची फौज ॥**
**अहेव मरण ।भाग्याचे नारी तुला ॥**
**झेंडूची फुलं ।कंत उधळीत गेला ॥**

अनुक्रमणिका

ताटी निघाली. म्होरं शेजचा दिवाण मागं गोताचं रिवान ।

दिरा-भावांनी दिलेला खांदा. ताटी बाजारापेठेतून गेली. गर्दी गुलालाची झाली.

**अहेव मेली नार ।हळदीकुंकवाचा झाला सडा ।**
**अहेव नारीचा गेला गाडा ॥**

मैनाबाईचा लोकसंग्रह मोठा. बरीच माणसं जमलेली. कंतानं ओल्या पडद्यानं शिंकाळी धरलेली. मागे बंधूजी चाललेले.

**अहेव मेली नार ।हाय पानाड्या माझा मला ।**
**बंधूजी मौजेनं संग चला ॥**

विसावा घेऊन ताटी स्मशानात गेली. लाकडं तयार होती. सराण रचलं.

**अहेव मेली नार ।तिचं पिवळं सराण ।**
**भरताराच्या आधी ।डाव जितला नारीनं ॥**

कंतानं पाणी पाजलं. आपल्या हातानं अग्नी दिला.

**अहेव मेली नार ।सराण जळतं वड्याला ॥**
**सर्व्या गोतामंदी ।अवघड वाटतं चुड्याला ॥**

अंतःकरणाची माणसं तीन. कंत, माऊली आणि लेक. सर्वाधिक दुःख त्यानाचं झाले होते.

**अहेव मेली नार ।सराण जळत सावलीला ॥**
**सर्व्या गोतामंदी ।अवघड वाटतं माऊलीला ॥**

पण मैनाबाईची आई तर अगोदरच गेली होती. ही उणीव लेकीने भरून काढली. अग्निज्वाला भडकू लागल्या. आकाशात धूर स्वर्गाला गेला.

**नदीच्या काटाला ।जळे सराण सोन्यावाणी ॥**
**भरतार बाई तिचा ।आसू टाकतो मोरावाणी ॥**

मस्तक फुटलं. माणसं माघारी निघाली. आयाबाया बोलायला लागल्या. बरं झालं. भरल्या कपाळानं सोमवारी गेली. सोनं झालं.

**अहेव मेली नार ।आमुच्या वारगीची ।**
**झाली बाई माझी ।सवासिन स्वरगीची ।**

अनुक्रमणिका

यासाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा. मैनाबाईच्या अनुभवांची, संसाराची, जीवनाची ही लोकगीतातून उलगडलेली कथा. तिच्यात तिच्या भावभावना, सुख-दुःख, व्यथावेदना सहजतेने, वास्तव पण तितक्याच भावरम्य पद्धतीने प्रगट झालेल्या आहेत. तिच्या हृदयाचे हे गीतात्मक बोल जात्यावर गायिलेले. ही जशी मैनाबाईची लोकगीतात्मक कथा तशीच तिच्यासारख्या असंख्य जणींची एक प्रातिनिधिक जीवनकथा.

जगणं जसं सारखं तसं मरणही. म्हणून इतर बायकांनी इच्छा प्रगट केली.

**अहेव मेली नार ।तिच्या करंडी कुंकू ल्यांव ॥**
**तिच्यासारखं मला यावं ॥**

❒❒❒

अनुक्रमणिका

# कामामंदी काम

मराठमोळ्या स्त्रीजीवनाची लोकगीतातून उलगडलेली ही प्रातिनिधिक जीवनगाथा. जात्याच्या साक्षीने गायलेली त्या दळणाविषयी या लेखात थोडेसे.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन अत्यंत कष्टाचे. घरातील आणि रानातील पडेल ती कामे तिलाच करावी लागतात. स्वयंपाक तर तिच्या पाचवीला पूजलेला. पूर्वी पिठाच्या गिरण्या नव्हत्या. स्वयंपाकाच्या अगोदर स्त्रियांना जात्यावर दळावे लागे. मराठी माणसाच्या खाण्यात धान्याच्या पिठापासून तयार केलेली भाकरी-पोळी मुख्य असल्याने स्त्रियांना दळावे लागत होते. दळण हे नित्याचे आणि कष्टाचे काम होते. भल्या पहाटेच्या वेळी स्त्रिया दळण घालीत. पहिला कोंबडा आरवला की स्त्रियांना उठावे लागे. सासुरवाशिणीला पहाटेच्या साखरझोपेचे सुख मिळतच नाही. उलट दळणासारख्या कष्टाच्या कंटाळवाण्या कामाला जुंपून घ्यावे लागते. एक सासुरवाशीण म्हणते,

**सासुरवासिनीला ।कोंबडा वैयरी ॥**
**पहाटेच्या पाऱ्यामंदी ।बांग देती दुहेरी ॥**

पहाटेच्या रामपाऱ्यात थोड्या थोड्या अंतराने कोंबडा आरवतो. त्यातही दुहेरी बांग देतो. ‘कोंबड्याने दिली बांग गोकुळाला आली जाग’ असा नागर माणसाला रम्य वाटणारा कोंबडा ग्रामीण स्त्रियांना वैरीच वाटत होता.

पहाटेची रम्य वेळ. शुक्राची चांदणी उगवलेली. कधी फिकट चांदणे, तर कधी गडद अंधार. पहाटवारा सुटलेला. प्रसन्न वातावरण. मुलंबाळं, वडिलधारी माणसं साखरझोपेत. घरधनी गोठ्यातलं शेणघाण काढून दिस उगवायला, शेतामळ्यात जाण्याच्या तयारीत. अशावेळी स्त्रियांना जात्यावर दळायला बसावे लागे. पूर्वीची मोठी एकत्र कुटुंबे, घरात माणसं जास्त, थोरली जाती, दळणही भरपूर लागे. जाऊबाई साथीला.

दळणाबद्दल आज दुरुन डोंगर साजरे अशा रम्य कल्पना आहेत. पण प्रत्यक्ष दळलेल्या स्त्रियांना विचारले तर –

**कामामंदी काम ।दळाण अवघड ॥**
**गीताच्या तालामंदी ।सईनं वडला दगड ॥**

सर्व कामात दळण अवघड. कष्टाचे आणि कंटाळवाणे. नित्य करावे लागणारे. त्याला पर्याय नव्हता. संसारासाठी केलेली ती तपश्चर्याच होती. पूर्वीच्या स्त्रिया ते आव्हान म्हणून स्वीकारत. आपण काही मेल्या आईचे दूध प्यालेलो नाही. अंगात धमक आहे. कुळवंताच्या लेकीला कामाचा सराव आहे. म्हणून त्या दळण दळीत. दळणाचे काम किती कष्टाचे.

**दळण दळताना ।मला घामाने केलं येडं ॥**
**माऊली बाईनं ।मला घुटीत दिलं येलदोडं ॥**

अनुक्रमणिका

**दळण दळताना ।डाव्या दंडात माझ्या कळ ॥**
**मावल्या बाईनं ।दिलं घुटीत जायफळ ॥**
**दळण दळताना ।माझी हालना मांडी ॥**
**बयाचं दूध पिली ।अंग पोलादाची कांडी ॥**
**जात्या तू ईश्वरा ।नको मला तू जड जाऊ ॥**
**गवळण बाईच्या दुधाचा ।मला येऊ दे अनूभव ॥**

या ओवीतील पहिल्या चरणात दळण दळताना घाम आला. चोळी भिजून पदर ओला झाला. जातं ओढून दंडात व बोटात कळ आली. बसून मांडीला कड आला. असे जिवाआगुज कष्ट झाले. पण अशा कामातही आपण माघार घेणार नाही. आपण आईचे दूध प्यालो आहे. घुटीत वेलदोडे, जायफळ खाल्ले आहे. त्यामुळे आपले शरीर पोलादाच्या कांडीसारखे आहे. असा ती आपल्या शरीर सामर्थ्याचा अभिमान बाळगते. पूर्वी दळणावरुन स्त्रियांच्या सामर्थ्यांची व कष्टाची पारख केली जात असे. दळण कष्टाचे काम स्त्रियांना सामर्थ्य पणाला लावून करावे लागे.

असे कष्टाचं काम सांगणाऱ्या सासुबाईचा पोरसवदा सासुरवाशिणीने गाण्यातून उद्धार केला आहे.

**पहिली माझी ओवी ।जात्याच्या फेराला ॥**
**आत्याबाई गेली ।पहिल्या पुराला ॥**
**दुसरी माझी ओवी ।आत्या त्या मालणीला ॥**
**थडगं बांधावं पलाणीला ॥**

मायेचा शब्द न बोलता दळायला सांगणारी. काम केलं तर कौतुक न करता केलंसुद्धा न म्हणणाऱ्या सासुबाईविषयी हा वैतागही आपण समजून घेतला पाहिजे.

पूर्वीची कुटुंबं मोठी. घरात माणसं जास्त. मोठी जाती. माळी सोप्याच्या तोलाची. गुंड्या घागरी गोलाची. ती एकटीला वडत नसत. खुंट्याला भिंगरी घालून वडावी लागत. पण बहुदा दोघीच दळण दळीत असत.

**दळण दळताना ।मला वडना एकलीला ॥**
**संगं घेती मी धाकलीला ॥**
**थोरल्या जात्याचा ।वेडा येतोय बैगीबेगी ॥**
**दळण दळताना ।माझी सवंगड मनाजोगी ॥**

दळताना सवंगड शिणंची, मनाजोगी अनुभवी, मनगट तोलून देणारी, बोलून न घेणारी, गीताला साथ देणारी हवी. अशी बहुदा धाकली जाऊच असे.

जीवनाला जे उपयुक्त त्याला देव मानण्याची लोकमानसाची प्रवृत्ती असते. जाते म्हणजे ईश्वर. नव्या जात्याची पूजा केली जाते. जात्यावर बसू नये. उशे-पाय ठेऊन झोपू नये. पिठाची शीग मोडू नये. दळण सरल्यावर सुपात लक्ष्मी ठेवावी. पाया पडून उठावे असे काही दळणाविषयी संकेत आहेत.

अनुक्रमणिका

जाते कमी जास्त वेगाने ओढले तर पीठ बारीक मोठे होते. बारीक पिठाच्या भाकरी जास्त होतात.

**बारीक पिठाची ।एकीची होती दिड ॥**
**माझ्या गवळण बाईनं ।मला शिकवली मोडं ॥**
**बारीक दळ नारी ।पिठात पाणी माया ॥**
**हावशा बंधू माझा ।आला सोयरा रीत पाहाया ॥**

भाऊ पीठ बघत नाही पण त्याला भाकरीवरुन पीठ आणि रीतही कळते. म्हणून मुलीला बालपणापासून रीत शिकवली जाते.

**नको तू दळू लागू ।मला उलीसा हात लावू ॥**
**लाडके साळूबाई ।तुझ्या मयाचा अंत पाहू ॥**

आईला मदत करण्यात लेकीची मया पाहिली जाते.

दळणाचं काम आत्यंतिक कष्टाचं आणि कंटाळवाणे. ते कष्ट कमी करण्यासाठी ओव्या म्हटल्या जातात. जीवनातील सुखदुःखातल्या गाण्यात मन रमल्याने कष्ट हलके होतात. जात्याच्या घराघरीतून निर्माण होणारा स्वर, लय, ताल तिला प्रेरणा देतो. मग ती सुचेल तसे आपल्या जीवनाचे गाणे गाते. दुःख भरल्या कष्टदायक जीवनात सासुरवाशिणीला आठवते ते आपले माहेर, आई – बाप, बहिण-भाऊ, गडयणी, बालपण, संसारातील सुखदुःखे, देवधर्म, त्याची गाणी आपण पाहिली आहेत. आपलं सगळं जगणंच ती गाण्यातून अभिव्यक्त करते. ओव्यातून हुरद उकलते. तिचं गाणं पोटातून ओठात येतं.

बहिणाबाई चौधरींनी म्हटले आहे –

**अरे घरोटा घरोटा**
**तुझ्यातून पडे पीठी**
**तसं तसं माझं गाणं**
**पोटातून येतं ओठी**

मग जात्यालाच ती आपलं सुखदुःख सांगू लागते.

**जात्या तू ईश्वरा ।कुण्या डोंगराचा तू ऋषी ॥**
**बया मालणीसारखं ।हुरदं उकलंल तुझ्यापाशी ॥**

एरवी आपलं सुखदःख सासरी तिला कुणाजवळ व्यक्त करता येत नाही. मग ती ओवीत शब्दबद्ध करून गाते. त्यामुळे दळणाचे कष्ट तर ती विसरतेच पण सासरचं दुःखही विसरते. आत्मविष्काराने मनही हलके होते. यालाच भावनांचे विरेचन म्हणतात. दळणाचे काम कष्टाचे असल्याने श्रमपरिहार्थ जात्यावरच्या ओव्या निर्माण झाल्या आहेत.

❒❒❒

अनुक्रमणिका

# बारीक माझा गळा

मराठमोळ्या पारंपरिक स्त्रीजीवनाची ही प्रातिनिधिक गीत-कथा. मैनाबाईने जात्यावर व इतर प्रसंगातून गायिली होती. स्त्रीगीतातून स्त्रीजीवनाचा सगळा आशय गाईला जातो. गीताचा आशय तर महत्त्वाचा असतोच पण त्याचा गेयरूप आविष्कार महत्त्वाचा असतो.

पारंपरिक स्त्रीच्या जगण्यात एक लय आणि गेयता होती. बारशाचा पाळणा बाळगाणी, झिमा-फुगडीची खेळगाणी, नागपंचमी व गौरीच्या फेराची गाणी, लग्न न्हानूली, सण-समारंभ, यात्रा उत्सव, याप्रसंगी म्हटली जाणारी सर्व गाणी व मयती नंतरचे रडणे या सर्व प्रसंगातून स्त्रिया गातच जीवन जगत होत्या. जीवन दुःखमय व कष्टाचं होतं पण गाणं जगण्याला वेढून गेलं होतं. स्त्रियांच्या भावविष्काराला वाट मिळत होती. यंत्रयुगा नंतर जीवन कोरडं बनत चाललं. जगण्याची लय आणि गेयता हरवली आणि गाणं लोपलं. स्त्रीजीवन रुक्ष झालं. मनोरंजनाची नवी साधने निर्माण झाली. पण त्यातून लोकमानसाच्या आविष्काराला संधी मिळाली नाही. त्यातून केवळ बघे निर्माण झाले.

पूर्वी प्रत्येक स्त्रीला दळावे लागे तसे गावे ही लागे. स्त्रियांचा गळा चांगला असतो. परंपरेने तिला गायनाचे शिक्षणही मिळत असे. त्यामुळे प्रत्येक स्त्री गानकोकीळाच होती. जात्यावर बसले की गाणं सूचे. मुक्याने दळणे वाईटच मानले जाई.

**मुक्यानं दळण ।गिरजा नारीला हुईना ॥**
**माता चांगुनाच्या घरी ।ऋषी भोजन करीना ॥**

मुक्यानं दळण होतच नसे. जसं आणि जितकं येईल तितकं स्त्रिया गात असत. एखादी मुक्यानं दळत असेल तर म्हटले जाई.

**मुक्यानं दळण ।तुला कसं होतं ग नारी ॥**
**भाऊ-भाचीयाचं दल ।तुझ्या उतरलं दारी ॥**

भाऊ-भाचा आल्यावर तर सोडाच पण एरवी ही भरल्या घरात ती मुक्याने दळत नसे.

ही गीते संकलन करताना माता भगिनीला गाणी मागितली की त्या चालीवर गाऊनच दाखवित. नुसती सांगा, लिहून घेतो म्हटलं तर त्यानां अवघडल्या सारखे होई. गीतं नीट आठवतही नसतं. म्हणजे लोकगीत ही त्यानी गायनातूनच स्वीकारली होती आणि तशाच त्या गात होत्या.

ही गाणी स्त्रियांच्या जगण्याची, सुख-दुःखाची असल्यामुळे त्याविषयी त्याना आत्मियता होती. त्या श्रमपरिहारार्थ, स्वतः साठी स्वान्तसुखाय गात होत्या पण आपण कवी असल्याचे त्यांना भान नव्हते. तसे त्या गायिका होत्या पण आपले गाणे कलात्मक व परिणामकारक करावे असे रूढ कलावंताचे भान ही त्यांना नव्हते. आज ही जात्यावर ओव्या गाणाऱ्या स्त्रियांना आपण गायक – कलावंत आहोत ह्याचे भान असत नाही. त्या आत्मविस्मृतीतून गात होत्या. म्हणजे या स्त्रिया अन्कॉन्सेस आर्टिस्ट (अजानता कलावंत) होत्या व आहेत. गायनाविषयी त्यामुळे ओव्या कमीच मिळतात.

अनुक्रमणिका

मैनाबाई . . . आमच्या पंचक्रोशितील प्रसिद्ध स्त्री होती. नागपंचमी, गौरी, लग्नकार्यात गाणी म्हणावी ती तीनेचं. तिचा गळा चांगला होता. गायनामुळे स्त्रिया तिला मान देत. कौतुक करीत त्यामुळे तिला आपल्या गाण्याविषयी थोडेसे भान आले होते. ती म्हणते..

**बारीक माझा गळा ।वाऱ्यानं ऐकू गेला ॥**
**घोडा मैदानी उभा केला ॥**
**बारीक माझा गळा ।वाऱ्यानं ऐकू गेला ॥**
**हौशामाझ्या बंधवानं ।चालू रेडीओ बंद केला ॥**
**बारीक माझा गळा ।कसा वाऱ्यानं झुळकला ॥**
**हौशा माझ्या बंधवानं ।गीताच्या चालीनं वळखला ॥**

मैनाबाईचा गळा उंच पट्टीतला. दुरवर ऐकू येणारा. तिच्या गीताच्या चाली ही बहारदार. त्यामुळे तिचे गायन तिच्या भावालाच नव्हे तर गावाला अवडत असे. ओळखू येई. पुरुष माणसेही तिच्या चालीची मोटेवर — गाडीवर गाणी म्हणताना नक्कल करीत.

**बारीक माझा गळा ।नको गाऊस गाडीवरी ॥**
**उभी सुंदरी माडीवरी ॥**

स्त्रियांची लोकगीते कधीही ऐकट्या स्त्रिने म्हटली जात नाही. किमान दोघी जणी तरी गात असतात. जात्यावरची ओवी दोघींनी गायली तरच ती रंगते. कधीकधी भाऊपणाने जोडलेल्या साळूबाई, राधाबाई सारख्या मैत्रीणी तिच्याकडे गाणी शिकायला येत. त्या म्हणत.

**तुझ्या गळ्यासाठी ।आली डोंगर चढूयानी ॥**
**शिणची गडयणी ।गळा दाखवावा काढूयानी ॥**

इथे गळा हा शब्द गीताची चाल या अर्थाने वापरला आहे. गीताला साथ देणारी स्त्री चांगली असती तर गीत रंगते. परिणाम कारक होते. गायनाचा आंनद मिळतो. म्हणून मैनाबाई तिचंही कौतुक गीतातूनच करते.

**गीत गाणारी परास ।साथ देणारी सोयरी ॥**
**शिणची गडयणी ।गळा राधाचा दुहेरी ॥**

गीत दुहीवडी म्हटली जातात. पण गळा दुहेरी असला तर गाणं भरुन येतं. साध्या चालीला गयडणी साथ देतं. पण मैनाबाई ठेवणीत्या अवघड चाली गाऊ लागली की मात्र साथ देणाऱ्या गडयणीची पंचाईत होई. मग मैनाबाई म्हणे.

**तुझ्या गळ्यासाठी ।माझा गळा किती मोडू ॥**
**शिणची गडयणी ।चल पेटीवर जोडू ॥**

अनुक्रमणिका

मैनाबाईचा स्वर उंच पट्टीवर चढे पण दुहेरी म्हणणाऱ्या साथीदारणीचा आवाज एवढा चढत नसे. मग सूर पेटीवर स्वर जोडून घेण्याची मनोहर कल्पना लढवली जाई. भजनात हे त्यांनी पाहिलेले असे. मग कधी तरी भजनाच्या चाली जात्यावर गायल्या जात. संत साहित्य आणि लोकसाहित्याचा अनुबंध तसा जुनाचं आहे.

अशा वेळी मैनाबाईच्या गायनाने. . . साथीदारीणी आश्चर्यकीत होत. लोक तिला का मानतात, गायनासाठी का बोलवितात याचा उलगडा होई. एखादीला तिचे फारच कौतुक वाटे. ती भारावून जाई आणि म्हणे.

**तुझ्या गळ्यासाठी ।माझा गळा ईकीन ॥**
**शिणची गडयणी ।तुला ताजव्यात जोखीन ॥**

ताजव्यात जोखण्यासारखीचं मैनाबाई गुणी कलावंत होती. पण लोकगीत म्हणणाऱ्या लोककलावंताची कदर आजचा समाज करीत नाही. याची खंत वाटते.

गंमत अशी की, एखाद्या साथ देणाऱ्या लहान मुलीचा गळा मैनाबाईच्या गळ्याशी जुळून जाई.

**बारीक माझा गळा ।जशी किंगरी किंकती ॥**
**नेणंती माझी मैना ॥साथ द्यायला शिकती ॥**

मैनाबाईची लहान बहीण सीताबाई अशीच गाणारी होती. तिचा ही गळा चांगला होता. एका खाणीची दोन रत्नं. कधी तरी ती बहिणीकडे आली की गाण फारच रंगे. लोक विचारीत.

**बारीक माझा गळा ।साथ देणारी कोण होती!**
**बहिणाई माझी बाई ।राती पाहुणी आली होती ॥**

मैनाबाईचा गळा चांगला होता. सुरावटही चांगली. म्हणायची ती ठेक्यात. तिला चालीही फार येत होत्या. परंपरेने चालत आलेल्या अनेक गीतांच्या चाली तिला येत होत्या. गाताना तिची ओवी मोडीवर सुटत असे. यमके साधली जात. गीतासाठी ती शब्दांची गेय रुपे तयार करीत असे. मागईन, वाकुईनी, सासईरा, बागंईडी असे 'ई' हा स्वर घालून गेयता वाढवी. कधी मांडवाच्या दारी, मांडबीवाच्या दारी, बोलत्याती बोलबित्याती अशी रुपे तयार करी. ओवीच्या चरणातली शब्दांचा तोल राखण्यासाठी अग, अगा, एवढी असे शब्द सुरवातीला घालत असे. गीताच्या शेवटी साजनेबाई, बाई असे शब्द घालून रंगत आणी. अशा प्रकारे गीत गेय व्हावे म्हणून ती अनेक गोष्टी करी. त्यामुळे तिचे गाणे रंगतदार होई. तिची गाणी ध्यान देऊन ऐकावी अशी तिची अपेक्षा. तिच्याच शब्दात –

**बारीक माझा गळा ।जसा पेटीचा बेंडबाजा ॥**
**ताईत माझा बंधू ।ध्यान देऊन ऐक राजा ॥**

❒❒❒

## सरलं दळण

आभिजनाचे गायन नमनाने सुरु होते आणि भैरवीने संपते. लोकगीतातील विधीगीते गणाने वा नमनाने सुरुवात होऊन आरतीने संपतात. तशी जात्यावरची ओवी 'पहिली माझी ओवी' ने सुरु होते आणि 'सरल दळण' या ओवीने संपते.

मैनाबाईच्या स्त्रीजीवनाची गीतगाथा संपली. तिचं दळणही संपल. कोणतंही कष्टाचं कंटाळवाणं काम संपविल्यावर एक प्रकारचे समाधान आणि आनंद वाटतो. मग ती पंढरीची लांब चालत तुडविलेली वाट असो किंवा तणाने भरलेली खुरपायची पात असो. दळणाचंही तसंच आहे. कामातही एक प्रकारचा आनंद असतो तो संपल्याची हुरहुरही असते. 'सरल दळण' मधील ओव्यातून असा आनंद आणि हुरहुर हे दोन्ही भाव व्यक्त झालेले दिसतात.

जात्यावरली ओवी श्रमपरिहारार्थ निर्माण झाली आहे. तसं दळण कष्टाचं पण जीवनाचं गाणं म्हणण्याच्या नादात ते केव्हा संपलं हे समजलंच नाही. मग मैनाबाईला वाटते.

**सरलं दळण ।सरती आरती कुणी केली ॥**
**शंभूदेवाची गिरजा नार ।दळू लागून गेली ॥**

काही पाठात विठ्ठलाची रुक्मिण दळू लागून गेली असे येते. जनाबाईच्या अभंगात भक्तीत तल्लीन होऊन कष्टाची कामे केली तर देव विठ्ठल आपल्याला मदत करतो अशी भावना येते. दळणकांडण, धुणीभांडी, झाडलोट तो करू लागतो असे तिला वाटते. तशाच प्रकारे गिरजा किंवा रुक्मिण आपल्याला दळू लागून गेली असे ओव्या गाण्यात तल्लीन झाल्यामुळे मैनाबाईला वाटते.

पूर्वी स्त्रियांना पहाटे नित्य दळावे लागे पण एकत्र कुटुंबात पैहीपाहुण्यांची वर्दळ फार असे. मग संध्याकाळीही दळण घालावे लागे. दळण संपत आले की एखादा दुसरा पाहुणा उतरे. ती म्हणते.

**सरलं दळण ।मी आणिक घेणार ॥**
**चुड्या माझ्या राजसाच्या घरी ।नित माणूस येणार ॥**

माणसं कुठं येतात जिथं आदरातिथ्य, पाहुणचार होतो तिथे. पूर्वीच्या खेड्यात ही अतिथ्यशीलता होती म्हणून नित्य माणूस येत होतं.

दळण संपलं की जात्यातील घास काढावा लागतो. त्यासाठी ते वेगाने फिरवावे लागते. तरीही जात्याच्या खुंट्याजवळ धान्य राहाते. त्याला निघळान म्हणतात. मग जात्याची पाळी उचलून ते तळीवर पसरावे लागते. मग फिरवले की जाते रिकामे होते.

**सरलं दळण ।निघळात पाण्यावाणी ।**
**पाठी भावंडं सोन्यावाणी ॥**

अनुक्रमणिका

असं निघळान काढताना जाते डाव्या हाताने फिरवू नये.

**सरल दळण ।नको निघळू डाव्याहाती ॥**
**धर्म केल्याला वायारती ॥**

वाणीने मांडलेल्या वाङ्यज्ञाचा शेवट पसायदानाने होतो. त्यात परमेश्वराकडे प्रार्थना केलेली असते. ज्ञानेश्वरीच्या शेवटी असे पसायदान येते. ज्ञानेश्वर अलौकिक मानवतावादी संत असल्यामुळे ते अखिल मानव जातीच्या कल्याणाचे पसायदान मागतात. जात्यावर ओव्या गाणाऱ्या मैनाबाईसारख्या स्त्रिया ह्या सामान्य संसारी स्त्रिया होत्या. त्यांचं भावविश्व कुटुंब-नात्यागोत्या पुरतं मर्यादित होतं. त्या सरलं दळणमधून आपल्या जीवाभावाच्या माणसाचं स्मरण करतात. त्यांना सुख-शांती-आरोग्य लाभावं अशी परमेश्वराकडे प्रार्थना करतात. गीतातून मांडलेल्या वाङ्यज्ञाचं पसायदान मागतात.

**सरल दळण ।खाली राहिली खडारेती ॥**
**जलम दिल्याली भागीरथी ॥**
**सरलं दळण ।माझ्या सुपात पाच गहू ॥**
**साता नवसाचं माझं भाऊ ॥**
**सरलं दळण ।पीठ भरून दोघी जाऊ ॥**
**धनी जात्याचं सुखी राहू ॥**
**सरलं दळण ।पीठ भराया नटली ॥**
**राघुबा साळाईला ।आवुक मागून उटली ॥**
**सरलं दळण ।सूप झाडूनी एकीकडं ॥**
**सासर माहेर ।आवुक मागती दोन्हीकडं ॥**

तिची प्रार्थना अशी. आपले आई-बाप, पती, मुलं आणि सासर-माहेरकडील माणसं सुखी, आनंदी आरोग्यसंपन्न राहावीत. त्यांना दीर्घ आयुष्य लाभावे. तिचं संगळ जगणंच कुटुंबासाठी. सासर-माहेरच्या माणसासाठी समर्पित झालेलं असल्यामुळे ती स्वतःसाठी काही मागत नाही. हे विशेषत्वाने लक्षात घेतलं पाहिजे. आपण मनापासून केलेला स्वयंपाक घरातल्या माणसांनी आवडीने खाल्ला की तिचं पोट भरतं. मग ती उरलंसुरलं शिळपाकं खावूनही समाधान मानते. तसं इथंही आहे. इतरांच्या सुखात ती स्वतःचं सुख मानते. इतरांसाठी जगण्यात परंपरागत स्त्री आपल्या जगण्याचे सार्थक मानत होती.

या स्त्रीगीतगाथेचा आणि दळणाचा शेवट तिच्याच शब्दात करू —

**सरलं दळण ।सरता अभंग मला येतो ॥**
**पंख मोराचा डहाळा देतो ॥**

❐❐❐

अनुक्रमणिका

**लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे –**
**शब्दार्थ**

| | | |
|---|---|---|
| अचाट | - | मोठा, भयंकर |
| अंजान | - | नाकळता मुलगा |
| अडत्या | - | अडत व्यापारी |
| अस्तुरी | - | पत्नी |
| अहेव | - | सौभाग्यवती |
| आकरी | - | निरसे, ताजे |
| आरवाळी | - | हुड, सतत धडपड करणारा |
| आगरी | - | अग्रभागी |
| आटुळा | - | शेतात पाखरे राखण्यासाठी केलेले माचाण |
| आयाबाया | - | बायका |
| आवुक | - | आयुष्य |
| इन | - | विहीन |
| इटली | - | विटली, मळकट झालेली |
| इटाक | - | कळकट |
| इटी | - | मरगळलेली, कोमेजलेली |
| इडी पीडी | - | दुःख, संकट |
| उधाळा | - | मोहर |
| औंदा | - | यंदा |
| अंगरखा | - | पैरण |
| अंदुस | - | अंधुक |
| कडीपाट | - | रेखीव व निटसपणे बांधलेली लाकडी इमारत |
| कडूस | - | तिन्हीसांज |
| कणकवार | - | पाळी न आलेली स्त्री, पुरूषाचा वारा न लागू दिलेली |
| कणकावला | - | मोठ्या जोमाने वाजविला |
| कल्हाळ | - | दारू विकणारी जमात |
| कल्हाळीन | - | दारू विकणारी स्त्री |
| करंगळ्या | - | पायांच्या करंगळीत घालायचा अलंकार |
| कवाड | - | दार |
| कळवातीन | - | नाचगाणं करणारी स्त्री |
| काचुळी | - | चोळी |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| कातर | - | मोडणी पुर्वी गोल उभी केलेली ज्वारी |
| कातीव | - | कोरून, कातून तयार केलेले |
| काया | - | शरीर |
| कारलं | - | गळ्यातल्या अलंकारातील कारल्यासारखा मणी |
| किकर | - | सुताराचे भोक पाडण्याचे हत्यार |
| कुरवली | - | वधुवराची बहीण |
| कोक | - | ओरडणे |
| कंडा | - | बैलाच्या गळ्यातील रंगीत दोर |
| कुंदा | - | एक प्रकारचे गवत |
| खटाल्याच | - | खूप माणसे असलेले एकत्र कुटूंब |
| खतरी | - | एक जात |
| खनाळ | - | चोळीचा लहान खण |
| खळीला | - | हट्टाला |
| खिल्लारी | - | गायी बैलाची एक देखणी जात |
| खुती | - | खोती |
| खंडिल | - | खंडून विकत घेणे |
| गजीभार | - | एक वजन |
| गडयनी | - | मैत्रीण |
| गवतार | - | गौमूत्र |
| गावंदरी | - | गावकुसाजवळची मोकळी जागा |
| ग्वात | - | गोत, गणगोत |
| गुज | - | सुखदुःखाच्या गोष्टी, हितगुज. |
| गुजरी | - | भावजय, दागिन्याने भरलेली स्त्री (गुजराती स्त्री) |
| गुत्ता | - | गुंत्ता |
| गोपा | - | मुल किंवा मुलीची प्रतिकृती |
| घसारटी | - | उताराची जागा |
| घुटी | - | बाळाला उगाळून दिलेला पौष्टिक पदार्थ |
| चाडद्वार | - | चाड्याचे दोर |
| चाडे | - | तिफणीवर नळ्याने पेरण्यासाठी लावलेली लाकडी हत्यार |
| चिकुलचिवंदा | - | चिखलाची तुडविलेली राड |
| चंची | - | पान खाण्याची पिशवी |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| चंदन बटवा | - | एक भाजी |
| चंदी | - | खुराक |
| चांगभलं | - | कल्याण होऊ दे, चांगले भले होऊ दे |
| टाकळं | - | डोके |
| डिकमल | - | दीपमाळ |
| डाव | - | खीर घोटण्याचे लाकडी साधन |
| डोरलं | - | मंगळसूत्र |
| तेलतवा | - | तळणाचा तवा |
| तेलंग्या | - | तेलाच्या पिवळ्या रंगाची |
| दिठी | - | दृष्टी |
| दिंडी | - | कपड्याच्या घड्या |
| दिसभूली | - | विश्मय चकीत, आश्चर्य चकीत, दिपून जाणे |
| दुचित | - | दुचिंत |
| दुंडीहात | - | दोन हात |
| देखुनपण | - | सौंदर्य |
| दोंद | - | पोट, पोटावरील वळ्या |
| दंडाला | - | विरळ झालेल्या साडीचा भाग काढून शिवणे |
| धज | - | नवसाचे पातळ कापड |
| धनपसा | - | खोंबारा |
| धाडणे | - | पाठविणे |
| धापधुप | | धाकधपाटशा दाखविणे |
| धुंडाळणे | - | शोधणे |
| नखीची | - | नखऱ्याची |
| नखीचे धोतर | - | काठावर नक्षी असलेले धोतर |
| नांद्रुकीचे झाड | - | एक प्रकारचे झाड/पिपंरीचे झाड |
| नावर्षी | - | नशीबात |
| निऱ्या | - | चुण्या |
| नेणंता | - | लहान |
| निघळान | - | दळण संपल्यावर जात्यांच्या पाळीत राहीलेला घास |
| नंदी | - | बैल |
| परास | - | पेक्षा |

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| पलाण | - | उंचावरल्या शेतीला पाणी देण्यासाठी केलेला उंच मातीचा दंड |
| पासारी | - | शिकार उठविणारे |
| पातरा | - | नाचगाण करणाऱ्या स्त्रिया |
| पारायाची | - | प्रहराची |
| पालव | - | पदर |
| पोवते | - | हळदीने रंगविलेला दोरा |
| फुटाणी रंगदाट | - | चांगली रंगीत चोळी |
| बडदास | - | व्यवस्था |
| बढाई | - | बडेजाव |
| बरांडी | - | ब्रांडी, एक दारू |
| बाजा | - | वाजाप |
| बाजुबंद | - | दंडातील चांदीचा अलंकार |
| बारव | - | गावालगतची पिण्याच्या पाण्याची विहीर |
| बावनी | - | बाव्वन कशी |
| रासनी | - | कुळव |
| रासबिदीला | - | राजरस्त्याला |
| लवणी | - | लवणातील ओहळाची जागा |
| लाख्या | - | लाख रुपये जवळ असलेला |
| लाग | - | चोळीचा काखेखालील बाहीचा भाग |
| लिंबार | - | लिंबाचे उभे वाढलेले झाड, गरडी लिंब |
| लोटांगण | - | देवापुढे लोळन घेण्याचा नवस |
| वज्र | - | ओझे |
| वटी | - | ओटी |
| वरझल | - | व्यर्ज करील |
| ववी | - | ओवी |
| वाकुऱ्या | - | सऱ्या |
| वाघाटी | - | एक कडवट फळ/वाघाटी |
| वारगीची | - | शिणची, वयाची |
| वावडी | - | उपणनी साठीचा तिवडा/आयाताकृती मोठा पतंग |
| वावर | - | मोकळे रान |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| वासुद | - | चिंता |
| वीसबंदाची रोपे | - | एक प्रकारची वनस्पती |
| वेस | - | गावकुसाचा दरवजा |
| वैराळ | - | बांगडीवाला |
| व्हंजी | - | नणंद |
| शिरवा | - | पावसाची झड |
| शिव | - | हद्द |
| शिवघडणी | - | मैत्रीण |
| संबला | - | पटक्याचा पाठीमागे सोडलेला पदर |
| सय | - | आठवण |
| सर | - | मण्याची माळ |
| सांजाई | - | संध्याकाळ |
| सैंदवा | - | भाग्यवान, सौभाग्यवती स्त्री |
| सोलाना | - | एक कडधान्य |
| संदुक | - | पेटी |
| हाळी | - | हाक |
| हुडकती | - | शोधणे |

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

अनुक्रमणिका



**डॉ. कृष्णा इंगोले**

जन्म १७ ऑगस्ट १९५३. सामान्य शेतकरी कुटूंबातून खडतर परिस्थितीत शिक्षण. १९८२ साली 'मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन' (इ.स. १८०० ते १९२०) या विषयावर शिवाजी विद्यापीठाची पीएच्.डी पदवी. १९८० पासून सांगोला महाविद्यालयात मराठी विषयाचे पदवी व पदव्युत्तर पातळीवर अध्यापन. एम्. फिल. व पीएच्. डी. चे मार्गदर्शन. शिवाजी विद्यापीठाच्या विविध समित्यावर काम. साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक चळवळीत सहभाग. १९८८ साली 'माणदेशः स्वरूप आणि समस्या' हा वैशिष्टपूर्ण संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध. त्यास आटपाडीचा गदिमा पुरस्कार. १९९६ साली 'गावरंग' कथासंग्रह प्रसिध्द. २००१ ला 'तुका म्हणे' ग्रंथ प्रसिध्द. त्यास म.सा.प. पुणे यांचा श्री. शा. हणुमंते व बामणीचा दमयंती डिकसळकर पुरस्कार. विविध नियतकालीकातून संशोधनपर, वैचारिक, ललित स्वरूपाचे २०० लेख प्रसिध्द. विविध प्रसंगी ३०० व्याख्याने, ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य, प्रबोधनपर वाङ्मय, संत साहित्य हे विशेष आवडीचे विषय.

लोकसाहित्याचे लोकगंगा पिढ्यान् पिढ्या अखंड वाहत आहे. त्यातील लोकसाहित्याने तर मानवी जीवन समृध्द केले आहे. स्त्रीगीते म्हणजे पारंपारिक स्त्रीजीवनाचा आरसाच होय. या आरशात तिच्या स्पंदनाचे, बंधनाचे आणि झिजलेल्या चंदनाचे हिशोब पारदर्शीपणे स्पष्ट जाणवतात. कष्टाबरोबर प्रामाणिक जगणे, निरपेक्ष मरणे आणि अखेर अनाम उरणे, यातंच तिच्या अस्तित्वाची साक्ष पटते. ही जाणीव ज्यांच्या लेखणीने टिपली ते सम्यक दृष्टीचे मींमासक डॉ. कृष्णा इंगोले हे एका शोध प्रकृतीचे नांव आहे. असे मी मानतो.

लोकशाहीत लोकसाहित्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. स्त्रीगीते म्हणजे साक्षात सारस्वताचे उगमस्थानच होय. अशा या साहित्याने वेदनेतील विद्रोह पचविला आहे. तर नकार हळूवार शब्दात डावलला आहे. म्हणूनच समूह मानसिकतेचा लोकाविष्कार लोकबंधातून मांडावा असा डॉ. इंगोले यांच्या लेखणीला निदिध्यास आहे. आशयाला भाष्याबरोबर चालते ठेवून मूळ शब्दापलिकडील अर्थ शोधणे हे तर त्यांच्या चिंतनशील प्रकृतीचे सामर्थ्यच होय.

या नव्या ग्रंथाच्या मांडणीत एक कल्पकता आहे. लेकीच्या जन्मापासून ते तिच्या अहेव मरणापर्यंतचा स्त्रीजीवन संग्राम लालित्यपूर्ण, प्रासादिक शब्दकळेतून सहजसाध्य उतरला आहे. तिचा श्वास, ध्यास आणि आत्मविश्वास त्यामुळेच अधिक अर्थपूर्ण बनला आहे. यातील प्रत्येक लेख म्हणजे स्वतंत्र विचारशिल्पकृतीच्या योग्यतेचा एकसंघ जिवंत साक्षात्कार आहे. असा साक्षात्कार असणे हीच तर ग्रंथाची खरी कसोटी ठरते.

**डॉ. सयाजीराजे मोकाशी**

**अनुक्रमणिका**